# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

## // महासभा बैठकीचे कार्यवृत्त //

**सभा क्रं. - ३३** **दि. १५/१२/२०२१**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.१५/१२/२०२१ बुधवार रोजी सकाळी ११.०० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.अवर सचिव, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.२२ ऑक्टोबर २०२१ अन्वये मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर. सौ.महाजन जयश्री सुनिल यांचे अध्यक्षतेखाली प्रत्यक्ष उपस्थितीने झालेल्या महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करून खालील मा.सभासद सभेस उपस्थित होते.

**मा.सौ.महाजन जयश्री सुनिल, महापौर तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| पाटील कुलभुषण विरभान, उपमहापौर | सोनवणे अश्विन शांताराम | सोनवणे अंजनाबाई प्रभाकर |
| नेरकर सरीता अनंत | पाटील सचिन भिमराव | पाटील रेखा चुडामण |
| पोकळे दिलीप बबनराव | चौधरी मनोज सुरेश | सोनवणे सुरेखा सुदाम |
| खान रूकसाना बी गबलु | भोईटे लताबाई रणजीत | ढेकळे सदाशिव गणपत |
| सोनवणे कांचन विकास | पाटील प्रतिभा सुधीर | महाजन सुनिल सुपडु |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | पाटील चंद्रशेखर शिवाजी | नाईक प्रशांत सुरेश |
| बाविस्कर किशोर रमेश | कापसे मयुर चंद्रकांत | अत्तरदे रजनी प्रकाश |
| सपकाळे मिना धुडकु | कापसे प्रतिभा चंद्रकांत | काळे रेश्मा कुंदन |
| कोळी दत्तात्रय देवराम | देशमुख प्रतिभा गजानन | आहुजा मनोज नारायणदास |
| सपकाळे रंजना भरत | पाटील विजय पुंडलिक | पाटील मिनाक्षी गोकुळ |
| कोल्हे प्रविण रामदास | सोनवणे सुरेश माणिक | सोनार रंजना विजय |
| सनकत चेतन गणेश | बारी शोभा दिनकर | खडके विश्वनाथ सुरेश |
| सोनवणे भारती कैलास | शेख हसीनाबी शरिफ | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| चौधरी चेतना किशोर | भिल पार्वताबाई दामु | देशमुख सुन्नाबी राजु |
| सोनवणे मुकुंदा भागवत | पाटील उषा संतोष | शेख सैईदा युसुफ |
| भंगाळे विष्णू रामदास | कोल्हे सिंधु विजय | पटेल इब्राहिम मुसा |
| तायडे ज्योती शरद | कोल्हे ललीत विजय | सोनवणे निता मंगलसिंग |
| लढ्ढा नितीन बालमुकुंद | बरडे नितीन मनोहर | सोनवणे विक्रम किसन |
| काळे अमित पांडुरंग | बेंडाळे उज्वला मोहन | **स्विकृत सदस्य** |
| चौधरी मंगला संजय | राणे गायत्री इंद्रजित | सोनवणे कैलास नारायण |
| ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह | जोशी अनंत हरिश्चंद्र | त्रिपाठी विशाल राधेशाम |
| सोनवणे धीरज मुरलीधर | तायडे सुरेखा नितीन | चौधरी महेश रतन |
| भोळे सिमा सुरेश | चव्हाण ज्योती बाळासाहेब | |
| काळे दिपमाला मनोज | मराठे जितेंद्र भगवान | |

सदर सभेस मा.आयुक्त, श्री.सतिश कुलकर्णी, मा.अतिरीक्त आयुक्त.डॉ.विद्या गायकवाड, नगरसचिव, श्री.सुनिल गोराणे, मा.उपायुक्त,श्री.शाम गोसावी, मा.उपायुक्त श्री.प्रशांत पाटील, मुख्यलेखाधिकारी, श्री.कपील पवार, नगररचनाकार, श्री.अशोक करवंदे, मा.सहा.आयुक्त, श्री.पवन पाटील, तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरू करण्याचे निर्देश दिले.**

**नगरसचिव :-** आजच्या या प्रत्यक्ष उपस्थितीत उपस्थित असलेल्या सन्मा.सदस्यांचा स्वागत आहे. आज भारताचे लोहपुरुष आणि आपल्या देशाचे पहिले प्रधानमंत्री व गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांची आज ७१ वी पुण्यतीथी आहे. त्यांचे दि.१५ डिसेंबर १९५० रोजी मुंबई येथे निधन झाले. त्यामुळे त्यांचे अभिवादन करणेसाठी मा.महापौर महोदया, मा.उपमहापौर महोदय व सन्मा.सभागृहाला विनंती करतो आपण मा.श्री.सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेला अभिवादन करायचे आहे.

**(मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.आयुक्त व सर्व सभागृहातील सन्मा.सदस्य उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांनी तसेच नगरसचिव यांनी मा.श्री.सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले.)**

**नगरसचिव :-** तद्नंतर सन्मा.सदस्य श्री.राजेंद्र झिपरु पाटील, श्री.राजेंद्र नारायण मराठे व श्री.सुनिल वामनराव खडके यांचे रजेचे अर्ज आलेले असुन ते मा. पिठासिन अधिकारी यांनी मंजूर केलेले आहेत.

**(नगरसचिव यांनी श्रध्दांजलीच्या प्रस्तावांना वाचायला सुरवात केली.)**

**श्री.कैलास सोनवणे :-** गोराणे साहेब, सगळे श्रध्दांजलीचे प्रस्ताव मान्य, सगळे. उठा.

**नगरसचिव :-** बाकीचे आलेले आहे ना सदस्यांचे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सगळे सगळे.

**श्री.कैलास सोनवणे :-** सगळे कॉमनच आहे.

**नगरसचिव :-** सर्व सभागृहाला विनंती करतो की, सर्वांनी दोन मिनीट श्रध्दांजलीसाठी उभे राहायचे आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६२५ पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे श्रध्दाजंलीचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | श्रध्दांजलीचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | महाजन जयश्री सुनिल, मा.महापौर | देशाचे संरक्षण दलप्रमुख (सीडीएस) जनरल स्व.बिपीनजी रावत व त्यांच्या पत्नी स्व.मधुलिका रावत व त्यांचेसह हौतात्म्य पत्करलेल्या सर्व १४ विर जवान यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| २. | कोल्हे ललित विजय, सभागृह नेता | १) देशाचे संरक्षण दलाचे प्रमुख स्व.बिपीनजी रावत व त्यांचेसह हौतात्म्य पत्करलेल्या सर्व विर जवान २) जळगांव जिल्हा परिषदेचे माजी पदाधिकारी स्व.दादासो, बळीराम तोताराम सोनवणे ३) जळगांव शहरातील स्व.किशोर वामनशेठ बडगुजर ४) जळगांव शहरातील स्व.अनिल मराठे यांचे वडील नामे स्व.शालिक दगडु मराठे (सुर्यवंशी) ५) जळगांव शहरातील श्री.गजानन सोपान पाटील यांचे जावाई स्व.सुशांत भैरव पाटील ६) मनपा सन्मा.सदस्या,सौ.शोभा दिनकर बारी यांचे दिर स्व.सुनिल रामचंद्र बारी यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ३. | भोळे सिमा सुरेश | १)श्री.स्वामी समर्थ केंद्र प्रताप नगर येथील सेवेकरी स्व.पी.एस.शिंपी (भाऊसाहेब) २) नगरसेवक श्री.महेश रतन चौधरी यांच्या आई स्व.हिराबाई रतन चौधरी यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ४. | बाविस्कर किशोर रमेश सोनवणे कांचन विकास | १) जळगांव जिल्हा परिषदेचे माजी पदाधिकारी स्व.दादासो, बळीराम तोताराम सोनवणे २) सन्मा.सदस्य,श्री.किशोर रमेश बाविस्कर यांचे मावस भाऊ स्व.नरेश रविंद्र सपकाळे यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ५. | भंगाळे विष्णु रामदास | १) माजी महापौर श्री.किशोर पाटील यांचे वडील स्व.काशिनाथ पाटील २) माजी उपमहापौर स्व.गणेश बुधो सोनवणे ३) आर.ज्वेलर्सचे महाव्यवस्थापक स्व.प्रकाशचंद्र नाहटा ४) गणेश वाडी येथील श्री.सुरेश व किरण सांखला यांच्या मातोश्री स्व.देविकाबाई सांखला ५) अयोध्या नगर येथील रहिवासी भंगाळे मटन |

| | | |
|---|---|---|
| | | हॉटेलचे संचालक दिलीप भंगाळे यांच्या पत्नी स्व.वैशाली दिलीप भंगाळे ६) मेहरुण येथील नगरसेविका सुरेखाबाई सोनवणे यांचे पती स्व.सुदाम सोनवणे ७) अशोक व राजीव बियानी यांच्या मातोश्री स्व.कुसुमदेवी गिरधर बियानी ८) विदयुत कॉलनी येथील जितेश व कुणाल तिवारी यांचे वडील स्व.विश्वास तिवारी ९) नाटयकर्मी व गुरु ॲडव्हार्टझिंगचे संचालक धनंजय धनगर यांचे वडील मनपा सेवानिवृत्त अभियंता स्व.संतोष धनगर १०) डॉ.श्रेणिक भंसारी यांचे वडील स्व.अशोक भंसारी ११) शनिपेठेतील प्रेस फोटो ग्राफर अतुल वडनेरे यांचे मोठे बंधू स्व.अनिल वडनेरे १२) नवी पेठ अशोक खादी भांडारचे संचालक अशोक पिंगळे यांच्या पत्नी स्व.नंदा पिंगळे १३) एमआयडीसी येथील कुलदीप कोठारी यांचे वडील स्व.प्रकाश कोठारी १४) रोटरीचे मेंबर स्व.आनंद खांबेटे १५) गांधी नगर येथिल रहिवासी स्व.हर्षल कोल्हे १६) कुन्नर येथे झालेल्या हेलिकॉप्टर अपघातात शहीद झालेले पहिले (तिन्ही सैन्य दलाचे प्रमुख) संरक्षण दलप्रमुख सीडीएस कै.बिपीन रावत व त्यांच्या पत्नी कै.मधुलिका रावत यांच्या सह ब्रिगेडर कै.एल.एम.लिद्दर, लेफ्टनंट कर्नल कै.हरजिंदर सिंग, नाईक कै.गुरुसेवक सिंग, नाईक कै.जितेंद्रकुमार, लान्स नाईक कै.विवेककुमार, लान्स नाईक कै.बी.साई तेजा, हवालदार कै.सतपाल आदी कै.१२ अधिकारी, १७) श्रीकृष्ण कॉलनी येथील पोलीस हवालदार नितीन कोल्हे यांच्या मातोश्री कै.पदमाबाई जर्नादन कोल्हे, १८) विसनजी नगर येथील ओमप्रकाश (पप्पण) शर्मा यांच्या पत्नी व राज, अमर व ऋषी शर्मा यांच्या मातोश्री कै.तार ओमप्रकाश (पप्पण) शर्मा, १९) जुने जळगांव विठ्ठल पेठ येथील अनिल व दिपक मराठे यांचे वडील कै.शालीग्राम दगडू मराठे, २०) डॉ.मिलींद वायकोळे यांचे वडील तंत्रनिकेतन महाविदयालयाचे निवृत्त प्राचार्य व संजीवन हार्ट हॉस्पिटलचे संचालक कै.रघुनाथ दोधू वायकोळे, २१) देवेंद्र व जितेंद्र अग्रवाल यांचे वडील कै.सी.एम.अग्रवाल यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ६. | कोळी दत्तात्रय देवराम | १) जळगांव शहर महानगरपालिकेचे माजी प्रभारी महापौर स्व.गणेश बुधो सोनवणे २) जळगांव शहर नपाच्या माजी नगरसेविका स्व. रुख्माबाई सपकाळे ३) वाल्मिक नगर,कांचन नगर परिसरातील नागरीक स्व.डिगंबर सोनवणे ४) वाल्मिक नगर, कांचन नगर परिसरातील नागरीक स्व.सुपडू साळुंखे ५) वाल्मिक नगर, कांचन नगर परिसरातील नागरीक स्व.कडू सपकाळे ६) वाल्मिक नगर, कांचन नगर परिसरातील नागरीक स्व.हिम्मत दगडू कोळी यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ७. | सनकत चेतन गणेश | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे माजी जिल्हाध्यक्ष तथा माजी प्रदेश अध्यक्ष अल्पसंख्याक स्व.अ.गफ्फार अ.रज्जाक मलिक यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ८. | पाटील मिनाक्षी गोकुळ | कुन्नर येथे झालेल्या हेलिकॉप्टर अपघातात शहीद झालेले पहिले (तिन्ही सैन्य दलाचे प्रमुख) संरक्षण दलप्रमुख सीडीएस कै.बिपीन रावत व त्यांच्या पत्नी कै.मधुलिका रावत यांच्या सह ब्रिगेडर कै.एल.एम.लिद्दर, लेफ्टनंट कर्नल कै.हरजिंदर सिंग, नाईक कै.गुरुसेवक सिंग, नाईक कै.जितेंद्रकुमार, लान्स नाईक कै.विवेककुमार, लान्स नाईक कै.बी.साई तेजा, हवालदार कै.सतपाल आदी कै.१२ अधिकारी, यांचे दु:खद निधनाबद्दल. |

श्रध्दांजली बाबत आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उपरोक्त दु:खद घटनेबाबत सभागृहाला अत्यंत दु:ख होत आहे. परमेश्वर इहलोक सोडून गेलेल्या मृतात्म्यास चिरशांती प्रदान करो, त्यांच्या समस्त कुटूंबियांचे दु:खात सभागृह सहभागी असून त्यांचे कुटूंबियांना, मित्र परिवारास दु:ख सहन करण्याची शक्ती प्रदान करो या भावनेसह सभागृहाने दोन मिनीटे शांत उभे राहून दिवगंत आत्म्यांना श्रध्दांजली अर्पण केली.

**नगरसचिव :-** अभिनंदनाचे प्रस्ताव.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** आता जे श्रध्दांजली व अभिनंदनाचे प्रस्ताव मांडले गेले, संबंधीत जी व्यक्ती आहे त्यांच्या घरी घरपोच महानगरपालिकेतर्फे ते प्रस्ताव पाठविण्याची व्यवस्था करावी. कारण त्याच्या पर्यंत ते जातात अशी माहिती मिळालेली नाही. कारण हे प्रस्ताव जे सन्मा.सदस्य मांडतात त्यांच्या कुटुंबियांना जरी मिळाले तर ते अधिक चांगल काम होईल.

**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सदस्यांनी वंदेमातरमसाठी उभे रहायचे आहे.

**सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरू करण्याचे निर्देश दिले.**

**सभेच्या सुरूवातीस वंदेमातरम ने सुरूवात करण्यात आली.**

**नगरसचिव :-** यानंतर सन्मा.सदस्यांकडुन अभिनंदनाचे प्रस्ताव प्राप्त झालेले आहे. ते पुढील प्रमाणे, यानंतर मा.उपमहापौर महोदय एक अभिनंदनाचा प्रस्ताव मांडत आहे.

**मा.उपमहापौर :-** जळगांव जिल्हा बँकेवरती जळगांव शहराचे प्रथम नागरीक आदरणीय जयश्रीताई महाजन यांची बिनविरोध निवड झाल्याने मी सर्व सदस्यांच्या वतीने महापौर जयश्रीताई महाजन यांचा सभागृहामध्ये अभिनंदनाचा प्रस्ताव मांडत आहे. येणाऱ्या काळामध्ये शेतकऱ्यांना बँकेच्या माध्यमातुन न्याय देण्याचा प्रयत्न ते निश्चितपणे करतील याची मला खात्री आहे. व जेव्हा जेव्हा शेतकऱ्यांना आपात्कालीन समस्या जसे आपण जसे आपण म्हणतो नैसर्गीक आपत्ती असो, दुष्काळ असो, ओला दुष्काळ असो. ज्या ज्या वेळेस शेतकऱ्यांना त्यांच्यासाठी मदत लागेल त्या त्या वेळेस आदरणीय जयश्रीताई महाजन निश्चितच बँकेच्या माध्यमातुन उभे राहतील. अशी आशा व्यक्त करतो व त्यांची जिल्हा बँकेत बिनविरोध निवड झाल्याबद्दल या ठिकाणी अभिनंदनाचा प्रस्ताव देखील मांडतो.

**श्री.कैलास सोनवणे :-** मला बोलायचे आहे ताई मी परवानगी अगोदर मागितलेली आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** श्री.शामभाऊ सोनवणे यांचाही अभिनंदनाचा प्रस्ताव मांडत आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** सभा बेकायदेशीर कशी चालेल, उपमहापौरांना तिथे बसण्याचा अधिकार आहे का पहिले ते सांगा मला.

**मा.उपमहापौर :-** त्याच बरोबर जिल्हा बँकेमध्ये उपाध्यक्ष पदी माजी नगरसेवक आदरणीय श्री.शामभाऊ सोनवणे यांची देखील निवड झाल्याबद्दल त्यांचा देखील या ठिकाणी सभागृहामध्ये अभिनंदनाचा प्रस्ताव मांडत आहे शामभाऊंच्या हातुन देखील शेतकऱ्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासंदर्भामध्ये चांगला एक नविन पायंडा आणि नविन काळ बँकेच्या माध्यमातुन सुरु होणार आहे. या ठिकाणी मी त्यांचे देखील अभिनंदन करतो.

**मा.महापौर :-** अभिनंदनाचे जे प्रस्ताव आहे ते पहिले वाचुन घेऊ द्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** या सभागृहाची सुध्दा अपेक्षा आहे. २ कोटी ८१ लक्ष रुपयाचे लिंकींग शेअर्सची रक्कम सुध्दा जे.डी.सी.सी. बँकेजवळ जमा आहे. तर आम्ही अपेक्षा व्यक्त करतो की, ती रक्कम महानगरपालिकेला मिळुन देण्याच्या संदर्भात सुध्दा आपण तेथे प्रयत्न करालच जेणे करुन या महानगरपालिकेच्या अंतर्गत ज्या काही विकास कामांना विलंब होत आहे. त्याच्या मध्ये तो एक मोठा हातभार लागेल ऐवढीच अपेक्षा व्यक्त करतो आणि पुन्हा आपले मनापासुन अभिनंदन व्यक्त करतो.

**मा.महापौर :-** अभिनंदनाचे प्रस्ताव होवु द्या अभिनंदनाचे प्रस्ताव बाकी आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** सगळे बँकेचेच आहे का ते ?

**नगरसचिव :-** नाही आहे काही वेगळे.

**श्री.कैलास सोनवणे :-** सगळेच मंजुर करा ना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** गोराणे साहेब, सगळेच मंजुर करुन घ्या.

**नगरसचिव :-** फक्त सन्मा.सदस्यांचे नावे वाचुन घेतो यांचे प्रस्ताव आलेले आहे असे.

**श्री.कैलास सोनवणे :-** वाचा गोराणे साहेब वाचा, तुमच्याकडे भरपुर वेळ आहे.

**नगरसचिव :-** ठिक आहे. या ठिकाणी बहुतांश सदस्यांचे अभिनंदनाचे प्रस्ताव प्राप्त झालेले आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.६२६ पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे अभिनंदनाचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | अभिनंदनाचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १ | महाजन जयश्री सुनिल<br>मा.महापौर | १) हरनाज संधु हीने ७९ देशांच्या स्पर्धकांना मागे टाकत यंदाचा विश्व सुंदरी (मिस यनिव्हर्स) मान मिळविलेबद्दल, २) श्री.गुलाबरावजी देवकर यांची जळगांव जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या अध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल, ३) श्री.श्यामकांतजी सोनवणे यांची जळगांव जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या उपाध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल हार्दीक अभिनंदन. |
| २ | भंगाळे विष्णू रामदास<br>पाटील सचिन भिमराव | जळगांव जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संचालकपदी मा.महापौर,जयश्री सुनिल महाजन श्री.शामकांत सोनवणे, आ.किशोरआप्पा पाटील, माजी चेअरमन रोहीणीताई खडसे खेवलकर, आ.श्री.चिमणराव पाटील, श्री.अमोल पाटील, श्री.मेहताबसिंग, श्री.संजयनाना मुरलीधर पवार आदी इतर सर्व विजयी संचालक तसेच अध्यक्ष पदी श्री.गुलाबरावजी देवकर यांची व श्री.श्यामकांतजी सोनवणे यांची उपाध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल हार्दीक अभिनंदन |
| ३ | भंगाळे विष्णु रामदास<br>कोल्हे ललित विजय | १) मा.सौ.जयश्रीताई सुनिल महाजन यांची महापौरपदी निवड झाल्याबद्दल २) मा.श्री.कुलभुषण विरभान पाटील यांचे उपमहापौर पदी निवड झाल्याबद्दल हार्दीक अभिनंदन. |
| ४ | चौधरी मंगला संजय | शिक्षण, बाल संस्कार क्षेत्रातील अतुलनिय योगदानाबद्दल परमपुज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या कार्याची लंडनच्या वर्ड बुक रेकॉर्ड मध्ये नोंद झाल्याबद्दल हार्दीक अभिनंदन. |
| ५ | सोनवणे कांचन विकास | कोरोना प्रतिबंधक राष्ट्रीय लसीकरण मोहिमेत अहोरात्र अथक मेहनत घेवुन मोठया प्रमाणात लसीकरणाची टक्केवारी वाढवून उत्कृष्ठ कामकाज केलेबद्दल मनपा दवाखाने विभागातील प्रमुख वैदयकीय अधिकारी, एम.ओ.अधिकारी, सिस्टर्स व आशावर्कर या कोरोना वारियर्स यांचे हार्दीक अभिनंदन. |
| ६ | काळे रेश्मा कुंदन<br>सोनवणे सुरेखा सुदाम<br>चव्हाण ज्योती बाळासाहेब | जळगांव जिल्हा बँक संचालक पदी सौ.जयश्री सुनिल महाजन यांची निवड झालेबद्दल हार्दीक अभिनंदन. |

| | | |
|---|---|---|
| ७ | कापसे मयुर चंद्रकांत | जळगांव शहरातील रहिवासी व कृषी विभागातील कृषी उपसंचालक श्री.अनिल भोकरे साहेब यांचे चिरंजीव अथर्व भोकरे यांची भारतीय नौदलात सब लेफ्टनंट पदी नियुक्ती झालेबद्दल हार्दीक अभिनंदन. |
| ८ | घेंगट अजय ईश्वर,जिल्हाध्यक्ष, अखिल भारतीय सफाई मजदूर संघ | जापान येथील टोकियो येथे संपन्न झालेल्या ऑलोम्पीक स्पर्धेत सहभागी होवुन भारताला सुवर्ण/रजत/कास्य पदक मिळवुन दिल्याबद्दल विजेत्या खेळाडूंचे हार्दीक अभिनंदन. |

उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने वरील सर्व पदाधिकारी, सन्मा.नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते व सामाजिक संस्था यांचे हे सभागृह अभिनंदन करीत असुन उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत आहे.

**नगरसचिव :-** यानंतर मा.महापौर यांच्या संमतीने या ठिकाणी लसीकरण संदर्भात तसेच.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौरताई मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** नमस्कार, जवळपास दोन वर्षापासुन आपली ऑनलाईन सभागृहाचे कामकाज सुरु आहे. ऑनलाईन सभागृहाचे काम सुरु असतांना आपल्याला बरेच प्रमाणामध्ये अडचणी येत होत्या. नेट प्रॉब्लेम असेल किंवा आवाज ऐकु येत नव्हता किंवा सन्मा.सदस्य यांना आपली भुमिका स्पष्टपणे मांडता येत नव्हती परंतु दोन वर्षानंतर आपण आज प्रथमत: ऑफलाईन सभा आपल्या सभागृहात घेण्यात आलेली आहे आणि प्रत्येक सन्मा.सदस्य यांना बोलण्याची संधी दिली जाणार आहे. फक्त एक नम्रपणे मी आपल्या सर्वांना विनंती करते अतिशय शांततापुर्ण वातावरणामध्ये ही महासभा पार पाडावी अशी अपेक्षा मी आपल्याकडुन व्यक्त करते. आणि सर्व सन्मा.सदस्यांनी मास्क वापरायचे आहे. सोशल डिस्टन्स ठेवायचे आहे. आणि पत्रकार बंधुंसाठी स्पेशल उजवीकडे जागा आपण राखिव ठेवली आहे. आणि प्रत्येकाने फक्त ज्या विभागासंबंधीत विषय असतील त्यांनीच येथे या ठिकाणी थांबायचे आहे. बाकीच्या सर्वांनी बाहेर थांबायचे आहे. अनावश्यक गर्दी या ठिकाणी होणार नाही याची काळजी सर्वांनी घ्यायची आहे. त्यानंतर आयुक्त साहेब आपण बोलावे.

**मा.आयुक्त :-** धन्यवाद सन्मा.महापौरताई, आपण सभा कामकाजा व्यतिरिक्त अन्य दोन विषयांबद्दल बोलायला परवानगी दिली. त्याबद्दल आपण पुनश्च धन्यवाद. एक दोन विषय जो नागरीकांच्या वतीने महत्वाच्या आहे. त्या ठिकाणी मी सन्मा.सदस्यांचे लक्ष वेधु ईच्छितो. आणि तसेच आपल्या मार्फत सर्व शहर वासीयांशी विनीमय करायचे आहे. दोन महत्वाची गोष्टींसाठी पहिली म्हणजे लसीकरणाची. आता दुसरे लाटेची जवळपास सांगता झाली असे आपण सगळे जण मानतो. अश्या मध्ये लसीकरणाचा वेग हा ज्या प्रमाणामध्ये अपेक्षित आहे त्या प्रमाणामध्ये घेता दिसत नाही. बऱ्याचश्या नागरीकांच्या मनात आता दुसरी लाट ओसळलेली आहे. तिसरी लाट येईल नाही येईल हा विषय मत मतांचा आहे. अश्या वेळेला जादा सिक्युरीटीच्या भावनेतुन आता आपल्याला लसीकरण करायची आवश्यकता नाही की काय ?अश्या प्रकारची एक्सट्रा सेफ्टीच्या भावना तयार झालेली आहे. आपल्या शहराचा जर विचार केला तर साधारणता १८ अधिक लोकसंख्या असलेली आपल्याकडे ३ लाख ९५ हजार असे नागरीक आहे. यापैकी आता पर्यंत किमान एक डोस घेतलेल्यांची संख्या. ती फक्त ३ लाख ३० हजार आहे. म्हणजे अजुन जर बघितले, तर ६० ते ६५ हजार नागरीक आपल्या शहरात असे आहेत की, ज्यांनी एकही डोस घेतलेला नाही. ज्यांनी पहिला डोस घेतला २८ दिवसाचा असेल किंवा ८४ दिवसाचा डयु डेट असेल. याबाबतीत जर आपण हिशोब केला तर २३ हजार नागरीक असे आहे की, ज्यांचा सेकंड डोस डयु आहे. परंतु अद्यापपावेतो त्यांनी तो घेतलेला नाही. तर माझी सर्व सन्मा.सदस्यांना या निमित्ताने विनंती आहे. आपण आपआपल्या प्रभागामध्ये सतत आपला लोकांशी संपर्क

असतो. आपण स्वत: आपले कुटुंब, आपले कार्यकर्ते, यांच्या मार्फत आपल्या वार्डामध्ये ज्या नागरीकाने एकही डोस घेतला नसेल व ज्यांचा दुसरा डोस ड्यु आहे. त्याला आपण आव्हान करावे.आता जर आपण बघितले तर फक्त आपण सुरुवातीला आपल्या लसीकरण केंद्रावर लसीकरण करीत होतो. परंतु आता केंद्रवर नागरीकांनी यायची वाट न पहाता आपण नागरीकांपर्यंत पोहचतो आहे. आणि शासनाची जी हर घर दस्तक, म्हणजे प्रत्येक घरावर जाऊन आपल्याला दस्तक देऊन लसीकरण करुन घ्या. ही मोहिम आपण संपुर्ण शहरामध्ये, जिल्ह्यामध्ये, राज्यामध्ये राबवितो आहे. आपल्या आरोग्याचे कर्मचारी आशा वर्कर हे अहोरात्र मेहनत करत आहे. अश्या वेळेला जर आपली सर्व सन्मा.सदस्यांची साथ मिळाली तर मला खात्री आहे की, आपल्या शहराचे १००% लसीकरण अस उद्दिष्ट आपण लवकर पुर्ण करु. किती तरी कोविडची भिती आता कमी वाटत असली, तरी सुध्दा येणारा नविन वैरियंट ओमायक्रॉन किंवा तिसरे लाटेची भिती अजुन ही तज्ञांनी नाकारलेली नाही. अश्या परिस्थिती मध्ये आपल्याला जर शरीराला कोरोनाच्या आजारापासुन दुर ठेवायच असेल तर लसीकरण आणि बाकीचे मास्क सॅानिटाईजर या गोष्टी अतिशय महत्वाच्या आहे. लसीकरण आज मोफत आपण करत आहोत. प्रत्येकाच्या घरी जाऊन प्रत्येकाच्या गल्लोगल्ली जाऊन लसीकरण करायची आपली तयारी आहे. पुन्हा एकदा मी आपल्या सर्वांना विनंती करेल की, आपआपल्या प्रभागांमध्ये महापालिकेमार्फत १००% लसीकरणासाठी आपण मदत करावी प्रयत्न करावा. मला खात्री आहे की, आपण आपले शहर कोविड पासुन सुरक्षित ठेवु शकतो. दुसरा जो महत्वाचा विषय आहे. तो आहे घरपट्टीच्या शास्तीसाठी जी आपण अभय योजना महानगरपालिकेने जाहिर केलेली आहे. मागच्या वेळेस ही आपण जाहिर केलेली होती. या वर्षीही आपण साधारणता १६ नोव्हेंबर पासुन १५ डिसेंबर २०२१ पर्यंत अशी योजना आपण जाहिर केलेली होती. शहरामधील बऱ्याच नागरीकांनी याचा फायदा घेतला, आणि त्याला प्रतिसाद ही मिळाला, काल या विषयी आपल्या आदरणीय महापौरांनी  एक सुचना केली की, नागरीकांना पैसे भरायचे आहे काही जणांना उशिरा माहिती झाली आहे. काही जणांना पैश्यांची तजवीज करण्यासाठी वेळ लागलेला आहे. अश्या वेळेला आपण ही मुदत जर थोडीशी वाढवुन दिली तर अनेक नागरीक त्याचा फायदा घेतील. नागरीक ही या शास्तीपासुन मुक्त होतील. आणि महानगरपालिकेचे ही उत्पन्न वाढेल. मा.महापौरांच्या सुचनेचे मान ठेवुन आपण या अभय योजनेची मुदत वाढवुन दिलेली आहे. आणि आता आपण २१ डिसेंबर २०२१ पर्यंत जी काही त्यांना शास्ती लागलेली आहे त्याच्यामध्ये आपण ९०% पर्यंतची माफी दिलेली आहे. जर त्यानी उर्वरित रक्कम एक रकमी भरली त्याला शास्तीमध्ये ९०% माफी मिळणार आहे. त्यानंतर २२ डिसेंबर पासुन ५ जानेवारी २०२२ पर्यंत ही शास्तीची रकमेमध्ये ७५% सुट मिळणार आहे. आणि तिसरा जो टप्पा आहे. तो ६ जानेवारी पासुन ते २० जानेवारी २०२२ पर्यंत हा शास्तीमध्ये ५०% ची माफी आहे. मी सदस्यांना आणि नागरीकांना विनंती करतो की, या वर्षी खुप मोठया प्रमाणावर धोरणामध्ये बदल झालेला आहे. कदाचित या बाबी नागरीकांच्या लक्षात आल्या नसतील. आपल्यालाही कदाचित या गोष्टींची माहिती मिळाली नसेल. एक मी माझे कर्तव्य समजतो की, आपल्यापर्यंत ही माहिती द्यावी. आपल्या नगरपालिकेच्या नियमाप्रमाणे ज्या वर्षाचा त्या वर्षाच्या ड्यु डेटला भरला नाही. तर जेवढा विलंब होईल त्याला दर महिन्याला २% अशी शास्ती लावण्याची नियमामध्ये तरतुद आहे. आपला १९४९ चा कायदा आहे. कायद्यातही तरतुद आहे परंतु आपण आपल्या नगरपालिका हद्दीमध्ये कितीही वर्षाची थकबाकी असेल, तरी सुध्दा आपण दर दोन महिन्याला २% याप्रमाणे आकारणी न करता जास्तीच्या २४% ऐवढेची आपण शास्तीची आकारणी करतो. म्हणजे जर सामान्य नागरीकानी ५ वर्ष टॅक्स भरले नाही. तर त्याला नियमाप्रमाणे ६० महिन्याचे ६० x ०२ म्हणजे ६० महिन्याचे १२०% याप्रमाणे म्हणजे मुद्दलापेक्षा टॅक्स जास्त लागत असत. परंतु आपण २४% च लावलेली होती. परंतु याच्या मध्ये कायद्यात असलेली तरतुदीची अंमलबजावणी आणि नागरीकांना सुध्दा वेळेवर टॅक्स भरण्याची सवय लागावी. महानगरपालिकेचे उत्पन्न आपल्या तिजोरी मध्ये जमा व्हावे. या चांगल्या हेतुने ही योजना या

वर्षापासुन सुरु केलेली आहे. आणि आता केवळ २४% ची आकारणी न करता जेवढा कालावधी असेल त्याला दर महिन्याला २% असे देतो आहे. जर नागरीकांनी आपली बिले बघितली तर त्याच्या मध्ये शास्तीच्या रकमा दरवर्षी पेक्षा मोठया प्रमाणात आहे. परंतु याचा नागरीकांवर भार येवु नये. म्हणुन आपण ही सल्लग २ वर्ष आपण ही शास्तीसाठी योजना जाहिर केलेली आहे. जर आता कमी भरली, पुढच्या आठवडयामध्ये तर जी काही शास्ती बाकीची आहे. त्यापैकी ९०% ची माफी मिळणार आहे. नागरीक या आर्थिक बोझ्यापासुन मुक्त होऊ शकतात. या निमित्ताने मला सभागृहातील सर्व सन्मा.सदस्यांना विनंती करायची आहे की, आपण या शास्तीच्या अभय योजनेचा फायदा नागरीकांनी घ्यावा. यादृष्टीने आपल्या संपर्कातले नागरीकांना याची जास्तीत जास्ती माहिती द्या. जेणे करुन नागरीकांवरचा बोझा कमी होईल. आणि महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल, धन्यवाद.

**मा.महापौर :-** बोला कैलास अप्पा,

**श्री.कैलास सोनवणे :-** आणि उपमहापौरांचे अधिकार काय काय आहे त्याची मला माहिती पाहिजे. गोराणे ऐकत आहे ना.मला माहिती द्या या ठिकाणी, आयुक्त साहेब, मला माहिती पाहिजे याची म्हणजे यांना बैठका घेण्याचे अधिकार आहे का ? शासनाचे अधिकार आहे का यांना की, टी.पी. प्रत्येक फाईल माझ्या कडुन जायला पाहिजे. अश्या तोडयापाणीसाठी उपमहापौर येथे बसले आहे का ?

**मा.उपमहापौर :-** अप्पा साहेब,

**श्री.कैलास सोनवणे :-** मला महापौरांची परवानगी आहे.

**मा.उपमहापौर :-** ऐकेरी भाषेत नाही बोलायचे. व्यवस्थीत बोलायचे.

**श्री.कैलास सोनवणे :-** ऐकेरी भाषेत बोलीन.

**मा.उपमहापौर :-** ऐकेरी भाषेत नाही बोलायचे.

**श्री.कैलास सोनवणे :-** ऐकेरी भाषेत बोलीन. मला महापौरांची परवानगी आहे, ताई तुम्ही याला परवानगी दिली का ?

**मा.उपमहापौर :-** ऐकेरी भाषेत नाही बोलायचे ऐकेरी भाषेत मला ही बोलता येते. मी सभागृहाचा मानसन्मान ठेवतो. ऐकेरी भाषेत बोलायचे नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** कामकाज बंद पाडतो या सभेच, यांची उत्तर भेटल्याशिवाय कामकाजच चालु देणार नाही मी,

**श्री.ललित कोल्हे :-** अप्पा, अप्पा ऐका.

**मा.उपमहापौर :-** ऐकेरी भाषेत बोलायचे नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** बिलकुल बोलायचे नाही विष्णु भाऊ. त्यानी महापौरांची परवानगी घेतली आहे का ? परवानगी घेतली आहे का त्यानी?

**मा.महापौर :-** अप्पा साहेब शांत रहा तुम्ही. शांततेत जागेवर बसायचे आहे सगळयांनी.

**श्री.कैलास सोनवणे :-** तुम्हाला जर शांततेत बैठक घ्यायची असेल तर नियमाने कामकाज चालायला पाहिजे.

**मा.महापौर :-** नियमानेच चालेल अप्पा, आपण सगळयांनी जागेवर बसायचे आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** नियमानेच चालायला पाहिजे, सांगा मला पहिले नियम सांगा,

**श्री.विष्णु भंगाळे :-** हे काय प्रकार आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** मला माहिती आहे प्रकार, मागचे उपमहापौर असे वचवच नाही करत होते. अश्विन सोनवणेंनी केले का येथे तोडयापाण्या, त्यांनी बोलविले का टी.पी.च्या ऑफिसवाल्यांना.

**मा.उपमहापौर :-** हे पहा अप्पा साहेब, तुम्ही जेवढया तोडयापाण्या केलेल्या आहे या ५-७ वर्षात सत्तेत आल्यानंतर हे मी सिध्द करुन दाखवतो नाही तर मी केलेली एक सिध्द करुन दाखवा उद्या सकाळी राजीनामा देतो.

**श्री.कैलास सोनवणे :-** हे बघ आता तु पण येथे आहे मी पण येथे आहे.

**मा.उपमहापौर :-** अप्पा, तुम्ही काय तोडयापाण्या केलेल्या आहे हे सर्व शहराला माहिती आहे. तुम्ही पदावर असतांना काय केले हे पुर्ण गावाला माहिती आहे. समजले का ? तुम्ही काय केलेले आहे सर्व गावाला माहित आहे सांगायची गरज नाही.

**मा.महापौर :-** अप्पा, अप्पा

**श्री.सचिन पाटील :-** महापौरांनी निर्णय घ्यावा.

**श्री.कैलास सोनवणे :-** टाऊन प्लॅनींगच्या अधिकाऱ्यांना बोलविले की नाही.

**मा.उपमहापौर :-** मी बोलविले ना.

**श्री.कैलास सोनवणे :-** तुला अधिकार नाही बोलविण्याचे.

**मा.उपमहापौर :-** कसे काय सभागृहाचा सदस्य आहे मी. महानगरपालिकेचा नगरसेवक आहे, उपमहापौरांनी काय काम करावे तुम्ही सुचवणार का ? उपमहापौरांनी काय काम करावे हे तुम्ही सांगा की, तुमची लायकी तरी आहे का सभागृहात बसायची ? तुमची नैतिकता आहे का ? तुम्हाला कोर्टाने ज्या खटल्यात दोषी ठरविलेले आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** काय काय ?

**मा.उपमहापौर :-** तुमच्यात जर नैतिकता असेल तर तुम्ही सभागृहात भाग पण नाही घेतला पाहिजे.

**श्री.कैलास सोनवणे :-** काय नाही घेतले पाहिजे.

**मा.उपमहापौर :-** तुमच्यात जर नैतिकता असेल तर तुम्ही सभागृहाचे कामकाजात देखील भाग नाही घेतला पाहिजे.

**श्री.कैलास सोनवणे :-** कश्याची नैतिकता.

**मा.उपमहापौर :-** ज्या महानगरपालिकेच्या संस्थेशी निगडीत इतका मोठा घोटाळा झालेला आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** हा झालेला आहे.

**मा.उपमहापौर :-** घोटाळयामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने तुम्हाला दोषी ठरविलेले आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** त्या घोटाळयात कोण दोषी आहे सांग.

**मा.उपमहापौर :-** तरी तुमच्या नैतिकता नाही. तुम्ही सभागृहाच्या कामाकाजात भाग कसे घेत आहे.

**मा.महापौर :-** अप्पा, अप्पा,

**मा.उपमहापौर :-** पहिले स्वत:मध्ये किती दोष आहे ते बघा. आपण पहिले स्वत:चे आत्मपरिक्षण करा. स्वत:चे आत्मपरिक्षण करा.

**मा.महापौर :-** अप्पा, अप्पा तुम्ही शांतता ठेवा.

**मा.उपमहापौर :-** अप्पा तुम्हाला विनंती आहे, सभागृहाचा मानसन्मान ठेवा. सभागृहाचे कामकाज हे नियमाने चालु द्या.

**मा.महापौर :-** अप्पा शांत बसा, सर्व सदस्यांना आपआपल्या जागेवर बसायचे आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** ही सभा चालणार नाही. मला नियमाची माहिती सांगा पहिले. मला नियमाची माहिती पाहिजे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अप्पा मान्य, या विषयावर शांततेने चर्चा होऊ शकते.

**श्री.कैलास सोनवणे :-** नियम सांगा साहेब मला नियम सांगा, उपमहापौरांचे अधिकार व कर्तव्य. उपमहापौरांची पाहिजे माहिती मला. सांगा ना. आणि ते डायसवर बसु शकता का ती माहिती पाहिजे मला.

**मा.उपमहापौर :-** आता पर्यंत सभागृहाच्या कामकाजामध्ये.

**श्री.कैलास सोनवणे :-** तु तर परवानगी घे पहिले महापौरांची.

**मा.उपमहापौर :-** महापौरांची परवानगी घेऊनच बोलत आहे मी. तुमच्या सारखे नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** मी परवानगी घेतली आहे. दहा मिनीट हात असा वर होता माझा.

**मा.महापौर :-** सर्व सदस्य आपआपल्या जागेवर शांत बसा.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब, या सभागृहाचा एक किस्सा सांगतो मी तुम्हाला, या ठिकाणी सन्मा.नगरसेवक श्री.नितीन लढ्ढा साक्षीदार आहे. विष्णु भाऊ साक्षीदार आहे.

**मा.महापौर :-** सगळयांनी बसुन घ्या. आणि बोला तुम्ही अप्पासाहेब. बाकीचे बसा.

**श्री.कैलास सोनवणे :-** सुनिल महाजन विरोधीपक्षनेता, नितीन बरडे, सन्मा.नगरसेवक अश्विनभाऊ सोनवणे, ललित भाऊ, हे सगळे या सभागृहाचे साक्षीदार आहे. दोन नगरसेवक दोघीचे दोघी मर्द, एक नरेंद्र अण्णा आणि एक रमेशदादा, तनुजाताई तडवी महापौर होत्या. आणि त्या वेळेस नरेंद्र अण्णांनी येऊन प्रश्न विचारला की, उपमहापौर वरती बसु शकतात का ? एका सेकंदात रमेशदादा खाली आले.आले होते की नाही हे सांगा मला.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** आले होते.

**श्री.सुनिल महाजन :-** आले होते.

**श्री.कैलास सोनवणे :-** आज मी येथे प्रश्न विचारत आहे, अजुन मला नैतिकता सांगत आहे, आता नैतिकता तुम्ही दाखवा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रश्न तसा नाही अप्पा.

**श्री.कैलास सोनवणे** :- नितीन भाऊ पहिले मला उत्तर घेऊ द्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो ना.

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही मला उत्तर द्या ते डायसवर बसु शकतात का ? मला उत्तर घेऊ द्या.

**श्री.सुनिल महाजन :-** एक मिनीट बोलत आहे ते.

**श्री.कैलास सोनवणे :-** ते देतील ना उत्तर, मी नितीन भाऊंना प्रश्न विचारलेलाच नाही.

**मा.महापौर :-** ते देतील उत्तर बसा तुम्ही, शांत बसा. जरा शांतता घ्या.

**श्री.कैलास सोनवणे :-** उत्तर द्या.

**मा.महापौर :-** आपल्या महापालिकेमध्ये जेव्हा पासुन अप्पा तुम्ही सुध्दा याचे साक्षीदार आहात. आपल्या भारतीताई सोनवणे सुध्दा महापौर होत्या. त्यानंतर नितीन भाऊ होते. सगळे महापौर असतांना बाजुला उपमहापौर बसण्याची पध्दत ही आपल्या महापालिकेत पहिल्या पासुन आहे. आणि त्या धरतीवर उपमहापौर या ठिकाणी बसलेले आहे. आणि राहिला विषय हा तर हे सभागृह आज आपल्या शहराच्या विकासाच्या कामकाजासाठी सभागृह शांततेत चालवायच आहे. याठिकाणी इतर जी विषय आहे. त्याचा आपल्या अजेंडयावर सुध्दा कुठलाही प्रकारचा समावेश नाही. त्याची चर्चा अनावश्यक आहे ती येथे टाळावी. कैलास अप्पा आपले म्हणणे येथे मांडुन झालेला आहे. आणि राहिला कायदेशीर विषय.

**श्री.कैलास सोनवणे :-** तुम्ही चुकीची माहिती देत आहे ताई.

**मा.महापौर :-** अप्पा एक मिनीट,

**श्री.कैलास सोनवणे :-** तुम्ही बोला ना बोला तुम्ही.

**मा.महापौर :-** आपल्याला कायदेशीर जो काही माहिती हवी आहे. त्याचा अभ्यास करावा लागेल.

**श्री.कैलास सोनवणे :-** अभ्यास काय ? काही मोठा विषय आहे का हा ? हे गोराणे सांगतील, आयुक्त सांगतील त्यांना आदेश द्या. मी तुम्हाला विनंती करतो ताई की, एकानेही असे. याच्या पुर्वी जितकेही उपमहापौर होते एकाही उपमहापौरांनी असे छिचोरे धंदे केलेले नाही. एकानेही असे तोडयापाण्यासाठी टाऊन प्लॅनींगला सांगितले नाही.

**मा.उपमहापौर :-** अप्पा, तुम्ही हे जे छिचोरे धंदे म्हणत आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** तु परवानगी घे पहिले महापौरांची.

**मा.उपमहापौर :-** मी महापौरांची परवानगी घेऊनच बोलत आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** तु परवानगी घे पहिले.

**मा.उपमहापौर :-** मी परवानगी घेऊनच बोलत आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** तु परवानगी घेतली नाही. तु परवानगी नाही घेतली.

**मा.उपमहापौर :-** एक पण अभ्यासपुर्वक मुद्दा मांडला का शहराच्या विकासाकरीता इतके वर्ष.

**श्री.कैलास सोनवणे :-** कोणी मी, नाही तु मांडला आहे.

**मा.उपमहापौर :-** एक तरी मांडला का ? एक तरी शुल्लक काम केली का ?

**मा.महापौर :-** अप्पा अप्पा, दोन मिनीट.

**मा.उपमहापौर :-** एक तरी ठोस काम दाखवा.

**श्री.कैलास सोनवणे :-** मागचे इतिवृत्त पहा काय मांडल आणि काय नाही मांडल आहे.

**मा.उपमहापौर :-** बंद करा अप्पा. जळगांव शहराच्या विकासाची काम करायचे आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** ताई हे सभेचं कामकाज चालणार नाही. आपल्या लक्षात हे येत नाही की,

**मा.उपमहापौर :-** सभागृहाला पारदर्शक कारभार पाहिजे. असे पध्दतीने झाले पाहिजे.

**श्री.कैलास सोनवणे :-** तु नको शिकवु. ताई हे सभेचे कामकाज चालणार नाही. तु घे सभा. नाही नाही. त्यांना अधिकार आहे का ? सांगा, तो बोगस धंदे करीन तोडयापाण्या करीन त्याला अधिकार आहे का ?

**श्री.विष्णु भंगाळे :-** ते उपमहापौर आहे म्हणुन बसलेले आहे तेथे.

**श्री.कैलास सोनवणे :-** बसलेले आहे. तुम्ही धंदे केले का तसे, सुनिल महाजनांनी केले का ते पण उपमहापौर होते. अश्विन सोनवणे उपमहापौर होते.

**मा.उपमहापौर :-** सिध्द करा, सिध्द करुन दाखवा ना तुम्ही नाही तर मी सिध्द करुन दाखवतो. माझी सर्व सन्मा.सदस्यांना विनंती आहे. हा सभागृह सर्व सन्मा.सदस्यांचा आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** मी काय म्हणतो आहे. त्याला तेथुन उठावे लागेल नाही मी चालुच देणार नाही सभेचे कामकाज.

**मा.उपमहापौर :-** महापौरांनी आदेश जर दिले. पिठासीन अधिकाऱ्यांनी आदेश जर दिले तर त्या आदेशाचे पालन करतील. हा सभागृह चालविण्याचे अधिकार महापौरांचे आहे. ते ठरवतील की, कोणी कुठे बसावे. हे तुम्ही नाही ठरविणार कोणी कुठे बसावे.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो सांगतील ते. सांगतील.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अप्पा शांतता ठेवा.

**श्री.कैलास सोनवणे :-** आमचा सादा मुद्दा आहे की, उपमहापौर तेथे बसु शकता का ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** याच्यामध्ये वेळ जाईल तर बाकीच्या विषयांचे काय ?

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही, आज हाच विषय राहील.

**श्री.नितीन लढ्ढा :-** परत परत तोच विषय.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो तोच विषय राहील.

**श्री.विष्णु भंगाळे :-** उपमहापौरांच्या बसण्याचा विषय का करत आहे मला कळत नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब, उपमहापौरांना तेथे बसण्याचा अधिकार आहे का ? शांततेत.

**मा.महापौर :-** अप्पा तुम्ही जागेवर बसा.

**श्री.कैलास सोनवणे :-** मी बसेल पण परत उठीन मी.

**श्री.ललित कोल्हे :-** दोघी पर्सनल नका घ्या. दोघी पर्सनल नका घ्या.

**श्री.कैलास सोनवणे :-** परत उठीन मी. नियमाने कामकाज चालेल तर सभा चालेल.

**श्री.विष्णु भंगाळे :-** उपमहापौर साहेब पर्सनल बोलु नका, तुम्हीही पर्सनल बोलु नका.

**श्री.कैलास सोनवणे :-** हे बघा, उपमहापौरांनी त्या जोशीला बोलविले समोरच्या, त्यानंतर त्या लाठीला बोलविले त्या सरस्वती डेअरीच्या बाजुच्या. जनता बँकेच्या बाजुचा जोशी, देशपांडे मार्केट मधला न्हावी. मेडीकलवाला या सगळयांना बोलविले आहे.

**मा.उपमहापौर :-** आता हे सर्व पत्रकार आहे सदस्य आहे. संबंधीत व्यक्तींना येथे बोलवा त्यांनी जर सांगितले की, मी आहे. तो जोशी काळा आहे की गोरा आहे मी हे पण बघितला नाही. हे देशपांडे कोण आहे ते ही पाहिले नाही. या सभागृहासमोर जर त्यांनी सांगितल की, मी बोलविले होते तर मी आताच्या आता राजीनामा दिन. तो कोणता जोशी आहे काळा की गोरा मी पाहिले नाही. हे सांगायची गरज नाही सामान्य जनतेला, सर्व पब्लीकला सांगायची गरज नाही की, तुमच्या मनात काय आहे.

**नगरसचिव :-** सभा क्र.३३ विषयपत्रिका क्र.३३.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौर ताई. मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** विषय होऊन जाऊ द्या ताई.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** साहेबांनी जो विषय मांडला घरपट्टीचा त्या विषयाबद्दल बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** बोला

**श्री.कैलास सोनवणे :-** ताई, तुम्ही घरपट्टी बद्दल बोला की, अभय योजना बोला की लसीकरण बोला की काही पण बोला पहिले या विषयाचा सोक्षमोक्ष होईल.

**श्री.सुनिल महाजन :-** बोलु द्या अप्पा बोलु द्या.

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही बोलतील ना, मी कधी बोललो का बोलायच. हे पहा सुनिल भाऊ, आणि तुम्ही विरोधीपक्ष नेता आहे. तुम्ही कसे काय मॅनेज झाले. तुम्ही महापौरांची बाजु का घेता आहे. तुम्ही महापौरांची बाजु का घेत आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ये अंदर की बात है.

**श्री.विष्णु भंगाळे :-** चांगल्या कामासाठी अप्पा.

**श्री.कैलास सोनवणे :-** ज्या वेळेस चांगल्या कामासाठी विरोधीपक्ष नेता आणि महापौर यांचा एकगट होईल चांगली गोष्ट आहे पण अश्या वेळेस महापौरांच्या बाजुने जर विरोधीपक्ष नेता राहिला तर जळगावची जनता होरपडेल. अस नाही चालणार.

**मा.महापौर :-** अप्पा ताईंना बोलु द्या मी परवानगी दिली होती तुम्ही थांबविले. म्हणजे माझ्या परवानगीचा जर येथे अवमान होत असेल तर हे चालणार नाही अप्पा.

**श्री.कैलास सोनवणे :-** तुमचा अवमान कधी होणार नाही.

**मा.महापौर :-** त्यांना मी त्यांचा विषय मांडण्याची परवानगी दिलेली आहे त्यांना बोलु द्या.

**श्री.कैलास सोनवणे :-** ताई तुम्ही माझा अवमान करुन परवानगी दिली.

**मा.महापौर :-** अप्पा तुमचा विषय ना विषयपत्रिकेत आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** नियमात आहे ना त्याला विषयपत्रिकेची काय गरज आहे. आजच कामकाज चालणार नाही.

**मा.महापौर :-** मला याबाबतचा नियम माहित नाही. आता पर्यंत सभागृहामध्ये

**श्री.कैलास सोनवणे :-** तुम्हाला जर माहित नसेल तर आयुक्तांना विचारा नगरसचिवांना विचारा. मी कामकाज नियमानेच चालवणार.

**श्री.सुनिल महाजन :-** अप्पा विकास कामांना मंजुरी द्यायची आहे आपल्याला.

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही हो आम्ही विरोध करायला आलेले आहे येथे.

**मा.महापौर :-** अप्पा याचा अर्थ असा होईल. आपल्या विषयपत्रिकेमध्ये विषय आपल्या जळगांव शहराच्या प्रगतीसाठी जळगांव शहराच्या कामांसाठी आपण अडथळा निर्माण करत आहात.

**श्री.कैलास सोनवणे :-** एका मिनीटात सर्व विषय मंजुर. एका मिनीटात सर्व विषय मंजुर.

**मा.महापौर :-** अप्पा आपल्याकडुन हीच अपेक्षा आहे, विषय मार्गी लागु द्या.

**श्री.कैलास सोनवणे :-** एका मिनीटात सर्व विषय मंजुर. चुकीचा आग्रह करु नका महापौर साहेब.

**श्री.विष्णु भंगाळे :-** मा.महापौर महोदया, मा.कैलास अप्पांनी सांगितले सर्व विषय मंजुर, त्याला आम्ही अनुमोदन देतो सभा संपली आहे. राष्ट्रगीत म्हणाव आणि सभा संपवावी.

**श्री.कैलास सोनवणे :-** विकास कामांना बोललो आहे फक्त.

**मा.महापौर :-** अप्पा थांबा एक मिनीट.

**श्री.कैलास सोनवणे :-** ज्या पध्दतीने उपमहापौर त्या ठिकाणाहुन बोलता आहे ना त्यांना नैतिक अधिकार पण नाही आणि मी सांगतो आहे. मला नियम सांगा पहिले. तुम्हाला नियम माहित नाही ना. ऐवढे शिक्षिका महापौर आहे आणि नियम माहित नाही.

**मा.महापौर :-** अप्पा एक मिनीट.

**श्री.कैलास सोनवणे :-** आयुक्तांना विचारा,

**श्री.सुनिल महाजन :-** अप्पा, आम्ही स्वत: बसले आहे तेथे. अश्विन भाऊ बसले तेथे.

**मा.महापौर :-** अप्पा तुम्हाला पण माहित आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** तुम्ही असे धंदे केले तेथे. अश्विनभाऊंनी असे धंदे केले का ? रमेशदादा उपमहापौर होते त्यांनी असे धंदे केले का ?

**श्री.सुनिल महाजन :-** आपल्या सभागृहाची परंपरा आहे ती.

**श्री.कैलास सोनवणे :-** हे चुकीच आहे. माझा पहिले हा विषय होईन. मला उपमहापौरांच्या अधिकारांची माहिती द्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मी काय म्हणतो.

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही. पहिले कबुल करा की, त्यांना तेथे बसण्याचा अधिकार आहे का ? एका मिनीटात सोडतो मी विषय कबुल करा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अप्पा परंपरा आहे ती.

**श्री.कैलास सोनवणे :-** परंम्परा असेल कायदा नाही. कबुल करा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आता पर्यंत मा.महापौर ताई.

**मा.उपमहापौर :-** शहरात काय चालत हे सांगण्याची गरज नाही सर्वांना. तो विषय आपला पर्सनल आहे. ते आपण दोघी चर्चा करुन सिध्द करु ना एकमेकांचे. आणि हा जो विषय आहे. तुम्ही काय केले आहे हे सर्व जनतेला माहिती आहे आता पर्यंत पदावर असतांना हे सर्व जनतेला माहित आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** काय केलेले आहे. एक किस्सा सांग फक्त एक किस्सा सांग.

**मा.उपमहापौर :-** तुम्ही एक सांगा, समोर आणा, सिध्द करा, पदाचा राजीनामा देऊन टाकीन.

**श्री.सुनिल महाजन :-** बस झालं, बस पर्सनल नको घ्या.

**श्री.कैलास सोनवणे :-** नियम सांगा मला. ताई मला नियमाची माहिती द्या.

**मा.महापौर :-** सर्व जण बसुन जा. नितीन भाऊ तुम्ही बोला.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अप्पा अप्पा, महापौरांनी मला परवानगी दिली आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** नितीन भाऊ, या ठिकाणी अस घडते आहे की नाही घडत आहे हे सांगा, अधिकाऱ्यांना बोलविले जात आहे की नाही हे सांगा मला.

**मा.उपमहापौर :-** बोलवितो आहे. आम्ही कुठे नाही म्हणतो आहे. एका अधिकाऱ्यानी सांगाव की आमच्याशी अश्या पध्दतीने वागत आहे.

**श्री.ललित कोल्हे :-** ओ, ओ. नितीन भाऊ बोलत आहे ना.

**श्री.कैलास सोनवणे :-** नगररचनाकार साहेब, अहो नगररचनाकार साहेब. तुम्हाला एकच विनंती करतो की, हे जे तुम्ही रिकामे धंदे लावले आहे ना बेसमेंटचे हे बंद करा तुम्ही तोडयापाण्याचे ही विनंती आहे तुम्हाला हात जोडुन विनंती आहे.

**मा.उपमहापौर :-** अनाधिकृत बेसमेंट पाडलेच जातील. अनाधिकृत बेसमेंट पाडलेच जातील.

**श्री.कैलास सोनवणे :-** करा, करा, सगळे पाडले पाहिजे. नेहरु चौक ते टॉवरच्या मध्ये नाथ प्लाझा पण आहे.

**मा.उपमहापौर :-** अप्पा हे तुम्ही सांगाल तेव्हाच नाही होणार. अनाधिकृत बांधकामाचे संदर्भातले बेसमेंट काढणेचे व सिल करण्याचे आदेश महापौरांनी हे गेल्या दोन महिन्यापासुन देऊन टाकलेले आहे. आणि त्याच्या संदर्भात कामं चालु आहे. आपल्याला सवय आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** तुम्ही काढत आहे काढा त्यांना परंतु त्यांना बोलुन सेटलमेंट नका करु.

**मा.उपमहापौर :-** अप्पा साहेब, एक मॅटर तुम्ही सिध्द करा, समोर आणा.

**श्री.कैलास सोनवणे :-** मी सिध्द नाही करणार. २२३५४७७.

**मा.उपमहापौर :-** करा सिध्द करा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौर महोदया, कायद्यात नियमांच्या तरतुदी काय असतील त्याचा सखोल अभ्यास आपण करुच त्याबद्दल वाद नाही. परंतु मी अप्पांना विनंती करतो की, अप्पा आता पर्यंतचा संकेताच्या अन्वये, हा पुर्वीपासुन चालत आलेला संकेत आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** आहे ना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नियमात काय असेल नसेल त्या बद्दलची शाहनिशा नक्की होईल.

**श्री.कैलास सोनवणे :-** तुम्हाला माहिती आहे का नियम ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** मी काय म्हणतो नियमांच्या अनुषंगाने जे काही असेल. उचित असेल किंवा इतर महानगरपालिकेच्या याबाबतीत काय भुमिका आहे ती आपण घेऊ.

**श्री.कैलास सोनवणे :-** कुठेच नाही महाराष्ट्रात कुठेच नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आज आपण या महासभेला उपस्थित केलेला मुद्दा ऐनवेळी उपस्थित केलेला असल्या कारणाने त्या विषयावरती आजच्या सभेचा कामकाज त्याला लांबविने किंवा सभागृहात आळा घालविणे मला वाटत कदापी संयुक्तीक नाही. आपल्या विनंतीचा विचार निश्चितपणे प्रशासन ही करेल.महापौरताई ही करतील. सभागृह ही करेल. परंतु ही आता समोर आलेली परिस्थिती आहे. कारण या परिस्थितीच्या संदर्भात. ना प्रशासन प्रिपेर्ड होऊन आलेले आहे ना सभागृहातील सदस्य प्रिपेर्ड होऊन आलेले आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** सगळे प्रिपेर्ड आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** परंतु आपण मांडलेली सुचनेच्या बाबतीत निश्चितपणे प्रशासनाने विचार करुन आपण आजच्या सभेच कामकाज शांततेत पार पाडु द्याव.

**श्री.कैलास सोनवणे :-** मला फक्त नियम सांगा तुम्ही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आणि आपली जी काही भुमिका आहे. त्या भुमिकेच्या संदर्भात प्रशासन आणि महापौर ताई आपल्याला पुढच्या महासभेच्या पुर्वी मा.महापौर निर्णय घेतील.

**श्री.कैलास सोनवणे :-** मी घेतो, मी वाचतो दोन मिनीट,

**मा.महापौर :-** अप्पा, बोलणे होऊ द्या अप्पा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** पुढच्या महासभेच्या पुर्वी.महापौरताई याच्यावरती जो काही निर्णय असेल. तो निर्णय सभा सुरु होण्यापुर्वी सभागृहात व्यक्त करतील.

**श्री.कैलास सोनवणे :-** वेळ कशाला घालविता आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अप्पा दोन वर्षानंतर एक ऑफलाईन सभा सुरु झालेली आहे. चांगले वातावरण आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** एका मिनीटात संपेल हो ही मिटींग.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बरेच विकास कामांचे प्रश्न आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** एका मिनीटात संपविन सगळे विकास कामांचे विषय. जो ६५ नंबरचा विषय आहे त्यापैकी ५० चे ५० मंजुर. सगळे.

**श्री.सुनिल महाजन :-** हो सगळे विकास कामे आहे ते.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो सर्वे मंजुर.

**श्री.विष्णु भंगाळे :-** हो मंग सांगितल ना अप्पा, सांगितल्या प्रमाणे राष्ट्रगीत म्हणाच आणि चालायच.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** महापौर महोदया, मला बोलायचे आहे. हा निर्णय घेण्याचा आपल्याला पुर्ण अधिकार आहे. कोणत्या सदस्यानी कुठे बसाव. कोणी काय कराव. कोणत्या सदस्यानी उपस्थित राहावे. कोणी बाहेर जावे हे सर्वस्वी अधिकार आपला आहे. तर माझी तुम्हाला सभागृहाचे पिठासीन अधिकारी म्हणुन विनंती आहे की, ठोस निर्णय घ्यावा आणि सन्मा.सदस्यांचे समाधान करावे.

**श्री.कैलास सोनवणे :-** उपमहापौरांना बसु द्यायचे अधिकार महापौरांना नाही. वकील साहेब पोकळे साहेब तुम्हाला सांगतो ना मी.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** अप्पा एक दोन मिनीट. एक दोन मिनीट.

**श्री.कैलास सोनवणे :-** मी सांगितले ना तुम्हाला महापौरांना अधिकार नाही. उपमहापौरांना तेथे बसु द्यायचा महापौरांना अधिकार नाही. कायदा आहे तो कायदा आहे. आणि बेकायदेशीर काम चालत असेल तर ते धकणार नाही. तुम्ही काही ही बोला.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** या सभागृहामध्ये महापौर म्हणजे हे सर्वोच्च अधिकारी आहे आणि त्यांच्या निर्णयाला या सभागृहात कोणीही आव्हानीत करु शकत नाही. तरी माझी विनंती आहे की, महापौरांनी निर्णय घ्यावा.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौरांना बेकायदेशीर कामकाज चालविण्याचा अधिकार कोणत्याही कायद्याने दिलेला नाही. उपमहापौरांना तेथे बसता येईल का माहिती द्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मी काय म्हणतो.

**श्री.कैलास सोनवणे :-** आणि पुर्ण महाराष्ट्र मध्ये ही पध्दत नाही. जळगांवमध्ये होती पण ते उपमहापौर असे नव्हते. अश्विन सोनवणेंनी केल का कधी असे. फोनवर कोणाला ही काही बोलविले नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अप्पा साहेब, याच्या संदर्भात

**श्री.कैलास सोनवणे :-** सुनिल भाऊंनी केले का असे मला सांगा.

**श्री.सचिन पाटील :-** मा.अप्पा साहेब अतिशय जेष्ठ नगरसेवक आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** श्रीधरपंत,

**श्री.सचिन पाटील :-** हो अप्पा साहेब.

**श्री.कैलास सोनवणे :-** श्रीधरपंत.

**श्री.सचिन पाटील :-** हो अप्पा साहेब, तुम्ही आमचे मोठे बंधु आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** तिनदा म्हटले मी मास्तरांचे नांव.

**श्री.सचिन पाटील :-** सभागृहाच कामकाज आपण सुरळीत पार पाडावे पुढचे कारण सभागृहामध्ये व्यक्तीगत हेवेदावे हे सभागृहाचे बाहेर बघावे. सभागृहाचे कामकाज सुरु करावे. म्हणजे आपल्या अधिकारांवरती कुठेतरी अन्याय होत आहे असे मला वाटत आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** किती लोकं समजवत आहे मला चुकीचे काम करण्यासाठी. चुकीचे काम करा याच्यासाठी किती लोकं समजवता आहे. पोकळे साहेब, आपले मास्तर, जेष्ठ नगरसेवक,

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** अप्पासाहेब साहेब, सभागृहामध्ये सर्वोच्च अधिकारी महापौर आहे. त्यांनी निर्णय घ्यावा.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौरांना ही अधिकार नाही त्यांना तिथे बसु देण्याचा. नियम वाचा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अप्पा साहेब, नियमाच्या

**मा.महापौर :-** अप्पा एक मिनीट, मी उत्तर देते, बसा तुम्ही. आपण एखाद्या गोष्टीवर आरोप झाल्यानंतर तो आरोप ज्या वेळेला सिध्द होतं त्या वेळेला तो आरोपी आहे असे सिध्द होत. अप्पा आपल्याला याबद्दल माहित आहे. कोणत्याही पध्दतीचे आरोप आपल्यावर आजपर्यंत सिध्द झाले नाही म्हणुन आपण आज या सभागृहामध्ये बसु शकता. त्याच पध्दतीने उपमहापौर यांच्यावर जो आरोप होत आहे. ते सिध्द झाल्यानंतर त्याबाबतचा निर्णय, त्यांच्या संदर्भातला निर्णय या ठिकाणी घेतला जाईल. आजच्या मिटींग मध्ये त्यांनी बसावे की नाही बसावे याची पुर्व सुचना आपण आम्हाला दिलेली नव्हती. आपण त्यांना सुध्दा दिली गेलेली नसल्यामुळे अचानक त्या गोष्टीवर कोणतीही चर्चा अनावश्यक आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** ताई, ताई.

**मा.महापौर :-** आणि ती येथे थांबावी, त्याचप्रमाणे आपले पर्सनल जे इशु आहे ते सभागृहाच्या बाहेर करावे.

**मा.उपमहापौर :-** महापौरताई मला बोलायचे आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** लोकमत पेपर पहा तुम्ही आजचा. लोकमत पेपर पहा तुम्ही.

**मा.उपमहापौर :-** महापौर ताई, ज्यांच्यावर आरोप सिध्द झालेले असतील त्यांना या सभागृहात बसण्याचा अधिकार नाही. माझी आपल्याला सर्व सभागृहासमोर विनंती आहे. अप्पांना या सभेमध्ये बसण्याचा अधिकार नाही. अप्पावरती याच संस्थेमध्ये घोटाळा केल्याचे अपराध करायचे दोष सिध्द झालेले आहे. अप्पांना त्या मध्ये दोषी ठरविले गेले आहे. अप्पांना त्यामध्ये शिक्षा झालेली आहे. अप्पांना सभागृहामधुन बाहेर काढण्यात यावे.

**श्री.कैलास सोनवणे :-** अंतिम निर्णय बाकी आहे त्याला, अंतिम निर्णय बाकी आहे. हा शाहनपणा चालणार नाही. मला नियम सांगा.आम्हाला नियम पाहिजे.

**मा.महापौर :-** अप्पा आपण याबद्दल पुर्वी कळवायला हवा होता हा प्रश्न. याच्या अगोदर महासभेचा अजेंठा आठ दिवस अगोदर आपल्याकडे आलेला होता.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो.

**मा.महापौर :-** त्याच्या अगोदर आपल्याला या प्रश्नाच उत्तर हव होत. त्याबाबत लेखी आपण आपल्याला द्यायला हवे होते.

**श्री.कैलास सोनवणे :-** ताई तुम्हाला माहित नाही. पेपर मध्ये आले, पुर्ण जळगांव लोकमत वाचतो. आणि सकाळी ६.०० वाज्याशी पेपर येतो सगळयांच्या घरी. ६.०० ला ७.०० ला पेपर येतो. ४ घंटे होते. ४ घंट्यामध्ये तुम्ही माहिती काढली नाही काढली असेल माहिती.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अप्पा, पुन्हा विशेष महासभेचे आयोजन आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** त्यांनी सांगाव ते खाली बसतील का ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** फक्त खाली नाही, कायद्यात तरतुदी असतील ना. तर नियमांच्या अनुषंगाने चर्चा होईल. नियमाच्या तरतुदीच्या अनुषंगानेच चर्चा होईल.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौरांना डिक्लेअर करायला लावा ना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई पुढच्या होणाऱ्या महासभेच्या पुर्वी. सभागृहासमोर या नियमाच्या अनुषंगाने ज्या काही तरतुदी असतील त्या तरतुदीच्या अनुषंगानेच या सभागृहाचे कामकाज होईल.

**श्री.कैलास सोनवणे :-** डायसवर नियमाने जे असतील तेच बसतील.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नक्की अप्पा हो, नियमात नोंदवुन दिलेल्या तरतुदी व महानगरपालिकेने अवलंबलेली पध्दत आणि जो नियम असेल त्या नियमाच्या अनुषंगाने सभेचे कामकाज सुरु राहील.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्या नियमांच्या तरतुदीच्या अनुषंगानेच सभेच कामकाज सुरु राहील.

**श्री.कैलास सोनवणे :-** मला मान्य आहे हा विषय, हट्टच धरत आहे तुम्ही उपमहापौर साहेब बसा काही अडचण नाही.

**मा.उपमहापौर :-** मी हट्ट धरत नाही आणि मला पदाचा लोभ पण नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** उठा मग, उठा चला उठा.

**मा.उपमहापौर :-** जो माणुस आरोपी आहे ज्याला शिक्षा झालेली आहे. सिध्द झालेला आहे. त्याला काय अधिकार आहे मला येथे बसायचे सांगायचं. हे तुमचे अधिकार नाही. तुम्हाला तर सभागृहात पण बसण्याचा अधिकार नाही तुम्ही काय शिकवसान मला की मी कुठे बसायचे. पिठासीन अधिकाऱ्यांचे हे अधिकार आहे. कोणी कुठे बसायचे. मला पिठासीन अधिकाऱ्यांनी सांगितल्या बरोबर तात्काळ आदेशाचे पालन करण्यात येईल.

**श्री.कैलास सोनवणे :-** कायद्यात आहे का ? कायद्यात आहे का सांगा मला.

**मा.महापौर :-** अप्पा तुम्ही शांत रहा.

**मा.उपमहापौर :-** मला पिठासीन अधिकाऱ्यांनी सांगितल्या बरोबर तात्काळ आदेशाचे पालन करण्यात येईल.

**श्री.कैलास सोनवणे :-** आता तर नियमात होईन.

**मा.महापौर :-** अप्पासाहेब शांत बसा, बसा खाली.

**श्री.कैलास सोनवणे :-** ताई माझी तुम्हाला हात जोडुन विनंती आहे तुम्ही मला अप्पा साहेब पण बोलु नका आणि काहीच बोलु नका.

**मा.महापौर :-** माझी सुध्दा हात जोडुन विनंती आहे अप्पा साहेब. माझी विनंती आहे की, आपण शांत बसुन जावे.

**श्री.कैलास सोनवणे :-** मला नियमाप्रमाणे माहिती द्या आता माझे दुसरे काहीच म्हणणे नाही. मला बाहेर काढायच असेल नियमात असेल तर मला बाहेर काढा नाही तर उपमहापौरांना तेथे बसु नका द्या.

**मा.महापौर :-** अप्पा साहेब ऐका तुम्ही.

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही, आता नाही ऐकणार मी. आता नाही ऐकणार हो तुमचा लई मान ठेवला मी आता नाही ठेवणार.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अहो अप्पा, ऐका ना.

**(सभागृहात निर्माण झालेल्या गोंधळामुळे काही गोष्टी ऐकु आलेल्या नाही. )**

**श्री.कैलास सोनवणे :-** किती ही पाईपामध्ये कुत्र्याची शेपटी ठेवली तर ती वाकडीची वाकडीच निघत आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अप्पा, आपण या सभागृहाचे जेष्ठ नगरसेवक आहात.

**श्री.कैलास सोनवणे :-** तुम्ही माझ्या पेक्षा जेष्ठ सदस्य आहे आणि तुम्ही मला विनंती करत आहात की, चुकीच काम होऊ द्या. नियमाने नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अहो, अप्पा साहेब खाली बसुन जातील.

**श्री.कैलास सोनवणे :-** मी मान्य करतो पण ते ऐकत आहे का ते ऐकत आहे का ?

**मा.महापौर :-** सगळयांनी शांत बसा. उपमहापौरांनी ही शांतता ठेवायची आहे मी सुचना देते त्यांना पण.

**श्री.कैलास सोनवणे :-** ताई पुढच्या मिटींगला नियमाने कामकाज चालायला पाहिजे.

**मा.महापौर :-** नियमानेच चालेल.

**श्री.कैलास सोनवणे :-** तुम्ही नियम तोडुन कामकाज चालविता आहे. तुम्हाला ही माहित आहे की, नियम काय आहे पण तुमची पक्षाची मजबुरी आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही नाही. अप्पा मजबुरी नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** मजबुरी आहे मजबुरी आहे तुमची.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अप्पा साहेब, तुम्ही जर आयत्या वेळेला एखादा विषय उपस्थित कराल.

**श्री.कैलास सोनवणे :-** तुम्हाला माहित नाही का नितीन भाऊ, तुम्हाला माहित नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मी काय म्हणतो तुम्हाला अप्पा.

**श्री.कैलास सोनवणे :-** घ्या ठिक आहे. दुसरा विषय घ्या गोराणे साहेब दुसरा विषय घ्या.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** आता येथे आयुक्त साहेबांनी जे सांगितल शास्ती बद्दल, आयुक्त साहेब आपण जे शास्ती बद्दल सांगितलं, त्यामध्ये सांगितल की, ९०% सुट, ते जरा सविस्तर सांगितले तर क्लियारिटी येईल.

**मा.आयुक्त :-** बसा ताई तुम्ही, आता या वर्षाचे बिल नागरीकांना दिले गेलेले आहे. आता या वर्षीच्या बिलामध्ये समजा एखाद्याची समजा १० हजार मुळ टॅक्स आहे आणि त्याला शास्ती म्हणजे दरमहा २% प्रमाणे जे व्याज लागतो त्याला आपण शास्ती म्हणतो. समजा त्याच्या बिलामध्ये ५ हजार आलेली आहे. तर ही जी काही मागणी आहे. त्याला बिल दिलं या वर्षाच, या वर्षाच्या टॅक्ससह त्याला आलेले ते मागणी बिल आहे. म्हणजे मागच्या वर्षी ३१ मार्च अखेर आलेली त्याची थकबाकी या वर्षाची नविन मागणी. आणि मागच्या वर्षाची थकबाकी दर वर्षाची कुठल्यावर्षाची किती आहे. त्या त्याप्रमाणे त्याला २% प्रमाणे लागलेल व्याज, एकुण मिळुन जर त्याला १०,००० आणि ५,००० अस बिल आले असेल तर त्यानी या १५००० पैकी १०% रक्कम ही शास्तीपैकी आहे. म्हणजे ५००० पैकी फक्त १०% रक्कम त्याला भरायची आहे. म्हणजे रु.५००/- आणि त्याची मुळ मागणी १०,०००/- तर या १५००० पैकी जर त्यानी १०५००/- रुपये जर त्यानी भरले. तर ५००० च्या शास्तीपैकी त्याला ९०% म्हणजे रु.४५००/- त्याचे माफ होणार. आणि हीच जर रक्कम त्यांनी आता नाही भरली तर म्हणजे आपण दिलेल्या मुदतीमध्ये ३१ तारखेपर्यंत तर नंतर त्याला ७५% माफी मिळणार आहे. म्हणजे ५००० पैकी ७५% म्हणजे रु.३७५० मिळणार त्याच्यानंतर जो टप्पा आहे. ५ जानेवारीच्या नंतरचा त्याला फक्त रु.२५००/- चा फायदा मिळणार. आणि २२ जानेवारीच्या नंतर त्याला पुर्ण रु५००० त्याला भरावे लागणार. त्यामुळे आपल्याला नागरीकांना ही बाब लक्षात आणुन द्यायची आहे की, तुम्ही आता जर या मुदतीत तुम्ही भरले तर तुम्हाला तुमच्या ५००० पैकी फक्त ५०० रुपयेच भरायचे आहे. रु.४५००/- तुमचे माफ होणार आहे. याचा कालावधी जर उलटुन गेला तर आपल्या माफीची रक्कम कमी कमी होत जाणार. आणि २२ जानेवारीच्या नंतर बिल्कुल काही माफी मिळणार नाही. आणि मग याच्यावर बोजा ही येऊ शकतो. तर या ठिकाणी आपण जर अभय योजनेचा फायदा घेतला. तर खुप मोठया

प्रमाणामध्ये यापुर्वी टॅक्स वेळेवर न भरण्यामुळे त्यांना शास्ती झाली आहे. त्यामधुन ते त्यांची सुटका करुन घेऊ शकता.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** साहेब, आता ज्या सुनावण्या चालु आहे, सर्व्हे केलेला आहे. त्या सर्व्हेला, सर्व्हे तर त्यांनी केलेला आहे. सन २०१६-१७ मध्ये, बाकीचे जी कामकाज आहे आपल्या कर्मचाऱ्यांना करावे लागत आहे. आता जी अर्ज येणार आहे. काही जणांना जास्तीचा टॅक्स लावलेला आहे. जसे लोडबेरिंग आहे त्याला आर.सी.सी.चा टॅक्स लावला गेलेला आहे. आणि काही ठिकाणी असे झालेले आहे की, भाडेकरु आहे. आणि भाडेकरु निघुन गेलेले आहे. आणि ते दुसऱ्याला विकलेला आहे. तेथे मुळ मालक राहतो तरी सुध्दा त्यांना भाडेकरु म्हणुनच दाखविलेला आहे. म्हणजे माझ्या प्रभागात सांगत आहे मी.

**मा.आयुक्त :-** नाही ताई, मी सांगतो तुम्हाला.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** काही ठिकाणी असे झालेले आहे की, माझे घर आहे आणि ज्योतीताईचे नाव लावलेले आहे. तर तेथे नावाचे बदल आहे. त्यामुळे काय होत आहे आपल्या कर्मचाऱ्यांना त्यांचा त्रास होत आहे. म्हणजे ते नगरसेवकांना पण म्हणजे ते डबल डबल होत आहे. आणि आपण तर पैसे त्यांना दिलेले आहे. आमची ही मागणी आहे त्यांच्याकडुनच हे सर्व्हे परत करुन घेण्यात यावा. महापौर ताई, जो हा सर्व्हे झाला आहे त्याचा आपल्या कर्मचाऱ्यांना पण त्रास होत आहे नगरसेवकांना पण त्रास होत आहे. जसा माझ्या वार्डात त्रास होत आहे तसा प्रत्येकाला हा त्रास होत असेल. कारण जर आपण त्यांना पैसे दिलेले आहे. किती पैसे दिलेले आहे आपण त्यांना किती दिवसासाठी ठेका दिलेला होता हा ?

**मा.आयुक्त :-** सांगतो ताई तुम्हाला.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** माहिती द्या तुम्ही मला, अमरावती वाल्यांनी जो सर्व्हे केलेला आहे.

**मा.आयुक्त :-** याच विषयावर जर कोणाचे अजुन काही प्रश्न असतील तर त्याच एकत्रित उत्तर देतो.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** साहेब, याचप्रकारे एका ठिकाणी खाली पुर्ण पार्कींग आहे आणि त्याला घर दाखवुन आकारणी केलेली आहे. मी मागे ते आपल्या उपायुक्तांना पण लक्षात आणुन दिले होते. आणि आता लेटेस्ट कालचा विषय. लाईफस्टाईल नावाची बिल्डींग आहे समतानगर मध्ये, ज्ञानेश्वर कॉलनीच्या पुढे, अपार्टमेंट आहे. त्या माणासाचे खरेदीखत नाही, सौदापावती नाही, खरेदीखत झालेले नाही काहीच झालेले नाही. तो माणुस इंदौरला राहतो. आणि घरपट्टी गेल्या १० वर्षापासुन त्याच्या नावावर येत आहे. आता कोण भरेल त्याची घरपट्टी ज्यानी विकत घेतला होता तो म्हणतो मी भरणार नाही ती घरपट्टी. त्यांनी मुळ मालकाकडुन विकत घेतलेले आहे. तो म्हणतो निर्लेखित करा. काल त्यांनी उदय पाटील साहेबांकडे अर्ज दिलेला आहे. आता काल त्यांनी डाटा उतारा, इन्ट्री रजिष्टरसाठी अर्ज केला तर पुर्ण थकबाकी भरल्याशिवाय तो पण देता येत नाही. अस कस काय चालेल.

**मा.आयुक्त :-** बसा मी सांगतो, सर्व्हे साधारण २ वर्षापुर्वी झालेला आहे. कोविडचा कालावधी सुरु होण्यापुर्वी. त्या कालावधीला जागेवरची परिस्थिती आपण नेमलेल्या लोकांनी त्या जागेवरची परिस्थिती पाहिली. त्याप्रमाणे याची माहिती आपल्याला आलेली आहे. आणि त्याच्यावरती आपल्याला, सॉरी आपण या वर्षापासुन सुधारीत आकारणी करण्यात येणार आहे. ते अजुन त्या आकारणी वरुन मागणी झालेली नाही. जी काही सर्व्हे करुन आलेली माहिती आहे. जसे आपण म्हणत आहात की, लोडबेरिंगच्या घराला आर.सी.सी.ची आकारणी झालेली आहे. अश्या बाबतीमध्ये संबंधीत मिळकतधारकांना त्यांची बिले वाटणार आहे.त्याच्या बद्दलची आपण त्यांना प्राथमिक नोटीस दिलेली आहे. त्याला त्यांची हरकत घेण्यासाठी २१ दिवसाचा कालावधी दिलेला आहे. या कालावधी मध्ये त्यांचे अर्ज आपल्याकडे येतील. त्यांचा वयक्तीक अर्ज या ठिकाणी महानगरपालिकेत नोंद करुन त्यांना सुनावणीच्या दिवशी

आपले म्हणणे मांडण्याची संधी आपण देणार आहोत. आता याच्यामध्ये सर्व्हे मध्ये आलेली माहिती जर संबंधीत नागरीक म्हणत असतील की, वस्तुस्थिती वेगळी आहे. तर त्याला आपले म्हणणे मांडण्याची संधी आपण देणार आहोत. याच्यानंतर संस्थेचे कर्मचारी आणि आपले नगरपालिकेचे संबंधीत असलेले टॅक्स लिपीक हे जागेवर जातील स्पॉट इन्सपेक्शन करतील वेरिफीकेशन करतील. आणि मग सर्व्हे मधील माहिती बरोबर आहे की, नागरीकांनी आपल्याकडे मांडलेली माहिती बरोबर आहे त्याची खातरजमा केल्यानंतर जी वस्तुस्थिती असेल. त्यावरच आकारणी होणार आहे. कुठलीही आकारणी केवळ सर्व्हे वरुन आलेल्या माहितीवरुन होणार नाही. नागरीकांना आपली सुचना मांडण्याची संधी मिळणार आहे. कारण याच्यामध्ये काही सदस्यांना तक्रार ही करावी लागेल. ज्या ठिकाणी आपल्याला असे वाटेल की, वस्तुस्थिती वेगळी आहे. आणि आपल्या रिकॉर्डवर माहिती वेगळी आहे. अशी विसंगती जर तुम्ही प्रशासनाच्या निर्दशनात आणुन दिली. तर आपण ती विसंगती दुर करणार आहोत. भाडेकरु च्या बाबतीमध्ये आपल्यासमोर असे अनेक केसेस येत आहे. कारण सर्व्हे ज्या वेळेला झाला. त्या वेळेला काही ठिकाणी भाडेकरु असेल.परंतु आज नसेल. काही ठिकाणी त्यावेळेला भाडेकरु नसेल पण आज असेल. आता हे भाडेकरु असणे आणि नसणे ही सतत बदलणारी प्रक्रिया आहे. दोन वर्षापुर्वी सर्व्हेच्या वेळी कदाचित कोणीही असेल पण आज जर त्याठिकाणी भाडेकरु नसेल. तर आपण आज आकारणी करणार आहोत की, भाडेकरु नाही मालक स्वत: वापरतात. असे समजुनच आकारणी केली जाईल.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** लेखी द्यायची आहे मान्य. पण सुनावणीची संधी देतील अमरावतीचे लोकं. आणि आपले कर्मचारी हे सोबत जाणार. मग जर आपले कर्मचारी आता सोबत जात आहे तर त्यांना तो त्रास होतच आहे त्यांना तो त्रास होतच आहे. मग सर्व्हेलाच आपण का दिला त्यांना. तेव्हा आपले कर्मचारी करु शकले असते. आपण इतका खर्च केला त्याच्यावर. मेन मुद्दा हा आहे की, आपण सर्व्हे कशासाठी केला. म्हणजे योग्य तो सर्व्हे झाला पाहिजे. योग्य सर्व्हेच जर झाला नाही त्यावेळेला. मग आपण पैसे कश्याचे मोजले इतके. पैसे तर मोजले आणि परत काम कराव लागत आहे. आपल्या कर्मचाऱ्यांना ही काम कराव लागत आहे. नगरसेवकांना पण त्याचा त्रास होत आहे. आणि ते अमरावतीचे लोकं परत येत आहे. म्हणजे याचा मुद्दा, वेस्ट मनीच म्हणायला पाहिजे माझ्या मते.

**मा.आयुक्त :-** आपला आक्षेप साहजिक आहे. एजन्सीचे काम एजन्सीलाच कराव लागणार आहे. ऐजन्सीच्या कामासोबत महापालिका कर्मचारी ठेवावेच लागणार आहे. केवळ एजन्सीला काम दिले आहे म्हणुन महापालिका आपल्या जबाबदारीहुन मुक्त होणार नाही. नागरीकांच्या दृष्टीने या सगळया कामांची जबाबदारी महापालिका प्रशासनाची आहे. त्यामुळे आपल्याला प्रशासनाला आणि हे काम अमरावतीच्या एजन्सीला दिले आहे असे म्हणुन आपल्याला जबाबदारी टाळता येणार नाही. त्यामुळे संस्थेने केलेल्या सर्व्हेबद्दल जर नागरीकांच्याकडुन काही तक्रार आली. तर संस्थेच्या बरोबरीने आपलेही कर्मचारी जावुन वेरिफाय करणे या मधुनच आपण नागरीकांना न्याय देऊ शकेल.आपण प्रामाणिकपणे काम करुन संस्थेच्या आलेल्या नागरीकांना भवतव्य करणे योग्य होईल. त्यामुळे आपण संस्थेच्या काम केल्याचेच आपण त्याला टॅक्सचे पैसे लावणार आहोत. आणि ज्या कामांमध्ये आपल्याला नागरीकांवर संशय आहे असे काम आपले कर्मचारी वेरिफाय करतील.जसे आपण एखाद्या कॉन्ट्रॅक्टरला काम देतो तर आपले इंजिनिअर सुपरवाईज करतात ना.तसेच एजन्सीच्या कामावर आपले लोक सुपरवाईज करतील. आणि याच्यामध्ये नागरीकांवर अन्याय होणार नाही. हा आपला हेतु आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** आणि रेट काय लावले आहे साहेब.

**मा.आयुक्त :-** आर.सी.सी. असेल आर.सी.सी.चे रेट लागतील, लोडबेअरींग असेल लोडबेअरींगचे रेट लागतील.याच्याबद्दल आपण निश्चिंत रहा. आपण याबाबी फक्त आमच्या निदर्शनास आणुन द्याव्या. आपण स्पॉट वेरिफीकेशन करु. जी वस्तुस्थिती असेल त्याप्रमाणे आकारणी होईल.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** मला माहिती मिळालेली आहे, हा जो लावलेला रेट आहे. काही ठिकाणी २२० लावलेला आहे काही ठिकाणी २३७ लावलेला आहे. हा डिफरंस का ?

**मा.आयुक्त :-** ताई, प्रत्येक वर्षाचे दर वेगळे आहे. आता आपण याठिकाणी आकारणी करत आहोत. याच्या मध्ये महानगरपालिका स्थापन झाल्यापासुन आपण नगरपालिकेच्या कालावधी मध्ये ठरविलेले कोणतेही दर आपण बदललेले नाही. नगरपालिका असतांना त्यावेळी दर ४-४ वर्षाने आकारणी होत होती. त्यावेळेला जे दर चार वर्षाने दर ठरविलेले आहे. एखादी मिळकत जर समजा ९२ साली बांधली गेली असेल. आपण त्याची आज जरी आकारणी करत असु. तर त्याला ९२ चा दर लावला जाईल. काही मिळकती ९६ ची असेल आणि आज आपण आकारणी करु तर त्याला आजचा दर न लावता ९६ चा दर लावला जाईल. तर जर ४ वर्षानंतर बदल झाला असेल तो बदल करणे आपल्याला योग्यच राहील. मिळकत केव्हा कन्स्ट्रक्ट करण्यात आलेली आहे याच्यावर त्याला कोणता दर आकारणार ते ठरणार आहे. आपल्याला मोघम चर्चा न करता. ज्या ज्या प्रटीक्युलर ईयर मध्ये नियोजन करणे त्याची आपल्याला सहज परवानगी आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौर आपल्याला एक विनंती आहे की, हे जे काही सुचना देण्यात याव्या. कारण नागरीकांना खुप त्रास होत आहे. काहींच्या ड्युटया असतात आणि ते सोडुन त्यांना त्यांच्या मागे फिराव लागत. तरी आपण योग्य त्या सुचना कराव्या.

**नगरसचिव :- विषय क्रं.१:-** दि.१२/०८/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झालेल्या ऑनलाईन (ॲपव्दारे) सर्वसाधारण महासभेचे चे कार्यवृत्त कायम करणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कार्यवृत्त मंजुर करण्यात यावे.

**श्री.नितीन बरडे :-** माझे अनुमोदन आहे. माईक बंद आहे तुमचा. माईक चालु करा.

**नगरसचिव :-** चालु आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.६२७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, दि.१२/०८/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झालेल्या ऑनलाईन (ॲपव्दारे) सर्वसाधारण महासभेचे कार्यवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- बरडे नितीन मनोहर**

**नगरसचिव :- विषय क्रं.२:-** महासभा ठराव क्र.५४१

**श्री.चेतन सनकत :-** साहेब, महापौर ताई मी पत्र दिले होते.

**श्री.कैलास सोनवणे :-** तुमचा गटाचा विषय आहे तो, जाऊ दे.

**श्री.चेतन सनकत :-** अप्पा टेक्नीकल विषय आहे ते.

**श्री.कैलास सोनवणे :-** कसला टेक्नीकल विषय, काही टेक्नीकल नाही. जावु द्या पुढचा विषय घ्या.

**नगरसचिव :- विषय क्रं.२:-** महासभा ठराव क्र.५४१

**श्री.चेतन सनकत :-** अप्पा तुम्हारे लिए वो कुछ नही होंगा मेरे लिए बहोत कुछ है.

**श्री.कैलास सोनवणे :-** जान दे ना यार.

**मा.महापौर :-** थोडक्यात विषय मांडा.

**नगरसचिव :-** विषय वाचुन घेऊ द्या.

**मा.महापौर :-** नाही. पहिल्या विषयाच्या संदर्भात आहे.

**श्री.नितीन बरडे :-** सुनिल भाऊ, माईक बंद आहे.

**नगरसचिव :-** नाही भाऊ चालु आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मास्क मुळे.

**श्री.चेतन सनकत :-** मागच्या मिटींग मध्ये आपण केलेल्या चर्चेच्या अनुषंगाने आपण आकृतीबंधावर चर्चा केली होती. त्यावेळेला मी मांडलेले मुद्दे होते. त्याच्यामध्ये शासनपरिपत्रकाचा उल्लेख करणे संदर्भात आणि मानव अधिकार आयोगाचा जो निकाल आहे त्याच्या अधिन राहुन मी तुम्हाला सुचना केलेली होती. ते त्याच्यामध्ये ठरावामध्ये उल्लेख झालेला नाही. आणि सर्व सभागृहाचे मी लक्ष वेधु ईच्छितो, २०१३ मध्ये सन्मा.महापौर किशोरभाऊ पाटील हे महापौर असतांना नितीनभाऊ लढ्ढा यांनी सुचना मांडुन एक ठराव पारित केलेला होता.आपला कोर्टाचा निकाल होता. ह्युमन राईट कोर्टाचा, त्याच्यावर महासभा ठराव क्र. १५४७ नाही. महासभा क्र. ८९ ठराव क्र.१५४७ दि.२२/०४/२०१३ या ठरावामध्ये ५२३ कर्मचारी भरती करणे संदर्भात जो आदेश आलेला होता कोर्टाचा, त्या संदर्भात ठराव केलेला आहे आणि राज्य शासनाला पाठविलेला आहे मान्यतेसाठी. आणि तो ठराव आपल्याकडे प्रलंबित आहे. आता आपण इकडे आकृतीबंध मंजुर करत आहे. आकृतीबंधामध्ये आपण त्या पदांचा उल्लेख केलेला नाही. आपण जर ते त्याच्यामध्ये उल्लेख केलेला नाही. तर कोर्टाच्या या निकालाचे आपण सर्व सभागृह अवमान करीत आहे. असे निदर्शनास येईल. आणि हे जर कधी आपण त्याच्या मध्ये इन्क्ल्युड नाही केले तर अनुसुचित जाती जमाती कायदा १९८९ जो आहे. आणि नागरी हक्क संरक्षण अधिनियम कायदा १९५५ याची आपल्याकडुन काही चुक होऊ शकते. म्हणुन ती सर्व बाबी तपासुन कायद्याची योग्य आणि ५२३ लोकांचा जो ठराव आहे. तो जिवंत आहे. कोर्टाचा आदेश जिवंत आहे. हे असतांना ही आपण वेगळा ठराव करुन पाठवु शकतो का मान्यतेसाठी ? हे टेक्नीकली गोष्टी आहे याच्यावर जर समजा, एखादी सामाजिक कार्यकर्ता म्हणो किंवा एखादी आर.टी.आय. कार्यकर्ता असो. किंवा कोणी युनियन पदाधिकारी असो. ते जर कोर्टात गेले तर सर्व सभागृह याच्या मध्ये अडकणार आहे. अवमान केले तर.

**श्री.कैलास सोनवणे :-** गोराणे साहेब, ते काय नोंद करायला म्हणत आहे चेतन भाऊ ते करा परत कशाला कोर्टात नेता आम्हाला.

**श्री.चेतन सनकत :-** कारण सन २०१८ चा जो जी.आर.आहे सफाई कर्मचारी संदर्भात ते सगळे, २०१८ चा जो शासन परिपत्रक आहे. त्याच्या अनुषंगाने सफाई काम मागासवर्गिय लोकांना देणे संदर्भातले ते काम आहे. मागासवर्गिय लोकांना जर काही हक्कापासुन वंचित ठेवतो आहे असा काही ठराव करतो आहे. त्याच्यासाठी आपण सभागृह दोषी ठरणार आहे. ही सर्व कल्पना प्रशासनाने लक्षात घ्यायची. आणि या विषयी जर कोणी कोर्टात गेला नाही. तर मी जाणार आहे. माझ्या समाजासाठी मी कोर्टात जाणार आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** अरे भो, प्रस्ताव सादर करणारेच मागासवर्गिय आहे.

**श्री.चेतन सनकत :-** अप्पा साहेब, काही गोष्टी अशी आहे की, त्याच्यामध्ये मला प्रत्येक विषयात माहिती हवी असल्यास मी मॅडमांकडे जातो, अस्थापना मध्ये जातो. तेथे समाधान होत नाही. मला सर्व विषयांसाठी आयुक्त साहेबांकडे जाव लागते. मी जर माझ्या समाजाला न्याय देऊ शकलो नाही. तर मला या पदावर राहुन काही उपयोग नाही.

**मा.महापौर :-** चेतन भाऊ बसुन घ्या आपण, आपल्या सगळया सुचनांवर प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी. कायदेशीर जे असेल आपण मांडा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सुचनांचे पालन करण्यात येईल आपण घ्या पुढचा विषय.

**मा.महापौर :-** पुढचा विषय घ्या.

**नगरसचिव :- विषय क्रं.२:-** महासभा ठराव क्र.५४१ दि.१२/०८/२०२१ अन्वये तहकूब करण्यात आलेला आस्थापना विभागाचा सन १९९१-९२ ते १९९७-९८ चा विशेष लेखापरिक्षण अहवालाची माहिती घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य.

**श्री.केलास सोनवणे :-** हा जो आक्षेपाचा विषय होता. हा जो १२०० कर्मचाऱ्यांवरती, तो मी पाहिला, वाचला नाही पुर्ण परंतु चाळला, चाळल्यानंतर असे लक्षात आले. जे शासनाचे आक्षेप आहे ते काही असे दमदार नाही. आणि ते आक्षेप घेतलेले अधिकार पण मला वाटते शासनाकडे उरलेले नाही. तुम्हाला ही उरलेले नाही. तुम्हाला म्हणजे महापालिका प्रशासनाला. आणि महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना काही घाबरण्याची गरज नाही त्याच्यात. सगळयांनी काही घाबरायचे नाही. सगळे घाबरलेले आहे. त्यात असे झालेले आहे. १९८७ साली तत्कालीन नगरपालिकेची जी हद्दवाढ झाली. हद्दवाढ मध्ये खेडी, निमखेडी, पिंप्राळा, मेहरुण आणि आव्हाणा आणि एम.आय.डी.सी. परिसर त्याची बॉंडरी आपल्या नगरपालिकेच्या हद्दीत आली. म्हणजे १२ चौ.कि.मी. ची सिमा ६८.७८ चौ.कि.मी. इतकी झाली, म्हणजे ५ पटपेक्षा ही जास्त. ही हद्दवाढ झाली मग हद्दवाढ झाल्याने जे काही नागरीक आपल्यामध्ये आले.त्यांच्या सेवा, सुविधा सोई, ज्या काही आपले प्राथमिक गरजा आहे हे असतात, रस्ते गटारी वगैरेची सर्वसोई जबाबदारी आपल्यावर आली. आपली अस्थापना त्यावेळेस ऐवढी मोठी नव्हती. त्याकरीता एक प्रस्ताव तयार करुन शासनाला पाठविला गेला. आणि जागा मंजुरीसाठी मागणी दिली. ती मंजुर होऊन आली. नंतर परंतु त्यावेळेस १९८७ साली मला वाटत, त्या वेळेस फक्त एकमेव नगरसेवक ढेकळे साहेब या सभागृहात तेव्हा ते फक्त एकमेव आहे. ते तेव्हाही नगरसेवक होते.आणि त्यावेळेस निवड मंडळ कार्यालय होते भरतीसाठी. ज्या भरती प्रक्रिया पार पाडायच्या ते निवड मंडळाच्या माध्यमातुन पार पाडुन घ्यायच्या. निवड मंडळावरतीपण ढेकळे साहेब होते त्या वेळेला मला आठवत आहे. सेना भाजपाचे सरकार होते. तेव्हा निवड मंडळावर जळगांवहुन ते होते. मला माहित आहे. आणि मी विचारले सुध्दा त्यांना ते पण हो त्यावेळेस. निवड मंडळाने त्यावेळेस आपल्याला सहकार्य केले नाही. आपण त्यावेळेस वेळोवेळी नगरपालिकेने पत्र व्यवहार केला त्या संदर्भात की, जागा भरायचे आहे. त्यांनी त्यावेळेस काही प्रतिसाद दिला नाही निवड मंडळाने. परंतु त्याच्यानंतर मग नगरपालिकेला येथे अधिकार प्राप्त होते की, सहा-सहा महिन्यात वर्ग-३ चे पदे आपण भरु शकत होते सहा-सहा महिन्याने, मग त्यावेळेस आपण काही पदे भरले, काही रोजंदारीवर टाकले. त्यांच्या मुदती संपुन गेल्या तरीही आपण निवड मंडळाला हे केले पण त्यांनी प्रतिसाद दिला नाही आणि जाणुन बुजुन दिला नाही हे मला माहित आहे. त्यावेळेस जळगांवचे काहीच काम करायचे नाही जळगांवच्या लोकांना वेठीस धरायचे हे प्रकार होत त्यावेळेला हे मला माहित आहे. तर त्यांनी मंजुरी न देता. मग ते लोकं दरम्यानच्या काळात सहा-सहा महिन्याची ऑर्डरी घेऊन नंतर ते न्यायालयात गेले. ते न्यायालयात गेल्यानंतर न्यायालयाने डायरेक्ट निकाल दिला की, यांना कमी करता येणार नाही यांना जिथे असतील त्याच जागेवर समावुन घ्या. कमी करता येणार नाही. आणि मग एक ठराव झाला आपला काही तरी दि.२२.११ काही तरी सन आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** १९९७

**श्री.कैलास सोनवणे :-** हा. दि.२२/११/१९९७ ला एक ठराव झाला आणि त्या ठरावानुसार ते सगळे कायम झाले, हे सगळेचे सगळे कायम झाले. मग कायम होत असतांना यांनी वेळोवेळी हे सात पानांचा आहे माझ्याकडे मी वाचुन दाखवितो तुम्हाला, कायम झाले मग त्यांना चौथा वेतन आयोग, पाचवा वेतन आयोग, सहावा वेतन आयोग जेव्हा यांनी मागणी केली तेव्हा तुमच्या नियुक्त्या बोगस आहे म्हणुन ते रद्द करण्यात आले. परत यांनी कोर्टातुन आणला, आणि यांना त्या नियुक्त्या दिल्या गेल्या. परत त्यांना वेतन आयोग दिले. काही लोकांना प्रशस्तीपत्र दिले गेले चांगले काम केले म्हणुन आता २५-३० वर्षानंतर जर शासन म्हणेल हे बोगस आहे तर बोगस म्हणण्याचा अधिकार तुम्हाला नाही असा ही निकाल कोर्टाचा लागलेला आहे. नंतर दि.१०/०४/२००६ चा कर्नाटक सरकार विरुध्द उमादेवी व इतर याच्यात सुध्दा सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिलेला आहे की, ज्यांना दहा वर्ष सरळ सेवा झाली असेल. जो सेवेत असेल आणि न्यायालयात आणि न्यायालयात वाद प्रलंबीत नसेल. तर त्याच्या बद्दल परत फाईल उघडण्याची तुम्हाला अधिकार नाही.

हा एक निकाल आहे त्यानंतर ऑडिट निघालं. ऑडिट मध्ये शक निघाले, ते क्लिअर पण झाले. नंतर मध्यंतरी एक महाभयंकर आयुक्त होते. बंडल होता तो.

**श्री.सुनिल महाजन :-** नांव सांगा नांव.

**श्री.कैलास सोनवणे :-** कापडनीस, परत त्याने, तो कार्यकर्ता होता, तो कार्यकर्ता होता, त्याने नेत्यांच्या सांगण्यावरुन परत ऑडिटला पाठवुन दिले. काही कारण नसतांना काही अधिकार नसतांना.लेखापरिक्षण झाल्यानंतर सात वर्ष माणसे उकळता येत नाही. तर ती अट रद्द करुन महापालिकेत हा आदेश आला. म्हणजे पुर्वगृह दुषित आहे. हे सिध्द होत डायरेक्टली, हे जर कोर्टात गेले ना. कोर्ट इतका झापुन टाकेल, महाराष्ट्र शासनाला पण झापुन टाकेल आणि जो जाईन त्यालाही झापुन टाकीन. म्हणजे इतकी क्लिअर केस आमच्या कर्मचाऱ्यांची आहे. आणि इतक्या चांगल्या पध्दतीने त्यांनी काम केलेले असतांना त्यांना २५-३० वर्षानंतर तुम्ही म्हणणार की, हे बोगस आहे. आणि आक्षेप काय आहे त्यांच्यावरती, जन्माचा दाखला जोडला नाही. वयाचा दाखला जोडला नाही. तीन वर्ष एका ठिकाणी राहिला नाही व डायरेक्ट प्रमोशन दिले गेले. सगळयांच्याच याच्यावर ऑबजेक्शन आहे. हेच ऑबजेक्शन आहे. एकाला डावलले आणि दुसऱ्याला दिले तर मी समजु शकतो, सगळयांच्याच याच्यावरती ऑबजेक्शन आहे. सगळे १२०० च्या १२००. असे इतका घाणेरडा प्रकार शासन जळगांवसाठी करतो ही दुदैवाची बाब आहे. आणखी बरेच काही निकाल आहे मी तुम्हाला देतो. आणि ही सुध्दा मांडु शकत नाही. ही कोणी तरी मांडावी. हे घेवुन घ्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अप्पा आपली सुचना मी पण वाचलेली आहे. ही सुचना रेकॉर्डवरती घेऊन घ्यावी.

**श्री.कैलास सोनवणे :-** विशेष म्हणजे यांच्या कोर्टात केसेस होत्या. आणि यांनी तडजोड केलेली आहे तेव्हा. आणि तडजोड करुन हे कामावर आलेले आहेत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अप्पा मी सुचक म्हणुन सही करुन देतो.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो माझे अनुमोदन आहे. नितीन भाऊ तहकुब करण्याची गरज नव्हती. आम्हाला अहवाल मिळाला नाही मिळाला नाही. तेथे पाहायला एकच जण गेलेला आहे तेथे, तेथे पडलेला आहे दोन दोन मजल्यावरती अहवाल, ११ व्या १२ व्या मजल्यावर,

**श्री.नितीन लढ्ढा :-** याच्या मागची आमची भुमिका ऐवढीच आहे. या कर्मचाऱ्यांनी आणि या अधिकाऱ्यांनी या शहर वासियांची सेवा केलेली आहे. जरी त्याच्यामध्ये काही तांत्रिक चुका झाल्या असतील किंवा ज्या काही त्रृट्या राहिल्या असतील. आपण यांना क्षमापीत करण्याच्या दृष्टीकोणातुन फक्त राज्य शासनाला विनंती करतो आहे. या सभागृहाला निर्णय घेण्याचा अधिकार नाही परंतु या अधिकाऱ्यांच्या भावना या सभागृहाच्या माध्यमातुन राज्य शासनाकडे पोहचवितो आहे. आणि राज्य शासनच त्याच्यावरती जो काही अंतिम निर्णय घ्यायचा आहे तो राज्य शासनच घेईल.

**श्री.कैलास सोनवणे :-** पाच मिनीट लागतील आपल्याला.

**नगरसचिव :-** श्री.नितीन लढ्ढा आणि श्री.कैलास अप्पा सोनवणे यांच्याकडुन एक सुचना प्राप्त झालेली आहे. मा.महापौर यांनी वाचन करायचे निर्देश दिलेले आहे. त्यानुसार मी वाचन करीत आहे.

जळगांव शहर महानगरपालिकेने (तत्कालीन नगरपालिका) सन १९९१-९२ ते १९९७-९८ या कालावधीत दिलेल्या पदोन्नती व नियुक्त्यांचे अभिलेखे विशेष लेखा परिक्षण अहवाल उपसंचालक (मनपालेप) यांचे कडील आदेश क्र.स्था १८/ब/मनपालेप/विशेष लेखा परिक्षण/जळगांव मनपा/३५० दिनांक १२/०७/२०१९ अन्वये प्राप्त झाला तो पाहिला.

असा ठराव करण्यात येतो की, तत्कालीन जळगांव नगरपालिका अस्तित्वात असतांना सन १९८० ते १९८५ या कालावधीत नगरपालिकेत प्रशासकीय राजवट होती. या कालावधीत अत्यावश्यक नागरी सुविधांची कामे ही खोळंबलेली होती तर विकासाच्या कामांचा प्रश्नच नव्हता. माहे मे १९८५ मध्ये न.पा.ची सार्वत्रिक

निवडणुक होवून मा.सुरेशदादा जैन यांचे नेतुत्वात शहर विकास आघाडीकडे जळगांव नगरपालिकेची सुत्रे आलीत. दिनांक ११/०९/१९८७ ला जळगांव नगरपालिकेची हद्दवाढ होवून शहरालगतची पिंप्राळा, मेहरुण, खेडी, निमखेडी तसेच भागश: आव्हाणा ही खेडे व एम.आय.डी.सी.परिसर नगरपालीका हद्दीत समाविष्ट होवून पुर्वी १२ चौ.कि.मी. असलेली हद्द ६८.७८ चौ.कि.मी. झाली. नगरपालिकेची हद्दवाढ झाल्याने जवळपास पाच पटीपेक्षा जास्त परिसर नगरपालिका हद्दीत अंतर्भुत झालेने त्या परिसरातील नागरिकांनाही नागरीसुविधा उपलब्ध करुन देणेची जबाबदारी जळगांव नगरपालिकेवर आली. मात्र त्यासाठी अत्यावश्यक लागणारा कर्मचारी वर्ग नगरपालिका आस्थापनेवर फारच अल्प प्रमाणात असलेमुळे नगरपालिकेने रोजंदारी तत्वावर कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या केलेल्या होत्या व नगरपालिकेच्या आस्थापनेवर कायम कर्मचारी नियुक्त करणेचे हेतुने शासनाकडे विहीत नमुन्यात पदनिर्मितीचा रितसर प्रस्ताव सादर केला. सदर प्रस्तावास शासनाने सन १९८७-८८ व तद्नंतर मान्यता प्रदान केलेली आहे.

सन १९८८ मध्ये शासनाने कर्मचारी भरतीसाठी राज्य निवड मंडळ निर्माण करुन वर्ग-३ ची पदे सरळ सेवा भरतीने राज्यनिवड मंडळ यांचे मार्फत करणेचे आदेशित केलेले होते. तसेच राज्य निवड मंडळ कर्मचारी नियुक्त करीत नाही तो पर्यंत अस्थापना सुचीवर मंजुर जागेवर स्थानिक प्राधिकरणास ६-६ महिने कालावधीसाठी वर्ग-३ चे कर्मचारी नियुक्त करणेचे अधिकार प्रदान केलेले होते. त्यानुसार अस्थापना सुचीवर मंजुर पदांवर कामाची निकड लक्षात घेता व कर्मचारी संख्या अल्प असलेमुळे तात्पुरती नियुक्ती देण्यात येवून सन १९८९ ते ९१ या कालावधीत कर्मचारी नियुक्ती करणे संबंधात राज्य निवड मंडळ यांचेशी वेळोवेळी पत्र व्यवहार करण्यात आला. मात्र दोन वर्षाचा कालावधीत राज्य निवड मंडळाने कर्मचारी निवड केली नाही.

दरम्यानच्या काळात नगरपालिकेने रोजंदारी तत्वावर नेमलेले व तात्पुरती नियुक्ती दिलेले कर्मचारी यांनी न्यायालयात दावे दाखल केले असता मे.औदयोगिक न्यायालयाने एका वर्षात २४० दिवस पेक्षा जास्त काम केलेले असलेने कर्मचारी यांना कामावरुन कमी करु नये असे निर्देश दिलेत.

मे.न्यायालयाचे निर्देशानुसार कर्मचारी यांना कमी करता येणार नाही व राज्य निवड आयोगास पत्र व्यवहार करुन ही कर्मचारी यांची निवड करण्यात आलेली नाही. त्यामुळे नगरपालिकेने ठराव क्र.४५८ दिनांक २३/१०/१९९० पारित करुन त्या अन्वये न्यायालयीन निर्णयाची माहिती राज्य निवड मंडळास अवगत करुन रिक्त पदे भरणे संबंधात पत्र व्यवहार करणेस मान्यता दिली. त्यानुसार पत्रव्यवहार करुन ही एक वर्षाच्या कालावधी उलटूनही राज्य निवड मंडळ यांनी कर्मचारी नेमणे संबंधात कोणतीही कार्यवाही केली नाही. त्यामुळे कामाची निकड लक्षात घेवून व न्यायालयीन कार्यरत कर्मचारी व यांचे वय होत असलेने नगरपालिकेने नगरपालिका अधिनियमाचे कलम ७६ अंतर्गत मंजुर पदावर कर्मचारी नियुक्त करणेस मान्यता प्रदान करुन कर्मचारी यांची नियुक्ती करुन तसा अहवाल न्यायालयास आणि राज्य निवड मंडळास सुध्दा प्रशासनाने सादर केलेला आहे.

सन १९८४ ते १९९२ या वर्षाच्या लेखा परिक्षणात स्थानिक निधी लेखा परिक्षण विभागाने कर्मचारी भरती संबंधात लेख परिच्छेद क्र.१७५ अन्वये आक्षेप घेतला होता. त्या आक्षेपास अनुसरुन नगरपालिकेस खुलासा सादर केला. मुख्य लेखा परिक्षण, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई यांनी पत्र क्र.१/ब/नपाज/४०८ दिनांक ०८/०३/१९९९ अन्वये आक्षेप वगळलेला आहे.

उर्वरीत रोजंदारी कर्मचारी यांनी त्यांना सेवेत कायम न केल्यामुळे न्यायालयात फौजदारी दावे दाखल केले होते. त्या दाव्यात तत्कालीन प्रशासक श्री.बी.जी.वाघ यांनी जागा मंजुर झालेवर सदर कर्मचारी यांना

प्रथम प्राधान्याने त्यांच्या शैक्षणिक पात्रता लक्षात घेवून कायम सेवेत रुजू करण्यात येईल असे न्यायालयात लेखी आश्वासन लिहून दिलेले होते. त्या अनुषंगाने सन १९९७ ला शासनाने मंजुर केलेल्या पदांवर भरती करण्यात आलेली आहे. त्याव्दारे न्यायालयाचा अवमान होणार नाही याची दक्षता घेण्यात आलेली आहे.

सदर मंजुर पदे भरतांना तत्कालीन नगरपालिकेने न.पा.ठ.क्र.८६ दिनांक २६/०४/१९९७ अन्वये धोरणात्मक निर्णय घेतलेला होता. त्यानुसार असे निश्चित करण्यात आलेले होते की, १) वर्ग-३ ची मंजुर २६२ पदे प्रादेशिक दुय्यम सेवा मंडळ, सेवा योजना कार्यालय आदिवासी कल्याण विभाग व समाज कल्याण विभाग यांचेकडून पात्र उमेदवारांची यादी मागवून मुलाखत घेवून भरता येतील तथापी हल्ली नगरपालिका सेवेत वर्ग-४ मध्ये कार्यरत कर्मचाऱ्यापैकी ज्यांचे कडेस विहीत शैक्षणिक पात्रता आहे. अशा कर्मचाऱ्यांना सेवा ज्येष्टतेनुसार वर्ग ३ चे पदावर पदोन्नतीने जागा भरण्यात याव्यात मात्र ज्या कर्मचाऱ्यांना शिक्षा/दंड/निलंबन/व गैरप्रकाराबाबत इतर शिक्षा झाली असेल त्यांच्या पदोन्नतीसाठी विचार करणेत येवू नये तसेच वर्ग-४ ची पदे भरणेचा महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ चे कलम ७६(२) नुसार नगरपालिकेस अधिकार असून त्यानुसार हल्ली रोजंदारीवर कार्यरत कर्मचारी ज्यांची सेवा २४० दिवसापेक्षा जास्त झालेली आहे त्यांना कमी केल्यास अनफेअर लेबर प्रॅक्टीस ॲक्ट नुसार अनुचीत होईल. त्यामुळे वर्ग-४ चे जागेवर रोजंदारी कर्मचारी व न्यायालयीन कर्मचारी यांना सेवेत समाविष्ट करुन घेणेत यावे. मात्र अशा रोजंदारी/न्यायालयीन कर्मचारी यांची मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

अ. ज्या रोजंदारी कर्मचारी यांनी नगरपालिकेविरुध्द न्यायालयात दावे / केसेस दाखल केल्या आहेत त्यांनी ३० दिवसाचे आत दावे काढून घ्यावे याबाबत मुख्याधिकारी यांनी कार्यवाही करावी. मुदतीत दावे न काढल्यास संबंधीतांचे वेतन रोखून ठेवण्यात यावे.

ब. ज्या कर्मचाऱ्यांचे वय ४५ पूर्ण होवून गेलेले आहे व काम करण्यास सक्षम नाही त्यांच्या वारसांना समाविष्ट करण्यात यावे.

क. जे रोजंदारी कर्मचारी/न्यायालयीन कर्मचारी यांची नियुक्तीसाठी निवड झालेली आहे त्यांचेकडून विधी सल्लागार यांनी तयार करुन दिलेल्या मसुदा नुसार २०/- चे मुदांकीत शुल्काचा करारनामा करुन घेण्यात यावा व ३० दिवसांत दावे न काढल्यास त्यांची नियुक्ती करण्यात येवू नये.

वरीलप्रमाणे निश्चित केलेल्या धोरणानुसार पदोन्नती व नियुक्तीचे प्रस्ताव सादर करतांना मुख्याधिकारी प्रशासन अधिकारी, आस्थापना अधिक्षक यांनी कार्यवाही करावी. कोणताही कामगार/कर्मचारी यांचेवर अन्याय होवू नये तसेच सेवाजेष्ठता पात्रता, अनुशेष याबाबत पडताळणी केलेनंतरच नियुक्ती पदोन्नतीचे आदेश निर्गमित करावेत याबाबत कोणतीही तक्रार/न्यायालयीन उक्त अधिकारी/खाते प्रमुख अस्थापना अधिक्षक व मुख्याधिकारी यांची राहील असा ठराव पारित करण्यात आलेला होता.

उपनिर्दिष्ठ विवेचन वरुन स्पष्ट होत आहे की कर्मचारी नियुक्ती/पदोन्नती करतांना तत्कालीन अध्यक्ष व नगरपालिका सभा यांनी कोणत्याही प्रकारची अनियमीतता तथा गैरकृत्य केलेले नाही. तसेच तत्कालीन मुख्याधिकारी यांनी ही तत्कालीन प्रचलीत सर्व नियमांचे पालन करुनच नियुक्त्या व पदोन्नत्या रितसर केलेल्या आहेत त्यामुळे त्यात अनुचीत असे काहीच घडलेले नाही.

या संबंधात भारतीय लेखा एवं लेखा परिक्षा विभाग प्रधान लेखाकार (लेखा परिक्षण-१) मुंबई यांनी २०१५-१६ मध्ये लेखा परिक्षण करुन परिच्छेद क्र.५ अन्वये आक्षेप घेतला होता. त्या आक्षेपास महानगरपालिकेने सादर केलेला खुलासा लक्षात घेता प्रधान लेखाकार यांनी पत्र क्र.सा.क्षे.१/प्रभार ITI/IV/आय.आर.नं.फा.नं.९९५/४५३ दिनांक ११/०७/२०१७ अन्वये आक्षेप वगळलेला आहे.

या पदोन्नती व नियुक्त्या संबंधात खाली नमुद काही मुद्दे फारच गरजेचे व आवश्यक आहे.

१. महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ मधील तरतुदीनुसार कर्मचारी भरतीबाबतचे अधिकार अंतर्गत कर्मचारी भरती कामी न.पा. सभेने वेळोवेळी ठराव पारीत केलेले होते. तत्कालीन मुख्याधिकारी न.पा.जळगांव यांनी महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ चे कलम ३०८ अंतर्गत सदर ठराव म.जिल्हाधिकारी सो.जळगांव यांचेकडेस विखंडणासाठी पाठविलेले आहेत. मात्र म.जिल्हाधिकारी सो.जळगांव यांनी याबाबत कुठलाही ठराव विखंडणाची कारवाई केलेली दिसून येत नाही.

२. मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपील क्र.३५९५-३६१२/१९९९ मध्ये दिलेल्या निकालात पॅरा ४४ मध्ये स्पष्ट निर्देशीत केलेले आहे की जर कर्मचाऱ्यांची सेवा १० वर्षे झालेली असेल व त्यास संबंधीत संस्थेने नियमीत केले असेल तर अशी प्रकरण पुन्हा उघडण्याची आवश्यकता नाही. मे.सर्वोच्च न्यायालयाच्या सदर निकालाच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य शासनाने पत्र क्र.डीएनसी-१००४/२३०८/प्र.क्र.७०/२००४/नवि-२४ दिनांक १६/११/२००६ चे महापालीका आयुक्तांना पत्रातील परिच्छेद ‘ग’ नुसार निर्देशीत केलेले आहे की, सर्वोच्च न्यायालयाचा आदेशान्वये या पुर्वी सेवा नियमीत केल्या आहेत व त्या न्यायप्रविष्ठ नाहीत अशा नेमणूकीची प्रकरणे पुन्हा उघडू नये. (नव्याने निर्णय घेण्याची गरज नाही.)

ज्या पदोन्नत्या व नियुक्त्याबाबत विशेष लेखापरिक्षण करण्यात आलेले आहे त्या १९९१-९२ ते १९९७-९८ या कालावधीतील असुन त्यास सुमारे २५ ते ३० वर्षे झालेली आहेत. त्या पदांवरील बहुतांश कर्मचारी सेवानिवृत्त झालेले ओहत, सेवानिवृत्त होण्याचा मार्गावर आहेत व काही मयत ही झालेले आहेत. त्यामुळे सदर प्रकरणी आक्षेप होणेच मुळात संयुक्तीक नसून गैर आहे.

३. जळगांव महापालिकेत कार्यरत केमीस्ट पदावरील कर्मचारी यांनी वरिष्ठ वेतनश्रेणी मिळणेबाबत अर्ज केला असता महापालिकेने सन १९९१-९२ मधील नेमणूका बेकायदेशीर असलेचे कारणास्तव अर्ज निकाली काढला असता सदर कर्मचाऱ्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठात रिट याचिका क्र.५६७४/२०१५ व ५६७५/२०१५ दाखल करुन दाद मागितली. सदर याचिकेची सुनावणी होवून निकालात स्पष्ट निर्देश दिलेले आहेत की २५ वर्षानंतर बेकायदेशीर नेमणूकीचा मुद्दा उपस्थित करणेचा पर्याय महापालिकेस खुलासा नाही. कर्मचाऱ्यांना ६ व्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चित करुन पगार अदा करावा.

मे.उच्च न्यायालयाच्या उपरनिर्दिष्ठ याचिकेतील निकालानुसार सुध्दा विशेष लेखा परिक्षण अहवालास काहीच अर्थ राहत नाही.

४. नियुक्त्या करतांना तत्कालीन नगरपालिकेने राज्य निवड मंडळ यांना वेळोवेळी पदे भरणेबाबत पत्रव्यवहार केला मात्र राज्य निवड मंडळाने प्रतिसाद न दिल्यामुळे तसेच शहराची वाढलेली हद्द लक्षात घेता, कर्मचारी वर्गाची अत्यंत गरज असल्यामुळे उपरनिर्दिष्ट विवेचनात नमुद केलेप्रमाणे पदोन्नती व नियुक्त्या तत्कालीन नगरपालिकेने केलेल्या होत्या व त्या नियमानुसारच व कायदयाच्या चौकटीत आहेत यात दुमत असण्याचे कारणच नाही.

सन १९९१-९२ ते १९९७-९८ या कालावधीत करण्यात आलेल्या पदोन्नत्या व नेमणूका संबंधातील पार्श्वभूमी सविस्तर वस्तुनिष्ठ अहवाल वर नमुद केलेप्रमाणे नमुद करण्यात येत असुन सदर अहवालाचा विचार करता तत्कालीन नगरपालिकेने केलेली कारवाई ही संयुक्तीक व नियमानुसारच आहे. नेमणूका शैक्षणिक पात्रतेनुसारच करण्यात आलेल्या आहेत. तसेच सदर नेमणूकींना जवळपास २५ ते ३० वर्षापेक्षा ही जास्त कालावधी लोटलेला आहे आणि सदर नेमणूकधारक कर्मचारी सेवानिवृत्त ही झालेले आहेत. काही मयत झालेले आहेत, काही सेवानिवृत्तीच्या मार्गावर आहेत. त्यामुळे मे.उच्च न्यायालय व सर्वोच्च

न्यायालयाचा निकालांच्या अनुषंगाने सदर विशेष लेखा परिक्षण अहवालास काही अर्थच शिल्लक राहत नाही. त्यामुळे प्रशासनाने सदर अहवाल नस्तिबंद करणेचा दृष्टीने योग्य ती कार्यवाही करावी आणि अहवाल नस्तीबंद करण्यात यावा असा ठराव करण्यात येत आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** गोराणे साहेब, समजेल असा वाचा ते पुर्ण करण्याच्या हिशोबाने वाचत आहे तुम्ही.

**नगरसचिव :-** नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** आना इकडे मी वाचतो ते, महत्वाची माहिती आहे ती. ते दाखवा माझ्याकडे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** हे सर्व विषय जे दिलेले आहे अप्पा साहेबांनी आणि नितीन भाऊंनी याची झेरॉक्स काढावी व सर्व खातेप्रमुख कर्मचाऱ्यांना वाटप करुन टाकावी.

**श्री.कैलास सोनवणे :-** त्यांना द्या तुम्ही ते मुद्दे इतके महत्वाचे आहे. ते कर्मचाऱ्यांनाही माहित नाही अजुन. चांगले मुद्दे आहे ते.

**श्री.विष्णु भंगाळे :-** अध्यक्ष महोदया, ते लेखी दिलेले आहे. त्याच्यावर जी मुद्दे आहे त्याप्रमाणे घ्यावे आणि पुढील कार्यवाही करावी.

**श्री.कैलास सोनवणे :-** चला, पुढचा विषय घ्या.

**श्री.प्रशांत नाईक :-** नाही तर त्याचे १०० प्रती माझ्याकडे देऊन द्या मी वाटुन देतो सर्वांना.

**श्री.कैलास सोनवणे :-** पुढचा विषय घ्या. मी ताईंकडे क्षमापण ही दिलेला आहे. ते शासनाला पाठवा.

**मा.महापौर :-** एक मिनीट, एक मिनीट.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** शासनाला विनंती पत्र पाठवायच आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** कैलास अप्पा आणि नितीन भाऊंनी जो विषय मांडला त्याच पध्दतीने पुढची कार्यवाही करावी.

**श्री.चेतन सनकत :-** पण ते पत्र नस्तीबंदसाठी होत. तो पत्र माझ मागे घेण्यात येत आहे. नितीन भाऊंची आणि आपले सर्वांच्या भुमिकेसोबत मी सहमत आहे.

**नगरसचिव :-** शेवटी त्यांनी अहवाल नस्तीबंद करण्यात यावा अस नमुद केलेल आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आणि हाच ठराव विनंती म्हणुन शासनाला पाठवावा. जेणे करुन या सर्व अधिकाऱ्यांच्या निघालेल्या आक्षेपाच्या अनुषंगाने राज्य शासनाकडे अपिल दाखल केलेली आहे. म्हणजे त्या अपीलाला कुठेतरी पुढे असा हा ठराव त्यांना मदतीसाठी कामात येईल.

**श्री.चेतन सनकत :-** राज्य शासनाकडुन जो अहवाल येईन ते आम्ही मान्य करतो. पहिला ठराव दुरुस्ती करणे संदर्भातला आहे ते पण दुरुस्ती करुन घ्यावी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हा संपुर्ण विषय राज्य शासनाच्या आणि लेखापरिक्षण विभागाच्या निदर्शनात आणुन देण्याच्या संदर्भात असा ठराव राज्य शासनाकडे आणि विशेष लेखापरिक्षणाकडे पाठविण्यात यावा. म्हणजे या सभागृहाची या अधिकाऱ्यांची संपुर्ण भुमिका या ठरावामध्ये डिक्टेट करुन ही बाब राज्य शासनाने आणि विशेष लेखापरिक्षण विभागाच्या निदर्शनास आणुन द्यावी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** या विषयावर कार्यवाही करुन ठराव करुन राज्य शासनाकडे पाठविण्यात यावा. विषय क्र.०२ हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे. पुढचा विषय घ्या.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.६२८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, तत्कालीन जळगांव नगरपालिका अस्तित्वात असतांना सन १९८० ते १९८५ या कालावधीत नगरपालिकेत प्रशासकीय राजवट होती. या कालावधीत अत्यावश्यक नागरी सुविधांची कामे ही खोळंबलेली होती तर विकासाच्या कामांचा प्रश्नच नव्हता. माहे मे १९८५ मध्ये न.पा.ची सार्वत्रिक निवडणुक होवून मा.सुरेशदादा जैन यांचे नेतुत्वात शहर विकास आघाडीकडे जळगांव नगरपालिकेची सुत्रे

आलीत. दिनांक ११/०९/१९८७ ला जळगांव नगरपालिकेची हद्दवाढ होवून शहरालगतची पिंप्राळा, मेहरुण, खेडी, निमखेडी तसेच भागश: आव्हाणा ही खेडे व एम.आय.डी.सी.परिसर नगरपालीका हद्दीत समाविष्ट होवून पुर्वी १२ चौ.कि.मी. असलेली हद्द ६८.७८ चौ.कि.मी. झाली. नगरपालिकेची हद्दवाढ झाल्याने जवळपास पाच पटीपेक्षा जास्त परिसर नगरपालिका हद्दीत अंतर्भुत झालेने त्या परिसरातील नागरिकांनाही नागरीसुविधा उपलब्ध करुन देणेची जबाबदारी जळगांव नगरपालिकेवर आली. मात्र त्यासाठी अत्यावश्यक लागणारा कर्मचारी वर्ग नगरपालिका आस्थापनेवर फारच अल्प प्रमाणात असलेमुळे नगरपालिकेने रोजंदारी तत्वावर कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या केलेल्या होत्या व नगरपालिकेच्या आस्थापनेवर कायम कर्मचारी नियुक्त करणेचे हेतुने शासनाकडे विहीत नमुन्यात पदनिर्मितीचा रितसर प्रस्ताव सादर केला. सदर प्रस्तावास शासनाने सन १९८७-८८ व तद्नंतर मान्यता प्रदान केलेली आहे.

सन १९८८ मध्ये शासनाने कर्मचारी भरतीसाठी राज्य निवड मंडळ निर्माण करुन वर्ग-३ ची पदे सरळ सेवा भरतीने राज्यनिवड मंडळ यांचे मार्फत करणेचे आदेशित केलेले होते. तसेच राज्य निवड मंडळ कर्मचारी नियुक्त करीत नाही तो पर्यंत अस्थापना सुचीवर मंजुर जागेवर स्थानिक प्राधिकरणास ६-६ महिने कालावधीसाठी वर्ग-३ चे कर्मचारी नियुक्त करणेचे अधिकार प्रदान केलेले होते. त्यानुसार अस्थापना सुचीवर मंजुर पदांवर कामाची निकड लक्षात घेता व कर्मचारी संख्या अल्प असलेमुळे तात्पुरती नियुक्ती देण्यात येवून सन १९८९ ते ९१ या कालावधीत कर्मचारी नियुक्ती करणे संबंधात राज्य निवड मंडळ यांचेशी वेळोवेळी पत्र व्यवहार करण्यात आला. मात्र दोन वर्षाचा कालावधीत राज्य निवड मंडळाने कर्मचारी निवड केली नाही.

दरम्यानच्या काळात नगरपालिकेने रोजंदारी तत्वावर नेमलेले व तात्पुरती नियुक्ती दिलेले कर्मचारी यांनी न्यायालयात दावे दाखल केले असता मे.औदयोगिक न्यायालयाने एका वर्षात २४० दिवस पेक्षा जास्त काम केलेले असलेने कर्मचारी यांना कामावरुन कमी करु नये असे निर्देश दिलेत.

मे.न्यायालयाचे निर्देशानुसार कर्मचारी यांना कमी करता येणार नाही व राज्य निवड आयोगास पत्र व्यवहार करुन ही कर्मचारी यांची निवड करण्यात आलेली नाही. त्यामुळे नगरपालिकेने ठराव क्र.४५८ दिनांक २३/१०/१९९० पारित करुन त्या अन्वये न्यायालयीन निर्णयाची माहिती राज्य निवड मंडळास अवगत करुन रिक्त पदे भरणे संबंधात पत्र व्यवहार करणेस मान्यता दिली. त्यानुसार पत्रव्यवहार करुन ही एक वर्षाच्या कालावधी उलटूनही राज्य निवड मंडळ यांनी कर्मचारी नेमणे संबंधात कोणतीही कार्यवाही केली नाही. त्यामुळे कामाची निकड लक्षात घेवून व न्यायालयीन कार्यरत कर्मचारी व यांचे वय होत असलेने नगरपालिकेने नगरपालिका अधिनियमाचे कलम ७६ अंतर्गत मंजुर पदावर कर्मचारी नियुक्त करणेस मान्यता प्रदान करुन कर्मचारी यांची नियुक्ती करुन तसा अहवाल न्यायालयास आणि राज्य निवड मंडळास सुध्दा प्रशासनाने सादर केलेला आहे.

सन १९८४ ते १९९२ या वर्षाच्या लेखा परिक्षणात स्थानिक निधी लेखा परिक्षण विभागाने कर्मचारी भरती संबंधात लेख परिच्छेद क्र.१७५ अन्वये आक्षेप घेतला होता. त्या आक्षेपास अनुसरुन नगरपालिकेस खुलासा सादर केला. मुख्य लेखा परिक्षण, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई यांनी पत्र क्र.१/ब/नपाज/४०८ दिनांक ०८/०३/१९९९ अन्वये आक्षेप वगळलेला आहे.

उर्वरीत रोजंदारी कर्मचारी यांनी त्यांना सेवेत कायम न केल्यामुळे न्यायालयात फौजदारी दावे दाखल केले होते. त्या दाव्यात तत्कालीन प्रशासक श्री.बी.जी.वाघ यांनी जागा मंजुर झालेवर सदर कर्मचारी यांना प्रथम प्राधान्याने त्यांच्या शैक्षणिक पात्रता लक्षात घेवून कायम सेवेत रुजू करण्यात येईल असे न्यायालयात लेखी आश्वासन लिहून दिलेले होते. त्या अनुषंगाने सन १९९७ ला शासनाने मंजुर केलेल्या पदांवर भरती करण्यात आलेली आहे. त्याव्दारे न्यायालयाचा अवमान होणार नाही याची दक्षता घेण्यात आलेली आहे.

सदर मंजुर पदे भरतांना तत्कालीन नगरपालिकेने न.पा.ठ.क्र.८६ दिनांक २६/०४/१९९७ अन्वये धोरणात्मक निर्णय घेतलेला होता. त्यानुसार असे निश्चित करण्यात आलेले होते की, १) वर्ग-३ ची मंजुर २६२ पदे प्रादेशिक दुय्यम सेवा मंडळ, सेवा योजना कार्यालय आदिवासी कल्याण विभाग व समाज कल्याण विभाग यांचेकडून पात्र उमेदवारांची यादी मागवून मुलाखत घेवून भरता येतील तथापी हल्ली नगरपालिका सेवेत वर्ग-४ मध्ये कार्यरत कर्मचाऱ्यापैकी ज्यांचे कडेस विहीत शैक्षणिक पात्रता आहे. अशा कर्मचाऱ्यांना सेवा ज्येष्टतेनुसार वर्ग ३ चे पदावर पदोन्नतीने जागा भरण्यात याव्यात मात्र ज्या कर्मचाऱ्यांना शिक्षा/दंड/निलंबन/व गैरप्रकाराबाबत इतर शिक्षा झाली असेल त्यांच्या पदोन्नतीसाठी विचार करणेत येवू नये तसेच वर्ग-४ ची पदे भरणेचा महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ चे कलम ७६(२) नुसार नगरपालिकेस अधिकार असून त्यानुसार हल्ली रोजंदारीवर कार्यरत कर्मचारी ज्यांची सेवा २४० दिवसापेक्षा जास्त झालेली आहे त्यांना कमी केल्यास अनफेअर लेबर प्रॅक्टीस ॲक्ट नुसार अनुचीत होईल. त्यामुळे वर्ग-४ चे जागेवर रोजंदारी कर्मचारी व न्यायालयीन कर्मचारी यांना सेवेत समाविष्ट करुन घेणेत यावे. मात्र अशा रोजंदारी/न्यायालयीन कर्मचारी यांची मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

आ. ज्या रोजंदारी कर्मचारी यांनी नगरपालिकेविरुध्द न्यायालयात दावे / केसेस दाखल केल्या आहेत त्यांनी ३० दिवसाचे आत दावे काढून घ्यावे याबाबत मुख्याधिकारी यांनी कार्यवाही करावी. मुदतीत दावे न काढल्यास संबंधीतांचे वेतन रोखून ठेवण्यात यावे.

ब. ज्या कर्मचाऱ्यांचे वय ४५ पूर्ण होवून गेलेले आहे व काम करण्यास सक्षम नाही त्यांच्या वारसांना समाविष्ट करण्यात यावे.

क. जे रोजंदारी कर्मचारी/न्यायालयीन कर्मचारी यांची नियुक्तीसाठी निवड झालेली आहे त्यांचेकडून विधी सल्लागार यांनी तयार करुन दिलेल्या मसुदा नुसार रु.२०/- चे मुदांकीत शुल्काचा करारनामा करुन घेण्यात यावा व ३० दिवसांत दावे न काढल्यास त्यांची नियुक्ती करण्यात येवू नये.

वरीलप्रमाणे निश्चित केलेल्या धोरणानुसार पदोन्नती व नियुक्तीचे प्रस्ताव सादर करतांना मुख्याधिकारी प्रशासन अधिकारी, आस्थापना अधिक्षक यांनी कार्यवाही करावी. कोणताही कामगार/कर्मचारी यांचेवर अन्याय होवू नये तसेच सेवाजेष्ठता पात्रता, अनुशेष याबाबत पडताळणी केलेनंतरच नियुक्ती पदोन्नतीचे आदेश निर्गमित करावेत याबाबत कोणतीही तक्रार/न्यायालयीन उक्त अधिकारी/खाते प्रमुख अस्थापना अधिक्षक व मुख्याधिकारी यांची राहील असा ठराव पारित करण्यात आलेला होता.

उपरनिर्दिष्ठ विवेचन वरुन स्पष्ट होत आहे की कर्मचारी नियुक्ती/पदोन्नती करतांना तत्कालीन अध्यक्ष व नगरपालिका सभा यांनी कोणत्याही प्रकारची अनियमीतता तथा गैरकृत्य केलेले नाही. तसेच तत्कालीन मुख्याधिकारी यांनी ही तत्कालीन प्रचलीत सर्व नियमांचे पालन करुनच नियुक्त्या व पदोन्नत्या रितसर केलेल्या आहेत त्यामुळे त्यात अनुचीत असे काहीच घडलेले नाही.

या संबंधात भारतीय लेखा एवं लेखा परिक्षा विभाग प्रधान लेखाकार (लेखा परिक्षण-१) मुंबई यांनी २०१५-१६ मध्ये लेखा परिक्षण करुन परिच्छेद क्र.५ अन्वये आक्षेप घेतला होता. त्या आक्षेपास महानगरपालिकेने सादर केलेला खुलासा लक्षात घेता प्रधान लेखाकार यांनी पत्र क्र.सा.क्षे.१/प्रभार ITI/आय.व्ही.नं.फा.नं.९९५/४५३ दिनांक ११/०७/२०१७ अन्वये आक्षेप वगळलेला आहे.

या पदोन्नती व नियुक्त्या संबंधात खाली नमुद काही मुद्दे फारच गरजेचे व आवश्यक आहे.

५. महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ मधील तरतुदीनुसार कर्मचारी भरतीबाबतचे अधिकार अंतर्गत कर्मचारी भरती कामी न.पा. सभेने वेळोवेळी ठराव पारीत केलेले होते. तत्कालीन मुख्याधिकारी न.पा.जळगांव यांनी महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ चे कलम ३०८ अंतर्गत सदर ठराव म.जिल्हाधिकारी सो.जळगांव

यांचेकडेस विखंडणासाठी पाठविलेले आहेत. मात्र म.जिल्हाधिकारी सो.जळगांव यांनी याबाबत कुठलाही ठराव विखंडणाची कारवाई केलेली दिसून येत नाही.

६. मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपील क्र.३५९५-३६१२/१९९९ मध्ये दिलेल्या निकालात पॅरा ४४ मध्ये स्पष्ट निर्देशीत केलेले आहे की जर कर्मचाऱ्यांची सेवा १० वर्षे झालेली असेल व त्यास संबंधीत संस्थेने नियमीत केले असेल तर अशी प्रकरण पुन्हा उघडण्याची आवश्यकता नाही. मे.सर्वोच्च न्यायालयाच्या सदर निकालाच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य शासनाने पत्र क्र.डीएनसी-१००४/२३०८/प्र.क्र.७०/२००४/नवि-२४ दिनांक १६/११/२००६ चे महापालीका आयुक्तांना पत्रातील परिच्छेद 'ग' नुसार निर्देशीत केलेले आहे की, सर्वोच्च न्यायालयाचा आदेशान्वये या पुर्वी सेवा नियमीत केल्या आहेत व त्या न्यायप्रविष्ठ नाहीत अशा नेमणूकीची प्रकरणे पुन्हा उघडू नये. (नव्याने निर्णय घेण्याची गरज नाही.)

ज्या पदोन्नत्या व नियुक्त्याबाबत विशेष लेखापरिक्षण करण्यात आलेले आहे त्या १९९१-९२ ते १९९७-९८ या कालावधीतील असुन त्यास सुमारे २५ ते ३० वर्षे झालेली आहेत. त्या पदांवरील बहुतांश कर्मचारी सेवानिवृत्त झालेले आहेत, सेवानिवृत्त होण्याचा मार्गावर आहेत व काही मयत ही झालेले आहेत. त्यामुळे सदर प्रकरणी आक्षेप होणेच मुळात संयुक्तीक नसून गैर आहे.

७. जळगांव महापालिकेत कार्यरत केमीस्ट पदावरील कर्मचारी यांनी वरिष्ठ वेतनश्रेणी मिळणेबाबत अर्ज केला असता महापालिकेने सन १९९१-९२ मधील नेमणूका बेकायदेशीर असलेचे कारणास्तव अर्ज निकाली काढला असता सदर कर्मचाऱ्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठात रिट याचिका क्र.५३७४/२०१४ व ५३७५/२०१५ दाखल करुन दाद मागितली. सदर याचिकेची सुनावणी होवून निकालात स्पष्ट निर्देश दिलेले आहेत की २५ वर्षानंतर बेकायदेशीर नेमणूकीचा मुद्दा उपस्थित करणेचा पर्याय महापालिकेस खुलास नाही. कर्मचाऱ्यांना ६ व्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चित करुन पगार अदा करावा.

मे.उच्च न्यायालयाच्या उपरनिर्दिष्ठ याचिकेतील निकालानुसार सुध्दा विशेष लेखा परिक्षण अहवालास काहीच अर्थ राहत नाही.

८. नियुक्त्या करतांना तत्कालीन नगरपालिकेने राज्य निवड मंडळ यांना वेळोवेळी पदे भरणेबाबत पत्रव्यवहार केला मात्र राज्य निवड मंडळाने प्रतिसाद न दिल्यामुळे तसेच शहराची वाढलेली हद्द लक्षात घेता, कर्मचारी वर्गाची अत्यंत गरज असल्यामुळे उपरनिर्दिष्ट विवेचनात नमुद केलेप्रमाणे पदोन्नती व नियुक्त्या तत्कालीन नगरपालिकेने केलेल्या होत्या व त्या नियमानुसारच व कायदयाच्या चौकटीत आहेत यात दुमत असण्याचे कारणच नाही.

सन १९९१-९२ ते १९९७-९८ या कालावधीत करण्यात आलेल्या पदोन्नत्या व नेमणूका संबंधातील पार्श्वभूमी सविस्तर वस्तुनिष्ठ अहवाल वर नमुद केलेप्रमाणे नमुद करण्यात येत असुन सदर अहवालाचा विचार करता तत्कालीन नगरपालिकेने केलेली कारवाई ही संयुक्तीक व नियमानुसारच आहे. नेमणूका शैक्षणिक पात्रतेनुसारच करण्यात आलेल्या आहेत. तसेच सदर नेमणूकींना जवळपास २५ ते ३० वर्षापेक्षा ही जास्त कालावधी लोटलेला आहे आणि सदर नेमणूकधारक कर्मचारी सेवानिवृत्त ही झालेले आहेत. काही मयत झालेले आहेत, काही सेवानिवृत्तीच्या मार्गावर आहेत. त्यामुळे मे.उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाचा निकालांच्या अनुषंगाने सदर विशेष लेखा परिक्षण अहवालास काही अर्थच शिल्लक राहत नाही. त्यामुळे सन १९९१-९२ ते १९९७-९८ या कालावधीत झालेल्या विशेष परिक्षण अहवालातील कोणत्याही कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करण्यात येवू नये. तसेच महाराष्ट्र शासनाचे दि.२०/०९/२०२१ चे पत्र रद्द करणे कामी तसेच सदर कर्मचारी यांना म.न.पा.मध्ये सेवा करुन २५ ते ३० वर्ष झालेले असल्याने त्यातील काही मयत, सेवानिवृत्त झालेले असल्याने शासनाकडेस आयुक्त यांनी अनुपालन अहवाल सादर करणे कामी तसेच सदर अहवालाप्रमाणे म.न.पा.कर्मचाऱ्यांवर कार्यवाही न करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच याबाबत मा. राज्य शासनास विनंती करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- सोनवणे कैलास नारायण**

**नगरसचिव :- विषय क्रं.३:-** जळगांव शहर मनपाचे,गोलाणी मार्केट, नविन बि.जे.मार्केट, जुने बि.जे.मार्केट, महात्मा गांधी मार्केट, सेंट्रल फुले मार्केट, मधील शौचालय, मुताऱ्या, स्नानगृहे पैसे दया व वापरा या तत्वावर चालविणे कामी खाजगी संस्थेस देणेकरीता धोरण ठरविणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** येथे कालावधी पाच वर्ष लिहीलेला आहे ना, पाच वर्षाचा कालावधी जास्त होतो. तर तीन तीन वर्षाचा कालावधी ठेवण्यात यावा. जर एखादी संस्था योग्य पध्दतीने काम करत नसेल. तर कमीत कमी त्यांना टर्मिनेट करण्याच्या संदर्भात कालावधी पुरेसा आहे. आणि योग्य त्या संस्थांनी जाहिर ठेका मागवुन अश्या पध्दतीने ज्या संस्था योग्य असतील. त्या संस्थांना हे शौचालय वापरण्याची परवानगी द्यावी.

**श्री.चेतन सनकत:-** याच्यामध्ये निविदा प्रक्रिया करण्यात यावी. जेणे करुन महानगरपालिकेचा आर्थिक फायदा होईल.

**श्री.मयुर कापसे :-** आपला छत्रपती शिवाजी महाराज चौकात जो सोमाणी मार्केट आहे. तो पण आपल्या मनपाच्या मालकीचाच आहे. गेल्या अनेक वर्षापासुन जो सार्व.शौचालय आहे. तो बंद अवस्थेत पडलेला आहे. त्यामुळे होत काय ? तेथे आपले जवळ जवळ ५० ते १०० मनपा मालकीचे गाळे आहे. तेथे जे गाळेधारक असतील किंवा ग्राहक असतील त्यांना या समस्यांचा खुप प्रॉब्लम फेस करावा लागतो. त्यामुळे याच्यात सोमाणी मार्केटचा सुध्दा समावेश करण्यात यावा ही विनंती.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौर महोदया, प्रशासनाने हा विषय क्र.०३ जो आणलेला आहे. अत्यंत महत्वाचा विषय आणलेला आहे. मनपा मालकीच्या सगळया संकुलांमधील स्वच्छतागृह पुन्हा एकदा कार्यान्वीत करण्याच्या दिशेने आपण प्रवास करणार आहोत. प्रशासनाचे अभिनंदन की, खुप मोठया कालावाधीपासुन पडुन असलेला विषय प्रशासनाने आणला, पण मला येथे खेद सुध्दा व्यक्त करावा असे वाटते, नियम, अटी, शर्ती ह्या सगळया खुप चांगल्या नमुद केलेल्या आहे. पण धोरणात्मक निर्णय ज्या वेळेला आपण घेतो, पुनश्च एकदा प्रशासनाने असा प्रस्ताव मनपा सभागृहात आणलेला आहे की, संस्था निवडीचे निकष काय असावे ? आता आपण हे खाजगी संस्थांना देणार येथे आपण असे म्हटले. ते सर्वानुमते आपण मंजुर पण करणार आहोत. त्याला विरोध अजीबात नाही. पण संस्था निवडीचे निकषा प्रकरणी हे काहीही मेन्शन केलेले नाही. संस्था निवडीचे निकष काय असावे हा निर्णय नितीन भाऊ मला वाटत महासभेमध्ये व्हायला हवा. सगळया सदस्यांच्या सुचना येथे घ्यायला हव्या. आणि संस्था निवडीचे निकष तेथे स्पष्टपणे नमुद करण्यात यावे. कारण माझ्या आठवणी प्रमाणे जयश्रीताईंची महापौर म्हणुन जी पहिली सभा होती. त्या सभेमध्ये सुध्दा स्वच्छतागृहांचा विषय आला होता. तो विषय वेगळा होता हा नव्हता तो. मार्केट संदर्भातला नव्हता. पण जळगांव शहरातले वेगवेगळया ठिकाणी उभारण्यासाठी जे स्वच्छतागृह असा विषय होता. त्या विषयास सुध्दा मी त्यावेळेला विरोध नोंदविला होता. कोणताही धोरणात्मक निर्णय त्या दिवशी घेतला गेलेला नाही. प्रशासकीय प्रस्ताव आलेला असतांना, खरं तर खुप आश्चर्याची बाब होती ती आयुक्त साहेब की, प्रशासकीय प्रस्ताव होता तो. प्रशासकीय प्रस्ताव असा कसा का येऊ शकतो की, हा स्पॉट या संस्थेला दिला, तो स्पॉट त्या संस्थेला दिला. असा प्रशासकीय प्रस्ताव कसा असु शकतो. बेकायदेशीर पध्दतीने तो ठराव झालेला आहे. मी आज आयुक्त साहेब, आपल्याला विचारु ईच्छिते. आपण आदेश करावे संबंधीत विभागाला की, तो जो ठराव त्या वेळेला झालेला आहे. त्याच पुढे काय कार्यालयीन काम झाल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई मला वाटत, तो ठराव आपण त्यावेळेला तहकुब केलेला होता.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** नाही नाही, आपण ते त्यावेळेला मंजुर केलेला आहे. त्यानंतर त्याला कार्यान्वय केल का ? किंवा नंतर काय करण्यात आले ? कारण ती बेकायदेशीर पध्दती होती, त्या दिवशी मी तिव्र विरोध नोंदविला होता. ऑनलाईन सभा होती ऑनलाईनचे लिमिटेशन असतात मला मान्य आहे. कदाचित तेथे जो विरोध व्यक्त करायचा होता. तो नोंदवायचा होता तो होऊ शकला नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आठवतो मला की, आपण चर्चा ही केली होती आणि त्या चर्चेच्या अनुषंगाने देता येईल असे मला ही जानवत आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** माझ्या माहिती प्रमाणे तो विषय मंजुर करण्यात आलेला होता बहुमताच्या जोरावर.ऑनलाईन सभेचे जे डिमेरीटस आहे त्याचा गैरफायदा घेण्यात आलेला होता. त्याचा कार्यान्वय कायदेशीर पध्दतीने होऊच शकणार नाही. त्याचे कार्यान्वय जर प्रशासन करण्यास जाईल. तर प्रशासनासहीत सगळे अडचणीत येणार आहे. ज्या ज्या टेबलवरुन ती फाईल फिरणार. ते सगळे अडचणी येणार आहे. आणि याच कार्यान्वय झालेतर याच्या विरुध्द १००% मी उभी राहणार आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** पाटील साहेब आपण केलेल्या.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** आपल्याला हे पुर्ण माहिती आहे. ते स्पॉट मी स्वत: व्हिजीट करुन शोधुन काढलेले आहे. बांधकाम, आरोग्य, नगररचना अतिक्रमण या चारही विभागांना सोबत नेवुन हे स्पॉट फाईनल केले होते. आमच्या सन्मा.मामी त्या वेळेला महापौर होत्या. मामी सुध्दा माझ्या सोबत काही स्पॉटवर आलेल्या होत्या व्हिजीटसाठी. सगळया अधिकाऱ्यांना नेवुन स्पॉट ठरविले. अनेक सेवाभावी स्वयंसेवी संस्थांचे अर्ज आपण प्रशासनाकडे दिले. तर अश्या पध्दतीने ठराव करुन हे खुप चांगला विषय आहे. होत काय साहेब, खुप चांगले विषय पण चुकीच्या पध्दतीने हाताळल्या गेल्यामुळे नाइलाजास्तव आम्हाला विरोध नोंदवावा लागतो. आणि विषय पेंडींग राहतो. तर विषय पेंडींग ठेवायची आम्हाला अजीबात ईच्छा नाही. स्वच्छतागृह ही निकड आहे. समाजाची निकड आहे आणि स्वराज्य संस्था म्हणुन ती आपली जबाबदारी आहे. त्यामुळे मागच्या प्रस्तावाबद्दल सुध्दा प्रशासनाने गांभिर्याने कार्यान्वय करावे ही सुचना मी मांडते आणि आजच्या प्रस्तावावर संस्था निवडीचे निकष आता येथे चर्चा व्हावी. असे मला अपेक्षित आहे. संस्था निवडीचे निकष वाढवा. बाकी तुम्ही अटीशर्ती जी ठरविलेली आहे. ते मान्य. त्यामध्ये एक दोन सुचना मी नक्कीच देणार आहे. आयुक्त साहेबांनी या विषयाबद्दल बोलाव नंतर मी पुढच्या सुचना देते.

**श्री.चेतन सनकत :-** ठरावाबद्दल जे बोलले, त्या ठरावामध्ये आपण प्रशासनाकडुन आलेल्या ठरावामध्ये अगोदर ज्या संस्थांनी पत्र दिलेले होते आणि ठरावामध्ये ज्यांनी निरीक्षण केलेले होते. त्या संस्थांना आपण प्राधान्य दिलेले आहे. आणि तसा ठराव ही केलेले आहे. आणि त्यावेळेला ठराव केल्यानंतर ती अंमलबजावणी संदर्भात मी पाठपुरावा करीत होतो. त्यादिवशी तो ठराव मी मांडलेला होता. आणि प्रत्येक ठिकाणी मा.मामी महापौर असतांना असो किंवा भारतीताई महापौर असतांना, शुचितााताई सभापती असतांना प्रत्येक स्पॉट विजीटला मी स्वत: उपस्थित होतो. आणि ती फाईल पुर्ण माझ्या समोर त्या फाईलचा प्रवास झालेला आहे. आणि आपण त्या संस्थांची निवड केलेली आहे. एक मागासवर्गिय संस्था आहे. बेरोजगार संस्था आहे. अश्या पध्दतीची जी संस्था आहे. त्यांना आपण निवड केलेली आहे. आणि दुसरी गोष्ट जर कधी असे झाले असेल तर आपण सुप्रिमला दिलेले आहे मधुर वाल्यांना दिलेले आहे. अजुन अशी काही आहे. सर्वांसाठी ते नियम लागु करावे. फक्त आता जी चर्चा होईल आपण जी नियम लागु करु. ते सर्वांसाठी लागु करावे. म्हणजे असे होता कामा नये की आपण त्याच्या मध्ये मागासवर्गिय लोकांची संस्था घेतलेली आहे, बेरोजगार लोकांची संस्था घेतलेली आहे. त्यांच्यावर अन्याय होता कामा नये.

**श्री.कैलास सोनवणे :-** असे वारंवार मागासवर्गिय, मागासवर्गिय आम्ही पण मागासवर्गियच आहे.

**श्री.चेतन सनकत :-** संस्था का नाम ही वो है.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** आपल्या प्रथमदर्शनी लक्षात आणुन देते प्रशासनाच्या की, धोरणात्मक निर्णय घेणे अपेक्षित आहे. फक्त मागासवर्गिय संस्था, मागासवर्गिय संस्थेला विरोध नाही. मागासवर्गिय संस्थेला द्यायला प्राधान्य, हा धोरणात्मक निर्णय सभेसमोर झाला का ? झालेला नाही. बेकायदेशीर पध्दतीने कृपया ठराव करु नका. चेतन भाऊ सुध्दा माझ्या सोबत सर्व ठिकाणी विजीटला होते मान्य आहे. चेतन भाऊ आपण सोबतच केलेले आहे. पण याचे व्यापारीकरण होऊ देऊ नका. सेवाभावी संस्था आपल्याला फ्रि ऑफ कॉस्ट उभारुन द्यायला तयार होत्या. अजुन ही आहे. व्यापारीकरण कृपया त्याचे करु नका. दुकानदारी येथे लावु नका. प्रशासनाने प्रशासकीय जबाबदारी ओळखावी ऐवढीच माझी विनंती आहे. अन्यथा त्याला विरोध करण्याचे कायदेशीर मार्ग अर्थातच माझ्यासाठी ओपन आहे. आणि आजच्या विषयासंदर्भात धोरण ठरवा ऐवढीच माझी विनंती आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ज्या पध्दतीने आपण याच्या संदर्भातला जे काही मागवु. ते जाहिर रित्या किंवा ज्या काही पध्दतीने मागवु परंतु ताईंनी जस म्हटल की, याच्या संदर्भात निष्कर्ष काय लावायला पाहिजे. त्या संदर्भातील ताई आपल्या ज्या काही सुचना असतील.त्या लेखी स्वस्पात आपण प्रशासनाला द्याव्या. जेणे करुन त्या अटीशर्तीमध्ये ज्या वेळेला समाविष्ट कराल. त्यावेळेला ज्या काही अटीशर्ती असतील.त्या अटीशर्तीच्या अनुषंगानेच आपण ठेका मागवावे.

**श्री.चेतन सनकत :-** काही महिन्यांच्या जवळ जवळ आपण त्यांना बांधकामाची परवानगी देणार आहोत. तर ते काम बंद पडता कामा नये ते पण लक्षात ठेवा.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** महापौर महोदया, जनरली मार्केट मध्ये आणि स्लम ऐरिया मध्ये असतात. आता स्लम ऐरियाची परिस्थिती पाहुन आपण टेंडर सुध्दा काढला साफसफाईचा. परंतु त्याच्याकडे कोणाचेही लक्ष जात नाही. आरोग्यधिकारी असतील, हे असतील, पाच-पाच दिवस शौचालय साफ होत नाही. साहेबांकडे तक्रार केली होती. आरोग्यधिकारी सुध्दा येवुन गेले. पण तीच परिस्थिती आहे. चार-चार पाच-पाच दिवस सार्व.शौचालय साफ होत नाही स्लम ऐरियाचे. हा माझा अनुभव आहे सांगुन द्यावे आरोग्यधिकारी यांनी. जी आता चर्चा चालली की, कुठल्या संस्थेनी हे काम घेतले पाहिजे. खंर तर काम करणारे असतील त्यांनी घेतलं पाहिजे. काम घेणारा वेगळा असतो, काम करुन घेणारा वेगळा असतो. आणि तिसरा चौथा कोणी येऊन साफ करतो. त्यांना रु.५०/- रु.१००/- असे काही दिले जातात. त्याच्यावर समाधानी होत नाही. त्याचा मात्र ठेकेदार कोण कळत नाही. परंतु तो हजेरी भरतो आणि टाईमपास करुन मोकळा होतो. आपले अधिकारी सुध्दा त्याला ॲडजेस्मेंट करुन घेता. असा माझा अनुभव आहे. असे होता कामा नये. लक्ष दिले पाहिजे तरच हे होईल. कारण स्लम एरिया मध्ये रोगराई पसरायला वेळ लागत नाही. धन्यवाद.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** एक सुचना मांडतो मी की, जेवढया शौचालय किंवा मुतारी आपण द्याल. आपल्या टेन्डर द्वारे. ज्या ठिकाणी फक्त महिलांच्या असतील ना. तर एक अट टाका की, तेथे कर्मचारी महिला असल्या पाहिजे. कारण बऱ्याच ठिकाणी पुरुष असता. तरी महिला कर्मचारी असणे ही एक अट ॲड करा.

**मा.महापौर :-** आयुक्त साहेब बोलत आहे.

**मा.आयुक्त :-** हा जो मक्ता पे ॲण्ड युज तत्वावर द्यायचे आहे. बहुतेक सन्मा.सदस्यांचा याच्याबद्दल त्यांच्या काही सुचना आहे. याच्या संदर्भामध्ये आज जो विषय आलेला आहे. आदरणीय हाडा मॅडमांनी याच्यामध्ये ही जे संस्था निवडीचे निकष म्हटलेले आहे. संस्था निवडीचे निकष आपण ठरविलेले आहे. जर असेल तर आपल्याला ते ही करता येईल. परंतु त्याही पेक्षा पुढे जाऊन सन्मा.सदस्यांना काही सुचना करायच्या असतील.आताही आपल्याला सभागृहामध्ये नाही करता आल्या. तर आपण मा.महापौरांच्याकडे किंवा माझ्याकडे त्या सुचना केल्या तर आपण त्या निकषाच्या बाबतीत आलेल्या सुचनांचा समाविष्ट करुन आपण संस्था निवडीचे निकष निविदेमध्ये निश्चित करु या. यापुर्वीच्या आपण जो काही स्वच्छतागृह जी काही संस्थांना देण्याच्या संदर्भामध्ये ठराव केलेला आहे. त्याच्या बद्दल सन्मा.सदस्यांनी काही आक्षेप नोंदविलेले आहे. या कामाची अद्यापपावेतो अंमलबजावणी अंतिम टप्यात आलेली नाही. परंतु आपला हेतु लक्षात घेवुन उद्देश लक्षात घेवुन याच्यामध्ये जर काही तांत्रिक अडचणी निर्माण होतील. तर सगळेच सन्मा.सदस्यांची आलेल्या सुचनांवरती चर्चा करु. आणि चर्चा अंती सर्वांच्या सुचनांचा समावेश करुनच हे पुर्वीच्या झालेल्या कामाची अंमलबजावणी करता येईल. जेणे करुन त्याच्यामध्ये अनियमितता किंवा बेकायदेशीरपणा राहणार नाही. याची प्रशासन दक्षता घेईल.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई, मनपाचे ५-७ मार्केटचे आणि मला वाटत, जळगांव शहरात या पेक्षा जास्त मार्केट आहे. ते सुध्दा याच्यात प्रस्तुत करावे. त्यानंतर याच्यात असे दिलेले आहे की, शौचालय वापरासाठी आणि स्नानगृहासाठी आपण पैसे घेणार आहोत. आणि मुतारी आपण फ्री ऑफ कॉस्ट देणार आहोत. आता काही मार्केट असे आहेत की, तेथे फक्त मुतारी आहे. ज्या संस्थांना आपण जास्त काम दिलेले आहे. अश्या संस्थांवर ती जबाबदारी फिक्स करावी असे एक आपण सांगु शकतो. सर्वांशी चर्चा करुन जेणे करुन ते मेनटेन झाले पाहिजे. कारण जर ते मेनटेन झाले नाही. तर पुन्हा एकदा काय होणार आहे त्याच्या वापराचा उपयोग करता येणार नाही. फक्त प्रकरण हाताळुन, ते आपण ठराव करुन कार्यान्वय करुन काही उपयोग होणार नाही. मी माझ्या या सुचना संस्थाच्या संदर्भातल्या ह्या आहे. बाकीच्यांच्या पण सुचना घ्या. पण प्रत्यक्षपणे प्रशासनाने हे काम करावे. तेवढीच येथे अपेक्षा आहे.

**मा.महापौर :-** सन्मा.सदस्य यांनी केलेल्या सर्व सुचनांच या ठिकाणी पालन करायचे आहे. प्रशासनाला सांगु ईच्छिते. आणि सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.
**श्री.कैलास सोनवणे :-** विषय क्र.४,५,६ एक सारखेच विषय आहे. आणि तो प्रशासनाला मान्य पण आहे.
**श्री.सचिन पाटील :-** मला बोलायचे आहे.
**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात येत आहे.
**श्री.चेतन सनकत :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.६२९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मा.महापौर यांचेकडील दि.१८/०६/२०२१ रोजी व्यापारी संकुलाचे प्रतिनिधी यांचे बैठकीत झालेल्या चर्चेनुसार व्यापारी संकुलातील शौचालय, मुताऱ्या, स्नानगृहे आहे त्या स्थितीत सोपवून त्याची दुरुस्ती करुन पैसे दया व वापरा या तत्वावर चालविणे कामी खाजगी संस्थेस देणेकामी मा.महासभेपूढे प्रस्ताव सादर करणेबाबत कळविले आहे. त्यानुसार प्राथमिक स्तरावर पुढील वर्दळीचे ठिकाण असलेली व्यापारी संकुलातील शौचालय, मुताऱ्या, स्नानगृहे पैसे दया व वापरा या तत्वावर चालविणे कामी खाजगी संस्थेस देणेकामी पुढील प्रमाणे.

| व्यापारी संकुलाचे नांव | ठिकाणांची संख्या | शौचालय सिट्सची संख्या | | स्नानगृहांची संख्या | | मुतारींची संख्या | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री | पुरुष |
| गोलाणी मार्केट | २४ | ४४ | ५० | १७ | २५ | ५२ | ९४ |
| नविन बि.जे.मार्केट | ३७ | १९ | ९८ | ४ | १० | ३० | ३६ |
| जुने बि.जे.मार्केट | १६ | ४८ | ४८ | ० | ० | ६४ | ६४ |
| महात्मा गांधी मार्केट | ७ | १२ | १४ | ० | १ | ६ | १० |
| सेंट्रल फुले मार्केट | ५ | ५ | १५ | १ | १ | ५ | १९ |
| एकुण | ८९ | १२८ | २२५ | २२ | ३७ | १५७ | २२३ |

उपरोक्त व्यापारी संकुलातील शौचालय, मुताऱ्या, स्नानगृहे पैसे दया व वापरा या तत्वावर चालविणे कामी खाजगी संस्थेस देणेकामी अटी व शर्ती पुढील प्रमाणे.

१. शौचालय, मुताऱ्या, स्नानगृहे आहे त्या स्थितीत नियुक्त संस्थेस हस्तांतर केले जाईल.
२. शौचालय, मुताऱ्या, स्नानगृहांची आवश्यक वापरायोग्य सर्व प्रकारची दुरुस्ती स्वखर्चाने करण्याची जबाबदारी नियुक्त संस्थेची राहील. त्याकामी ज.श.म.न.पा. कडून कोणताही मोबदला दिला जाणार नाही.
३. दुरुस्तीकामी आवश्यक सर्व परवानगी प्राप्त करण्याची जबाबदारी नियुक्त संस्थेची राहील.
४. शौचालय, मुताऱ्या, स्नानगृहांच्या ठिकाणी पाण्याची व्यवस्था करण्याची जबाबदारी नियुक्त संस्थेची राहील.
५. विदयुत व्यवस्था उपलब्ध करुन घेणे व विदयुत देयकांचा भरणा करण्याची जबाबदारी नियुक्त संस्थेची राहील.
६. शौचालय, मुताऱ्या, स्नानगृहांच्या ठिकाणी केअरटेकरची नेमणूक करण्याची जबाबदारी नियुक्त संस्थेची राहील.
७. शौचालय, मुताऱ्या, स्नानगृहांच्या ठिकाणांचा गैरवापर होणार नाही याची जबाबदारी नियुक्त संस्थेची राहील.
८. नागरीकांकडून शौचालय वापरासाठी शुल्क प्रती व्यक्ती ५ रुपये, स्नानगृहासाठी प्रती व्यक्ती ५ रुपये आणि मुतारी सर्वांसाठी वापरास निशुल्क असेल.
९. नागरीकांकडून शौचालय, स्नानगृहे वापरासाठी आकारणी केलेल्या रकमेची पावती वापरकर्त्या नागरीकांस देणे बंधनकारक राहील व त्याबाबतचा लेखा नोंद ठेवणे आवश्यक राहील.
१०. शौचालय,स्नानगृहे, मुतारींवर स्त्री आणि पुरुष स्पष्ट नमूद करणे बंधनकारक राहील.
११. शौचालय, मुताऱ्या, स्नानगृहांच्या ठिकाणी जंतुनाशके टाकणे व दैनंदीन साफसफाई दिवसातुन दोनवेळा करणेची जबाबदारी नियुक्त संस्थेची राहील.
१२. शौचालय, मुताऱ्या, स्नानगृहांच्या भिंतींवर खाजगी जाहिरात लावणेस मनाई असेल.

१३. शौचालय, मुताऱ्या, स्नानगृहांच्या ठिकाणी नियुक्त कामगारांस नियमीत वेतन देणे, त्यांचा विमा उतरविणे इ.जबाबदारी नियुक्त संस्थेची राहील. सदर कामगारांना किंवा त्यांचे नातेवाईकांना ज.श.म.न.पा. कडेस कोणताही हक्क मागता येणार नाही.

१४. शौचालय, मुताऱ्या, स्नानगृहांच्या ठिकाणांची साफसफाई करणारे कामगारांना आवश्यक सुरक्षा साधने पुरविणे नियुक्त संस्थेस बंधनकारक राहील.

१५. निवड झालेल्या संस्थेने निविदे अंती ठरलेले स्वामित्व शुल्क दरमहा ज.श.म.न.पा.चे खजिन्यात भरणा करावा लागेल.

१६. सुरक्षा अनामत रक्कम प्रति संकुलासाठी रुपये १ लक्ष मनपा खजिन्यात तीन वर्षाकरीता भरणा करावा लागेल. सदर रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

१७. शौचालय, मुताऱ्या, स्नानगृहांच्या ठिकाणांचे नुकसान झाल्यास सुरक्षा अनामत रकमेतुन नुकसान भरपाई वसूल केली जाईल.

१८.शौचालय, मुताऱ्या, स्नानगृहांच्या ठिकाणांची साफसफाई समाधानकारक न वाटल्यास सदर संस्थेचा मक्ता रद्द करण्यात येईल व कोणत्याही स्वरुपाची भरपाई अथवा मोबदला मनपाकडून दिला जाणार नाही.

१९.शौचालय, मुताऱ्या, स्नानगृहांच्या ठिकाणी बालमजुरांना तसेच गुन्हेगारी पार्श्वभुमी असणाऱ्या कामगारांना कामावर ठेवता येणार नाही.

२०. नियुक्त संस्था सदरकामी अपयशी ठरल्यास कोणतिही पुर्वसूचना न देता सदरचे काम इतर संस्थेस देण्यात येईल.

२१. कराराचा कालावधी ५ वर्षे (६० महिने) इतका राहील. ज.श.म.न.पा.स आवश्यक वाटल्यास पुढील मुदतवाढ देण्यात येईल किंवा कालावधी कमी करण्यात येईल.

२२. प्रत्येक सहा महिने नंतर आरोग्य विभागाच्या यंत्रणेमार्फत कामाचे मुल्यमापन केले जाईल. काम समाधानकारक वाटल्यास पुढील सहा महिने काम दिले जाईल.

२३. करार संपल्यावर शौचालय, मुताऱ्या, स्नानगृहे सुस्थितीत मनपास हस्तांतरण करणे नियुक्त संस्थेस बंधनकारक असेल.

२४. शौचालय, मुताऱ्या, स्नानगृहांच्या ठिकाणांची / सिट्सची संख्या कमी/जास्त होण्याची शक्यता असल्याने ती नियुक्त संस्थेस बंधनकारक राहील.

**<u>वादविवाद निर्माण कामी (Dispute Resolution)</u>**

१. नियुक्त संस्था व ज.श.मनपा मध्ये काही वाद निर्माण झाल्यास दोन्ही पक्षांच्या संमतीने मध्यस्थ/लवाद व्यक्तिची नेमणूक करुन वादाबाबत समोपचाराने मार्ग काढून जो निर्णय होईल तो उभयपक्षांना मान्य व बंधनकारक राहील.

**<u>न्यायालयीन कार्यक्षेत्र</u>**

१. नियुक्त संस्था व ज.श.मनपा मध्ये कायदेविषयक वाद उद्भवल्यास त्याबाबत दाद मागण्याकरीता न्यायालयीन कार्यक्षेत्र जळगांव शहर राहील. तसेच उच्च न्यायालयासाठी औरंगाबाद खंडपीठ हे क्षेत्र राहील.

वरील सर्व अटी शर्तीचा करारनामा मुद्रांकावर ज.श.मनपास करुन देणे बंधनकारक राहील.

उपरोक्त अटी व शर्तीवर जळगांव शहर मनपाचे, गोलाणी मार्केट, नविन बि.जे.मार्केट, जुने बि.जे.मार्केट, महात्मा गांधी मार्केट, सेंट्रल फुले मार्केट, मधील शौचालय, मुताऱ्या, स्नानगृहे पैसे दया व वापरा या तत्वावर चालविणे कामी खाजगी संस्थेस देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. प्रशासनाने ज्या संस्थांना कामाचा जास्त अनुभव असेल अशा संस्थांना प्राधान्य दयावे.

सन्मा.सदस्यांनी सभागृहात सदर विषयासंदर्भात चर्चे दरम्यान ज्या सुचना केलेल्या आहेत त्याची प्रशासनाने नोंद घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- सनकत चेतन गणेश**

**नगरसचिव :- विषय क्रं.४:-** श्री.महेश धनराज पाटील,उपशिक्षक म.न.पा.कैंद्र शाळा क्र.२, जळगांव यांच्या आंतरजिल्हा बदलीस नाहरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत प्रशासन अधिकारी, मनपा शिक्षण मंडळ,जळगांव यांचेकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.सचिन पाटील :-** श्री.महेश धनराज पाटील यांच्याबाबत मी प्रशासन अधिकारी, म.न.पा. शिक्षण मंडळ यांना विचारु ईच्छितो, संबंधीत व्यक्ती जेव्हा आपल्या महानगरपालिकेच्या क्षेत्रात दाखल झाली, ती नंदुरबारची होती की, गडचीरोलीची होती. यांना आपण फक्त यांच्या गुणवत्तेवरती दाखल करुन घेतलेले आहे. आणि डॉकेट मध्ये स्पष्ट म्हटलेले आहे की, त्यांचे मुळगांव येथुन २०० कि.मी.दुर नंदुरबार आहे. आणि प्रशासन अधिकारी त्याला पुष्टी देऊन रिटन डॉकेट मध्ये लिहीत आहे. ठिक आहे आपल्या मराठी शाळा ज्या आहे नगरपालिकेच्या त्यांची संख्या ही अल्प आहे. विद्यार्थ्यांची, ही नैतिकता आहे आयुक्तांची, प्रशासनाची आणि निवडुन आलेल्या नगरसेवकांची की, आपण जळगांव शहराकरीता जास्तीत जास्त शाळा कसे चांगल्या होतील महानगरपालिकेच्या या दृष्टीने प्रयत्न केले पाहिजे. परंतु मराठी माध्यमाचे विद्यार्थी कमी असल्यामुळे या महेश पाटीलांच्या विषयावर विद्यार्थी संख्या आणि शिक्षक यांचा जी गुणवत्ता आहे. त्यानुसार शिक्षक हे अधिक होत आहे. त्यामुळे या विषयाला अनुमोदन देऊ शकतो पण प्रशासन अधिकाऱ्यांनी हे नमुद करुन घ्याव की, २०० कि.मी. दुर नंदुरबार मुळगांव आहे. हे म्हणणे चुकीचे आहे. पुढचा विषय जो आहे विषय क्र.०५ आणि ६ मध्ये. उर्दु माध्यमाचे जवळपास ६ शाळा आहे. त्या १ ते ५ चे विद्यार्थी २०६६ गुणवत्ता आहे ३५ विद्यार्थ्यामागे एक शिक्षक आणि ७ व ८ चे आहे १०२२ दोन्हींच गुण जर बघितले तर २५ च १ आणि ३५ च १ तर जवळपास १०० शिक्षक आज रोजी तुमच्या महानगरपालिकेत उर्दु माध्यमाकरीता उपस्थित पाहिजे. आणि आपल्या घेतलेल्या माहितीनुसार प्रशासन अधिकारीकडुन आपल्याकडे उर्दु माध्यमिक शिक्षकांची संख्या उपलब्ध आहे ८५. म्हणजे लो शॉर्टेज चालत आहे. आणि प्रशासन अधिकारी कुठल्या पध्दतीने कार्य करीत आहे की, त्यांना एकतर्फी बदली करणे करीता ६ चे ६ शिक्षकांचा प्रस्ताव प्रशासनाकडे मांडला जात आहे. म्हणजे प्रशासनाकडुन जरी प्रस्ताव येत असेल. तर प्रशासनाने पहिले डोळयात तेल घालाव. जनतेच्या नागरीकांचे काय योग्य काय अयोग्य नाही. आणि त्यानंतरच त्यांनी तो प्रस्ताव महासभेपुढे ठेवला पाहिजे. म्हणजे जिथे शिक्षकांची संख्याच कमी आहे. आणि तुम्ही ६ शिक्षक हे एकतर्फी बदली करण्याचा ठराव तुम्ही करुन टाकला, तर उद्या जाऊन जी मुस्लीम संवर्गातील विद्यार्थी आहे. त्या विद्यार्थ्यांना शिक्षक उपलब्ध होणार नाही. म्हणजे कुठेतरी या संस्था चालकांची घरे भरली पाहिजे. त्यांच्या संस्था चालल्या पाहिजेत.याच्या करीता सगळा घाट आहे. हा माझा स्पष्ट आरोप आहे प्रशासन मंडळावरती. त्यामुळे ५-६ विषयामधील ह्या बदल्या स्थगित ठेवाव्या. त्या बदल्या करु नये विद्यार्थ्यांच नुकसान होणार आहे. कारण या बदलीच्या प्रस्तावामुळे संबंधीत विद्यार्थ्यांचा शैक्षणिक नुकसान होता कामा नये.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.महापौरताई, विद्यार्थ्यांची संख्या १८४१ आहे आणि कार्यरत शिक्षकांची संख्या ६६ आहे. ३५ विद्यार्थ्यांच्या मागे १ शिक्षक असायला पाहिजे. तर साधारणता ३८ शिक्षकांची आवश्यकता आहे. आणि ते आपल्याकडे कार्यरत शिक्षक ६६ आहे. आणि हे झाले ३८ म्हणजे या उर्वरित शिक्षकांच्या अतिरिक्त पगाराचा बोजा जो आहे. तो आपल्यावरती पडत आहे. तर या शाळा काही याच्यामध्ये मर्ज करुन शिक्षक संख्या कमी केली, विद्यार्थी संख्या वाढविण्याच्या संदर्भात प्रयत्न प्रशासनाकडुन होत नाही. हा एक भाग दुसरा सामान्य जनतेच्या मनातला जो आहे की, मनपाच्या किंवा जिल्हा परिषदच्या शाळांचा दर्जा जो आहे. तो अत्यंत खालवलेला आहे. असा एक समज आहे. आणि त्या शाळांमध्ये झोपडपट्टी भागातला सुध्दा मुलगा शिक्षण घेण्यासाठी इंग्लिश मेडीअमकडे जातो. आणि अश्या अनुषंगाने आपल्या शाळा जी आहे ते क्लोज पडत आहे. आज जर कधी या अतिरिक्त शिक्षकांची संख्या, आणि याच्या पगारावरती होणारा खर्च, ५०% शिक्षकांच्या पगाराचा बोजा हा महानगरपालिकेवर पडतो. तर याचा जर

आपण कॅलक्युलेशन केले. तर हा जो अतिरिक्त बोझा महानगरपालिकेवर पडत आहे. किंवा तेथे तेवढी पदसंख्याच नाही. परंतु शिक्षकांचे पगार हे महानगरपालिकेला दर महिन्याला अदा करावे लागते. तर याच्या संदर्भात प्रशासनाचा धोरण काय आहे नेमक. आणि प्रशासन अश्या पध्दतीने धोरण तयार करुन अतिरिक्त शिक्षकांच्या बाबतीतला काय निर्णय घेईल. त्या संदर्भातली माहिती या ठिकाणी सभागृहाला अवगत करण्यात यावी.

**श्री.सचिन पाटील :-** महापौर महोदया, काही स्लम ऐरिया मधील गोरगरीब जनता जी असेल त्यांचे मुलांना त्या पालकांच्या मनात ही भावना निर्माण झाली पाहिजे. जशी मुंबई महानगरपालिका आहे. जस दिल्लीचे केजरीवाल यांचा आप सरकार आहे. या गोष्टी घेतल्या पाहिजे आपण. तर आपण या ठिकाणी जनतेत विश्वासता निर्माण केली गेली पाहिजे महानगरपालिकेकडुन तर आमच्या शाळेत देखील इंग्रजी माध्यमाच चांगल शिक्षण दिले जात आहे आणि मराठी माध्यमाचा ही चांगले शिक्षण दिले जात आहे. म्हणजे जेणे करुन ही जी अल्पसंख्या आहे. १३३८ हे कुठेतरी इम्प्रु होईल. आणि भाऊंनी जो सुचना मांडलेल्या आहे की, ३० ते ३५ शिक्षक अतिरिक्त ठरत आहे. तर त्या शिक्षकांना सुध्दा कुठेतरी शिक्षणाचा शिकविण्याचा भार येईल. आणि आपला पैसा हा फक्त शिक्षकांच्या दृष्टीने अतिरिक्त जातो असे नाही. येथे बसलेले सगळे नगरसेवकांना माहिती आहे की, किती वर्ष झाले गाळयांचा थकबाकी बाकी आहे अजुन. तर शिक्षकांच्या विषयावर आपण जनजागृती करुन प्रशासनाने हा पुढाकार घेतला पाहिजे. उपायुक्त साहेबांनी, शिक्षण मंडळाने, अधिकाऱ्यांनी, त्यादृष्टीने लवकरात लवकर प्रयत्न केले पाहिजे. आणि याच्या पुढे असे बदल्यांचे प्रस्ताव जे आहे एकतर्फी हे प्रस्तावीत करतांना विचार केला पाहिजे. हे ५ आणि ६ बदल्यांचा विषय हा पारित करु नये असा हा माझा व्यक्तीगत मत आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** हा व्यक्तीगत मत आहे त्यांच.

**श्री.सचिन पाटील :-** प्रशासनाकडुन निर्णय घ्यायचा आहे अप्पा साहेब.

**श्री.कैलास सोनवणे :-** मी बोलु की नाही आता, आम्ही केव्हापासुन किती ऐकत आहे तुमचे.

**श्री.सचिन पाटील :-** अरे अप्पा साहेब तुमच पण ऐकतो आहे आम्ही.

**श्री.कैलास सोनवणे :-** तुम्ही मांडली भुमिका ती, परंतु महानगरपालिकेचे शिक्षक असे काही शार्प नाही ऐवढे की, ते विद्यार्थी संख्या वाढविण्यासाठी प्रयत्न करतील.

**श्री.सचिन पाटील :-** आपण असे म्हणु शकत नाही अप्पा साहेब.

**श्री.कैलास सोनवणे :-** मी म्हणु शकतो माहिती आहे मला,

**श्री.सचिन पाटील :-** असे म्हणुन शिक्षकांचे अपमान करत आहात तुम्ही. आपले महापौर पण शिक्षिका आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** अरे महापालिकेचे शिक्षक म्हणत आहे मी,

**श्री.सचिन पाटील :-** अप्पा तुम्ही आमचे मोठे बंधु आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** काय विषय चालत आहे आणि काय लावल आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** अरे किती बोलु देता,

**श्री.सचिन पाटील :-** अप्पा साहेब आम्ही जास्त ऐकतो तुमच.

**श्री.कैलास सोनवणे :-** बोला टाईम जात आहे ना यार.

**श्री.सचिन पाटील :-** ते उर्दु माध्यमाच.

**मा.महापौर :-** विषय क्र.०४

**श्री.नितीन लढ्ढा :-** विषय क्र.०४ वरच बोलायचे होते. या संदर्भात महानगरपालिकेच्या शाळांमधली, विद्यार्थ्यांची संख्या ही जवळपास ८००० पर्यंत होती. शाळांचा दर्जा घसरला जात आहे. शिक्षकांचा दर्जा घसरला जात आहे. कुठल्याही कारणाने घसरला असेल. ही विद्यार्थी संख्या १३४१ पर्यंत आली ही अत्यंत चिंतनणीय बाब आहे. परंतु जसे सचिन भाऊंनी सांगितले की, त्या शाळांचा दर्जा कश्या पध्दतीने उंचावला जाईल. आणि जर त्याच्या मध्येही प्रशासनाच अपयश होत असेल किंवा शिक्षणाचा दर्जा उंचवला जात नसेल. या अतिरिक्त शिक्षकांच्या पगाराचा अतिरिक्त खर्च जो या महानगरपालिकेच्या तिजोरीवर पडतो. त्याकरीता प्रशासन काय धोरण अवलंबणार. दोघी गोष्टींच्या संदर्भात विचार करुन उत्तर द्यावे लागेल आपल्याला की, शिक्षणाचा दर्जा वाढविण्याच्या संदर्भात काय प्रयत्न होतील. आणि समजा ते नाही झाल तर या अतिरिक्त शिक्षकांचा बोझा कसा कमी करता येईल.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** हा विषय मांडला ही वस्तुस्थिती आहे. कारण १९९४-९५ ला मी शिक्षण मंडळाचा सदस्य होतो. त्यावेळेस १८००० विद्यार्थी संख्या या महानगरपालिकेच्या शाळांमध्ये होती. आणि त्यावेळेस आम्ही गेल्या ७-८ वर्ष शिक्षण मंडळ आम्ही चांगल्या पध्दतीने चालविल. तर तेथे जी साधन सुविधा हा जो सरळ विषय आहे. तर त्या ठिकाणी साधनसुविधा, या सगळया गोष्टी उपलब्धता आणि शिक्षकांवरती कंट्रोल सगळयात महत्वाचा विषय. आणि शिक्षकांच मनोबल आणि त्यांचा पगार या तिन गोष्टी फार महत्वाचे आहे. त्याच्यासाठी शिक्षण मंडळाची एक चांगली समिती या महानगरपालिकेने स्थापन करावी. त्यामध्ये महानगरपालिकेचे उपायुक्त असतील तर उपायुक्त घ्यावे. आपल्या सदस्यांमधुन एक ४-५-७ सदस्य घ्यावे. आणि जळगांव शहरातुन ज्यांना शिक्षणाची आवड आहे. असे ३-४ तज्ञ लोकं दानशुर लोकं. त्या समितीमध्ये समाविष्ट करुन ती समिती स्थापन करावी. अशी माझी या ठिकाणी सुचना आणि ठराव आहे. ते सगळयांना मान्य असल्यास सगळयांनी करावा जेणे करुन शिक्षणाचा दर्जा उंचावला जाईल. शिक्षण मंडळ आपले बरखास्त झालेले आहे. आणि शिक्षण मंडळाची न्यायालयीन प्रक्रिया सुरु आहे. तो निकाल येईल तो पर्यंत ही पध्दत राबवावी अशी माझी या सभागृहाला विनंती आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** मग आता हा विषय मंजुर करायचा की नाही.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मंजुर, मंजुर.

**श्री.विष्णु भंगाळे :-** अध्यक्ष महोदया,

**श्री.कैलास सोनवणे :-** अरे बस ना या तुम्ही राहिले होते का ?

**श्री.विष्णु भंगाळे :-** अध्यक्ष महोदय, या आधीची शिक्षणाच्या बाबतीतली व्यथा जी व्यथा आपल्या नगरपालिका, महानगरपालिका या शाळेतील व्यथा जी आहे. शिक्षण मंडळावर जसे विशाल भाऊंनी काम केल. तसेच मी सुध्दा या शिक्षण मंडळावर सदस्य होतो. त्यावेळेस कृष्णा सरांच्या मार्गदर्शनाखाली चांगल्याप्रकारे काम आपल्या नगरपालिका आणि महानगरपालिका मध्ये होते. आपण शिक्षिका आहात, आपण मुख्याध्यापीका आहात. आपल्याकाळामध्ये सुध्दा आपल्या मनपाच्या शाळांमध्ये कश्या प्रकारे मुलं किंवा मुली ज्या प्रकारे शिक्षण घेण्यासाठी जास्तीत जास्त येतील. याची सुध्दा उपाययोजना आपण आणली पाहिजे. शिक्षणात मा.श्री.सुरेशदादा जैन यांचे देखील, मागील काळामध्ये आपल्या ज्या ज्या शाळा होत्या. त्या शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी त्यांना आवश्यक असलेले बुक असतील, ड्रेस असतील किंवा चप्पल असतील किंवा शाळेसाठी उपयोगी वस्तु असतील ह्या देण्याचा प्रयत्न सुध्दा आपल्या या दानशुर व्यक्तींच्या माध्यमातुन होत होता. तसे मा.श्री.विशाल भाऊ यांनी सांगितले प्रमाणे या गोष्टीकडे आपण शिक्षक या नात्याखाली या जळगांव शहराचे जे काही विद्यार्थी गरीब पालकांचे जे विद्यार्थी आहे. त्यांना शिक्षण जर चांगल मिळाल. माझ एक व्यक्तीगत मत अस आहे की, चांगल्या प्रकारे आपल्या या जळगांव शहराचा नागरीक आपल्या या मनपाच्या स्कुल मध्ये टाकतील. शिक्षक सुध्दा चांगल्या प्रकारे शिकविण्याचा प्रयत्न करतात. पण मुल त्या गोष्टीकडे वळत नाही.म्हणुन एक विनंती आहे की, त्या समितीच्या माध्यमातुन येणाऱ्या काळामध्ये आपण त्याकडे लक्ष द्याव. आणि जास्तीत जास्त आपण मनपाच्या स्कुलच्या बिल्डींग इतक्या मोठया प्रमाणावर तयार केलेल्या आहे. जळगांव शहरातील नागरीकांच्या जे गरीब नागरीक असतील किंवा जे काही नागरीक असतील त्यांना शिक्षणाच्या दृष्टीने सुखसोई होण्याच्या दृष्टीने आपल्या विविध विभागामध्ये आपल्या बिल्डींग उपलब्ध आहे. म्हणुन माझी एक विनंती आहे की, बिल्डींगांच सुध्दा चांगल्या प्रकारे उपयोग होऊ शकतो. आपल्याला बिल्डींग उभारण्याचा जो खर्च आपल्याकडे नाही. जर या दर्ज्याने जर लक्ष घातल तर येणारे कामाचे मनपाचे स्कुल सुध्दा नाव लौकीक असतील अशी आपल्याला विनंती आहे. येणाऱ्या काळामध्ये आपण या गोष्टींकडे लक्ष द्यावे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** या गोष्टीकडे लक्ष टाकुन जास्तीत जास्त शैक्षणिक क्षेत्राचा दर्जा उंचवता येईल त्याच्याकडे लक्ष द्याव.

**मा.महापौर :-** विद्यार्थी १३४१ आहे आणि त्याला जी कार्यरत शिक्षक आहे ते ६६ आहे. आता हे ६६ जी शिक्षक आहे ती कर्मचारी सुची आपण कोणत्या वर्षानुसार नोंदविलेली आहे. मला वाटत दोन वर्षापासुन आपल्या महानगरपालिकेला कर्मचारी सुची मिळालेली नाही. ३५ च्या अनुषंगाने १ शिक्षक हा क्रायटेरीया असल्यामुळे कदाचित नविन कर्मचारी सुची ज्या वेळेला आपल्याला उपलब्ध होईल. त्या वेळेला आपले शिक्षक सरपल्स झालेले असतील. त्यामुळे विद्यार्थ्यांनुसारच आपल्याला या ठिकाणी शिक्षक उपलब्ध होणार आहे. अजुन आपण या विषय

क्र.०४ चा जर विचार केला तर या ठिकाणी या शिक्षकांना जी अंतरजातीय बदली आहे याला काही अडचण नाही असे मला वाटते. त्या अनुषंगाने विद्यार्थीची पठसंख्या ही बरोबर आहे. दुसरा विषय विषय क्र.५ आणि ६ याच आपण अवलोकन केल तर विद्यार्थ्यांची संख्या ही ३०८८ आहे. आपल्याकडे कार्यरत असणारे शिक्षक ८६ आहे यात दिले प्रमाणे कर्मचारी सुची आपल्याला आज पर्यंत नविन वर्षाची मिळालेली नाही. त्यामुळे मी आपल्याला सांगते की, जुन्या कर्मचारी सुचीनुसार ही संख्या घेण्यात आलेली आहे. त्यामुळे आज जर ही पटसंख्या ग्राहय धरली. तर आपल्याला ८९ शिक्षक आज रोजी आपल्या येथे कार्यरत असावे. परंतु आपल्याकडे ८६ आहे. त्यातील जर ६ शिक्षक अंतरजिल्हा बदली होऊन जर जात असतील तर आपल्याकडे त्या ६ शिक्षकांची कमतरता भासणार आहे. त्याच काय ? याच उत्तर शिक्षण मंडळाने द्यावे. यात म्हटल्याप्रमाणे दोन जी शिक्षक आहे त्यांची पवित्र पोर्टल प्रमाणे नियुक्ती झालेली आहे. ते रुजु झालेले आहे का याच ही उत्तर मला शिक्षण मंडळाने द्याव. आणि उर्वरित त्या ६ पैकी जर २ रुजु झालेले आहे तर मग बाकीचे ४ जे शिक्षक आहे त्यांच काय ? विद्यार्थ्यांच शैक्षणिक नुकसान होऊ नये या दृष्टीकोणातुन शिक्षण मंडळाने याच पुर्ण विवेचन कराव.

**श्री.सरोदे, शिक्षण मंडळ :-**२० शिक्षकांची डिमांड केलेली आहे त्याच्यापैकी ६ हजर झाले आपल्याकडे १४ शिक्षक हे येण्याचे बाकी आहे. ते आपल्याकडे येतील.

**मा.महापौर :-** किती लोकं आले आपल्याकडे.

**श्री.सरोदे, शिक्षण मंडळ :-** ६

**मा.महापौर :-** येत आहे ते.

**श्री.सरोदे, शिक्षण मंडळ :-** हो. शासनाने आपल्याकडे ६ लोक दिले आता १४ बाकी आहे.

**श्री.सचिन पाटील :-** महापौर महोदया, यांनी कालच्या दिवशी ही माहिती दिली. यानुसार तुमचे ३५ विद्यार्थ्यांमागे १ शिक्षक.

**श्री.सरोदे, शिक्षण मंडळ :-** हो ना. मग ते जे कमी आहे उर्दु शिक्षक २० आपण डिमांड केली आहे.

**श्री.सचिन पाटील :-** आले आहेत का आज? विद्यार्थ्यांच नुकसान होत आहे.

**श्री.सरोदे, शिक्षण मंडळ :-** ६ आलेले आहे १४ येण्याचे बाकी आहे.

**मा.आयुक्त :-** विषय क्र.४ मध्ये जे अतिरिक्त शिक्षक आहे त्यांना आपण अंतरजिल्हा बदलीला संमती द्यायला मला वाटत सभागृहाला काही अडचण दिसुन येत नाही.

**श्री.विष्णु भंगाळे :-** नाही. याला मंजुर आहे.

**मा.आयुक्त :-** विषय क्र.५ आणि ६ विषय सोडुन उर्दु शाळांमधील शिक्षकांच्या बाबतीमध्ये बहुतांशी सन्मा.सदस्यांनी एक या ठिकाणी चिंता व्यक्त केलेली आहे की, विद्यार्थी संख्या जास्त आहे आणि आदरणीय महापौर मॅडमांचाही तोच मुद्दा होता. जर विद्यार्थ्यांची संख्या जास्त असेल आणि आपल्याकडे उपलब्ध शिक्षकांची संख्या कमी असेल. अश्या वेळेला आपल्या शिक्षकांना जर आपण संमती दिली. तर ऑलरेडी कमी असलेले शिक्षक अजुन कमी होईल आणि विद्यार्थ्यांचे नुकसान होईल. अतिशय रास्त मुद्दा आहे. पंरतु याच्या मध्ये जर आपण डॉकेट बघितल. तर त्या डॉकेट मध्ये प्रशासन अधिकारींनी हे स्पष्टपणे म्हटलेले आहे की, आपल्याकडील विद्यार्थी संख्या निश्चित करुन आपण जे काही कमी पडणारे शिक्षकांची संख्या आहे. ते आपण शिक्षण विभागाच्या पवित्र पोर्टल मार्फत शिक्षकांची भरती होते त्याच्यामध्ये आपण दिलेली आहे. जसे आता आपल्या कर्मचारी यांनी स्पष्ट केले प्रमाणे आपल्याला २० शिक्षकांची संख्या कमी आहे.त्याप्रमाणे आपण मागणी ही दिलेली आहे. २० शिक्षकांची आपल्याकडे अलॅटमेंट झालेली आहे. ६ जॉईंट झाले १४ येत आहे. आपण आज जरी संमती दिली तर जो डॉकेट आहे प्रस्ताव आहे. तो जर विचारात घेतला तर आपण आपल्या विद्यार्थ्यांचे कुठेही नुकसान होऊ देणार नाही. प्रशासन अधिकारी यांनी

याच्यात अस म्हटलेले. बदलीच्या ठिकाणच ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर शिक्षण मंडळ जळगांव या अस्थापनेवरील त्यावेळेला पवित्र पोर्टल मार्फत उपलब्ध केलेली शिक्षक संख्या, कार्यरत शिक्षक संख्या, रिक्त किंवा जादा शिक्षक संख्या यांच्या संख्येच्या तुलना करुनच तसेच कोणत्याही विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान होणार नाही ही बाब प्राधान्याने लक्षात घेऊन काही कृत्य करण्यापुर्वी आयुक्त, जळगांव महानगरपालिका यांची मान्यता घेणे बंधनकारक राहील. अशी आयुक्तांची मान्यता मिळाल्यानंतर कार्यमुक्ती संबंधीतची कार्यवाही करण्यात येईल. ज्या वेळेला आपल्याला विद्यार्थ्यांच्या संख्येच्या प्रमाणामध्ये प्रयोजनार्थ पुरेशी उर्दु शिक्षकांची संख्या उपलब्ध होईल आणि आपल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान काही होणार नाही. याची खात्री केल्यानंतरच प्रत्यक्ष अंतरजिल्हा बदलीच्या प्रस्तावाला आपण कार्यमुक्ती देणार आहोत. आज आपण एक धोरण म्हणुन याला NOC जरी दिली. आजच्या ठरावाबद्दल आपण त्यांना लगेच उद्या त्यांना कार्यमुक्त करणार नाही. आपल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताची काळजी करुनच आपण त्या नाकार्यमुक्तीचा निर्णय घेऊ.

**श्री.सचिन पाटील :-** महापौर महोदया , आपण मागे पण निर्णय घेतला होता त्यावेळेस त्याचे काय झाले

**श्री.कैलास सोनवणे :-** आपल्याला काही ॲग्रीमेंट करायचे नाही याच्यावर

**मा.आयुक्त :-** आपण आपल्या विद्यार्थ्यांच्या हिताची दक्षात घेऊ.

**मा.महापौर :-** आयुक्त साहेब ज्या वेळेला याला मान्यता देतील ना-हरकत प्रमाणपत्र देतील त्यावेळेस त्यांनी सगळी परिस्थिती सभागृहाला अवगत करुन द्यावी. कुठले शिक्षक आले आणि कुठले शिक्षक गेले. म्हणजे सभागृहाला सुध्दा त्या बद्दल माहिती होणार की, या ठिकाणी शिक्षक आहे म्हणुन आणि त्यानंतरच शिक्षकांना त्यांनी या ठिकाणी ना-हरकत प्रमाणपत्र द्याव.

**मा.उपमहापौर :-** विषय क्र.४,५,६ तिघ विषयांना माझे अनुमोदन आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** तिघ विषयांना. नंबर-७ घ्या आता.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात येत आहे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सर्वानुमते विषय क्र.४,५ आणि ६ मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.६३० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका शिक्षण मंडळ आस्थापनेवरील कार्यरत श्री.महेश धनराज पाटील,उपशिक्षक म.न.पा.केंद्र शाळा क्र.२, जळगांव येथे दि.१५/०७/२०१० पासून सेवेत कार्यरत आहे. ते मुळगाव जिल्हा नंदुरबार येथील रहिवासी असून त्यांचे मुळगाव नंदुरबार ते जळगांव शहरापासूनचे अंतर २०० किलोमीटर आहे. म्हणून संबंधीतांनी जिल्हा परिषद, नंदुरबार या आस्थापनेवर एकतर्फी आंतरजिल्हा अंतर्गत बदली होणेसाठी नाहरकत प्रमाणपत्र मिळणेकरिता दि.०४/०६/२०२१ रोजी विनंती अर्ज सादर केलेला आहे.

तथापि, शासन निर्णय दिनांक १६ फेब्रुवारी, २०२१ नुसार संबंधीतानी नियमानुसार प्रशासकीय अधिकारी यांच्याकडे आंतरजिल्हा बदलीसाठी विनंती अर्ज व परिपूर्ण प्रस्ताव सादर केलेला आहे. तरी उक्त शासन निर्णयात दिलेल्या अटी व शर्ती नुसार नियुक्ती प्राधिकाऱ्याचे नाहरकत प्रमाणपत्र आवश्यक आहे.

| क्र. | माध्यम | विदयार्थी पटसंख्या | कार्यरत शिक्षक संख्या |
|---|---|---|---|
| १ | मराठी | १३४१ | ६६ |

तथापि, वरील तक्त्यातील नमुद विदयार्थी पटसंख्या प्रमाणे शिक्षकांची संख्या ही नियमानुसार ३५:१ म्हणजे ३५ विदयार्थी मागे एक शिक्षक असणे महत्वाचे आहे. तरी मराठी माध्यमाची विदयार्थी संख्या व कार्यरत शिक्षक एकूण ६६ प्रमाणे ३५X६६=२३१० होत आहे. त्यामुळे एकूण मराठी माध्यमाच्या विदयार्थ्यांची पटसंख्या लक्षात घेता मराठी माध्यम शिक्षकांची संख्या आजच्या स्थितीत जादा आहे. तरी संबंधिताची जिल्हाबदली झाल्यास व महानगरपालिकेची

आर्थिक स्थिती बीकट असल्याने संबंधीतास सोडण्यास परवानगी दिली तर महापालिकेवरील त्या शिक्षकाचा ५० टक्के अनुदानावरील भार कमी होवू शकतो.

तथापि, संबंधीत श्री.महेश धनराज पाटील हे आज रोजी राज्यातील पहिली आंतरराष्ट्रिय दर्जाची निवास शाळा नंदुरबार जिल्हातील तोरणमाळ केंद्रामध्ये सुरु असून त्यांची सदर शाळेमध्ये मा.उपसंचालक महाराष्ट्र विदया प्राधिकरण, पुणे-३० यांचे जा.क्र.मविप्रा/आस्था/प्रतिनियुक्ती/२०१७/३५८९/२०२२ दि.०६/१०/२०१७ चे आदेशाने दि.१०/१०/२०१७ ते ३०/०९/२०२० या कालावधी पर्यंत निवड करण्यात आलेली आहे. तद्नंतर सदर कार्यालयाने आयुक्त,म.न.पा.जळगांव यांची दि.०२/११/२०१७ रोजीच्या मान्य टिपणी नुसार प्रशासन अधिकारी,म.न.पा. शिक्षण मंडळ,जळगांव यांचे जा.क्र.जशमनपा/शि.मं./८३२/२०१७-१८ दि.२०/११/२०१७ रोजी प्रतिनियुक्तीवर हजर होणेसाठी कार्यमुक्त केलेले आहे.

प्रस्तावात नमूद केल्यानुसार श्री.महेश धनराज पाटील,उपशिक्षक म.न.पा.केंद्र शाळा क्र.२, जळगांव यांच्या आंतरजिल्हा बदलीस नाहरकत प्रमाणपत्र देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार आयुक्त साहेब ज्यावेळी ना-हरकत प्रमाणपत्र देतील त्यावेळी त्यांनी सभागृहाला सगळी परिस्थिती अवगत करुन दयावी. कुठले शिक्षक आले आणि कुठले शिक्षक बदली होवून गेले याची सभागृहाला माहिति दयावी. याठिकाणी शिक्षक असल्यावरच त्यांनी बदली होवून जाणाऱ्या शिक्षकांना ना-हरकत प्रमाणपत्र दयावे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं.५:-** जळगांव म.न.पा.प्राथमिक शिक्षण मंडळाच्या आस्थापनेवरील सदफ जरीन मिर्झा नवाज बेग व इतर दोन शिक्षक यांच्या आंतरजिल्हा बदलीस नाहरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत प्रशासन अधिकारी, मनपा शिक्षण मंडळ,जळगांव यांचेकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात येत आहे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.६३१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव म.न.पा.प्राथमिक शिक्षण मंडळाच्या आस्थापनेवरील खालील शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदलीबाबत प्रस्ताव प्राप्त झालेले असून त्यानुसार खालील रकान्यात शिक्षकांची माहिति नमुद केलेली आहे.

परिशिष्ठ-१

| अ.क्र. | शिक्षकाचे नांव | मनपा शिक्षण मंडळात सेवाकालावधी वर्ष | कार्यरत मनपा शाळा क्रमांक | आंतरजिल्हा बदलीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | सदफ जरीन मिर्झा नवाज बेग | १० वर्षे | शाळा क्र.३५ | म.न.पा.औरंगाबाद |
| २ | अकील अहमद गुलाम अहमद | १४ वर्षे | शाळा क्र.४१ | म.न.पा.अकोला |
| ३ | मो.जहीर अब्दुल कदीर | १० वर्षे | शाळा क्र.१९ | म.न.पा.औरंगाबाद |

उक्त अ.नं.१ ते ३ शिक्षकांची कोणतीही विभागीय चौकशी सदयस्थितीत सुरु नाही. तसेच म.न.पा.उर्दू माध्यम शाळांमध्ये विदयार्थ्यांची पटसंख्या व शिक्षकांची संख्या खालील तक्त्यात नमुद केलेली आहे.

| क्र. | माध्यम | विदयार्थी पटसंख्या | कार्यरत शिक्षक संख्या |
|---|---|---|---|
| १ | उर्दू | ३०८८ | ८६ |

वरील तक्त्यातील नमुद विदयार्थी पटसंख्या प्रमाणे शिक्षकांची संख्या ही नियमानुसार ३५:१ म्हणजे ३५ विदयार्थी मागे एक शिक्षक असणे महत्वाचे आहे. तथापि, उर्दू माध्यमाची विदयार्थी संख्या व कार्यरत शिक्षक एकूण ८६ प्रमाणे ३५X८६=३०१० होत आहे. त्यामुळे एकूण उर्दू माध्यमांच्या विदयार्थ्यांची पटसंख्या लक्षात घेता उर्दू माध्यम शिक्षकांची संख्या आजच्या स्थितीत पुरेशी आहे.

तथापि, सदय स्थितीत शासनाने पवित्र पोर्टल या संगणकीय प्रणालीव्दारे सन २०१९ मध्ये उर्दू माध्यमाची ४ शिक्षणसेवकांना नियुक्ती दिलेली आहे. तद्नंतर पुनश्च शासनाने पवित्र पोर्टल या संगणकीय प्रणाली मार्फत सन २०२० मध्ये नव्याने ४ उर्दू शिक्षकांना म.न.पा.जळगांव आस्थापनेवर मान्यता देऊन नियुक्ती दिलेली असून त्यापैकी २ शिक्षणसेवक रुजू झालेले आहे.

उपरोक्त शिक्षकांना आंतर जिल्हा बदलीस मान्यता मिळाल्यास म.न.पा.वरील खालील रकान्यात नमूद केलेप्रमाणे रु.६,५१,६७२/- मात्रचा ५० टक्के आर्थिकबोजा कमी होऊ शकतो.

| अ. क्र. | शिक्षकाचे नांव | शाळा क्रमांक | मासिक वेतन | वार्षिक वेतन | शिक्षणसेवक मानधन | शिक्षणसेवक वार्षिक मानधन | जादा वेतन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सदफ जरीन मिर्झा नवाज बेग | शाळा क्र.३५ | ३८७८८ | ४६५४५६ | ६००० | ७२००० | ३९३४५६ |
| २ | अकील अहमद गुलाम अहमद | शाळा क्र.४१ | ४९०३६ | ५८८४३२ | ६००० | ७२००० | ५१६४३२ |
| ३ | मो.जहीर अब्दुल कदीर | शाळा क्र.१९ | ३८७८८ | ४६५४५६ | ६००० | ७२००० | ३९३४५६ |
| एकूण १०० टक्के वेतन | | - | १२६६१२ | १५१९३४४ | १८००० | २१६००० | १३०३३४४ |
| म.न.पा.५०टक्के वेतन | | - | ६३३०६ | ७५९६७२ | ९००० | १०८००० | ६५१६७२ |

तथापि, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०१८/प्र.क्र.३८९/नवि-२० दि.१६/०२/२०२१ च्या शासन निर्णयामधील अट क्र.१ ते ११ नुसार वरील दोन्ही शिक्षक नियम व अटी मान्य असल्याबाबत कळवित असून सेवा वर्ग करण्याबाबत मान्यता देण्याचे अधिकार हे आयुक्त,महानगरपालिका यांना आहे. तसेच संबंधीतांच्या प्रस्तावामध्ये याबाबत स्व घोषणा पत्र आहे.

उक्त परिशिष्ठ १ मधील अ.नं.१ ते ३ शिक्षकांनी ५ व्या रकान्यात नमूद ठिकाणातील शिक्षण विभाग त्यांच्या आस्थापनेवर समावून घेण्यास तयार असल्याच्या अटीवर नाहरकत प्रमाणपत्र देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

मात्र १) सदर शिक्षकांना ज्या ठिकाणी बदली हवी आहे त्या आस्थापनाकडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे लागेल. २) बदल ठिकाणचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यावर महानगरपालिका शिक्षण मंडळ,जळगांव या आस्थापनेवरील त्या वेळी पवीत्र पोर्टल मार्फत उपलब्ध शिक्षक संख्या, कार्यरत शिक्षक संख्या, रिक्त / जादा शिक्षक संख्या यांची संख्यात्मक तुलना करुनच तसेच विदयार्थ्यांचे कोणत्याही प्रकारचे शैक्षणिक नुकसान होणार नाही ही बाब प्राधान्याने लक्षात घेता कार्यमुक्त करणेसंबंधी आयुक्त,म.न.पा.जळगांव यांची मान्यता घेणे बंधनकारक राहिल. मान्यता मिळाल्यानंतर कार्यमुक्ती संबंधी कार्यवाही करण्यात येईल. ३) सध्या संबंधीत शिक्षकांना बदली ठिकाणाचे ना हरकत प्रमाणपत्र मिळत नाही व या आस्थापनेवरुन आयुक्त,म.न.पा.जळगांव कार्यमुक्त करीत नाही तो पर्यंत संबंधीत शिक्षक याच आस्थापनेवर कार्यरत राहतील. त्यामुळे वरील कालावधीत विदयार्थ्यांचे कोणतेही प्रकारचे शैक्षणिक नुकसान होणार नाही.

उपरोक्त प्रमाणे कार्यवाही झाल्यानंतर सदर शिक्षकांना आंतरजिल्हा बदलीसाठी ना हरकत प्रमाणपत्र देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार आयुक्त साहेब ज्यावेळी ना-हरकत प्रमाणपत्र देतील त्यावेळी त्यांनी सभागृहाला सगळी परिस्थिती अवगत करुन दयावी. कुठले शिक्षक आले आणि कुठले शिक्षक बदली होवून गेले याची सभागृहाला माहिती दयावी. याठिकाणी शिक्षक असल्यावरच त्यांनी बदली होवून जाणाऱ्या शिक्षकांना ना-हरकत प्रमाणपत्र दयावे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिवः- विषय क्रं.६:-** जळगांव म.न.पा.प्राथमिक शिक्षण मंडळाच्या आस्थापनेवरील खान मो.फैसलउल्लाह फसाहतउल्लाह व इतर दोन शिक्षक यांच्या आंतरजिल्हा बदलीस नाहरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत प्रशासन अधिकारी, मनपा शिक्षण मंडळ,जळगांव यांचेकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात येत आहे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६३२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव म.न.पा.प्राथमिक शिक्षण मंडळाच्या आस्थापनेवरील खालील शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदलीबाबत प्रस्ताव प्राप्त झालेले असून त्यानुसार खालील रकान्यात शिक्षकांची माहिती नमुद केलेली आहे.

परिशिष्ठ - १

| अ.क्र. | शिक्षकाचे नांव | मनपा शिक्षण मंडळात सेवाकालावधी वर्ष | कार्यरत मनपा शाळा क्रमांक | आंतरजिल्हा बदलीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | खान मो.फैसलउल्लाह फसाहतउल्लाह | १० वर्ष | शाळा क्र.५६ | म.न.पा.औरंगाबाद |
| २ | शेख रेहान भिकन | १० वर्ष | शाळा क्र.१३ | म.न.पा.औरंगाबाद |
| ३ | शेख अकील इस्माईल | १० वर्ष | शाळा क्र.४१ | म.न.पा.औरंगाबाद |

उक्त अ.नं.१ ते ३ शिक्षकांची कोणतीही विभागीय चौकशी सदयस्थितीत सुरु नाही. तसेच म.न.पा.उर्दू माध्यम शाळांमध्ये विदयार्थ्यांची पटसंख्या व शिक्षकांची संख्या खालील तक्त्यात नमुद केलेली आहे.

| क्र. | माध्यम | विदयार्थी पटसंख्या | कार्यरत शिक्षक संख्या |
|---|---|---|---|
| १ | उर्दू | ३०८८ | ८६ |

वरील तक्त्यातील नमुद विदयार्थी पटसंख्या प्रमाणे शिक्षकांची संख्या ही नियमानुसार ३५:१ म्हणजे ३५ विदयार्थी मागे एक शिक्षक असणे महत्वाचे आहे. तथापि, उर्दू माध्यमाची विदयार्थी संख्या व कार्यरत शिक्षक एकूण ८६ प्रमाणे ३५X८६=३०१० होत आहे. त्यामुळे एकूण उर्दू माध्यमांच्या विदयार्थ्यांची पटसंख्या लक्षात घेता उर्दू माध्यम शिक्षकांची संख्या आजच्या स्थितीत पुरेशी आहे.

तथापि, सदय स्थितीत शासनाने पवित्र पोर्टल या संगणकीय प्रणालीव्दारे सन २०१९ मध्ये उर्दू माध्यमाची ४ शिक्षणसेवकांना नियुक्ती दिलेली आहे. तद्नंतर पुनश्च शासनाने पवित्र पोर्टल या संगणकीय प्रणाली मार्फत सन २०२० मध्ये नव्याने ४ उर्दू शिक्षकांना म.न.पा.जळगांव आस्थापनेवर मान्यता देऊन नियुक्ती दिलेली असून त्यापैकी २ शिक्षणसेवक रुजू झालेले आहे.

उपरोक्त शिक्षकांना आंतर जिल्हा बदलीस मान्यता मिळाल्यास म.न.पा.वरील खालील रकान्यात नमूद केलेप्रमाणे रु.५,९०,१८४/- मात्रचा ५० टक्के आर्थिकबोजा कमी होऊ शकतो.

| अ.क्र. | शिक्षकाचे नांव | शाळा क्रमांक | मासिक वेतन | वार्षिक वेतन | शिक्षणसेवक मानधन | शिक्षणसेवक वार्षिक मानधन | जादा वेतन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | खान मो.फैसलउल्लाह फसाहतउल्लाह | शाळा क्र.५६ | ३८७८८ | ४६५४५६ | ६००० | ७२००० | ३९३४५६ |
| २ | शेख रेहान भिकन | शाळा क्र.१३ | ३८७८८ | ४६५४५६ | ६००० | ७२००० | ३९३४५६ |
| ३ | शेख अकील इस्माईल | शाळा क्र.४१ | ३८७८८ | ४६५४५६ | ६००० | ७२००० | ३९३४५६ |
| एकूण १०० टक्के वेतन | | - | ११६३६४ | १३९६३६८ | १८००० | २१६००० | ११८०३६८ |
| म.न.पा.५०टक्के वेतन | | - | ५८१८२ | ६९८१८४ | ९००० | १०८००० | ५९०१८४ |

तथापि, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०१८/प्र.क्र.३८९/नवि-२० दि.१६/०२/२०२१ च्या शासन निर्णयामधील अट क्र.१ ते ११ नुसार वरील चारही शिक्षक नियम व अटी मान्य असल्याबाबत कळवित असून सेवा वर्ग करण्याबाबत मान्यता देण्याचे अधिकार हे आयुक्त,महानगरपालिका यांना आहे. तसेच संबंधीतांच्या प्रस्तावामध्ये याबाबत स्व घोषणा पत्र आहे.

उक्त परिशिष्ठ १ मधील अ.नं.१ ते ३ शिक्षकांनी ५ व्या रकान्यात नमूद ठिकाणातील शिक्षण विभाग त्यांच्या आस्थापनेवर समावून घेण्यास तयार असल्याच्या अटीवर नाहरकत प्रमाणपत्र देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

मात्र १) सदर शिक्षकांना ज्या ठिकाणी बदली हवी आहे त्या आस्थापनाकडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे लागेल. २) बदल ठिकाणचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यावर महानगरपालिका शिक्षण मंडळ,जळगांव या आस्थापनेवरील त्या वेळी पवीत्र पोर्टल मार्फत उपलब्ध शिक्षक संख्या, कार्यरत शिक्षक संख्या, रिक्त / जादा शिक्षक संख्या यांची संख्यात्मक तुलना करुनच तसेच विदयार्थ्यांचे कोणत्याही प्रकारचे शैक्षणिक नुकसान होणार नाही ही बाब प्राधान्याने लक्षात घेता कार्यमुक्त करणेसंबंधी आयुक्त,म.न.पा.जळगांव यांची मान्यता घेणे बंधनकारक राहिल. मान्यता मिळाल्यानंतर कार्यमुक्ती संबंधी कार्यवाही करण्यात येईल. ३) सध्या संबंधीत शिक्षकांना बदली ठिकाणाचे ना हरकत प्रमाणपत्र मिळत नाही व या आस्थापनेवरुन आयुक्त,म.न.पा.जळगांव कार्यमुक्त करीत नाही तो पर्यंत संबंधीत शिक्षक याच आस्थापनेवर कार्यरत राहतील. त्यामुळे वरील कालावधीत विदयार्थ्यांचे कोणतेही प्रकारचे शैक्षणिक नुकसान होणार नाही.

उपरोक्त प्रमाणे कार्यवाही झाल्यानंतर सदर शिक्षकांना आंतरजिल्हा बदलीसाठी ना हरकत प्रमाणपत्र देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार आयुक्त साहेब ज्यावेळी ना-हरकत प्रमाणपत्र देतील त्यावेळी त्यांनी सभागृहाला सगळी परिस्थिती अवगत करुन दयावी. कुठले शिक्षक आले आणि कुठले शिक्षक बदली होवून गेले याची सभागृहाला माहिती दयावी. याठिकाणी शिक्षक असल्यावरच त्यांनी बदली होवून जाणाऱ्या शिक्षकांना ना-हरकत प्रमाणपत्र दयावे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं.७:-** महासभा ठराव क्र.३२२ दि.१६/१२/२०२० अन्वये सदरचा प्रस्ताव तहकूब करण्यात आलेला होता त्यानुसार जळगांव शहर महानगरपालिकेतील डॉ.सौ.हेमलता नेवे,न्यायालयीन रोजंदारी मानधन तत्वावर कार्यरत वैदयकीय अधिकारी यांचे मानधनात वाढ करणेबाबत प्रशासनाकडुन स्वयंस्पष्ट परिपूर्ण आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** फक्त डॉ.सौ.हेमलता नेवे यांना येथे प्रस्तावीत केलेले आहे की, मानधन द्यायचे संदर्भात, परंतु विषय क्र.१६ मध्ये अजुन काही एम.बी.बी.एस. डॉक्टर्स आहे. बी.ए.एम.एस. डॉक्टर्स, त्यांना मानधन आपण देत आहोत रु.३४,७२२/- कुठेतरी ते डिस्क्रीमीनेशन होईल की, त्या सेम कॅटेग्रीमध्ये असलेल्या डॉक्टर्स यांना २१,००० प्रस्तावीत केलेले आहे. या संदर्भात मी डॉ.रावलाणी कडुन माहिती घेतली. तर त्यांचे म्हणणे होते की, साधारणता २ वर्षापुर्वी हा प्रस्ताव पुटअप केलेला होता. जे मानधन आपण इतर डॉक्टरांना देत आहोत त्यांना ही तेच मानधन देण्यात यावे.

**मा.आयुक्त :-** विषय फक्त स्पष्ट नाही. मागच्या वेळेस पण आपण महासभेत या विषयाची चर्चा केली आणि हा विषय तहकुब केला होता. त्या वेळेस पण याच मुद्दयावर चर्चा झाली होती की, यांना मानधन किती देण्यात येईल. आणि याच्या बाबतीमध्ये काही स्पष्ट प्रस्ताव ठेवता येईल का ? वैद्यकीय अधिकारी यांनी अन्य व वैद्यकीय अधिकारी यांना किती मानधन दिले जाते ते कंत्राटी तत्वावर आहे. ज्या मानधनासाठी या नेवेंची शिफारीस केलेली आहे. परंतु घेतलेल्या कोणत्याही योजनेमध्ये नाही ना RCH योजनेमध्ये ना इतर योजनेमध्ये हे काम करतात. यांना पुढे आपल्याला पिंप्राळेच्या हेडपोस्ट वरती आपण महानगरपालिकेच्या स्वत:च्या विलगीकरणामुळे आपण त्यांची नियुक्ती केलेली असल्यामुळे वेळोवेळी त्याच जे मानधन महासभा ठरवत आलेली आहे. याला शासनाचे कुठलेही निकष नाही. सुरुवातीला रु.३०००/- मानधन दिल जात होत. त्यानंतर रु.५०००/- मानधन दिल जात होत. नंतर रु.६०००/- च सन २०१३ पासुन यांना रु.१०,०००/- मानधन दिल जात आहे. तर महानगरपालिकेने रेग्युलर स्टॅबलिशमेंट व्यतिरिक्त अतिरिक्त अस्थापना वरील नेमलेली जी मानधनावरचे डॉक्टर्स आहेत. यांचे मानधन वाढविण्याचे शासनाचे कोणतेही स्पष्ट निकष नाही. त्यामुळे यापुर्वी सुध्दा जसे वेळोवेळेला महासभेने ठरविलेले आहे. त्याच प्रमाणे महासभेने धोरणात्मक निर्णय घ्यावा. अश्या प्रकारचा जो आपला प्रस्ताव होता. मागच्या वेळेला महासभेत सन्मा.सदस्यांनी याच विषयावर चर्चा केली होती की, याला जर शासनाची निकष नसतील तर महासभेने मानधन ठरवायचे. जसे यापुर्वी महासभेमध्ये एक ठोक रक्कम लमसम मानधन ठरविलेली आहे. तसेच आपल्याला ठरवाव लागेल. शासनाच्या योजनेमध्ये हे जी काही वैद्यकीय अधिकारी आहे. त्यांना किती मानधन द्यावे किंवा कंत्राटी पध्दतीवर पगार द्यावे. या विषयी शासनाचे वेळोवेळी आपल्याला सुचना प्राप्त होतात. त्यामुळे RCH मध्ये पुर्वी काम करणारे वैद्यकीय अधिकारी असतील किंवा NUHM मध्ये काम करणारे वैद्यकीय अधिकारी असतील. त्याला शासनाचे धोरण आपण देतो. आपल्या अस्थापनावरील कायम सेवेमध्ये असणारे वैद्यकीय अधिकारी आहे त्यांना शासनाच्या ६ व्या वेतन आयोगाप्रमाणे रेग्युलर वेतनश्रेणी प्रमाणे आपण वेतन देतो. परंतु हे ना शासनाच्या कुठल्या योजनेमध्ये आहे ना महानगरपालिकेचे अस्थापना वरील कायम कर्मचारी आहे. त्यावेळेला पिंप्राळयामध्ये आपण हेडपोस्ट चालु केल, मला वाटत तात्पुरती व्यवस्था म्हणुन हे नेमलेले वैद्यकीय अधिकारी आहे. आणि यांच्या मानधनाच्या बाबतीमध्ये आपल्याला महासभेमध्ये त्याच धोरण ठरवावे लागेल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्तावीत केलेले रु.२१,०००/- त्याच प्रमाणे इतर बी.ए.एम.एस. डॉक्टर्स जे आहे. ते NUHM मधील असतील त्यांना जास्तीत जास्त आपण रु.३४,०००/- देतो. आज आपण बघतो की, एका समकक्ष असलेल्या समकक्ष शिक्षण प्राप्त केलेल्या व्यक्तीला वेगवेगळया प्रकारचे वेतनाचे लाभ दिले. तर तेथे कुठेतरी मनामध्ये एक अन्यायाची भावना निर्माण होते.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** किमान वेतन पण नाही ते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपण साधारणता, आपल्या अस्थापनाच्या मजुराला सुध्दा जास्त पगार देतो. आणि रु.१०,०००/- च्या मानधनामध्ये, ऐवढया मानधनामध्ये आज घरकाम करणारी कामवाली बाई सुध्दा घेत नाही. आणि आपण बघत आहोत की, आता पर्यंत रु.१००००/- मानधन देत आलेलो होतो. तो निश्चितपणे खुप कालावधीपासुन त्यांच्यावर अन्याय होत होतो. तर त्या अनुषंगाने इतर बी.ए.एम.एस. डॉक्टरांना जो वेतन अदा करतो आपण रु.३४,७२२/- त्याच पध्दतीने यांना सुध्दा तेवढेच वेतन देण्यात यावे. तशी आपण या ठरावाबाबत विनंती करतो आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई, रु.३४,५००/- आता त्यांना जे देतो आहे आपण आता विषय क्र.१६ मध्ये आपण ५% वाढीचा प्रस्ताव आणलेला आहे. तर खरोखर ही खेदजनक बाब आहे. एका महिला डॉक्टरला आपण जे

सेवाभावी काम करतात आणि सगळे लोकं ते सारखेच काम करतात त्यांना आपण रु.१०,०००/- मानधन देत आहे. स्वच्छता कर्मचारीला सुध्दा यापेक्षा जास्त पगार आहे. जो ५% वाढीचा प्रस्ताव जो आपला आज इतर डॉक्टरांसाठी मंजुर होणार आहे. त्यानुसार ती जी वाढीव आकडा येईल. त्यानुसारच डॉ.हेमलता नेवेंना सुध्दा मानधन द्याव असे मी विनंती करते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात येत आहे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय मंजुर करण्यात यावे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.६३३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, डॉ.सौ.हेमलता जयंत नेवे या मानधन तत्वावर १९९९ पासून दवाखाने विभागात वैदयकीय अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांना मनपातर्फे उपस्थितीनुसार दरमहा रु.१०,०००/- इतके मानधन दिले जाते.

डॉ.सौ.हेमलता नेवे यांचे मानधन वाढ होणेबाबत अर्ज प्राप्त झाले होते त्यानुसार प्रस्तावासह डॉकेट महासभेपूढे पाठविण्यात आले असता मा.महासभा ठराव क्र.३२२ दि.१६/१२/२०२० अन्वये डॉ.सौ.हेमलता नेवे यांना शासन निर्णयाप्रमाणे दरमहा किती मानधन देता येईल याबाबत प्रमुख वैदयकीय अधिकारी यांचा स्वयंस्पष्ट अभिप्राय सादर करणेबाबत प्रस्ताव तहकुब ठेवण्यात आला होता.

प्रमुख वैदयकीय अधिकारी,म.न.पा.जळगांव यांनी त्यांचे दि.२०/०१/२०२० रोजीच्या अभिप्रायात नमूद केले आहे की, जळगांव शहर महानगरपालिका अंतर्गत आर.सी.एच.वैदयकीय अधिकारी यांना सदयस्थितीत साधारणत: रु.३१,०००/- मात्र इतके वेतन (मानधन) दरमहा देण्यात येते.

डॉ.सौ.हेमलता जयंत नेवे यांचे मा.उच्च न्यायालयात कोणताही दावा प्रलंबित नाही. त्यांनी यापुर्वी मा.उच्च न्यायालयात दाखल केलेले रिट पि.नं.८१९९/२०१४ ला दाखल केलेली याचिका मा.उच्च न्यायालयाने दि.०४/०१/२०१८ ला फेटाळून लावलेली आहे. मे.न्यायालयाचे आदेशान्वये त्यांना रु.१०,०००/- मानधन देण्यात येत आहे.

प्रमुख वैदयकीय अधिकारी यांच्या दि.२९/०१/२०२१ रोजीच्या अभिप्रायामध्ये डॉ.सौ.हेमलता नेवे यांनी सन १९९९ पासुन दिलेली सेवा लक्षात घेता रु.१०,०००/- मात्र इतके मिळणारे मानधन अत्यल्प असल्याने साधारणत: रक्कम रु.३१,०००/- मात्र इतके दरमहा मानधन देणेबाबत नमूद केलेले आहे मात्र महानगरपालिका अंतर्गत आर.सी.एच फेज २ अंतर्गत कार्यरत वैदयकीय अधिकारी यांना सदयस्थितीत रु.३३०६९/- इतके मानधन देण्यात येत असून त्यांना सभागृहातील सुचनेनूसार याच सभेतील विषय क्र.१६ मध्ये ५% वाढीव मानधन देवून एकूण रक्कम रु.३४,७२२/- मानधन देणेबाबत प्रशासनाने प्रस्तावित केलेले असल्याने डॉ.सौ.हेमलता नेवे यांना सुध्दा त्याप्रमाणेच दरमहा रक्कम रु.३४,७२२/- इतके मानधन देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं.८:-** भुसंपादन प्रस्ताव क्र.१८७/२०१७ जळगांव भुसावळ ४ थ्या रेल्वे मार्गासाठी संपादन मौजे जळगांव शहर येथील जमीन भुसंपादनासाठी म.प्रा व न.र अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव शासनास सादर करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** ज्या प्रमाणे रेल्वेला आपला रस्ता द्यायचा आहे. द्यायला हरकत नाही आपण ३७ चा प्रस्ताव करत आहे. पण आजच्या ठरावामध्ये काही गोष्टी नमुद झाल्या पाहिजे की, आपण जेव्हा रेल्वेकडे काही मागणी करतो किंवा रेल्वेला आपण काही प्रभाग समितीतुन बोगदा करायला म्हणतो रेल्वे आपल्याला किंवा पादचारी पुलचा प्रस्ताव मागे टाकला होता तहसील कचेरी कडुन शिवाजी नगर कडे, कारण शिवाजीनगर पुलाचे काम सुरु आहे. त्यावेळेस ते आपल्याला डिमांड लिहुन देतात की, इतके इतके पैसे भरा. तर माझा स्वयं:स्पष्ट मत आहे की, याच्या बदल्यात भुसंपादनाचे पैसे घ्यावे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही नाही विशाल जी, आपण ठराव तसाच केलेला आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** पैसे घ्यावे किंवा त्याच्या बदल्यात आपल्याला एखादे काम करुन घ्यावे. पिण्याची पाईप लाईन सुध्दा टाकु देत नाही, ड्रेनेजची सुध्दा पाईप लाईन टाकु देत नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपण केंद्र शासनाला सहकार्य करत आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौर ताई.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** सहकार्य आहे पण शहराच्या विकासासाठी आमची मागणी आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौर ताई. Unified development control and Protection Act नुसार आदी मोबदला घ्या मोबदला डिसमीस झाल्यानंतर जागेचा ताबा द्या. हा नियमच आहे. जो नितीन भाऊंनी सुध्दा मांडलेला आहे. विशाल भाऊंनी तिच मागणी केलेली आहे. मी पुनश्च तीच मागणी करणार की, आधी मोबदला घ्यावा. आणि त्यानंतर जागेचा ताबा द्यावा. निश्चितच हे लोकपुर्ण कामे होणार आहे, अडविण्याचे काहीच कारण नाही पण मोबदला आधी रिसिव्ह करावा.

**मा.आयुक्त :-** हा विषय आपण थोडासा समजुन घेणे गरजेचे आहे. हा विषय रेल्वेला महानगरपालिकेची जागा हस्तांतरण करणेचा नाही. हा आहे रेल्वेट्रॅकसाठी जी जागा भविष्यामध्ये महानगरपालिकेला हस्तांतरीत करावी लागेल.त्यासाठी आताचा जो आपला रस्ता आहे. त्या रस्त्यापैकी काही पोर्शनचा २ मिटरचा रुंदीकरण करणेसाठी आपण आपल्या विकास योजनेमध्ये जो किरकोळ फेरबदल करतो आहे. त्याच्या संदर्भातला हा अंतिम प्रस्ताव आहे. कलम ३७ खालचा. आपण यापुर्वी महासभेत ठराव केलेला आहे. त्याला तत्वता मान्यता या महासभेने दिलेली आहे. आता ज्या सुचना आपण मागविलेल्या आहे. आज आपण कलम ३७ खाली आपला अंतिम ठराव करुन राज्य शासनाला पाठविणार आहोत. राज्य शासनाने याला अंतिम मान्यता दिल्यानंतर या विकास योजनेमध्ये फेरबदल होईल आणि तो फेरबदल झाल्यानंतर रितसर महासभेच्या मान्यतेने जी काही लॅण्ड ॲक्वीसीएशनची कॉस्ट होईल सरकारी दराप्रमाणे ती आपण भरुन घेऊनच महासभेच्या मान्यतेनंतरच महानगरपालिकेच्या मालकीची जागा आपण रेल्वेला देणार आहोत. आज जागा देण्याचा किंवा मोफत किंवा त्याची किंमत घ्यायचा विषय नाही. आता पर्यंत आपण फक्त किरकोळ फेरबदलाला मान्यता देतो आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** तुम्ही असे बरोबर घुमावुन फिरुन सांगातात.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही अप्पा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात येत आहे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६३४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मंजुर विकास योजना जळगांव जुनी हद्दी अंतर्गत मौजे जळगांव स.नं.४९० पैकी व स.नं.४९१ या जमिनीतुन १८.०० मी रुंद विकास योजना रस्ता प्रस्तावित असुन रेल्वे विभागाने ४ थ्या रेल्वे मार्गासाठी जागा मागणीचा प्रस्ताव सादर केला होता, रेल्वे विभागास आवश्यक असलेली जागा १८.०० मी रुंद विकास योजना रस्त्यातील असल्याने विकास योजना रस्त्याची रुंदी २.०० मीटर ने कमी होऊन १६.०० मीटर उपलब्ध होईल. या अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना व

नियोजन अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल कार्यवाही करणेसाठी प्रस्ताव शासनास सादर करणे बाबत मा.महासभेने ठराव क्र.४६२ दि.१२/०५/२०२१ अन्वये मान्यता दिलेली आहे.

मा.महासभा ठराव क्र.४६२ दि.१२/०५/२०२१ च्या पारीत ठरावा नुसार म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल बाबत ची जाहीर सुचना दै.लोकमत व दै.दिव्यमराठी या वृत्तपत्रात दि.२९/०६/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली असुन सदरची जाहिर सुचना शासन राजपत्र दि.१५-२१ जुलै २०२१ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

वरील प्रमाणे जाहिर सुचना शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याचे दिनांका पासुन ३० दिवसाचे विहीत कालावधीत कुठल्याही प्रकारची हरकत/सुचना या कार्यालयाकडे प्राप्त झालेली नाही.

उपरोक्त प्रमाणे कलम ३७ च्या फेरबदलानुसार २.०० मी रुंदचीचे पट्टी वजा क्षेत्र रेल्वेकडे ४ थ्या रेल्वे मार्गासाठी मोबदल्यासह हस्तांतरीत होणार आहे. सदरचा प्रस्ताव सार्वजनिक हिताचा असल्याने व सदर फेरबदलामुळे १८.०० मी रुंद रस्ता अंदाजे २००.०० मीटर लांबी पर्यंत १६.०० मी रुंद रस्ता उपलब्ध होणार आहे, या प्रस्तावामुळे सार्वजनिक वाहतुकीस अडथडा होण्याची शक्यता नाही. वर नमुद केल्या प्रमाणे कलम ३७ अंतर्गतची वैधानिक कार्यवाही पुर्ण करण्यात आलेली असल्याने १८.०० मी रुंद विकास योजना रस्त्यातील रुंदी २.०० मीटर ने कमी होऊन १६.०० मीटर रुंद विकास योजना रस्त्यासाठी म.प्रा. व न.र अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल बाबत शासनाकडे अंतिमत: प्रस्ताव सादर करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. मात्र प्रशासनाने रेल्वे विभागाला सदर जागा हस्तांतरण करणे पूर्वी सदर भूसंपादीत जागेचा मोबदला घेवून त्यानंतरच रेल्वे विभागाला सदर जागेचा ताबा देण्यात यावा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं.९:-** जळगांव शहर महानगरपालिकेचे भाडेपट्टा मुदत न संपलेले व्यापारी संकुलातील गाळयांचे गाळे हस्तांतरण (नाव बदल) शुल्क ठरविणेचे धोरण निश्चित करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा. फक्त याच्या मध्ये एक सुचना आहे की, याच्या मध्ये वारसाहक्क हस्तांतरण फी शासनाने रु.२५०००/- प्रस्तावीत केलेली आहे. आपण म्हणतो की, राज्य शासनाने जी काही आपली इमारती किंवा मिळकती असतील. कोणाच्या वडीलांचे मृत्यु झाल्यानंतर वारसाहक्काने त्याही मोफत नोंदविले जातात.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** आता ३% आहे भाऊ.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही नाही, वारसहक्काला नाही.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** वारस हक्काले ३% आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही नाही. काही तरी परसेंटेज घेतात ३ ते ४ टक्के घेतात.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपण रु.२५०००/- वारसाहक्काला, यापुर्वी सुध्दा सुरुवातीला जो धोरण ठरलेला होता. ज्या वेळेला गाळयांचा विकास झालेला होता. त्यावेळेला वारसदारांना विनामुल्य हस्तांतरण करणे संदर्भातली आपली भुमिका होती. मला वाटत तीच भुमिका कायमस्वरुपी करावी.बाकीचे जी प्रशासनाने हस्तांतरणाचे दर ठरविलेले आहे त्यांना मान्यता देण्यात येत आहे.

**मा.आयुक्त :-** मला वाटत आपण जेव्हा वारसहक्क म्हणतो त्यावेळेला जी वडीलोपार्जित प्रॉपर्टी आहे. स्वत:च्या नावावर आहे. अश्या प्रकारची प्रॉपर्टी जर वारसहक्काने ट्रान्सफर करायला सांगितली तर त्याला कुठल्याही प्रकारची फि नाही. जी काही रजिष्ट्रेशन फि स्टॅम्प ड्युटी लागत असेल ठिक आहे. आता आपल्या याच्यामध्ये जेव्हा आपण नविन व्यक्तीबरोबर करार करु. त्यावेळेला रितसर स्टॅम्प ड्युटी लागणार आहे. परंतु महानगरपालिकेच्या मालकीचा गाळा हा तसे वारसहक्का तश्या अर्थाने त्याला वारसाहक्क प्राप्त होत नाही. कारण आपण जो गाळा दिलेला आहे त्या व्यक्तीला दिलेला आहे. तर त्यामुळे एका व्यक्तीकडुन त्याच्या पत्नी असेल, मुलगा असेल, मुलगी असेल असे त्यांच्या वारसांना ट्रान्सफर करायच असेल तर मला वाटतं, तो त्याचा हक्क म्हणता येणार नाही. तर तो त्याला हक्क म्हणुन द्यायचा असेल. तर काही तरी फी घेणे योग्य राहील. जरी ती रु.२५०००/- असेल किंवा त्यापेक्षा कमी करायची असेल सभागृहाला हा धोरणाचा विषय आहे. याकरीता काही वेगळा नियम नाही. परंतु पुर्ण मोफत करणेपेक्षा काही तरी फी घेणे योग्य होईल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** परंतु यापुर्वी ज्या वेळेला गाळे हस्तांतरण केले ना. त्या वेळेचा धोरण ठरविलेला आहे. मुळ धोरण जो आहे हस्तांतरणची प्रक्रियेसाठी त्यावेळेच्या करारनाम्यामध्ये आपण बघा. वारसाहक्काचे जी आहे ते मोफत आहे. आणि नंतरच्या याला आपण फी म्हणुन आकारणी करण्यात आलेली आहे. म्हणुन जो मुळ धोरण आहे त्या मुळधोरणाला छेद जाता कामानये. हाच आमचा हेतु आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौर महोदया, २५००० रुपया सुध्दा आपण घेवु नये त्यांच्याकडुन ते कराव नाही तर अत्यंत आपल्याला कमी ठेवायचे असेल तर नॅमिनल चार्जेस रु.१०००/- , रु.५००/- फार कमी ठेवावे. वारसहक्काच ॲटलिस्ट वेगळं कराव ही विनंती. त्याच पध्दतीने मला सांगा, आपण लो लेव्हल आणि तळ मजल्यासाठी १५% आणि पहिला, दुसरा, तिसरा आणि चौथा मजल्यासाठी १०% म्हटलेले आहे. तर ते आपल्याला हे स्लॅट केले पाहिजे. पहिला, दुसरा, तिसरा, चौथा या प्रत्येक मजल्यासाठी आपण १०% सरसकट अमाऊंट ठरवुन टाकलेली आहे. त्याचे सुध्दा आपण स्लॅट केले पाहिजे. १०,८,६,५ अश्या पध्दतीने ते असले पाहिजे. भुखंडाचा वॅल्युवेशन सुध्दा आपण मजलावाईस दिल की कमी होत जातो. तर तो बेनिफीट येथे मिळाले पाहिजे. होत काय आहे. हा विषय आहे गाळे हस्तांतरण धोरण ठरवायचा. गाळे हस्तांतरणाच धोरण जर चांगल ठरल नाही तर पुन्हा होणार काय याचे ईम्पलीमेंटेशनच होणार नाही. मुळात आपण शासन दरबारी तेव्हा. जेव्हा खरेदी विक्रीचा व्यापार करतो. तर मार्केट वॅल्युच्या आपण ५% स्टॅम्प ड्युटी देतो. आणि ते महापालिकेत फ्री असतो. आणि आपण त्यांना १५%, १०% आपण लावत आहोत. म्हणजे त्याचे दुप्पट आपण करत आहोत. अस जर झाल तर पुन्हा काय होणार की, लोक रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरावरच ते ट्रान्सफर करुन घेणार. आपल्याकडे हस्तांतरण शुल्क भरुन हस्तांतरण करण्यासाठी कोणी येणारच नाही. ते येथे खुप आवश्यक आहे.

**मा.आयुक्त :-** शुचिता मॅडम, तस नाही. शासनामध्ये जी काही स्टॅम्प ड्युटी आणि त्याला असणारी रजिष्ट्रेशन फी ह्या दोन गोष्टी वेगळया आहेत. शासन ज्या वेळेला स्वत:ची प्रॉपर्टी, ज्याला वर्ग-२ च्या जमीनी आपण म्हणतो. गट ब चा सत्ता प्रकार, अश्या जमीनी हस्तांतरण करत असतांना त्याच्या आताच्या वार्षिक भाडे मुल्याच्या २५% काही ठिकाणी ५०% ची आकारणी केली जाते. त्याला आपण नजराना म्हणतो, ही नजराना रक्कम जिल्हाधिकाऱ्याकडे भरल्यानंतर हस्तांतरणाला परवानगी मिळते. आणि प्रत्यक्ष हस्तांतरणाचे दस्तऐवज जेव्हा आपण नोंदणी करतो. त्या वेळेला आपण म्हणता त्याप्रमाणे फी भरली जाते. ही फी कुठल्याही प्रकारच दस्त हा रजिष्ट्रार आफिसमध्ये रजिष्ट्रेशन करत असतांना भरावा लागणार आहे. हे जे काही आपण बिल बनवत आहे १०%, १५% ही भरल्यानंतर तुम्हाला ५% आणि १% माफ आहे अश्यातला भाग नाही. ती तर रजिष्ट्रेशनची फी आहे. त्याचा डॉक्युमेटशी कायदेशीर संबंधच आला नाही. आपण जी हस्तांतरीत करतो, आपल्या मालकीचा जो गाळा आहे.त्याला ते आपल्याला नियमाप्रमाणे परत करणे गरजेचे आहे. तो परत न करता आपण उर्वरित मुदतीसाठी त्याच्या संमतीने आपण दुसऱ्याला द्यायची आपण त्याला अधिकार देतो आहे. त्यामुळे आपण ही जी फी आकारतो आहे. ती फी शासनाच्या धोरणाने सुध्दा सुसंगत आहे. त्याप्रमाणे शासनाची कमी असेल जास्त असेल. आपली महासभा ही आपल्या मिळकतीच्या हस्तांतरणाला धोरण ठरवायला सक्षम आहे. म्हणुन आपण याच्यामध्ये म्हणतो आहे. म्हणजे लो लेव्हल आणि तळ मजला या दोघीसाठी १५% आणि उर्वरित सगळयांसाठी आपण १०% म्हटलेल आहे. आपण जो मुद्दा मांडलेला आहे तो एक हाताने बरोबर

आहे की, जसे मजल्याची संख्या वाढते जसे दुसरा, तिसरा, तसे त्या गाळयांची किमत जर कमी जास्त नाही झाली तरी त्याचा मार्केट पोटेनशियल कमी होत नाही. ही वस्तुस्थिती आहे किंवा अश्या वेळेला जेव्हा मार्केट पोटेन्शीयल कमी आहे. पहिल्या मजल्यापेक्षा दुसऱ्या मजल्यावर व्यवसाय कमी चालतो, दुसऱ्यामजल्यावरील पेक्षा दुसऱ्या ते तिसऱ्या मजल्यावर व्यवसाय कमी चालतो. ही वस्तुस्थिती आहे. याला अजुन आपण १०% मध्ये काही कमी करायला हरकत नाही. परंतु सर्व साधारणपणे जे धोरण बघितल. तर फार बदल करण्याची काही आवश्यकता वाटत नाही.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** नॅमिनल फरक तरी असल पाहिजे. जसा जसा मजला बदलतो आहे तसा तसा त्याचा एक स्लॅट पाडण्यात यावा. आणि दुसरा एक मुद्दयाकडे आपल लक्ष वेधु ईच्छिते, त्यात आता याच्या पुढचे धोरण कस असणार आहे. ज्या गाळयांचे ऑलरेडी ३-४ वेळा ट्रान्सफर होऊन गेलेले आहे. म्हणजे महापालिकेचा मुळ गाळा होता. तो मुळ मालक म्हणुन मी घेतला, माझ्याकडुन रु.१००/- च्या स्टॅम्पवर मी दिपाताईला देऊन टाकला. दिपाताई कडुन तो मामींनी घेतला, रु.१००/- च्या स्टॅम्पवर झालं. आता मामींना तो हस्तांतरीत करायचा आहे. अश्या वेळेस आपण त्याच कस धोरण ठरविणार आहे. हा एक महत्वाचा मुद्दा आहे. त्यात अजुन एक उपप्रश्न माझा असा आहे. आपण हे आता कसे सांगणार की, मुळ मालक जो आहे त्याच्याकडुनच आता जो चौथा मालक असणार आहे त्याच्याकडे हस्तांतरण दाखवु या. पण जर मुळ मालक हयातच नसेल. मुळ मालक मी होती. मी जर हयातच नाही.समजा आता आज मामींच्या ताब्यात आहे तर यांनी काय करायचे. या संदर्भातल सुध्दा धोरण ठरविणे आवश्यक आहे. या बद्दल कुठेच काहीही नमुद केलेले नाही. तर माझ्या या दोन तीन मागण्या आहेत महापौरताई. एक म्हणजे १५% रक्कम सुध्दा जास्त वाटते. नियमानुसार त्यात अजुन काय कमी होऊ शकतो. प्रशासनाने ते सांगाव सभागृहाला, ते कमी कराव आणि पहिला, दुसरा, तिसरा, चौथा माळयांनुसार त्याचा उपयोगिता मुल्य त्याच्यामध्ये जे काही सोईस्कर पडते त्याच्यामध्ये स्लॅट पाडुन घ्यावे. वारसाहक्काने जे आहे ते पेड कराव. मुळ मालक याच्याकडे जर आज गाळा नसेल तर त्याचे रु.१००/- च्या स्टॅम्पवर हस्तांतरण झालेले असतील. त्या संदर्भातील पॉलिसी मुळ मालक हयात नसतील तर त्या संदर्भातील पॉलिसी या बद्दल सुध्दा स्पेसिफीक या सगळया धोरणामध्ये आजच ते ठरवुन घ्याव.

**मा.आयुक्त :-** आजचे जी काही गाळे वापरणारे आहेत आपण मालक म्हणतो ज्यांना, तो कदाचित दुसरा असेल तिसरा असेल, पण प्रत्येक ट्रान्सफरला जी फी भरणे आवश्यक आहे. तरी परंतु अश्या ज्या वेळेस मल्टीपल ट्रान्सफर झालेले असतील. अश्या बाबतीत राज्य शासनाच त्यांच्या मालकीच्या हस्तांतरण ज्या वेळेला अनेक वेळा होत असतो त्यावेळेला होत. त्यावेळेला प्रत्येक वेळेला कश्या प्रकारे रक्कम आकारणी झाली, हे धोरण, त्याच धोरण मागणी करायला हरकत नाही. आम्ही तशी महसुल कार्यालयाकडुन माहिती घेवु. आणि आवश्यकतेप्रमाणे आपण महासभेला माहिती देवु. दुसरं, पहिल्या मजल्याच्या वरच्या मजल्यावर आपण जी काही सवलत द्यायची म्हणतो. आता सभागृहाने कळवावे. मला व्यक्तीश: असे वाटते की, १-१ टक्के त्याच्या मध्ये कमी करायला फारशी अडचण नाही.

**मा.आयुक्त :-** मुल्यांकन जरी कमी झाल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** जसे पहिल्या ते चौथ्या मजल्यापर्यंत १५% जात आहे.

**मा.आयुक्त :-** परंतु आपण ज्या वेळेला आपण तळ मजला आणि लोवर बेसमेंट याला आपण १५% ज्या ऐवजी १०% करतो आहे ना. म्हणजे आपण ही दोन मजल्यांमध्ये डिफ्रंशियेट केलेले आहेच. जर ग्राऊंड फ्लोअर आणि फस्ट फ्लोअरमध्ये डिफरंशियेट होत असेल. तर फस्ट आणि सेकंड मध्ये का होणार नाही. होऊ शकेल. परंतु किती करायच त्याच्यामध्ये फार सवलत द्यायची काही गरज नाही. कारण जसे मजला प्रमाणे आपण वरच्या मजल्यावर जाऊ. मजल्याप्रमाणे त्याच रेडीरेकनर प्रमाणे जे वॅल्युवेशन आहे. ते ऑलरेडी याच्यामध्ये कमी होत. त्यांना ऑलरेडी त्याच्यामध्ये रिबीट दिला जातो. फार कमी करण्याची आवश्यकता नाही.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** जरी रेडीरेकनर प्रमाणे आहे तरी त्याचे स्लॅट वाटुन द्यावे, मजल्याप्रमाणे स्लॅट असावे. आणि वारसाहक्काच वेगळ कराव.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आणि आता आपण म्हणतात की, शासनाचे जे काही धोरण असेल. परंतु त्या धोरणाला अनुसरुन जर विचार केला. आणि ट्रान्सफर फीची रक्कम ही खुप मोठया प्रमाणावर जात असेल तर पुन्हा त्याला प्रतिसाद मिळणार नाही. पुन्हा नागरीक तश्याच पध्दतीने म्युचवल अंडरस्टॅन्डींगनेच ते व्यवहार दाखवतील आणि महानगरपालिका आपल्या या कृत्याला भोगतील हे जे काही यांनी केलेल आहे. जितका वेळ याच्यामध्ये गेलेला आहे.

याला गाळेधारक जबाबदार आहे अश्यातला भाग नाही. कारण ७,८,१० वर्षापासुन धोरणच ठरविलेले नाही. जी धोरण ठरविलेले गेले होते तो राज्य शासनाकडे विखंडनाला पाठविला गेला. अजुन तो राज्य शासनाकडे विखंडीत केला गेलेला नाही. याच्यामुळे महानगरपालिकेचा आर्थिक नुकसान होत आहे. धोरण हे लवचिक असायला पाहिजे. सर्वसामान्यांना परवडेल अश्या पध्दतीचे धोरण असायला पाहिजे. जेणे करुन लोकं टॅक्स द्यायला उत्सुक व्हायला पाहिजे. टॅक्सचा इशु जर हे केव्हाही टोकाला जाऊन जर ठरविला. नागरीकांची मानसिकता टॅक्स देण्याच्या बाबतीकडुन चोरीकडे वळते. आणि चोरी करण्याच्या दृष्टीकोणातुन त्याच्यामध्ये जर काही फलेक्झीबीलीटी जर असेल, वाढ तर निश्चितपणे ते स्विकारल जाऊ शकतो. तर या सर्व गोष्टींचा विचार करुन एकापेक्षा जास्त हस्तांतरण झालेल्या गाळयांच्या संदर्भात एक योग्य असा धोरणात्मक प्रस्ताव आपण सभागृहासमोर ठेवावा. आता तुर्त या प्रस्तावाला मान्यता देण्यात येत आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदया, विषयाला धरुनच बोलतो मी, जळगांव शहरातील जे घरकुल धारक आहे. त्यांना ज्या घरकुल धारकांना घर दिलेले आहे. आता तेथे अमृतचे कनेक्शन टाकलेली आहे. त्या लोकांना तेथे कनेक्शन घ्यायला अडचण होत आहे. त्यांना पण हेच नियम लागु होतो हस्तांतरणाचा. त्यांचा पण हस्तांतरणाचा विषय करावा. माझे असे म्हणणे पडतात. कारण त्या लोकांचे असेच रु.१००/- च्या स्टॅम्पवर चार-चार पाच-पाच मालक झालेले आहे. त्यांना ते ताबा दिला गेल्याने त्यांना घरपट्टी तितकीच आखलेली आहे. त्याचे नियोजन आखुन त्यांना पुर्तता करावी. ही माझी सुचना आहे विषयाला धरुन घरकुल धारकांकडुन, ज्या वेळेला ते अमृतचे कनेक्शन घ्यायला जातील, तर त्यांचे थकबाकी असल्यामुळे तुम्ही कनेक्शन देत नाही. जळगांव शहराचे सर्व घरकुल धारकांचा असा प्रश्न आहे.

**श्री.सुरेश सोनवणे :-** महापौरताई, जी बढती झालेली आहे. पिंप्राळा घरकुल, गेंदालाल मिल, समता नगर, तांबापुर, शिवाजी नगर, या परिसरामध्ये स्लम वस्तीच एरिया असल्यामुळे ते भाग कट करुन त्या लोकांजवळ पैश्यांचा प्रॉब्लम आहे. तर माझे असे म्हणणे आहे की, त्या लोकांना आपल्या क्रायटेरीया मधुन काही तरी सोल्युशन काढुन त्यांना नळ जोडणी देण्यात यावी. जेणे करुन ते काम प्रलंबीत होईल.

**मा.आयुक्त :-** या वरती असे धोरण आपल्याला लावता येणार नाही. परंतु घरकुलांचे हस्तांतरणाचे, पंरतु घरकुल मध्ये आपल्याला आता जी नविन नळ कनेक्शन द्यायची आहे. याच्या बद्दलच आपण स्वतंत्र धोरण ठरविणार आहोत. आता आपण त्याच्यामध्ये जी अधिकृत कनेक्शन धारक आहे. यांना नविन नळ कनेक्शन आपण महापालिकेच्या खर्चावर शिफ्ट करुन देत आहोत. जी स्लम मधले धारक आहे. त्यांना जर नविन कनेक्शन घ्यायच असेल अमृत योजनेच, तर आपण त्यांना महासभेने जो धोरण ठरविलेला आहे. रेग्युलर पाणीपट्टीच्या ५०% म्हणजे रु.१०००/- प्रमाणे आपण आता ही देतो आहे. घरकुलच्या थकबाकीचा आणि नविन कनेक्शन देतांना थकबाकी आपण क्लिअर असल तरच आपण कनेक्शन देतो. परंतु घरकुलच्या बाबतीत आपल्याला एक वेगळ धोरण ठरवाव लागेल. ठरवु आपण त्याबाबतीत धोरण. परंतु दुकान गाळे आणि घरकुल या दोघींच करु.

**श्री.नितीन लढ्ढा :-** दोन्ही विषय वेगवेगळे आहे. हे मान्य करण्यात आलेले आहे. परंतु या दोघी सदस्यांनी मांडलेल्या सुचना जी आहे ते अत्यंत महत्वाच्या आहे की, झोपडपट्टी धारकांकडे इतका पैसा देण्याची आज व्यवस्था नसल्या कारणाने आपल्याला अमृतच्या कनेक्शन देण्याच्या संदर्भात अडचणी तेथे खुप मोठया प्रमाणावर निर्माण होता. लोकप्रतिनिधीना वेठीस धरले जातात. अमृतची योजना पुर्ण झाली आणि आपण त्यांना नळ कनेक्शन देऊ शकलो नाही. उद्या आपण तेथे विकास कामे प्रस्तावीत केलेली आहे. विकास कामे झाली आणि पुन्हा त्याचे धोरण ठरविल गेले. पुन्हा कनेक्शन देतांना विकास कामांना पुन्हा खोदकाम होईल तेथे आणि विकास कामांवर केलेला खर्च वाया जाईल. या अनुषंगाने पाणी पुरवठयाच्या संदर्भातल फ्लॅट सिस्टीमच्या बाबतीतल धोरण सुध्दा अजुन पर्यंत ठरलेल नाही. ते सुध्दा ठरविणे खुप महत्वाच आहे. कारण याच्या संदर्भात अनिश्चितता जी आहे. जुन्या मिळकत धारकांना ५ फ्लॅट असतील तर ५ कनेक्शन देतो आहे. परंतु नविन इमारतींना किती फ्लॅटसच्या संख्यावरती आपण त्यांना रिस्ट्रीक्शन करतो आहे. या संदर्भातल धोरण सुध्दा तातडीने ठरविणे खुप गरजेचे आहे. या अनुषंगाने पुढच्या महासभेपर्यंत प्रशासनाने पाणी पुरवठेच्या अमृत योजनेच्या संदर्भातले मग स्लम एरियाच्या संदर्भातल असेल किंवा

फ्लॅट सिस्टीमच्या बाबतीतल असेल. एक परिपुर्ण धोरण ठरवुन पुढच्या महासभेसमोर या सभागृहापुढे ठेवणे आवश्यक आहे.

**मा.महापौर :-** प्रशासनाने नोंद घ्यावी.

**मा.आयुक्त :-** याच्या मध्ये आपल्याला जे पहिल्या मजल्यावरचे धोरण होते. तो विषय चर्चेला आला पण निर्णय झालेला नाही. तर मला वाटत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपण पहिला मजला आणि दुसरा मजला रेडीरेकनरच्या प्रमाणे रेडीरेकनरची व्हल्यु तशीच कमी होते.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** निश्चित कमी होणार आहे. त्यात सुध्दा आपण त्यांना मिनीमम, फ्लॅटची किमत सुध्दा कमी होणार. ते आयुक्त साहेबांनी सुध्दा मुद्दा मान्य केलेले आहे. जर ते आपण सहजपणे देऊ शकतो. जर आपण आपल्याकडे हस्तांतरणाचे प्रस्ताव जास्तीत जास्त प्राप्त होतील. माझा उद्देश फक्त ऐवढाच आहे की, धोरण ठरवुन ठराव करुन त्याच इम्पलीमेंटेशन होऊ शकला नाही. नाही तर रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर लोकं जर करत राहतील हस्तांतरण तर उपयोग काय मग त्या हस्तांतरणाचा. आणि १५ आणि १० % मध्ये जे काही मिनीमम करता येत असेल तर ते कमी करावे.

**मा.आयुक्त :-** ताई याच्या मध्ये त्यांना काही फार मोठा रिलिफ मिळणार नाही. १०% मध्ये आपण जर १% कमी केले तर फारशी रक्कम मिळणार नाही. पण उलटपक्षी त्यांच्या मध्ये जो वाद निर्माण होतो. जसा पुर्वी टॅक्स होता. पहिल्या मजल्यावर जो टॅक्स, दुसऱ्या मजल्यावर त्यापेक्षा कमी. त्यापेक्षा जर आपण त्यांच्या मुळ व्हल्युवेशन मध्ये कमी करतो आहे. मला वाटत की, जरी तांत्रिक दृष्टया ते अयोग्य आहे. आता आपण सरासरी १०% घेवु या. जरी ते १०% योग्य वाटल नाही तर ८% करु या.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** आयुक्त साहेब, आपण जर हे करणार आहोत तर माझी मागणी अशी असणार आहे की, १५ आणि १०% हे आपण जे केलेल आहे ती अमाऊंट थोडी कमी करावी. १५%चा आपण १२% कराव. आणि १०%चा ८% कराव.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई, आपली जी महापालिका आहे खुप श्रीमंत महापालिका आहे अश्यातला भाग नाही.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** निश्चितच भाऊ. आपल्या महापालिकेची स्थिती बिकट आहे. आज जबाबदारी खुप मोठी आहे मी पण मान्य करते.

**श्री.कैलास सोनवणे :-** ताई मला सांगा, तुम्ही ऐवढे भांडण करत आहे ज्याच्यासाठी आपल्याकडे कोणी आल आहे का कमी करायला. नाही तर सोडा ना कशाला करत आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** अप्पा, अप्पा, आपल्याला लोकांनी लोकप्रतिनिधी म्हणुन येथे पाठविलेल आहे. ज्या वेळेला आपल्याला निवडुन दिले त्या वेळेलाच ही जबाबदारी दिलेली आहे. प्रत्येक विषयासाठी कोणी वेगळे येण्याची अपेक्षा करणे हे चुकीच आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** मग आपल्या संस्थेच हित पाहायचे नाही का ?

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** संस्थेच हित बघतोच आहे आपण.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** एक मिनीट मी बोलतो,

**श्री.विशाल त्रिपाठी :-** हस्तांतरणाच्या संदर्भात ट्रान्सफर फीच्या संदर्भात प्रशांत पाटील साहेबांकडे पाठपुरावा मीच करत आहे. त्यांच्या मागे लागुन मी त्यांना त्याचे कारण असे आहे की, मागचा जो प्रशासनाचा प्रस्ताव होता. त्याचे दर कमी झाले आणि दर कमी झाल्यानंतर आपण ते प्रस्ताव परत शासनाकडे पाठविले. आणि गेल्या १० वर्षापासुन महानगरपालिकेला १ रुपयाच उत्पन्न मिळत नाही. आणि तेथे व्यवहार सुरु आहे. तर माझ ऐवढेच म्हणणे आहे सभागृहाला आणि माझी विनंती आहे. समजा २-५ आता खाली जर दुकान घ्यायला गेले तर रु.२५ लाख, रु.३० लाखच्या खाली कोणी दुकान देणार नाही. आणि त्याच्यासाठी ५० हजार, २५ हजार, जर त्याच्या नावावर होत असेल. तर ते त्याच्या फायद्याचे आहे. कारण बरेच ठिकाणी व्यवहार असे झालेले आहे की, लोकांनी स्टॅम्प पेपरावर व्यवहार केले आणि पैसे खाऊन नंतर पसऱ्या खाऊन घेतलेल्या आहे. त्याच्यामुळे जर महापालिकेला उत्पन्न मिळत असेल.

कमीत कमी २-४ कोटी रुपये महापालिकेला त्याच्यातुन मिळणार आहे. त्याच्याने आपल्या शहराचा विकास होणार आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** मल्टी ट्रान्सफर बाबतच मात्र काही तरी धोरण ठरविणे येथे आवश्यक आहे.

**मा.आयुक्त :-** महसुल कायद्यात काय धोरण आहे ते आपण बघुन घेवु.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य आहे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे. वरच्या फेरबदलासह विषय क्र.०९ हा मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.६३५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिकेचे भाडेपट्टा मुदत न संपलेले व्यापारी संकुलातील गाळयांचे गाळे हस्तांतरण (नाव बदल) प्रक्रीया सुरु करणेबाबत मा.महापौर तसेच सन्मा.सदस्य यांचेकडून वारंवार विचारणा होत असते, यापुर्वी गाळे हस्तांतरण (नाव बदल) बाबत महासभा ठराव क्र.५४४ दि.३/१२/२०१६ अन्वये धोरण ठरविण्यात आलेले होते, परंतु सदरचा ठराव प्रशासनाने सुचविलेल्या धोरणाशी विसंगत असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५१(१) नुसार विखंडनाकरीता शासनाकडे पाठविण्यात आलेला होता, त्याअनुषंगाने शासनाने दि.३०/०१/२०१८ चे पत्रान्वये महासभा ठराव क.५४४ दि.३/१२/२०१६ हा निलंबीत केलेला आहे.

सदया गाळे हस्तांतरण (नाव बदल) शुल्काबाबत धोरण निश्चित नसल्याने ज्या गाळयापासून महानगरपालिकेस एकापेक्षा अधिक वेळा गाळे हस्तांतरण (नाव बदल) शुल्क मिळणार होते, तेथून एकदाही उत्पन्न मिळत नाही, तसेच गाळेधारक हस्तांतरण (नाव बदल) शुल्क न भरता गाळा हस्तांतरीत करीत असल्याचे दिसून येते. यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत असल्याने आयुक्त यांचे जा.क्र./मा.व./९८३/२०२१-२२ दि.१३/०९/२०२१ अन्वये जळगांव शहर महानगरपालिकेचे भाडेपट्टा मुदत न संपलेले व नव्याने भाडेपट्टयाने देण्यात येणाऱ्या गाळयाकरीता गाळे हस्तांतरण (नाव बदल) शुल्क आकारणीचे धोरण ठरविणेकामी उपायुक्त (महसुल), मुख्यलेखाधिकारी, सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांची त्रिसदस्यीस समिती गठीत करण्यात आली सदर समितीने व्यापारी संकुलांतील गाळयांची भौगोलिक स्थिती बाबत, शासनाच्या रेडीरेकनरबाबत नव्याने आलेल्या तरतूदी तसेच उपलब्ध माहितीच्या अनुषंगाने समितीने महानगरपालिकेचे भाडेपट्टा मुदत न संपलेले व नव्याने भाडेपट्टयाने देण्यात येणाऱ्या गाळयाकरीता गाळे हस्तांतरण (नाव बदल) शुल्क निश्चितीबाबत सादर केलेला अहवाल खालीलप्रमाणे.

- सदर अहवाल तयार करतांना सर्व साधारणपणे खालिलप्रमाणे बाबी विचारात घेण्यात आल्या.
  १. गाळयाचा पुढावा (Frontage)
  २. गाळयाची मजल्याची स्थिती (Lower Floor, Upper Floor, First Floor, Second Floor etc)
  ३. यापुर्वी सादर करण्यात आलेला प्रशासकीय प्रस्तावात व महासभेचा ठरावात हस्तांतरण शुल्क सर्व गाळयाकरीता सरसकट ठरविले होते. मात्र आता सदरचे हस्तांतरण शुल्क हे गाळयाचे स्थान, मजल्याचे स्थिती, क्षेत्रफळ व त्यासाठी बाजार मुल्य दर तक्त्यातील (ASR) देण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचना विचारात घेण्यात आल्या आहे.

४. सदरचे धोरण हे केवळ हस्तांतरणाचे असल्याने याबाबत शासनाचे सर्व समावेशक, नियम महानगरपालिकेसाठी नाहीत. तथापी नगरपरीषदेसाठी स्थायी निर्देश क्र.२४ दि.२८/१०/२००४ हे नगरपरीषद प्रशासन संचालनालय (DMA) यांनी निर्गमित केलेले असून ते महानगरपालिकेस लागू नाही.

५. हस्तांतरण (नाव बदल) शुल्काच्या स्वरुपात मनपास प्राप्त होणारे उत्पन्न कुंठीत झाले आहे, या धोरणामुळे हस्तांतरण (नाव बदल) शुल्क स्वरुपातील उत्पन्न सुरु होवून उत्पन्नाच्या स्त्रोतात वाढ होणार आहे.

| अ.क्रं. | व्यापारी संकुलांचे नांव | मजला | गाळे हस्तांतरण (नाव बदल) शुल्काबाबतचे धोरण |
|---|---|---|---|
| १ | व.वा.मार्केट (गोलाणी) | लो लेव्हल, तळ | चालु वर्षाच्या रेडीरेकनर नुसार येणाऱ्या गाळयाच्या मुल्याकनाच्या १५ टक्के येणारी रक्कम गाळे हस्तांतरण (नांव बदल) शुल्क म्हणून आकारण्यात यावी. |
| | | पहिला,दुसरा, तिसरा,चौथा | चालु वर्षाच्या रेडीरेकनर नुसार येणाऱ्या गाळयाच्या मुल्याकनाच्या १० टक्के येणारी रक्कम गाळे हस्तांतरण (नांव बदल) शुल्क म्हणून आकारण्यात यावी. |
| २ | नविन बी.जे.मार्केट | लो लेव्हल, तळ | चालु वर्षाच्या रेडीरेकनर नुसार येणाऱ्या गाळयाच्या मुल्याकनाच्या १५ टक्के येणारी रक्कम गाळे हस्तांतरण (नांव बदल) शुल्क म्हणून आकारण्यात यावी. |
| | | पहिला, दुसरा, तिसरा, | चालु वर्षाच्या रेडीरेकनर नुसार येणाऱ्या गाळयाच्या मुल्याकनाच्या १० टक्के येणारी रक्कम गाळे हस्तांतरण (नांव बदल) शुल्क म्हणून आकारण्यात यावी. |
| ३ | मिनाताई ठाकरे मार्केट | तळ | चालु वर्षाच्या रेडीरेकनर नुसार येणाऱ्या गाळयाच्या मुल्याकनाच्या १५ टक्के येणारी रक्कम गाळे हस्तांतरण (नांव बदल) शुल्क म्हणून आकारण्यात यावी. |
| ४ | १० व ३३ उर्दु शाळा मार्केट, सुभाष चौक | तळ | चालु वर्षाच्या रेडीरेकनर नुसार येणाऱ्या गाळयाच्या मुल्याकनाच्या १५ टक्के येणारी रक्कम गाळे हस्तांतरण (नांव बदल) शुल्क म्हणून आकारण्यात यावी. |
| ५ | नव्याने भाडेपट्टयाने देण्यात येणाऱ्या गाळयाकरीता | लो लेव्हल, तळ | चालु वर्षाच्या रेडीरेकनर नुसार येणाऱ्या गाळयाच्या मुल्याकनाच्या १५ टक्के येणारी रक्कम गाळे हस्तांतरण (नांव बदल) शुल्क म्हणून आकारण्यात यावी. |
| | | पहिला,दुसरा, तिसरा,चौथा | चालु वर्षाच्या रेडीरेकनर नुसार येणाऱ्या गाळयाच्या मुल्याकनाच्या १० टक्के येणारी रक्कम गाळे हस्तांतरण (नांव बदल) शुल्क म्हणून आकारण्यात यावी. |

- जळगाव महानगरपालिकेच्या भाडेपट्टा मुदत न संपलेले व नव्याने भाडेपट्टयाने देण्यात येणाऱ्या व्यापारी संकुलातील रहिवासी गाळयांकरीता संबंधीत गाळयाच्या चालु वर्षाच्या रेडीरेकनर नुसार येणाऱ्या गाळयाच्य मुल्याकनाच्या १० टक्के येणारी रक्कम हस्तांतरण (नाव बदल) शुल्क आकारण्यात यावी.
- जळगाव महानगरपालिकेच्या भाडेपट्टा मुदत न संपलेले व नव्याने भाडेपट्टयाने देण्यात येणाऱ्या व्यापारी संकुलातील व्यावासायिक तसेच रहिवासी गाळयाकरीता वारसाहक्काने गाळे हस्तांतरण (नाव बदल) करणेकामी सभागृहातील सूचनेनूसार कोणतेही शुल्क आकारण्यात येऊ नये, ते विनामुल्य करण्यात यावे.

- यापुर्वी गाळे हस्तांतरण (नाव बदल) करण्याकरीता प्राप्त झालेले अर्ज यांना देखील वरील प्रमाणे धोरण लागू राहील.
- महानगरपालिकेकडून यापुर्वी जे व्यापारी संकूल ९ वर्षापेक्षा जास्त मुदतीकरीता भाडेपट्टयाने दिलेले आहे अश्या सर्वच व्यापारी संकुलाचे भाडेकराराचे तत्कालीन न.पा.ठराव शासनाकडे विखंडनाकरीता सन २०१७ मध्ये पाठविण्यात आलेले आहेत, त्याबाबत शासना कडून अदयापपावेतो कोणताही निर्णय प्राप्त झालेला नाही. सदर भाडेपट्टा मुदतीच्या ठरावाबाबत / वैधतेबाबत शासनाचा अगर मे.न्यायालयाचा अंतीम निर्णयाच्या अधिन राहूनच गाळे हस्तांतरण (नाव बदल) उपरोक्त धोरणानुसार होईल. त्या बाबतचा अंतिम निर्णय मान्य असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र संबंधीतांना मनपात सादर करणे अनिवार्य राहील.
- हस्तांतरणासाठी प्रशासनाने निश्चित केलेल्या अटी व शर्तीचा करारनामा करुन देणे बंधनकारक राहील.
- उपरोक्त प्रमाणेच धोरण हे गाळयाच्या मूळ भाडेपट्टयाच्या संपूर्ण मुदतीकरीता लागू राहील. म्हणजेच हस्तांतरण शुल्क आकारणी करताना भाडेपट्टयाचा किती कालावधी संपलेला आहे अथवा शिल्लक आहे ही बाब विचारात न घेता वरील धोरणाप्रमाणेच हस्तांतरण (नाव बदल) शुल्क आकारले जाईल.
- ज्या गाळेधारकांनी गाळे हस्तांतरण (नाव बदल) कामी यापुर्वी अर्ज केलेले आहेत. तथापी असे अर्ज मनपाकडे प्रलंबीत आहे, अशा प्रकरणी सदरचे धोरणानुसार चालु बाजार मुल्य दर तक्त्यानुसार (ASR) येणारे मुल्य व त्या प्रमाणेचे गाळे हस्तांतरण (नाव बदल) शुल्काची आकारणी करण्यात येईल.

जळगांव महानगरपालिकेचे भाडेपट्टा मुदत न संपलेले व नव्याने भाडेपट्टयाने देण्यात येणाऱ्या व्यापारी संकुलातील गाळे हस्तांतरण (नाव बदल) शुल्क आकारणीबाबत त्रिसदस्यीय समितीने उपरोक्त प्रमाणे सादर केलेला अहवाल स्विकारणेस तसेच महासभा ठराव क्र.५४४ दि.०३/१२/२०१६ रद्द करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सन्मा.सदस्यांनी सभागृहात सदर विषयासंदर्भात चर्चे दरम्यान ज्या सुचना केलेल्या आहेत त्याची प्रशासनाने नोंद घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं.१०:-** महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत (१) प्रभाग क्र.०४ शास्त्रीटावर ते भिलपुरा ते ममुराबाद पुला पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे (२) प्रभाग क्र.०६ व १६ पांडे डेअरी चौक ते इच्छादेवी चौक पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे चे कामे करण्यास व अंदाजपत्रकांना मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कैलास सोनवणे :-** विषय क्र.१०,११,१२,१३ व १४ मंजुर.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** विषय क्र.१४ नाही अप्पा त्यावर बोलायचे आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** हा बोला.

**श्री.चेतन सनकत :-** विषय क्र.११ आणि १२ यातील एक काम वाचुन दाखवा आणि आम्हाला समजुन सांगा.दोघी तिघींची संख्या जास्त आहे मला वाटत आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मनपा फंड कोणत्या रोडाला मंजुर झालेला आहे. आणि असच वार्ड क्र.१ व २ वार्डात महानगरपालिका फंड का नाही.

**श्री.चेतन सनकत :-** आणि साहेब मंजुरीसाठी आपण आता ठेवलेला आहे. या कामाची टेंडर प्रोसेस ऑलरेडी झालेली आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** कार्योत्तर मंजुरी आहे ही.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** निविदा समितीचा अभिप्राय त्याच्यावर नाही.

**श्री.चेतन सनकत :-** या विषयावर बोला. भाऊ आर.एस.एस.भवन के पासका मे सालभर से काम बोल रहा. एक दिन एक खड्डा बुजाने आऐ नही वो. ये अभी तक ठराव हुआ नही कैसे डॉकेट पर आया और कैसे मंजुर कर रहे है वो. जिल्हा परिषद ते ममुराबाद रोड तक का रस्ता.

**श्री.कैलास सोनवणे :-** आता हे तुमचे पार्टी मिटींग मधले विषय आहे तर पार्टी मिटींगलाच सॉल करायला पाहिजे. तुमचे म्हणणे काय आहे. विरोध आहे का या कामाला.

**श्री.चेतन सनकत :-** विरोधचा विषय नाही अप्पा.आमचा कामाला विरोध नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** मग संपला विषय, मंजुर आहे.

**श्री.चेतन सनकत :-** पण या विषयावर निविदा समितीने सविस्तर अहवाल द्यावा आणि खुलासा करावा.

**श्री.कैलास सोनवणे :-** सांगा काय म्हणत आहे ते, सांगा सोनवणी साहेब.

**श्री.व्हि.ओ.सोनवणी, शहर अभियंता :-** विषय क्र.१० शास्त्री टॉवर ते भिलपुरा चौक ते ममुराबाद पुलापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे, प्रभाग क्र.६ व १६ पांडे डेअरी चौक ते ईच्छादेवी चौक पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे सदरच्या कामांना महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत मा.जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. आणि त्यावर प्रशासकीय मान्यता देतांना त्यांनी अट टाकली की, मनपा सभागृहात येवुन पुढील कार्यवाही करावी.आणि २०२२ पर्यंत निधी खर्च करावयाचा असल्यामुळे त्यातील टेन्डर प्रक्रिया आपण सुरु केलेली असल्यामुळे पुढचा विषय क्र.११ चा जो विषय आहे तर दलितोत्तर योजने अंतर्गत ती कामे मंजुर केलेली आहे. मा.जिल्हाधिकारी साहेबांनी आणि निधी मुदतीत खर्च करायचा असल्यामुळे ती टेन्डर प्रक्रिया आपण सुरु केलेली आहे. आणि विषय क्र.१३ जो आहे तो शहरातील मोठया रस्त्यांबाबत वेळोवेळी वृत्तपत्रामध्ये बातम्या येत असल्यामुळे ७ मुख्य रस्ते घेण्यात आलेले आहे. हे रस्ते घेतांना शासकीय योजना असणेबाबत निविदा प्रक्रिया होते परंतु मनपा फंडातुन निविदा प्रक्रिया केल्यास कोणीही भाग घेत नाही म्हणुन ही तरतुद करण्यात आलेली आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** चांगल केल उलट.

**श्री.नितीन लढ्ढा :-** याच्यामध्ये काही बेकायदेशीर घडल आहे का ?

**श्री.कैलास सोनवणे :-** काही वाईट नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** याच्या मध्ये जर काही बेकायदेशीर घडत असेल तर निश्चितपणे निदर्शनास आणुन द्यावे.

**श्री.कैलास सोनवणे :-** उलट चांगल केलेल आहे. मनपा फंडात टाकल तर, हे जे आपले महापालिकेचे ठेकेदार आहे. ते म.न.पा. फंडातुन काम करतात आणि ते अश्या निधीच्या वेळेस बाहेरचे येतात कोणी आणि बिलो टाकुन देतात आणि मग कॉलिटीशी कॉम्प्रमाईज करतात ते. बरं झाल याच्यात मनपा फंड जोडल तर, मी अभिनंदन करतो तुमच. चांगल केल तुम्ही आणि मला.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अप्पा आम्हाला तर विचारा काय बोलत आहे.

**श्री.कैलास सोनवणे** :- एकच बात आहे. येथे मांडण म्हणुन काही तर मांडत आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मांडतो आहे ना. विरोध काय बरोबर आहे ना.

**श्री.कैलास सोनवणे** :- मी बोलु की नाही, मला परवानगी दिलेली आहे महापौरांनी. आणि चेतन सनकत तु मला या ३० वर्षात पाहिला नगरसेवक दिसतो आहे की, तु आपल्याच वार्डाच्या कामावर आक्षेप घेतो आहे. ते १ कोटी आले तर आपल्याच वार्डात काम होईल ना. एक तर रोज तेथे धुळीमधुन जाव लागत. डोळे गळायला लागले आहे, सकाळी आंघोळ केली की, मातीच पाणी निघत सगळ,

**श्री.चेतन सनकत :-** मी विरोध करत नाही अप्पा.

**श्री.कैलास सोनवणे :-** मी तुमचे मनपा प्रशासनाचा आभार मानेल.

**श्री.चेतन सनकत :-** आता मी मांडतो हा विषय.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई.

**श्री.चेतन सनकत :-** दोन वर्षापासुन मी त्या रस्त्याचे काम सांगितले आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** लेंडी नाल्याजवळचा विषय आहे का ?

**श्री.चेतन सनकत :-** नाही ना भाऊ. तो विषय आज पर्यंत आलेला नाही. हाच आला का ?

**श्री.कैलास सोनवणे :-** कोणत्या रस्त्याचा विषय.

**श्री.चेतन सनकत :-** जिल्हा परिषद ते ममुराबाद रोड, संघ कार्यालयाचा रस्ता.

**श्री.कैलास सोनवणे :-** सांगा ना कोणत्या निधीतुन घेतलेला आहे. घेतला ना बाबा, पुलाच्या कामामध्ये ते काम करत आहे ते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** चेतन आपण आपल्या निधीचा योग्य पध्दतीने नियोजन व्हाव या दृष्टीकोणातुन शिवाजी नगर उड्डाणपुलाचे जे काम सुरु आहे. शिवाजी नगर पुलाच्या कामाच्या संदर्भात त्यांच्या निधी मध्ये अॅपरोच रोड घेण्याच्या संदर्भात तरतुद आहे आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता यांच्याशी चर्चा केली. उप-अभियंता राऊत साहेब यांना बोलविले होते. मक्तेदाराला ही बोलविले होते की, रेल्वे स्टेशन पासुन ते ममुराबाद पर्यंत जाणारा जो रस्ता आहे. हा मेन पुलाची उंची वाढविल्यामुळे बॉम्बे लॉजचा चौक जो आहे तो खालती गेलेला आहे. आणि त्यांच्यामुळे आमच्या रस्त्यांची दुरावस्था झालेली आहे. हे काम त्याच निधी अंतर्गत समावेश करुन त्याच काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातुन कराव. तश्या पध्दतीने अॅपरोच रोड शिवाजी नगर भागाकडील, ज्या वेळेला शिवाजी नगर भागाकडील अॅपरोच रोड डी.बी.जैन दवाखान्यापासुन ते थेट ममुराबाद पुलापर्यंतचा, काल ते राऊत साहेबांनी जाऊन स्थळ निरिक्षण करुन आले मक्तेदार ही त्यांच्यासोबत होते. रात्री मला मक्तेदारांनी फोन करुन सांगितल की, आम्ही तो निरिक्षण केल्यानंतर ममुराबादच्या पुलापर्यंत अॅपरोच रोड करुन देण्याच्या संदर्भातली त्यांची भुमिका सकारात्मक आहे. जेणे करुन कमीत कमी महानगरपालिकेच्या निधीतले साधारणता २-२.५ कोटी रुपये वाचतील अश्या दृष्टीकोणातुन ते नियोजन केलेले आहे. आणि भुसारी वकीलांच्या चौकापासुन तर पुढे ममुराबाद रोडला अपस्त्वल करण्याच्या संदर्भातील रस्त्याची सुध्दा तरतुद केलेली आहे. ते तुम्हाला पुढच्या महासभेमध्ये येईल.

**श्री.कैलास सोनवणे :-** त्याचे इस्टीमेट सांगा कसे आहे. डबलचे आहे ते बी.एन्ड सीचे रोड.

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्या रोडांची स्थिती जी आहे ती निश्चितपणे आपण मनपा फंडातुन जी कामे करतो त्याच्या पेक्षा निश्चितपणे ज्या पध्दतीने राज्य महामार्ग तयार होतात त्या राज्य मार्गाचा दर्जा त्या रस्त्यावर आखला जाईल. म्हणजे मोठया प्रमाणावरती महानगरपालिकेची आर्थिक बचत होईल. काम गुणवत्तेच होईल. अश्या पध्दतीने वेगवेगळया भागातुन वेगवेगळया निधीतुन या शहरातील प्रमुख रस्त्यांची समस्या पुढच्या सहा महिन्यामध्ये कश्यापध्दतीने सोडवायची आहे याच नियोजन मा.पालकमंत्री असतील, मा.जिल्हाधिकारी साहेब असतील, मा.आयुक्त साहेब असतील,याच्या संदर्भात जी समिती गठीत झालेली आहे. ते चांगल्या पध्दतीने नियोजन जेणे करुन निधीची जी मर्यादा आहे. परंतु निधीच्या मर्यादेमध्ये सुध्दा जास्तीत जास्ती शहरातील नागरिकांना कश्या पध्दतीने दिलासा देता येईल. या दृष्टीकोणातुन प्रयत्न सुरु आहे. एकदा या प्रगतीने काम मार्गी लागल्यानंतर आलेला निधी हा जर योग्य नियमाने जर खर्च केला गेला तर राज्य शासनाकडे अजुन निधी मागणे संदर्भातला विषय आपल्याला मा.पालकमंत्री महोदय यांच्या मध्यस्तीने राज्य शासनाकडे नेणे आज परिस्थिती अशी आहे की, राज्य शासनाने याच्यापुर्वी सुध्दा दिलेला निधी, जळगांव शहर महानगरपालिकेची एक प्रतिमा राज्य शासनाकडे अशी निर्माण झालेली आहे की, जळगांव शहर महानगरपालिका हा योग्य वेळेमध्ये निधी खर्च करु शकत नाही. कारण मला सांगा, २५ कोटीचा निधी आता मागील ३ महिन्यापर्यंत त्याच्यातल्या ४ कोटी निधीच नियोजन आता अंतीम टप्प्यात केल. १०० कोटीचा निधी मिळाल्यानंतर सुध्दा २.५ ते ३ वर्ष गेले. मी म्हणतो निधीचा एक चांगल्या पध्दतीने एक चांगला समन्वय ठेवुन त्याच्यामध्ये आपण कुठलाही भेदभाव करत नाही. संपुर्ण शहर हे डोळयासमोर त्याचे उद्दिष्ट ठेवुन या शहरातील वेगवेगळया भागातुन दुर वरुन येणाऱ्या नागरीकांना चांगल्या पध्दतीने रस्ते कश्यापध्दतीने उपलब्ध करुन देता येईल. कश्या पध्दतीने दिलासा देता येईल. या पध्दतीने योग्य नियोजन केलेले आहे. प्रत्येकात ऐनझायटी आहे मी समजु शकतो. पण मुळात निधीचीच कमतरता असल्याकारणाने प्रत्येकाला वाटत की, माझ्या प्रभागातील सगळी कामे लवकर आणि कमी वेळेत मार्गी लावुन देईल.परंतु आलेल्या निधीचा जो पर्यंत आपण विनयोग करणार नाही आणि तो विनियोग करण्याच्या भानगडीमध्ये आपण गुंतुन पडु तर मी म्हणतो की, राज्य शासन हे काही कालंतराने आपल्याला पुर्णत: दुर्लक्ष करेल.म्हणुन माझी सभागृहाला विनंती आहे की, नियोजन जो आहे, खरं जर चुकीच नियोजन असेल तर सदस्यांनी निश्चितपणे येथे आक्षेप नोंदवावा.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर ताई, मला सांगा, या महापालिकेच्या बाबतीमध्ये जो तो आपल्या वार्डाचे, येथे पहा तुम्ही किती आलेले आहे आपल्या आपल्या वार्डाचे आहे सगळयांचे आहे का शहराच, वार्ड क्र.५ आहे वार्ड क्र.६ आहे हे हार्ट ऑफ सिटीचे भाग आहे तेथे झाल म्हणजे जळगांव शहराच काम झालं असं दिसत. म्हणुन बाकीच्यांच्या वार्डात होऊ नये असा भाग नाही. तेथे पण व्हायला पाहिजे. पण पैसे आहे का आपल्याकडे. आपल्याकडे पैसे किती आहे.

**श्री.चेतन सनकत :-** अप्पा जेवढ निधी आहे ते विशेष वार्डात चाललं जात आहे. आता येणारा निधी.

**श्री.कैलास सोनवणे :-** तु तरी जात येत असतील ना तेथुन आता मी कामासाठी चाललो आहे.

**श्री.चेतन सनकत :-** अप्पा बरोबर आहे. पण या विषयावर मला सुचना मांडायची आहे. आता ज्या वार्डात कामे दिलेली आहे ते सोडुन दुसऱ्या वार्डात टाकावे.

**श्री.कैलास सोनवणे :-** वयक्तीक निधी वापरा ना वयक्तीक निधी दिलेला आहे शिवसेनेने, पर्सनल निधी दिलेला आहे सगळयांना २०-२० लाख रुपये.

**श्री.चेतन सनकत :-** आता पुढे येणारा निधी जे असतील, ज्या वार्डामध्ये आता पर्यंत निधी दिला गेलेला नाही. त्या वार्डामध्ये टाकण्यात यावे.

**श्री.कैलास सोनवणे :-** याचा अधिकार कोणाकडे आहे याचा अधिकार आपल्याला थोडी आहे.

**श्री.चेतन सनकत :-** अप्पा मी सुचना मांडलेली आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो मांडा ना मांडा.

**श्री.चेतन सनकत :-** अप्पा तुम्हारे ही शिष्य है हम तुम्हारे से ही सिखे है.

**श्री.कैलास सोनवणे :-** अरे तु शिष्य नही गुरु है मेरा.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौर ताई.

**श्री.अनंत जोशी :-** एक मिनीट,

**मा.महापौर :-** बंटी भाऊ बोला.

**श्री.अनंत जोशी :-** मी सभागृहातील सर्व सदस्यांना,

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मला बोलु द्या.

**श्री.अनंत जोशी :-** मी परवानगी घेतलेली आहे महापौरांची.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मी पहिले घेतलेली आहे.

**श्री.अनंत जोशी :-** ठिक आहे तुम्ही बोलुन घ्या.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मी काय म्हणतो, माझ एकच म्हणण आहे की, बी ॲण्ड .सी. वाले जे शिवाजी नगर दवाखान्यापासुन रस्ता करणार आहे. मग शिवाजी नगरच्या त्या साईडला जो पुल उतरतो आहे. रेल्वेच्या त्या साईडला.दोघी जिन्यामधुन, आणि एक पंकजच्या घरापासुन तर साळुंखे चौक, अमर चौक आणि १० मिटर तो मेन रस्ता नाही का? साहेब त्याच्यावर आंदोलन केले लोकांनी त्याच्यावर उत्तरे काय दिली तुम्ही. काही उत्तरं नाही, अधिकाऱ्यांना पुढे पाठविले. काय उत्तरे दिली तुम्ही त्याच्यावर, लोकं आम्हाला बोलतात आता मार्च महिन्या पुल चालु होईल तर काय करायच त्या रोडाच. तुम्ही अस तुमच महापालिका फंड वापरतात. आमच्याकडे पण फंड वापरा.

**श्री.कैलास सोनवणे :-** तुम्ही पण मनपा फंड वापरा ना कोण नाही म्हणत आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अप्पा, त्याच्या एस्टीमेट करत नाही इंजिनिअर लोकं, अडथळा आणतात आमच्या कामांला हा माझा आरोप आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** नवनाथ भाऊ, आता एका विषयाला त्यांनी केलं ना तर बाकीचे त्यांना करावे लागतील.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मागे मी ठराव केले, काय ते ठरावांचे, अप्पांच्या टाईमाला ठराव केलेले आहेत.

**श्री.प्रशांत नाईक :-** तुम्ही पाठपुराव्यात अपुरे पडत असतील.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** कशाला अप्पांच्या टाईमाचे आहे. पाठपुरावे किती करायचे.

**श्री.कैलास सोनवणे :-** अहो, नितीन भाऊ, सुनिल भाऊ तुम्ही, तुमचे कामे होते तेव्हा लावला त्यांना आंगाशी आणि आता बाजुला टाकुन दिला त्यांनी.

**श्री.अनंत जोशी :-** अप्पा, नवनाथ भाऊ, एक मिनीट तर बोलु द्या. महापौर साहेब, आयुक्त साहेब आणि सन्मा.सभागृह मी फक्त इतकी विनंती करतो आहे सभागृहातील सर्व सन्मा.सदस्यांना, गेल्या ७-८ महिन्या पासुन, आणि मी जे बघतो आहे ते बोलत आहे. मी कोणाच्या बाजुने बोलत आहे असे अजिबात समजु नका. हा जो गैरसमज सगळीकडे चाललेला आहे. अनेक वेळा हे सांगणे, उत्तर देणे की, विशेष वार्डांमध्ये निधी टाकला जातो. जी ६०-६३ कोटी रुपये गुलाबभाऊंनी दिले होते. ते एकदम सिम्पल विषय आहे. कैलास अप्पांना माहिती आहे. सगळयांना माहिती आहे पण काही लोकं. मुद्दाम असे दाखवितात की, आपल्याला माहित नाही आणि ते आरोप करतात. हे चुकीच आहे. ज्या वेळेला गुलाबभाऊंची सत्ता आली, महापौर शिवसेनेच्या बसल्या. आणि गुलाबभाऊंनी सांगितल की, ज्यांचे ज्यांचे ठराव मंजुर असतील. त्यांनी सगळयांनी आणा, १२५ कोटीचा डि.पी.डी.सी.चा जो निधी परत जाणार होता ३१ मार्चला, तो आपला काही निधी नव्हता तो जिल्हाचा निधी होता.तो शिल्लक होता आणि पण ३१ मार्चला परत गेला असता. तर गुलाबभाऊंनी त्या वेळेस सांगुन दिल की, मी तुम्हाला देतो शहराला गरज आहे. ज्यांचे ज्यांचे ठराव मंजुर असतील सगळयांनी आणा. ते भाजपचे होते, शिवसेनेचे होते, एम.आय.एम.चे होते सगळयांचे होते. ज्यांचे ठराव मंजुर होते. मा.भारतीताई ज्या वेळेस महापौर होत्या.त्यावेळेस ज्यांनी ज्यांनी ठराव करुन घेतले होते. आम्ही पण नशिबवान होतो. मी नितीन बरडे आम्ही नशिबवान आहोत. अप्पांच्या मागे लागुन ते ठराव करुन घेतले होते. ८,१०,११ कोटीचे ठराव करुन घेतले होते. त्यावेळेस सगळयांनी सांगितले, अप्पानीही मला विचारल, पैसे कुठुन आणशील. मी म्हटल अप्पा, काय होईल ते प्रयत्न करेल पण दोन वर्षानंतर लोकांना तोंड दाखवायच आहे. तुम्ही ठराव करुन द्या. अप्पांनी त्यावेळेस समान वागुन आमचे पण ठराव करुन दिले. महापौर भारतीताई असतांना आणि नशिब असे की, सत्तांतर झालं, महापौर आमच्या झाल्यात. सरकार आमचे आले, गुलाबभाऊंनी भरघोस निधी दिला आणि त्यातला बराच निधी माझ्या वार्डात आला, तसा अनेक वार्डांमध्ये आला. याचा अर्थ काय ? त्या वेळेला ते ठराव मंजुर होते. त्यावेळेस गुलाबभाऊंनी त्यांना पैसे दिले कुठल्याही पक्षाचा असुन दिले. मग वारंवार हा मुद्दा येतो कुठुन विषय नं.१, विषय नं.२ गेला हा मुद्दा येतो कुठुन विषय नं.१, विषय नं.२ गेल्या सत्ता बदलण्यापासुन मी जे बघतो आहे. सन्मा.नितीन भाऊ असतील, आयुक्त साहेब असतील, जिल्हाधिकारी साहेब असतील, पालकमंत्री गुलाबभाऊ असतील. आपले शिंदे साहेब, नगरविकास मंत्री आपले, महापौर ताई असतील. उपमहापौर साहेब असतील, ज्या पध्दतीने नियोजन करत आहे. आणि अश्या मंचावर शंका घेणे की, विशिष्ट वार्डात कसा जातो, विशिष्ट वार्डात कसा जातो. विशिष्ट वार्डात कसा जातो. म्हणजे काय नितीनभाऊ लढ्ढांवर किंवा त्या वार्ड क्र.०५ चे लोकांवर आक्षेप आहे. खरं तर बाजार पेठ आहे. जिल्हातील परमनेंट ठिकाण आहे. जिल्ह्यातील तालुक्यातील सगळेच लोक त्या ठिकाणी येतात. जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले, आयुक्त साहेबांची ईच्छा होती. सगळयांनीच ते सांगितले, सुनिल भाऊंनी सांगितले होते. आपल्या शहरात पायाचा भाग जो आहे त्यात सगळयात पहिले चांगल्या सुविधा दिसल्या पाहिजे. बाजारपेठच आणि मेन मार्केट त्या ठिकाणी आहे. आपला वार्ड नं.५ जो आहे तो शहराचा हार्ट आहे. तर तेथील मुख्य रस्ते आणि सुविधा आपण पहिले केले पाहिजे. त्या अनुषंगाने तेथे काही काम राखली गेली. त्याच्यावर लक्ष ठेवण्याचे कारण नाही. पहिले जो निधी आला ६० कोटीचा किंवा आता जो दोन वादग्रस्त रस्ते आहे असे दोन विषय झाले, याच्यानंतर आपला जो ४८ कोटीचा पेंडींग निधी असेल तो आता मार्गी लागेल आयुक्त साहेबांच्या पाठपुराव्याने, नितीन भाऊंच्या पाठपुराव्याने महापौरांच्या पाठपुराव्याने तो विषय मार्गी लागलेला आहे. जेव्हा ४२ कोटीचा विषय मार्गी लागेल त्याच्यानंतर ५८ कोटीचा मार्ग मोकळा होईल. त्याच्या आधी आपल्याला सगळयात पहिले आपण निधी आणायचा विषय सगळयांनीच मिळुन मार्गी लावावा. तुमच्याकडे माझ्याकडे, सर्वांकडे दिडच वर्ष आहे, शेवटचे ४-६ महिने सोडुन द्या. निवडणुकीचे वारे वाहायला लागली, कोणीही बघत नाही, तुमचे कामे होत नाही. दिड वर्षात आपल्या सगळयांना मिळुन चांगल्या पध्दतीने नियोजन करुन लवकर हे सगळे विषय मार्गी लावायचे आहे हीच विनंती आहे. याच्यात खुड घालण्याचा किंवा काही तरी निगेटीव्ह करण्याची गरज नाही. मी असतो येथे ऑफिस मध्ये, किमान चार तासात अनेक लोक येतात. वेगवेगळे ठिकाणावुन सगळे बघतात. तुमच्यापैकी कोणी येणार. ज्या पध्दतीने सुनिलभाऊ, नितीनभाऊ याचे नियोजन करत आहे मी बघतो, अगदी व्यवस्थीत नियोजन चाललेल आहे. आयुक्त साहेबांचे पुर्ण सहकार्य आहे. महापौरांच, उपमहापौरांच पुर्ण लक्ष त्या नियोजनवर आहे. जो पण निधी आपल्याला उपलब्ध होत आहे. त्या सगळयात पहिले शहरातील मुख्य परिस्थिती, जे रस्ते आपल्या उत्पन्नाला जोडतात शहराच्या,

त्या त्या रस्त्यांना पहिले घेण्याचे काम आपण करत आहोत. याच्यापुढे जो जो निधी येईल त्याचे ही नियोजन केलेले आहे. प्रत्येक प्रभाग कुठलाच पक्षाचा बी.जे.पी. शिवसेना, एम.आय.एम. राष्ट्रवादी काही नाही. प्रत्येक प्रभागामध्ये २४ मिटरचे रस्ते पहिले घेतले जातील, १८ मिटरचे घेतले जातील, १२ मिटरचे घेतले जातील, ९ मिटरचे घेतले जातील. आणि मुख्य रस्तेच घेतले जातील. आणि शहराच्या इतके सुंदर पध्दतीने नियोजनाला खुप वेळ द्याव लागते. अश्या माणसावर आक्षेप जर होईन. आणि नितीन भाऊंच्या निदर्शनास येणार नाही असे नका समजु.

**श्री.कैलास सोनवणे :-** मी एक सांगतो, तुम्ही पुर्ण टेन्डर क्लब करा तुम्ही डायरेक्ट, म्हणजे बाकीच्यांच्या हस्तक्षेपचा प्रश्नच येत नाही. आणि मी तर महापौरांचा आणि सुनिल भाऊंचे आभार मानेल की, काम करण्याची संधी दिली नितीन भाऊंना, कोणी देत नाही संधी, विश्वास टाकला आहे त्यांच्यावर, ते पात्र ठरत आहे.

**श्री.अनंत जोशी :-** आणि सर्वात महत्वाचा विषय असा आहे की, इतक्या मोठया प्रमाणावर शहराचा नियोजन करायचे आणि बॅकलॉक भरायचे १० वर्षाचे १५ वर्षाचे, त्याच्यासाठी कोणी उपलब्ध होत नाही. त्याच्यासाठी ही व्यक्ती पुढाकार घेत आहे वेळ देत आहे. या सगळया गोष्टी ऐवढया सोप्या नसतात. खुप मनस्ताप सहन करावा लागतो, सगळयांचे बोलणे ऐकावे लागतात. सगळयांच्या डिमांड असतात, तो माणुस सगळया गोष्टींना हॅण्डल कश्या पध्दतीने करतो ते मी बघतो दररोज ४ तास, सगळयांनी साथ दिली पाहिजे, आपल्याला शहर चांगले बनवायचे आहे. आमच्या बद्दल तर काही वादच नाही, आम्ही नशिबवान होतो, आमचे ठराव झाले, भारतीताई आणि कैलास अप्पांनी करुन दिले. त्यावेळेस तुमचे ठराव झाले असते तर तुम्हाला ही मिळाले असते, पण याच्यापुढे जो निधी येणार आहे त्याचा योग्य वापर होणार आहे प्रत्येकाचे काम होणार आहे. कोणीही त्याच्या बाबतीत बाऊ करायचे नाही गैरसमज करायचे नाही. सगळयांनी सोबत मिळुन काम करा, या दिड वर्षात कामे करायची आहे माझी सभागृहाला फक्त हीच विनंती आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** पुढचा विषय घ्या.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** आता जी चर्चा सुरु आहे, शासकीय निधी वगैरे, आता दोन वर्ष कोरोनाचे गेले, त्याच्या आधी निवडणुकांच वर्ष गेले, तर आता शेवटचे दोन वर्ष येवुन गेलेले आहे. तर आता जळगांव शहर प्रगतीकडे धावत आहे. मग ते देवेंद्रजी फडणवीस असतील, गिरीष भाऊ असतील, राजु मामा असतील, गुलाबभाऊ असतील, नितीन भाऊ असतील, कैलास अप्पा असतील, त्या वेळेचे महापौर सिमाताई असतील, भारतीताई असतील तुम्ही असाल, त्या त्या वेळेचे प्रशासन असेल, आपण गेल्या ३ वर्षामध्ये जळगांव शहराच्या प्रगतीसाठी सर्व प्रयत्न करीत आहोत. आणि त्या पध्दतीने आपली वाटचाल सुरु आहे. सत्ता येईल जाईल बदल होईल. तो विषय नाही पण माझी संपुर्ण सभागृहाला विनंती आहे. आणि महापौर व आयुक्त साहेबांना सुध्दा विनंती आहे. आपली परिस्थिती महापालिकेची आर्थिक आता हळुहळु आता सुधरत आहे. कारण आपला कर्जाचे लोड बराच कमी झालेला आहे. जे.डी.सी.सी. बँकेचे कर्ज निल झालेले आहे. कर्मचाऱ्यांची आपली भरती नसल्यामुळे आणि बरेचशे कर्मचारी निवृत्त झाल्यामुळे तो लोड आपल्यावरचा थोडासा कमी झालेला आहे. अश्या छोट्या छोट्या गोष्टी, नळ कनेक्शन वाढलेले आहे आपले अमृत योजनेमुळे, अश्या बऱ्याच गोष्टी जर आपण अभ्यास केला तर आपण या शहराला आर्थिक प्रगतीकडे नेत आहोत. आणि आर्थिक प्रगतीकडे नेत असतांना आपल्याकडे २ वर्ष शिल्लक असतांना माझी या सभागृहात सगळयांना विंनती आहे. प्रत्येक नगरसेवकाला म.न.पा. फंडातुन २५ लाखाचा निधी देण्यात यावा जेणे करुन छोटे छोटे कामे असतील, स्लॅब क्लव्हर्ट असेल, गटार असेल, १०-१५ कोटी रुपये लागतील काही जास्त लागणार नाही. पण १०-१५ कोटी रुपये या शहरासाठी छोटे छोटे कामांसाठी सुध्दा मंजुर केले पाहिजे. ही माझी भुमिका आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** प्रमुख रस्ते,

**श्री.विशाल त्रिपाठी :-** प्रमुख रस्ते, ६१ कोटी गुलाबभाऊंनी दिले, ४२ कोटी दिले १००-१२५ कोटी येणार आहे. पण हे एक सुवर्ण जयंतीचा म.न.पा.चा हिस्सा म.न.पा.चा अधिकार आम्हाला पाहिजे. काय म्हणणे आहे तुमच सगळयांच. मी या ठिकाणी ठराव मांडतो, प्रशासनाला माझी विनंती आहे की, २५ लाखाचे कामे जर तुम्ही आजपासुन दिले, ६-८ महिने कामाला जातील, बिले तयार होतील, पुढच्या वर्षी तुम्ही बिले द्या, ते याच वर्षी दिले जाणार नाही, ही प्रक्रिया आपल्याकडे वर्षभर सहा महिने चालते. जे धोरण असेल ते ठरवा पण माझ म्हणण आहे, म.न.पा. फंडाचा सुध्दा येथे उपयोग झाला पाहिजे.

**श्री.प्रशांत नाईक :-** २५-२५ लाख रुपये आहे फक्त,

**श्री.कैलास सोनवणे :-** निधीला जोडुन म.न.पा. फंडात.

**श्री.सुनिल महाजन :-** शासकीय निधीला जोडुन.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** शासकीय निधीला जोडुन करा पण २५-२५ लाख रुपये जो नगरसेवक सुचवेल ते काम झाल पाहिजे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** ताई, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान या अंतर्गत कामे आलेली आहे आणि १२ हे नागरी दलितोत्तर वस्ती अंतर्गत आहे. आणि तेच काम पुन्हा विषय क्र.१२ मध्ये नमुद करण्याचे कारण काय हे काही लक्षात आलेले नाही. तर या मागची भुमिका काय ? स्वभाविक आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** काय झाल ताई.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** सोनवणी साहेब, विषय क्र.१२ चा तुम्ही विषय दिलेला आहे. प्रभाग क्र.५ च्या विविध ६ कामांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता देणेबाबत, मग असे असतांना पुन्हा १० आणि ११ चा विषय काय केलेला आहे.

**श्री.व्ही.ओ.सोनवणे, शहर अभियंता :-** निविदा प्रसिध्द करतांना आपण जे जे विषय घेतले होते त्याच्या सोबतच.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** प्रशासकीय ठराव तुम्ही १० आणि ११ मध्ये केला, त्याला मंजुरी ऑलरेडी आहे. १० ला मंजुरी आपण सेपरेटली दिली, ११ ला सेपरेटली दिली, १२ ला विषय तुमचा वेगळा आहे. ६ विकास कामांचे म.न.पा. फंडातुन त्यामध्ये १० आणि ११ पुन्हा नमुद का केलेला. त्यामुळे काय होत गैरसमज होतो पुन्हा विषय आल्याने.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई ते एकत्रित निविदा आल्याने ते संदर्भ दिलेला आहे. डबल नाव जे आहे फक्त माहितीसाठी आहे. तसे असल्याकारणाने एकत्रित करुन दाखविलेले आहे १२ नंबरवर.

**मा.आयुक्त :-** नगरोत्थान आणि दलितोत्तरच्या दोन दोन कामांचा उल्लेख करण्याचे कारण असे आहे की, नगरोत्थान मध्ये म.न.पा. निधीतील ६ कामांची जी यादी दिलेली आहे. नगरोत्थानचे पहिले २ कामे जी नमुद केलेली आहे. त्याच्या सोबत मनपा निधीतले सिरियल नं.१ आणि २ हे क्लब केलेले आहे. दलितोत्तर मधली दोन कामे आहे. ११ नंबर ठरावाची म्हणुन त्याचा उल्लेख तेथे आलेला आहे. त्या दलितोत्तरच्या २ कामांबरोबर म.न.पा. निधीतील ६ कामांपैकी ३ त्याच्यात. असे ते दोन्ही क्लब केल्याबरोबर, म.न.पा. निधी बरोबर नगरोत्थानचे २ कामे. दलितोत्तरच्या २ कामांसोबत म.न.पा. निधीतील ४ कामे. असे एकुण शासनाच्या निधीचे ४ कामांबरोबर म.न.पा. निधीचे ६ कामे क्लब केलेली आहे. म्हणुन त्याचा एक ठराव होईल.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** बरं, आता हे जे सगळे प्रभागाचे कामे आहे ते म.न.पा.निधीतील आहे.

**मा.आयुक्त :-** हो, ते म.न.पा. निधीतील आहे. फक्त पहिली २ कामे आपण नगरोत्थान मधुन केलेली आहे. आणि ते ४ कामे दलितोत्तर मध्ये केलेली आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** हे क्लब केलेली प्रक्रिया सगळी निविदा प्रक्रियेसाठी, निधी आपण मनपाचा वापरला,

**मा.आयुक्त :-** परंतु शासनाकडचे कामे आणि म.न.पा. निधीतील कामे हे निविदा प्रक्रियेसाठी क्लब केलेले आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** हेच मला फक्त स्पष्ट करुन घ्यायचे होते. धन्यवाद.

**श्री.कैलास सोनवणे :-** विषय क्र.१३ पर्यंत मंजुर,

**श्री.नितीन लढ्ढा :-** विषय क्र.१४ आहे पेट्रोल पंपाचा तो ही मंजुर करुन घ्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य आहे.

**श्री.ललित कोल्हे :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** हा विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६३६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की,मा.नामदार श्री.गुलाबरावजी पाटील, पालकमंत्री,जळगांव जिल्हा यांचे सोबत महानगरपालिका क्षेत्रातील प्रमुख ०६ रस्ते सार्व.बांधकाम विभागास हस्तांतरीत करणेबाबत अजिंठा शासकिय विश्राम गृह येथे झालेल्या बैठकीत सदरचे ०६ रस्ते हस्तांतरण करण्यापूर्वी महानगरपालिकेने

दुरुस्ती करुन दयावे असे बैठकीत पालकमंत्री यांनी निर्देश दिले परंतु महानगरपालीकेची आर्थीक परिस्थीती खराब असल्याने सदरचे रस्ते महानगरपालिका निधीतुन करणे शक्य नसल्याने मा.पालकमंत्री यांनी सदरचे रस्ते महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रस्ताव तयार करुन प्रशासकीय मान्यते करीता जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडेस प्रस्ताव सादर करण्यास सूचीत केले त्यानुसार सदरचे रस्त्यांचे आठ भागात अंदाजपत्रके तयार करुन मनपा सर्व साधारण सभेची मान्यता न घेता जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडेस दि.२९/१०/२०२१ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला त्यानुसार जिल्हाधिकारी जळगांव यांच्या कडील पत्र क्र.नपा/नियोजन/आर.आर/९६२/२०२१ दि.०३/११/२०२१ अन्वये खाली नमुद दोन कामांना रक्कम रु.२४७०५२०१/- मात्रास प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| ०१ | प्रभाग क्र.०४ शास्त्री टॉवर ते भिलपुरा ते ममुराबाद पुलापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१,५२,९३,१४४/- |
| ०२ | प्रभाग क्र.०६ व १६ पांडे डेअरी चौक ते इच्छादेवी चौक पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.२,००,००,०००/- |

वर नमुद दोन्ही कामास नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत मिळालेल्या प्रशासकीय मान्यता आदेशातील अटीशर्तीतील अट क्र.०१ नुसार महानगरपालिकेचा सर्व साधारण सभेने उक्त कामांचे अंदाजपत्रकांना मंजुरी प्रदान केल्यानंतर ठराव पारित करुन कार्यादेश देण्यात यावे असे नमूद करण्यात आले असल्याने वर नमुद दोन्ही कामे नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत करणेकामी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- कोल्हे ललित विजय**

**नगरसचिव :- विषय क्रं.११:-** नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत (१) प्रभाग क्र.०५ व ०६ स्वातंत्र्य चौक ते नेरीनाका चौक पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे (२) पुष्पलता बेंडाळे चौक ते पांडे डेअरी चौक पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे चे कामे करण्यास व अंदाजपत्रकांना मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य आहे.

**श्री.ललित कोल्हे :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६३७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की,मा.नामदार श्री.गुलाबरावजी पाटील, पालकमंत्री,जळगांव जिल्हा यांचे सोबत महानगरपालिका क्षेत्रातील प्रमुख ०६ रस्ते सार्व.बांधकाम विभागास हस्तांतरीत करणेबाबत अजिंठा शासकिय विश्राम गृह येथे झालेल्या बैठकीत सदरचे ०६ रस्ते हस्तांतरण करण्यापूर्वी महानगरपालिकेने दुरुस्ती करुन दयावे असे बैठकीत पालकमंत्री यांनी निर्देश दिले परंतु महानगरपालीकेची आर्थीक परिस्थीती खराब असल्याने सदरचे रस्ते महानगरपालिका निधीतुन करणे शक्य नसल्याने मा.पालकमंत्री यांनी सदरचे रस्ते महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रस्ताव तयार करुन प्रशासकीय मान्यते करीता जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडेस प्रस्ताव सादर करण्यास सूचीत केले त्यानुसार सदरचे रस्त्यांचे

आठ भागात अंदाजपत्रके तयार करुन मनपा सर्व साधारण सभेची मान्यता न घेता जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडेस दि.२९/१०/२०२१ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला त्यानुसार जिल्हाधिकारी जळगांव यांचया कडील पत्र क्र.नपा/नियोजन/आर.आर/९६३/२०२१ दि.०३/११/२०२१ अन्वये नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजने अंतर्गत खाली नमुद दोन कामांना रक्कम रु.२,३८,९८,५५५/- मात्रास प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| ०१ | प्रभाग क्र.०५ व ०६ स्वातंत्र्य चौक ते नेरीनाका चौक पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१,५१,८४,७०५/- |
| ०२ | पुष्पलता बेंडाळे चौक ते पांडे डेअरी चौक पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.८७,१२,८५०/- |

वर नमुद दोन्ही कामास नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत मिळालेल्या प्रशासकीय मान्यता आदेशातील अटीशर्तीतील अट क्र.०१ नुसार महानगरपालिकेचा सर्व साधारण सभेने उक्त कामांचे अंदाजपत्रकांना मंजुरी प्रदान केल्यानंतर ठराव पारित करुन कार्यादेश देण्यात यावे असे नमूद करण्यात आले असल्याने वर नमुद दोन्ही कामे नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत करणेकामी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- कोल्हे ललित विजय**

**नगरसचिव :- विषय क्रं.१२:-** प्रभाग क्र.०५ मधील विविध ०६ कामांच्या अंदाजपत्रकांना मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य आहे.

**श्री.ललित कोल्हे :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.६३८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मा.महापौर यांनी त्यांच्या कडील पत्र क्र.(१) जा.क्र./ जशमनपा/ म.का. /२४३/२०२१-२२ दि.१५/११/२०२१ (२) जा.क्र./जशमनपा/म.का./२४२/२०२१-२२ दि.१५/११/२०२१ अन्वये जिल्हाधिकारी जळगांव यांनी नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजने अंतर्गत खाली नमुद दोन कामांना व महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत खाली नमुद दोन कामांना अनुक्रमे जिल्हाधिकारी जळगांव यांच्या कडील पत्र क्र.नपा/नियोजन/आर.आर/९६३/२०२१ दि.०३/११/२०२१ व पत्र क्र.नपा/नियोजन/आर.आर/९६२/२०२१ दि.०३/११/२०२१ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे.

नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजने अंतर्गत

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| ०१ | प्रभाग क्र.०५ व ०६ स्वातंत्र्य चौक ते नेरीनाका चौक पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१,५१,८४,७०५/- |
| ०२ | पुष्पलता बेंडाळे चौक ते पांडे डेअरी चौक पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.८७,१२,८५०/- |

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| ०१ | प्रभाग क्र.०४ शास्त्री टॉवर ते भिलपुरा ते ममुराबाद पुलापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१,५२,९३,१४४/- |
| ०२ | प्रभाग क्र.०६ व १६ पांडे डेअरी चौक ते इच्छादेवी चौक पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.२,००,००,०००/- |

खाली नमुद ०१ ते ०६ कामांना अनुक्रमे महासभा ठराव क्र.५१६ दि.१२/०५/२०२१ व महासभा ठराव क्र.५३५ दि.१२/०५/२०२१ अन्वये नागरी दलितेत्तर वस्ती सुधार योजने अंतर्गत कामांचा प्रस्ताव सादर करण्यास मान्यता मिळालेली होती सदर योजने अंतर्गत शासना कडून निधी सन २०२१-२२ करीता उपलब्ध होणार नसल्याने सदरचे कामे शहराच्या मध्यवर्ती भागात व रहदारीचे रस्ते असल्याने या योजनेतून वगळून मनपा निधीतून प्रस्तावीत करण्या बाबत तसेच वर नमुद जिल्हाधिकरी जळगांव यांचे कडून प्रशासकीय मान्यता मिळालेल्या कामाच्या ई निविदा सोबत खाली नमुद रस्त्यांचा ०६ कामांच्या अंदाजपत्रकांना मनपा सर्वसाधारण सभेच्या मंजुरीच्या अधिन राहून मनपा निधी अंतर्गत ई निविदा प्रसिध्द करण्याची कार्यवाही करण्याबाबत मा.महापौर यांनी दि.१५/११/२०२१ रोजी दिलेल्या पत्रात सुचित केलेले आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| ०१ | प्रभाग क्र.०५ जुनी सरस्वती डेअरी ते सुरेश कलेक्शन पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१७,९९,४८०/- |
| ०२ | प्रभाग क्र.०५ विजय टाईम ते हनुमान मंदिर (व.वा.मार्केट) रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१७,००,०००/- |
| ०३ | प्रभाग क्र.५ रेल्वे स्टेशन ते नेहरु चौक रस्ता डांबरीकरण करणे. | रु.५५,००,०००/- |
| ०४ | प्रभाग क्र.०५ काबरा टाईपींग ते नविन सरस्वती डेअरी पर्यंतचा (दोन्ही बाजु) रस्ता डांबरीकरण करणे. | रु.३२,००,०००/- |
| ०५ | प्रभाग क्र.०५ जुने एल.आय.सी. ऑफिस ते जुना श्रीराम पेट्रोल पंपा पर्यंत (नवजिवन सुपर शॉप समोरील) रस्ता डांबरीकरण करणे. | रु.३२,००,०००/- |
| ०६ | प्रभाग क्र.०५ स्टेट बँक ते भिकमचंद जैन मार्केट पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.२४,९९,५९६/- |

त्यानुसार वर नमुद ०१ ते ०६ कामांपैकी अ.क्र.०१ व ०२ चे कामे हे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रशासकीय मान्यता मिळालेल्या कामांच्या तसेच अ.क्र.०३ ते ०६ चे कामे हे नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रशासकीय मान्यता मिळालेल्या कामांच्या ई निविदे सोबत सारख्या रक्कमेचे ई निविदा प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर ०१ ते ०६ कामे मनपा निधीतुन करणे कामी चे अंदाजपत्रकांना मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- कोल्हे ललित विजय**

**नगरसचिव :- विषय क्रं.१३:-** महानगरपालिकेचे सन २०१८-१९ ते २०२०-२१ पावेतोचे दुहेरी नोंद लेखे अवलोकनार्थ व मान्यतेसाठी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य आहे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.६३९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र शासनाचे निर्देशानुसार NMAM या शासकीय लेखापध्दतीमध्ये कामकाज करण्यांसाठी सनदी लेखापाल यांना कार्यादेश देण्यांत आलेला होता. त्यानुसार जळगांव शहर महानगरपालिकेत दुहेरी नोंद लेखापरिक्षणाचे कामकाज सनदी लेखापाल यांचे मार्फत करण्यात येत असते. त्याअनुषंगाने अर्थ विभागाकडेस सन २०१८-१९, २०१९-२० व सन २०२०-२१ चे वर्षानिहाय दुहेरी नोंद लेखे (वार्षिक जमा व खर्चाचे विवरण) सनदी लेखापाल यांचे कडुन प्राप्त झालेले असुन सदर लेखे लेखापरिक्षणाकामी शासकीय लेखापरिक्षण विभागाकडेस पाठविणे आवश्यक असल्याने सदर सन २०१८-१९, २०१९-२० व सन २०२०-२१ या तिन वर्षाचे दुहेरी नोंद लेखापरिक्षणाचे लेखे (वार्षिक जमा व खर्चाचे विवरण) यांचे अवलोकन केले तसेच लेखापरिक्षण विभागाकडुन पूढील कार्यवाहीसाठी पाठविणेकामी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं.१४:-** महानगरपालिकेचा एम.आय.डी.सी.फायर स्टेशन येथे कार्यरत असलेला डिझेल पंप हा टी.बी.एस. हॉस्पीटल वाहनतळ येथे स्थलांतरित करणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** विषय क्र.१४ वर बोलायच आहे. त्याला माझा काही विरोध नाही. सर्वानुमते परवानगी आहे. एक सुचना अशी मांडु ईच्छिते की, हे स्थलांतरण करतांना आपण ती जागा आपण मनपाच्या ताब्यात ठेवावी. जेथे आपण स्थलांतरीत करणार आहोत ती जागा मनपाने निश्चित करायची जळगांव शहराचा भविष्यातला विस्तार लक्षात घेता, त्या जागेचा भविष्यात आपण पुन्हा वापर निश्चितच करणार आहोत. त्यामुळे त्या जागेचा ताबा मनपाकडे ठेवुन स्थलांतरीत करावा. असा स्पेसीफिक ठराव झाला पाहिजे.

**मा.आयुक्त :-** नगरपालिका असतांना ज्या वेळेला एम.आय.डी.सी. स्थापन झाली होती. त्या वेळेला एम.आय.डी.सी.साठी फायर स्टेशन आपल्याला द्यायच होत. त्या फायर स्टेशनसाठी त्यांच्या ले आऊट मध्ये जो आरक्षित प्लॉट आहे. त्या आरक्षित प्लॉट वरती अग्निशमन केंद्र बांधायच होत. त्यांनी तेथे वाहन आणि स्टाफची व्यवस्था करे पर्यंत नगरपालिकेला त्या ठिकाणी व्यवस्था करायला सांगितल होत. आणि नगरपालिका आणि एम.आय.डी.सी. मध्ये जे काही करार झाले होते त्या प्रमाणे, एम.आय.डी.सी. व्यवस्था करे पर्यंत आपण आपल फायर स्टेशन आणि फायरची गाडी त्या ठिकाणी ठेवावी. परंतु त्या सगळया संदर्भामध्ये महानगरपालिकेच फायर स्टेशन त्या ठिकाणी कायमस्वरुपी होऊ शकला नाही. त्याची व्यवस्था करता आली नाही म्हणुन या उद्योजक क्षेत्राच्या सर्व्हे मध्ये ही चर्चा होऊन निर्णय झालेला होता मा.पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली त्याच्यामध्ये हा प्लॉट महानगरपालिका पुन्हा त्यांच्या ताब्यात पहिल्या सारखा द्यावा आणि त्यांची मालकी त्यांचीच आहे. फक्त फायर स्टेशनसाठी आपल्याला दिला होता आणि फायर स्टेशन एम.आय.डी.सी.ने त्या ठिकाणी कायमस्वरुपी उपलब्ध करुन द्यावा. अश्या प्रकारे ही चर्चा झ ाालेली होती. त्याप्रमाणे जो काही सर्व्हे केला शासनाच्या समितीने पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली, जे निर्देश दिलेले होते त्याप्रमाणे आपण हा प्लॉट त्यांच्या ताब्यात दिलेला आहे. आता एम.आय.डी.सी. मधील एरियाच्या फायर ॲण्ड सेफ्टीची जबाबदारी एम.आय.डी.सी.कडे राहणार आहे. फक्त आपल्याला आपला जो डिझेल पंप आहे त्याची पर्यायी

व्यवस्था होईपर्यंत आपण एम.आय.डी.सी.ला विनंती केलेली होती. आमची पर्यायी व्यवस्था होईपर्यंत आमच्या कामांना काही अडथळा येऊ नये. म्हणुन आपली पर्यायी व्यवस्था होईपर्यंत आमचा डिझेल पंप त्या ठिकाणी चालु राहु द्या. तात्पुरत्या कालावधीसाठी आपल्याला परवानगी दिलेली आहे. कायमस्वरुपी ते प्लॉट आपल्याला त्यांच्याकडुन मागता येत नाही. आपण आपल्या जागेची व्यवस्था करु या मग आपला जेथे पंप शिफ्ट झाला मग ती पुर्ण जागा कायदेशीर एम.आय.डी.सी.ची राहील.

**नगरसचिव :-** विषय क्र.१४ चा सुचक कोण ?

**श्री.नितीन लढ्ढा : -** सदर विषय मान्य करण्यात येत आहे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.१४ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.६४० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, आयुक्त तथा जिल्हाधिकारी यांच्या दालनामध्ये दि.११/०१/२०१८ रोजी झालेल्या विभाग प्रमुख आढावा बैठकीमधील चर्चेनुसार मनपा मालकीच्या एम.आय.डी.सी. फायर स्टेशन येथील डिझेल पंप जळगांव शहरात शिफ्ट करणे बाबत मौखिक आदेश दिल्यानुसार मनपा मालकीच्या एकुण १२७ वाहनांना डिझेल भरणे कामी गेंदालाल मिल वाहनतळ, विविध विभागाकडील कार्यरत वाहनांना डिझेल भरणे कामी एम.आय.डी.सी. आर.एल.चौफुली पर्यंत सुमारे ८ ते १० किलोमिटर जाणे व येणे कामी लागणारा डिझेल खर्च तसेच त्यामुळे वेळेचा होणारा अपव्यय या बाबी लक्षात घेता डिझेल पंप जळगांव शहरातील मनपाच्या खुल्या जागेवर स्थलांतरित करणे विषयी आयुक्त तथा जिल्हाधिकारी यांचे समवेत झालेल्या बैठकीत ठरले.

त्याअनुषंगाने मनपा मालकीच्या सदया स्थितीत जळगांव शहरातील उपलब्ध जागा व जागे संदर्भातील आवश्यक कागदपत्र (जागेचा नकाशा, लेआऊटची प्रत) मनपा मालकीच्या व सातबारा उताऱ्यावर नांव असलेल्या जागा बाबत नगररचना विभागाकडून त्वरित माहिती मिळणेस रिपोर्ट सादर तसेच नगररचना विभागाकडून जागे संदर्भातील कागदपत्रे व उपलब्ध जागा बाबत माहिती वाहन विभागाकडे प्राप्त झालेनंतर डिझेल पुरवठा करणाऱ्या इंडियन ऑईल कंपनी पानेवाडी,मनमाड यांना डिझेल पंप शिफ्टींग करणे कामी मार्गदर्शन व येणारा खर्च आवश्यक असलेली कागदपत्रे व लागणाऱ्या NOC बाबत पत्र जा.क्र./जशमनपा/वा.व्य.वि/१५९/२०१७-१८ दि.१७/०१/२०१८ अन्वये पत्र देण्यात आले. तद्नंतर नगररचना विभागाकडून जळगांव शहरातील मनपा मालकीच्या सदया स्थितीत जळगांव शहरातील उपलब्ध जागा व जागे संदर्भातील आवश्यक कागदपत्र (जागेचा नकाशा, लेआऊटची प्रत) मनपा मालकीच्या व सातबारा उताऱ्यावर नांव असलेल्या जागा बाबत नगररचना विभागाकडून त्वरित माहिती मिळणे कामी दि.१५/०१/२०१८ रोजी टिप्पणी सादर करण्यात आली. त्याअनुषंगाने नगररचना विभागाकडून सर्व्हे नं.४२१ मेहरुण सिटी सर्व्हे नं.५५७६+५५७७ ही जागा शिवाजी उदयानालगत असुन १२ मिटर रोड लगत स्थित असुन सदर जागेची मालकीची महानगरपालिकेची असल्याबाबत व सदर जागेचे क्षेत्रफळ ८७९३ चौ.मी. असुन सदर जागा डिझेल पंप उभारणी कामी योग्य असल्याबाबत नगररचना विभागाचे अभिप्राय घेण्यात आले होते.

त्याअनुषंगाने जा.क्र./जशमनपा/वा.व्य.वि/१६७/२०१७-१८ दि.२४/०१/२०१८ अन्वये व्यवस्थापक, आय.ओ. सी.लि.पानेवाडी, मनमाड यांना स्थळ निरीक्षण करणे कामी कंपनीचे प्रतिनिधी पाठविणे बाबत पत्र देण्यात आले. त्यानुसार कंपनीचे प्रतिनिधी डिकेशकुमार वर्मा (सेल्स ऑफीसर) अमरावती सेल्स एरिया, नागपुर मंडळ यांनी नगररचना विभागाने सुचविलेल्या जागेची पाहणी करुन ले-आऊट प्लॅन

दि.१६/०२/२०१८ रोजी इंजिनिअरींग डिझाइन प्रमाणे मनपा बारनिशी आवक क्र.३६३६ दि.२०/०२/२०१८ वाहन विभाग आवक क्र.३८१ दि.२१/०२/२०१८ नुसार इंडियन ऑईल कार्पोरेशन लि.पश्चिमी क्षेत्र औरंगाबाद मंडळ कार्यालय प्लॉट नं.९९ ज्योती नगर औरंगाबाद यांचेकडून पत्र प्राप्त झाले होते. सदर डिझाइन नुसार नगररचना विभागाकडून साईड प्लॅनचे स्केलमध्ये रुपांतर करुन पुढील कार्यवाही नगररचना विभाग यांचेकडून प्राप्त झाले होते.

त्यानुसार नगररचना विभागामार्फत प्रत्यक्ष साईडवर जाऊन जागेवर मोजमाप घेवून चर्तुसीमेबाबत अभियप्राय घेण्यात आला होता व सदर डिझेल पंप गावात शिफ्ट करणे बाबतची बाब ही धोरणात्मक असल्याने मा.महासभेची मान्यता घेवून शहर अभियंता यांचे स्वाक्षरीने चार प्रतीत नकाशे सादर करुन नगररचना विभागाकडून मंजूरी घेणे कामी कार्यवाही करणे बाबत प्रस्तावीत केले होते. त्याअनुषंगाने डिझेल पंप सर्व्हे नं.४२१ मेहरुण सिटी सर्व्हे नं.५५७६+५५७७ ही जागा शिवाजी उदयानालगतची या ठिकाणी डिझेल पंप उभारणे कामी मा.महासभेपूढे प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

परंतु मनपाची सर्व वाहने महानगरपालिकेच्या जागेवर पार्कींग होत असतात त्यामुळे सदर डिझेल पंप हा गेंदालाल मिल परिसरात स्थलांतरित करणेस मा.महासभा ठराव क्र.९०० दि.०५/०५/२०१८ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली होती.

मात्र गेंदालाल मिल येथे अमृत योजनेअंतर्गत जलकुंभाची कामे सुरु असून प्रकल्प विभागाच्या मागणी रिपोर्ट नुसार महानगरपालिकेचे वाहनतळ देखील प्रभाग समिती क्र.३ टि.बी.एस.हॉस्पीटल या ठिकाणी स्थलांतरित करण्यात आलेले आहे. तसेच शिवाजीनगर उड्डाण पुलाचे देखील कामास सुरुवात होणार असल्याने व सदर पुल उभारणीस देखील बराच कालावधी लागणार असल्याने, व गेंदालाल मिल परिसर हा दाट लोकवस्तीचा परिसर असून सदर ठिकाणी डिझेल पंप स्थलांतरीत करणे योग्य होणार नाही असे मत तत्कालीन शहर अभियंता यांचे दि.२९/११/२०१८ रोजीच्या अभिप्रायात नमूद केलेले आहेत. व त्यास तत्कालीन आयुक्त यांनी देखील सहमती दर्शविलेली आहे.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी यांचेकडील क्र./स्वीय हा./कावि/२०२०/५६/१२७/३९०० चे दि.२०/१०/२०२० अन्वये तसेच जिल्हाधिकारी यांचे दालनातील दि.२३/१०/२०२० रोजीच्या बैठकीत महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळ जळगांव यांचेकडेस एम.आय.डी.सी. अग्निशमन केंद्राची जागा हस्तांतरित करणे बाबत चर्चेअंती सुचित करण्यात आलेले आहेत. त्याअनुषंगाने एम.आय.डी.सी.फायर स्टेशन येथे सदया सुरु असलेला डिझेल पंप पर्यायी व्यवस्था होईपर्यंत विनाअडथळा सुरु ठेवण्याच्या अटीवर अग्निशमन केंद्र एम.आय.डी.सी.कडे हस्तांतरित करण्यात यावे याबाबत आयुक्त यांनी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळ धुळे यांना दि.०४/१२/२०२० अन्वये पत्र दिलेले आहे.

प्रस्तावित बाबी लक्षात घेता सदया स्थितीमध्ये मनपाचे वाहनतळ टी.बी.एस.हॉस्पीटल येथे तयार झालेले असुन मनपाची सर्व वाहने या ठिकाणी पार्कींग होत असतात. प्रस्तावित केलेली डिझेल पंपाची जागा ही वाहनतळालगतचीच असल्याने यापुर्वीच प्रस्तावित केलेली असल्याने महानगरपालिकेचा एम.आय.डी.सी.फायर स्टेशन येथे कार्यरत असलेला डिझेल पंप हा टी.बी.एस. हॉस्पीटल वाहनतळ येथे स्थलांतरित करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं.१५:-** शहीद भगतसिंग व्यायाम शाळा देखभाल व व्यवस्थापन करणेकामी धोरणात्मक निर्णय घेणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हा ठराव मान्य करण्यात यावा आणि ती रक्कम जी आहे ती ५० हजारांच्या ऐवजी १ लाख रूपये करण्यात यावी.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** भाऊ नाही नाही मुंकुदाचा विषय आहे.

(सभागृहात सन्मा.सदस्यांनी चर्चा केली.)

**श्री.मुकुंदा सोनवणे :-** हा ठराव झालेला आहे. भाऊ ऑलरेडी त्याचा ठराव झालेला आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** भाऊ हा ठराव ऑलरे डी झाला आहे.

**श्री.मुकुंदा सोनवणे :-** ठराव क्रं. १९० दि. ०३/०८/२०१९ रोजी हा ठराव झालेला आहे. हा ठराव कन्टींन्यु ठेवुन हे नियम लावलेले आहेत त्यांनी आता याच्यामध्ये तिन वर्ष ऑडीट रिपोर्टसह

**श्री.सचिन पाटील :-** आप्पासाहेब

**श्री.कैलास सोनवणे :-** हो बरोबर लावले आहे ते ठिक आहे.

**श्री.मुकुंदा सोनवणे :-** हो ना

**श्री.सचिन पाटील :-** या व्यायाम शाळेच्या बद्दल मनपा प्रशासनाचे काय ध्येयधोरण आहे याबाबतीत ते स्पष्ट करा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** भाऊ त्याचे काय आहे की महानगरपालिकेच्या ज्या काही व्यायाम शाळा असतील. याच पध्दतीचे धोरण भविष्यात अवलंबविण्यात येईल.

**श्री.सचिन पाटील :-** हो भाऊ .

**श्री. कैलास सोनवणे :-** पुढचा विषय घ्या.

**श्री.सचिन पाटील :-** आप्पा बोलु देत नाहीत.

**श्री. कैलास सोनवणे :-** बोला ना हो.

**मा.महापौर :-** जळगांव शहरामध्ये मनपाच्या ज्या व्यायाम शाळा आहेत. त्या सर्व व्यायाम शाळांची त्या प्रत्येकाची मुदत संपलेली आहे. त्यामुळे त्या नव्याने मुदती देणेस नविन करार करुन त्याच संस्थेला देणे हे प्राधान्य आहे. तर त्या संदर्भातील जे ध्येयधोरण आहे. तर ते आपण जी पध्दती भगतसिंग व्यायाम शाळेसाठी राबविणार आहोत. तीच प्रक्रीया इतर व्यायाम शाळेलासुध्दा राबवावी आणि सर्वांची एकत्रित प्रक्रीया ही राबवावी.

**श्री. कैलास सोनवणे :-** हो घ्या पुढचा विषय घ्या.

**मा.महापौर :-** याबाबत प्रशासनाने याची नोंद घ्यावी आणि त्या अनुषंगाने विषय क्रं. १५ हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.६४१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, तत्कालीन जळगांव नगरपालिकेने, नपा संचलित व्यायामशाळांचे व्यवस्थापन सांस्कृतीक संस्थांना देणेबाबत तत्कालीन नगर पालिका ठराव क्र.१२६ दि.०४/०९/१९९५ रोजी शहीद भगतसिंग व्यायाम शाळा ही राष्ट्रीय मित्र मंडळ, मारोती पेठ,जळगांव यांना ९ वर्षे कराराने व्यवस्थापनेसाठी महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ चे कलम ९२(३) नुसार देणेचा प्रस्तावास मंजूरी देण्यात आलेली असून सदर प्रस्ताव शासनाच्या मान्यतेस सादर करण्यास सभेने मंजूरी दिलेली आहे.

त्यानुसार जा.क्र./न.पा./२८८५ दि.०९/१०/१९९५ अन्वये संचालक, न.पा. प्रशासन संचालनालय, मुंबई यांचेकडे पत्र व्यवहार केल्याचे दस्तऐवजांवरुन दिसून येते.

मात्र शासनाची मान्यता प्राप्त झाल्याचे कोणतेही दस्तऐवज उपलब्ध नाही. तसेच राष्ट्रीय मित्र मंडळ, मारोती पेठ, जळगांव यांना सन १९९५ पासून ९ वर्षे मुदतीने शहीद भगतसिंग व्यायाम शाळा व्यवस्थापनास दिल्यानंतर तद्नंतर मुदत संपल्यानंतर पुढील मुदतवाढ दिल्याचे ही दिसून येत नाही.

तसेच आयत्या वेळच्या विषय क्र.०३ नुसार महासभा ठराव क्रमांक १९० दि.०३/०८/२०१९ रोजी महानगरपालिका संचलित चौबे प्रांगणातील शहीद भगतसिंग व्यायाम शाळा देखभालीसाठी अध्यक्ष, शनिपेठ मित्र मंडळ,जळगांव यांना चालविण्यासाठी देण्यास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. मात्र सदर ठरावात व्यायाम शाळा किती वर्षासाठी देण्यात आली व कशापध्दतीने दयावी याबाबतची कोणतीही प्रक्रिया नमूद नाही. तसेच सदर प्रकरणी शासन आदेश/निर्देशानूसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन नियमाप्रमाणे कार्यवाही करावी असे नमूद आहे. सदरची व्यायाम शाळा सदया राष्ट्रीय मित्र मंडळ,जळगांव यांचे व्यवस्थापन आहे.

मात्र राष्ट्रीय मित्र मंडळ, संचलीत शहीद भगतसिंग व्यायाम शाळेचे व्यवस्थापक सदरची व्यायाम शाळा गेल्या ४० वर्षापासून कालावधीपासून आम्ही विनामुल्य व्यायाम शाळा चालवित असून त्यांनी सदर ठरावाची अंमलबजावणी करु नये असा अर्ज दि.०९/०८/२०१९ मा.महापौर, मा.उपमहापौर, मनपा,जळगांव यांचे कार्यालयाकडून मिळकत व्यवस्थापन विभागास प्राप्त झालेला आहे.

तसेच रिट पिटीशन क्र.७७३०/२०१५ चे मे.उच्च न्यायालय, औरंगाबाद यांनी दिलेल्या निर्देशानुसार महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही जागा अथवा इमारत कोणत्याही संस्थेस अथवा व्यक्तीस दयावयाची झाल्यास विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुनच सदरची जागा वितरीत करणे क्रमप्राप्त आहे. त्यानुसार शहरातील नोंदणीकृत सामाजिक संस्थेकडून देकार मागविण्यात येवून त्यातील सर्वाधिक स्वामित्व शुल्क देणाऱ्या संस्थेस व्यायाम शाळेचे व्यवस्थापन व देखभालसाठी देण्यात यावी. यामुळे सर्वाना समान संधी प्राप्त होऊन योग्य संस्थेची निवड करता येऊ शकते.

१) महानगरपालिकेने बांधकाम केलेल्या व्यायामशाळा केवळ व्यवस्थापन व देखभालीसाठी देण्यात येईल.
२) जळगांव शहरातील सामाजिक काम करणाऱ्या नोंदणीकृत संस्थेकडून देकार स्विकारुन निवडलेल्या संस्थेकडून अनामत रक्कम रु.०१ लक्ष मात्र महानगरपालिकेकडे जमा करणे आवश्यक राहील.
३) नोंदणीकृत संस्थेचे मागील ३ वर्षाचे लेखापरिक्षण अहवाल (ऑडीट रिपोर्ट) केलेले असणे आवश्यक राहील.
४) व्यायामशाळा निहाय व्यवस्थापन व देखभाल यावरील येणारा खर्च भागविण्यासाठी योग्य ते शुल्क प्रशासनाने निश्चित करावे त्यानंतर देकार मागविण्यात यावेते. N0t for Profit तत्वाचा अवलंब करावा.
५) या संस्थांना किमान ५ वर्षे व्यवस्थापन व देखभाल करण्याकरिता देण्यात यावे. या संबंधीत व्यक्ती/ संस्थानी महानगरपालिका अटी व नियमांचे पालन न केल्यास त्यांचेकडील व्यवस्थापन काढून घेण्याचा अधिकार आयुक्ताना राहील.
६) ज्या संस्थांना सदरची जागा व्यवस्थापन व देखभालसाठी देण्यात आलेली आहे अशा संस्थांना परस्पर पोट भाडयाने किंवा अन्य संस्था किंवा व्यक्तीस व्यवस्थापनासाठी देणे अनुज्ञेय राहणार नाही.
७) ज्या संस्थेस/ व्यक्तीस महानगरपालिकेची इमारत मंजूर झाली असेल त्यांनी सदर नेमून दिलेली अनामत रक्कमेचा भरणा पूर्णपणे १५ दिवसाचे आत भरणे आवश्यक राहील. पूर्ण अनामत रक्कमेचा

भरणा केल्याशिवाय तसेच आवश्यक तो करारनामा केल्यानंतरच संबंधीत जागेचा ताबा महानगरपलिकेकडुन देण्यात येईल.

८) महानगरपालिकेची जागा अथवा इमारत वापराबाबत योग्य वाटतील अशा अतिरिक्त अटी, शर्ती व निर्बंध लादण्याचा अधिकार आयुक्तांना असेल.

९) कराराची मुदत संपल्यानंतर सदर जागा स्वत:हून महानगरपालिकेच्या ताब्यात देणे बंधनकारक राहील. तसेच मुदत वाढ न दिल्यास त्याबाबत कोणत्या ही प्रकारचा दावा न्यायालयात दाखल करता येणार नाही किंवा सदर संस्थेस किंवा व्यक्तीस हक्क सांगता येणार नाही.

१०) सदरच्या जागेचा विनियोग हा ज्या कामा करिता देण्यात आलेला आहे त्याच कामा करीता वापर करता येईल. त्याचा अन्य कोणत्याही कामासाठी करता येणार नाही.

११) सदरच्या व्यायामशाळेत असणाऱ्या साहित्यांची अदयावत नोंदी ठेवण्यात याव्यात. तसेच त्यांना इतर साहीत्याची आवश्यकता भासल्यास संबंधीत संस्थेने ते स्वखर्चाने विकत घेण्यात यावे. त्यास महानगरपालिका कोणताही निधी उपलब्ध करुन देणार नाही.

१२) सदर व्यायामशाळा ताब्यात दिल्यानंतर जर त्या ठिकाणी काही स्वच्छता गृहाची दुरुस्ती किंवा इतर डाग डूजी, रंग रंगोटी करावयाची झाल्यास त्याबाबतचा सर्व खर्च संबंधीत संस्थेस करावा लागेल. त्याकरीता महानगरपालिकेकडून कोणताही निधी उपलब्ध करुन देता येणार नाही.

१३) तसेच व्यायामशाळेकरीता इलेक्ट्रीक मिटरचे कनेक्शन स्वखर्चाने घेऊन त्याचे विज बील भरण्याची जबाबदारी ही व्यायामशाळा चालकाची राहील.

१४) व्यायामशाळेत प्रशिक्षित व्यायामपटू नेमण्याची जबाबदारी संस्था चालकाची राहील. त्यांना मानधन किंवा वेतन देण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

१५) व्यायामशाळेत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी लागल्यास त्याचे महानगरपालिकेकडून रितसर अर्ज करुन नियमाप्रमाणे नविन नळ संयोजनासाठी लागणारी फी भरुन नळ कनेक्शन घ्यावे लागेल व त्याची दरवर्षी नियमित नळ संयोजनाचे बील भरणा करावा लागेल.

१६) स्वच्छता गृहाची व परिसराची साफसफाई ठेवण्याची जबाबदारी ही सदर संस्थेची राहील.

तसेच यापूर्वी आयत्या वेळच्या विषय क्र.०३ नुसार महासभा ठराव क्रमांक १९० दि.०३/०८/२०१९ रोजी महानगरपालिका संचलित चौबे प्रांगणातील शहीद भगतसिंग व्यायाम शाळा देखभालीसाठी अध्यक्ष, शनिपेठ मित्र मंडळ,जळगांव यांना चालविण्यासाठी देणेबाबत पारित ठराव रद्द करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार जळगांव शहर महानगरपालिकेने शहरातील ज्या संस्थाना व्यायामशाळा चालविणेकामी दिलेल्या आहेत त्यातील बहुतेक व्यायामशाळांची मुदत संपलेली असून त्या सर्व व्यायाम शाळा व्यवस्थापन व देखभाल करण्यासाठी कोणत्याही संस्थेस किंवा व्यक्तिस देणेकामी जे ध्येयधोरण आहे ते आपण जी पध्दती भगतसिंग व्यायाम शाळेसाठी राबविणार आहोत तीच प्रक्रीया इतर व्यायाम शाळेसाठी सुध्दा राबवावी आणि सर्वांची एकत्रीत प्रक्रिया राबवावी.

उपरोक्त प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे संपूर्ण कार्यवाही करुन उपरोक्त अटी/ शर्तीनुसार व्यायाम शाळा देखभाल व व्यवस्थापन करणेकामी देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं:-१६**) जळगांव शहर महानगरपालिका अंतर्गत RCH अंतर्गत कार्यरत वैदयकीय अधिकारी व परिचारीका यांना पुर्ननियुक्ती देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपल्याकडे कार्यरत असलेल्या परिचारीका यांना करारपध्दतीने सन २००८ पासुन महापालिकेत काम करत असुन त्यांना NUHM अंतर्गत समाविष्ट केल्यास त्यांची सेवाज्येष्ठता संपुष्टात येवुन भविष्यात कायम सेवेची संधी उपलब्ध झाल्यास त्यांच्यावर कायमचा अन्याय होईल. त्यामुळे त्यांना RCH च मध्ये ठेवुन वैद्यकीय अधिकाऱ्यांसोबत सेवेचा प्रस्ताव शासनाची मान्यता घेण्यासाठी पाठवावा. तोपर्यंत सदर कर्मचारी किंवा वैद्यकीय अधिकारी यांना ३१ डिसेंबर २०२२ पर्यंत तात्पुरत्या स्वरुपात करार तत्वावरती असलेले मुदतवाढ देवुन आणि १०१०४/- रू. मानधन वाढ करून आणि त्याच्यावर ५ टक्के वाढ करून १०६०९/- रू. मानधनावर त्यांना नियुक्ती देण्यात यावी. हे आपण त्यांना लेखी सुचना देत आहोत.
**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** विषय क्रं. १६ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.
**श्री.महेश चौधरी :-** महापौर महोदय, मला बोलायचे आहे या विषयी मंजुरी आहे याला RCH ला मला आपल्या डॉंक्टरांकडून काही अपेक्षा आहेत. कारण जळगांव महापालिकेचे आठ हेल्थ पोस्ट आहेत . RCH अंतर्गत जे कार्यक्रम राबविले जातात. आजच्या परिस्थितीत जळगांव महापालिकेमध्ये व्हॅक्सिनेशन शिवाय कुठलाही कार्यक्रम राबवत नाहीत. थोडे लक्ष दिले पाहीजे आयुक्त साहेबांनी या गोष्टीकडे की आज पाहीले तर बाहेरील रूग्ण तपासणीची परिस्थिती खुप खराब आहे. बाह्यरूग्ण आपल्याकडे तपासणी होतच नाहीये. काही ठिकाणी दोन ते तिन हेल्थ पोस्ट असे आहे की तिथे चांगल्या प्रकारे होते आणि बाकीच्या ठिकाणी होत नाही. तर वस्तुस्थिती ही आहे मी महापालिकेने बंद करण्यात आहे. तर ते महापालिकेकडुन चालु झाले पाहीजे. कारण जळगांव शहरातील नागरीकांना ते गेले तर त्यांना सरळ सिव्हिलला पाठवले जाते. असे नाहीये सिव्हिल हे जिल्हयासाठी आहे. सिव्हिल हे फक्त जळगांव शहरासाठी नाहीये. त्यामुळे आपण याचा सुध्दा विचार केला पाहीजे. त्याच्यासाठी चांगले डॉक्टर सुध्दा तुम्ही भरा त्याच्यासाठी कुठलेही ऑब्जेक्शन नाहीये. पण जी परिस्थिती आहे जळगांव शहराची जे हेल्थ पोस्टची जी आहे ती आजारी आहे असे माझे म्हणणे आहे. तर ती सुरू करण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहीजे. त्याच्यानंतर ज्यांनी ज्यांनी व्हॅक्सिनेशन केले आहे. मग त्या आशासेविका असतील , एएनएम , जीएनएम असतील किंवा डॉक्टर असतील. सर्वांनी जे व्हॅक्सिनेशन वाले जे खुप चांगले काम करताहेत.त्यांना महापालिकेतर्फे सन्मान पत्र द्यावे . त्यांचा सन्मान केला जावा अशी माझी विनंती आहे.त्याच्यानंतर आशासेविकांचा एक विषय आहे. आशासेविका या जरी एकत्रित मानधनावर असल्या तरी त्यांच्या मानधनाचा त्यांना भंयकर त्रास होतो. आज मी एका आशासेविकेशी बोललो होतो . तर त्या एक गरीब कुटुंबाचे असल्याने त्यांच्या घरी खायचे वांदे आहे. त्यांना तिन तिन , चार चार महिने पगार नाहीये. फक्त आपल्याकडे स्टाफ नाहीये म्हणुन पगार दिला जात नाही. त्यांचे व्हाऊचर दिले जात नाही. तर माझी विनंती आहे प्रशासनाला की त्याच्यातही सुध्दा लक्ष घालावे आणि त्यांचे सुध्दा पगार रेग्युलर देण्यात यावे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६४२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका अंतर्गत आर.सी.एच. फेज २ अंतर्गत काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा करार हा दिनांक ३१/१२/२०२१ रोजी संपत असल्याने दिनांक ०१/०१/२०२२ रोजी एक दिवसाचा खंड देऊन पूढील पुर्ननियुक्ती सदयस्थितीत देय असलेल्या मानधनात ५ टक्के मानधन वाढ देऊन दिनांक ०३/०१/२०२२ ते ३१/१२/२०२२ पर्यंत दयावयाची आहे.

सदर अधिकारी / कर्मचारी यांचा तपशिल खालील प्रमाणे

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचाऱ्याचे नांव | कार्यरत असलेल्या हेल्थपोस्ट व दवाखान्याचे नांव | मुळ मानधन | प्रस्तावीत ५% नुसार वाढीव मानधन | पुर्ननियुक्ती देण्याचा कालावधी दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ.पल्लवी प्रभाकर नारखेडे, वैदयकीय अधिकारी | शाहीर अमर शेख दवाखाना, सुभाष चौक हेल्थ पोस्ट | ३३०६९ | ३४७२२ | ०३/०१/२०२२ ते ३१/१२/२०२२ |
| २ | डॉ.पल्लवी किसनराव पाटील, वैदयकीय अधिकारी | म.मो.मुलतानी दवाखाना, मेहरुण गावठाण हेल्थपोस्ट | ३३०६९ | ३४७२२ | |
| ३ | डॉ.सोनल गिरीष जोशी,वैदयकीय अधिकारी | नानीबाई अग्रवाल दवाखाना,इंडीया गॅरेज हेल्थपोस्ट | ३३०६९ | ३४७२२ | |
| ४ | डॉ.सायली चंद्रकांत पवार,वैदयकीय अधिकारी | डी.बी.जैन दवाखाना शिवाजी नगर हेल्थपोस्ट | ३३०६९ | ३४७२२ | |
| ५ | श्रीमती योगिता बबन बावीस्कर, परिचारीका | पिंप्राळा हुडको दवाखाना,पिंप्राळा हेल्थपोस्ट | १०१०४ | १०६०९ | |

उपरोक्त नमुद प्रमाणे अधिकारी व कर्मचारी यांचा करार हा दिनांक ३१/१२/२०२१ रोजी संपत आहे. जळगांव शहर महानगरपालिका अंतर्गत वैदयकीय अधिकारी यांची संख्या कमी असल्याने रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून वरील वैदयकीय अधिकारी व परिचारीका यांना पुर्न नियुक्ती देणे आवश्यक आहे. वर नमुद तक्त्यातील १ ते ५ कर्मचारी हे त्यांचे नावा समोर दर्शविलेल्या ठिकाणी कार्यरत असून, त्या ठिकाणी OPD, गरोदर माता (ANC), यांची दैनंदिन तपासणी तसेच वेळोवेळी राष्ट्रीय कार्यक्रम राबविण्यात येत असतात. उदा.,नियमित लसिकरण, वार्षिक लसिकरण मोहिम, जननी सुरक्षा योजना, प्रधान मंत्री मातृत्व वंदना योजना, मिशन इंद्र धनुष्य यासारख्या कार्यक्रमांसाठी सदर वैदयकीय अधिकारी व कर्मचारी हे आपली नित्य सेवा देत असतात. तसेच जागतिक महामारी कोविड-१९ हया साथ रोगाचा जळगांव शहरात जास्त प्रमाणात प्रादुर्भाव झालेला असता त्या काळातही त्यांनी अहोरात्र आपली सेवा देवून कर्तव्य बजावलेले आहे. तसेच यापुर्वी ही वैदयकीय अधिकारी यांची मनुष्यबळ कमी असल्याने वरील चार वैदयकीय अधिकारी व एक परिचारीका यांना सदयस्थितीत देय असलेल्या मानधनात ५% वेतनवाढ देवून पूढील पुर्न नियुक्ती दिनांक ०३/०१/२०२२ ते ३१/१२/२०२२ पर्यंत देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

NUHM अंतर्गत आवश्यक तेवढे वैदयकिय अधिकारी उपलब्ध झाल्यास याबाबत प्राप्त परिस्थिती विचारात घेऊन निर्णय घेणे तसेच प्रस्तावातील परिचारीका या पदाच्या वेतनाचा मनपा वरील आर्थिक भार कमी होणार असल्याने सदर प्रस्तावातील परिचारीका यांना मंजूर NUHM अंतर्गत परिचारीका पदावर सामावून घेणेत यावे असे प्रस्तावात नमूद आहे.

परंतू सन्मा.सदस्य यांनी सभागृहात केलेल्या सुचनेनुसार प्रस्तावातील कार्यरत असलेल्या परिचारीका करारपध्दतीने सन २००८ पासुन महापालिकेत काम करत असुन त्यांना NUHM अंतर्गत समाविष्ट केल्यास

त्यांची सेवाजेष्ठता संपुष्टात येवुन भविष्यात कायम सेवेची संधी उपलब्ध झाल्यास त्यांच्यावर कायमचा अन्याय होईल. त्यामुळे त्यांना RCH मध्येच ठेवुन वैदयकीय अधिकाऱ्यांसोबत कायम सेवेचा प्रस्ताव शासनाची मान्यता घेण्यासाठी पाठवावा. तोपर्यंत सदर कर्मचारी किंवा वैदयकीय अधिकारी यांना ३१ डिसेंबर २०२२ पर्यंत तात्पुरत्या स्वरुपात करार तत्वावरती असलेली मुदतवाढ देवुन आणि १०,१०४/- रु. मानधन वाढ करुन आणि त्याच्यावर ५ टक्के वाढ करुन १०,६०९/- रु. मानधनावर त्यांना नियुक्ती देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं.१७**:- जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत किंवा वेळोवेळी शासन स्तरावर जो निधी उपलब्ध होईल त्या योजने अंतर्गत प्रभाग क्र.११ मधील विविध १ ते ४ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.५३,५९,७७०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत मा.सभागृहनेता, श्री.ललित विजय कोल्हे यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६४३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नागरीकांना मुलभुत सोयीयुक्त पुरविणे तसेच रहदारी व वाहतुकीच्या सेवा पुरविणे कामी जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत किंवा वेळोवेळी शासन स्तरावर जो निधी उपलब्ध होईल त्या योजने अंतर्गत प्रभाग क्र.११ मधील खालील नमूद विविध १ ते ४ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.५३,५९,७७०/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.११ पिंप्राळा शिवार अंतर्गत गट नं.७८ मधील ओपन स्पेसला चेनलिंक फेन्सिंग करणे. | रु.१५,०६,९२४/- |
| २ | प्रभाग क्र.११ पिंप्राळा शिवार अंतर्गत गट नं.१०४ मधील ओपन स्पेसला चेनलिंक फेन्सिंग करणे. | रु.१८,७१,४४५/- |
| ३ | प्रभाग क्र.११ पिंप्राळा शिवार अंतर्गत गट नं.१४५ श्री.कुलगुरु समोरील ओपन स्पेसला चेनलिंक फेन्सिंग करणे. | रु.१४,३१,४०१/- |
| ४ | प्रभाग क्र.११ रामानंद स्टॉप जवळ जेष्ठ नागरिक यांचेकरिता ओपन लायब्ररी व बसणे करीता चौक सुशोभिकरण करणे. | रु.५,५०,०००/- |
| | एकूण रक्कम - | रु.५३,५९,७७०/- |

जिल्हा वार्षीक योजना अंतर्गत या आर्थिक वर्षात निधी मिळण्याची शक्यता कमी असल्याने सन्मा.सदस्यांचा पत्रांचा विचार करता जी कामे जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सन २०२१-२२ असे नमूद केलेली आहेत असे सर्व प्रस्तावीत कामे सन २०२१-२२ ऐवजी सन २०२२-२३ मध्ये सदरील प्रस्ताव प्रशासनाने प्रस्तावित करुन निधी संदर्भात पाठविण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं .१८:-** जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत किंवा वेळोवेळी शासन स्तरावर जो निधी उपलब्ध होईल त्या योजने अंतर्गत प्रभाग क्र.११ मधील विविध १ ते ५ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.३,०७,११,८७२/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत मा.सभागृहनेता, श्री.ललित विजय कोल्हे यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६४४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नागरीकांना मुलभुत सोयीयुक्त पुरविणे तसेच रहदारी व वाहतुकीच्या सेवा पुरविणे कामी जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत किंवा वेळोवेळी शासन स्तरावर जो निधी उपलब्ध होईल त्या योजने अंतर्गत प्रभाग क्र.११ मधील खालील नमूद विविध १ ते ५ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.३,०७,११,८७२/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.११ रामानंद नगर व यशवंत नगर मधील गट नं.१४७ व १४८ मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.९३,८५,००५/- |
| २ | प्रभाग क्र.११ रामानंद घाट श्री.अंबोरे यांचे घर व यशवंत नगर मधील रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | रु.३२,७१,३३३/- |
| ३ | प्रभाग क्र.११ पिंप्राळा गट नं.१४९ मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.७८,२४,७६२/- |
| ४ | प्रभाग क्र.११ पिंप्राळा गट नं.१३२ व्यंकटेश नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.५०,७८,७६१/- |
| ५ | प्रभाग क्र.११ साई संस्कार कॉलनी, पिंप्राळा गट नं.१५२/२+३ मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.५१,५२,०११/- |
| | एकूण रक्कम - | रु.३,०७,११,८७२/- |

जिल्हा वार्षीक योजना अंतर्गत या आर्थिक वर्षात निधी मिळण्याची शक्यता कमी असल्याने सन्मा.सदस्यांचा पत्रांचा विचार करता जी कामे जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सन २०२१-२२ असे नमूद केलेली आहेत असे सर्व प्रस्तावीत कामे सन २०२१-२२ ऐवजी सन २०२२-२३ मध्ये सदरील प्रस्ताव प्रशासनाने प्रस्तावित करुन निधी संदर्भात पाठविण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं.१९:-** जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत किंवा वेळोवेळी शासन स्तरावर जो निधी उपलब्ध होईल त्या योजने अंतर्गत प्रभाग क्र.११ मधील विविध १ ते ५ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम

रु.२,७२,२२,११४/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत मा.सभागृहनेता, श्री.ललित विजय कोल्हे यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६४५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नागरीकांना मुलभुत सोयीयुक्त पुरविणे तसेच रहदारी व वाहतुकीच्या सेवा पुरविणे कामी जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत किंवा वेळोवेळी शासन स्तरावर जो निधी उपलब्ध होईल त्या योजने अंतर्गत प्रभाग क्र.११ मधील खालील नमूद विविध १ ते ५ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.२,७२,२२,११४/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.११ पिंप्राळा शिवार गट नं.६१,६२ व ६३ कोल्हे नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.१,०४,०५,१७६/- |
| २ | प्रभाग क्र.११ दत्त डिगंबर हौ.सो.व गुलमोहर कॉलनी गट नं.१५२/४/१+२, १५१/१, १५२/२ मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.६२,८२,६५८/- |
| ३ | प्रभाग क्र.११ पिंप्राळा शिवार गट नं.६४ व ७८ मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.३२,०३,२५१/- |
| ४ | प्रभाग क्र.११ पिंप्राळा शिवार गट नं.१४१ मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.४३,४५,९८९/- |
| ५ | प्रभाग क्र.११ पिंप्राळा शिवार गट नं.१४३ व १४४ मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.२९,८५,०४०/- |
| | एकूण रक्कम - | रु.२,७२,२२,११४/- |

जिल्हा वार्षीक योजना अंतर्गत या आर्थिक वर्षात निधी मिळण्याची शक्यता कमी असल्याने सन्मा.सदस्यांचा पत्रांचा विचार करता जी कामे जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सन २०२१-२२ असे नमूद केलेली आहेत असे सर्व प्रस्तावीत कामे सन २०२१-२२ ऐवजी सन २०२२-२३ मध्ये सदरील प्रस्ताव प्रशासनाने प्रस्तावित करुन निधी संदर्भात पाठविण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं.२०**:- जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत किंवा वेळोवेळी शासन स्तरावर जो निधी उपलब्ध होईल त्या योजने अंतर्गत प्रभाग क्र.११ मधील विविध १ ते ५ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.५,५९,५९,९६५/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत मा.सभागृहनेता, श्री.ललित विजय कोल्हे यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६४६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नागरीकांना मुलभुत सोयीयुक्त पुरविणे तसेच रहदारी व वाहतुकीच्या सेवा पुरविणे कामी जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत किंवा वेळोवेळी शासन स्तरावर जो निधी उपलब्ध होईल त्या योजने

अंतर्गत प्रभाग क्र.११ मधील खालील नमूद विविध १ ते ५ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.५,५९,५९,९६५/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.११ पिंप्राळा शिवार गट नं.६५,६६,६९,७० व ७६ मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.१,३०,९८,१४१/- |
| २ | प्रभाग क्र.११ पिंप्राळा शिवार गट नं.१५० किसनराव नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.८३,२७,३८८/- |
| ३ | प्रभाग क्र.११ मुंदडा नगर पिंप्राळा शिवार गट नं.१०१ मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.१,३५,९०,७२४/- |
| ४ | प्रभाग क्र.११ भगवान नगर, भूषण कॉलनी पिंप्राळा शिवार गट नं.१०२,१०४ मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.१,२३,१७,१९८/- |
| ५ | प्रभाग क्र.११ शास्त्री नगर, अंबिका हौ.सो. व जीवन नगर मधील गट नं.१०५,१०६,१०७ मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.८६,२६,५१४/- |
| | एकूण रक्कम - | रु.५,५९,५९,९६५/- |

जिल्हा वार्षीक योजना अंतर्गत या आर्थिक वर्षात निधी मिळण्याची शक्यता कमी असल्याने सन्मा.सदस्यांचा पत्रांचा विचार करता जी कामे जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सन २०२१-२२ असे नमूद केलेली आहेत असे सर्व प्रस्तावीत कामे सन २०२१-२२ ऐवजी सन २०२२-२३ मध्ये सदरील प्रस्ताव प्रशासनाने प्रस्तावित करुन निधी संदर्भात पाठविण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं.२१**:- नियोजन मंडळ/आमदार निधी/मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्र.०४ मधील राम मंदीर चौक पासून ते स्नेह चौक विठ्ठल मंदीर (मठगल्ली) ते साईबाबा मंदीर ते एकता चौक विठ्ठल पेठ (जुना नशीराबाद रोड) पर्यंतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.६२,००,०००/- लक्ष मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या,सौ.भारती कैलास सोनवणे यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कैलास सोनवणे :-** मंजुर करण्यास काहीच हरकत नाही. परंतू आता ज्याला ज्या ज्या विषयावर बोलायचे असेल त्याने त्याच्या त्याच्या विषयावरती चर्चा करून घ्यावी. याच्यापैकी २१ नंबरच्या विषयावर मी बोलतोय आता २१ नंबरचा जो विषय आहे ना नियोजन मंडळ जर आपला निधी मनपाच्या अंतर्गत प्रभाग क्रं. ४ मध्ये राम मंदिराचा जो जो रस्ता आहे . तर त्याच्यामध्ये २० लाख रू. ऑलरेडी राजुमामांनी दिले आहे. १० कोटी ७८ लाख रू. आपण जो निधी आणला होता गुलाबभाऊंकडून त्याच्यामध्ये १ कोटीचा जो प्रस्ताव होता. तो चुकीने १० झाला होता म्हणुन आपल्याला त्यांचे एक पत्र आले की ते १० लाख जे आहे ते १० लाख आता या रस्त्यासाठी गोराणेसाहेब तुम्ही लक्ष द्या तुम्हाला ठराव तयार करायचा आहे . तुम्ही म्हणताहेत तसे मी वाचुन दाखवित आहे.

**नगरसचिव :-** हो

**श्री.नितीन लढ्ढा :-** आप्पा ठरावात दुरूस्ती करतांना आहे ना

**श्री.कैलास सोनवणे :-** आहे ना , भाऊ राम मंदिर चौक पासुन ते स्नेह चौक विठ्ठल मंदिर (मठगल्ली) ते साईबाबा मंदिरापर्यंतचा रस्ता कॉंक्रीटीकरण करणे आता हा याच्यामध्ये हे दहा लाख आणि २० मनपा निधी मध्ये आणि ३२ लाख याच्यामध्ये पाहीजे आणि साईबाबा मंदिर ते एकता चौक विठ्ठल पेठ जुना (नशिराबाद रोड ) हा रस्ता कॉक्रीटीकरण करणे असा हा प्रस्ताव घेण्यात यावा . तसेच २२ नंबरचा जो विषय आहे. तो जिमचा विषय होता तर

त्याच्या मध्ये काही निधी भेटत नाहीये. निधीमध्ये मला ते काही पटत नाही आहे. त्याच्यामुळे ते मनपा फंडातुन करण्यात यावे आणि लगेच टेंडर काढण्यात यावे. आता ज्याला कोणाला ५० नंबर पर्यंतच्या विषयाबद्दल बोलायचे असेल त्यांनी बोलावे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.६४७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्र.०४ मधील राम मंदीर चौक पासून ते स्नेह चौक विठ्ठल मंदीर (मठगल्ली) ते साईबाबा मंदीर ते एकता चौक विठ्ठल पेठ (जुना नशीराबाद रोड) पर्यंतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणेसाठी कामाची एकूण रक्कम रु.६२,००,०००/- असून त्यापैकी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत यापूर्वी प्रभाग क्र.४ व ५ अंतर्गत पांझरापोळ ते दधिची चौक व दधिची चौक ते टॉवर पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे कामी रक्कम रु.१०,००,०००/- मात्रला मिळालेली प्रशासकीय मान्यता चुकीची प्राप्त झालेली असल्याने सदरचे काम रद्द करण्यात आलेले असल्याने शिल्लक असलेली रक्कम रु.१०,००,०००/- मधून नव्याने प्रस्तृत कामाकरीता खर्च करणेस तसेच रक्कम रु.२०,००,०००/- निधी आमदार निधीमधून मिळणार असल्याने उर्वरीत निधी रक्कम रु.३२,००,०००/- मात्र हा म.न.पा.मधून उपलब्ध करुन देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं.२२**:- महासभा ठराव क्र.२०४ दि.२९/०८/२०१९ अन्वये जिल्हा विकास योजने अंतर्गत प्रभाग क्र.०३ मधील जळगांव शिवार स.नं.१०१/१ १०१/२ १०१/३ मध्ये आरक्षण क्र.४८ मध्ये शाळा विकसीत करणेस मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे परंतू गेल्या २ वर्षात जिल्हा विकास योजने अंतर्गत निधी उपलब्ध झालेला नाही त्यामुळे सदर ठरावात नमूद आरक्षण क्र.४८ चा विकास मनपा निधीतून त्वरीत करणेबाबत सन्मा.सदस्या,सौ.भारती कैलास सोनवणे यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** १७ ते ५० जे आहेत ना ते मान्य करण्यात यावे. विषय क्रं. १७ ते ५० हे सगळे विकासकामांचे नगरसेवकांचे प्रस्ताव आहेत म्हणुन ते सगळे मान्य करण्यात यावेत.

**मा.उपमहापौर :-** सदरील विषयांना माझे अनुमोदन आहे. ज्या ज्या सदस्यांनी जिल्हा वार्षिक योजना २०२१ आणि २०२२ असा उल्लेख केलेला आहे. तर मला वाटत नाही की आता हे अजेंडयावर एवढे विषय आहेत तर हा निधी या आर्थिक वर्षात मिळेल . म्हणुन मला अस वाटत की सन्मा.सदस्यांच्या पत्रांचा विचार करता २०२१-२२ ऐवजी २०२१-२२ मध्ये हा खर्चिक व पुर्ण निधी आहे म्हणुन हा येणारा निधी २०२२-२३ मध्ये सदरील प्रस्ताव हे प्रशासनाकडुन प्रस्तावित करून निधी संदर्भात पाठविण्यात यावे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** योग्य आहे. योग्य आहे आणि ठराव हाही तसा करून घेण्यात यावा

**मा.उपमहापौर :-** हो भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** की जिल्हा नियोजन मंडळाच नांव बदल करून देण्यात यावे . कारण आपण काय करतोय की हे पुर्णच टेंडर काढा . म्हणजे जो कायद्याने मिळणारा निधी आहे. त्याच्या कित्येक पटीने आपली मागणी जास्त आहे. तरी सुध्दा आपण जास्तीत जास्त निधी शासनामार्फत मिळाला पाहीजे.

**मा.उपमहापौर :-** हो भाऊ शासनाकडुनही आपल्याला निधी मिळाला पाहीजे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही ठिक आहे ना तशी दुरूस्ती आपण करून घ्यायला पाहीजे.

**मा.उपमहापौर :-** हा निधी आर्थिक वर्ष २०२१-२२ ऐवजी सन २०२२-२३ मध्ये हा ठराव करून घेऊ.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो तेवढी दुरूस्ती करून घेण्यात यावी.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** महापौर महोदया,

**श्री.दिलीप पोकळे :-** महापौर मॅडम , आयुक्त साहेबांनी मला एक उत्तर द्यायचे आहे. आता आमदार स्थानिक विकास कामांचा जो निधी आहे आपला विकास कामांचा माझ्या प्रभाग क्रं. ०१ मध्ये केशरबाग परिसर सिटीएस नं.२७०१ यांची निविदा निघाली . निविदेचे फक्त मंजुरी घ्यायची राहीली आहे त्यात टेक्निकल प्राब्लेम मंजुरी घ्यायची राहील. त्याच्यामध्ये या प्रभागामध्ये जिल्हाधिकारी आपले आयुक्त साहेब , शहर अभियंता , निविदा समिती या सर्वांची सही होवुन ते प्रकरण वर्कऑर्डर पर्यंत आले. आता आपले सन्मा. आमदार राजुमामा भोळे यांनी पत्र दिले की निधी नाहीये म्हणुन सदरचे काम हे रद्द करण्यात यावे. त्या प्रकरणाचे या मिटींगपर्यंत आता तिन महिने झाले मला काहीच माहिती नाहीये आणि आता आजच्या मिटींगमध्ये आमदारांच्या निधीमध्ये बहुसंख्य काम आहेत. अशावेळेस आपली संपुर्ण यंत्रणा राबविल्यानंतर आपल्या निविदेपर्यंत काम केल्यानंतर निविदा प्रक्रीया झाल्यानंतर तो निधी रद्द करतात. तेही टेक्निकल कारण नसतांना या पुर्ण बंच मध्ये दहा क्युऱ्या काढल्या आहेत. त्यांनी दिलेले पत्र योग्य आहे की आपल्या अधिकाऱ्यांनी केलेले काम योग्य आहे का आपले अधिकारी आपले महानगरपालिका प्रशासन आपली यंत्रणा या टेक्निकल बाबी वगळुन काढुन / ओढुन काम करतय याचा आपण खुलासा करावा.

**श्री.कैलास सोनवणे :-** तसे लिहीले आहे का काम केले नाही असे.

**श्री.दिलीप पोकळे :-** तस नाहीये आप्पा त्यांनी लेखी पत्र दिलेले आहे की काम करत नाहीये हे गट नं. सहीत टेंडर दिलेले आहे हे टेक्निकल फॉल्ट तिथे झालेला आहे .

**श्री.कैलास सोनवणे :-** पोकळे साहेब

**श्री.दिलीप पोकळे :-** मला अस जाणवत आहे की महापालिकेच्या प्रशासनावर याच्यात काय प्रकार केलेला आहे. आपले अधिकारी , आपली यंत्रणा ही पुर्ण क्षमतेने काम करते की नाही करते याच्यावरही प्रश्नचिन्ह आहे.तर आपण याच्यावर काय निर्णय घेणार आहे. याची आपण चौकशी करणार आहात का ? आणि खरोखर जर हे टेंडर झाल असेल आतापर्यंत या स्टेजपर्यंत हे प्रकरण आले आहे त्याची जबाबदारी कोणाची आहे आणि तो जर असेल गट नंबर जर असेल. तर आमदारांनी जे पत्र दिलेले आहे. त्या पत्राचे हे सभागृह काय करणार आहे.आपण ठराव करणार परत टेंडर पर्यंत ती प्रक्रीया येवुन गेलेली आहे आणि परत आमदार महोदय पत्र देतील की मी निधी देत नाही. मग अशावेळेस आपण जे धोरण ठरवायचे आहे. याच्या विषयी आपण खुलासा करावा.

**श्री.कैलास सोनवणे :-** पोकळे साहेब नाही नाही काय आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** मला एक सांगा प्रक्रीया का राबवली मग त्यांनी असे चुकीचे काम का केले एकतर जळगांव जिल्हयाचे आहेत आपला काही अंतर्गत वाद नाहीये. याच्यावरून हे लक्षात येते की जाणीवपुर्वक अस होवू शकत का याचा आपण खुलासा करावा.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** महापौर महोदया मला बोलायचे आहे.

**शेख हसीना बी :-** महापौर ताई

**श्री.सदाशिव ढेकळे :-** आता हे जे विषय आहेत याच्यात जळगांव शहराचे सर्व काम घेतले आहे परंतू मला वगळुन घेतले आहे. माझ्या प्रभागातील काम घेतलेले नाहीत.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर आणि विरोधी पक्ष नेत्यांची मिलीभगत आहे हे , मिलीभगत आहे तुमची

**श्री.सदाशिव ढेकळे :-** महापौर महोदया आणि विरोधी पक्ष नेता दोघांनी हे काम करावे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** महापौर महोदया विषय पत्रिकेवर विषय का घेतलेले नाहीये.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** महापौर महोदया मी पत्र दिले होते आणि विरोधी पक्ष नेत्यांच्या कानावर घातले होते. मग हे अस काय होत ? सुनिलभाऊ ही बोलले नाही या विषयावर , दुसरा विषय असा की स्लम एरीयाचा माझा काही भाग आहे. ५ कोटींचे टेंडर काढले होते ते सुध्दा त्यांनी रद्द करून टाकले. मला सांगा असे करण्याचे काय कारण आहे. मला महापौरांनी सांगाव की हे काय होतय. याच्यानंतर विषय घेण्यात यावा अशी माझी विनंती आहे.

**श्री.धिरज सोनवणे :-** माझ्या प्रभागाचे पण नाहीये.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** हे ठेकेदार जे आहेत ना , या सभागृहाचे ढेकळेदादा ज्येष्ठ सदस्य आहेत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.६४८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्र.०३ मधील जळगांव शिवार स.नं.१०१/१ १०१/२ १०१/३ मध्ये आरक्षण क्र.४८ मध्ये शाळा विकसीत करणे संदर्भात आरक्षण असून ते आरक्षण विकसीत करणे कामी महासभा ठराव क्र.२०४ दि.२९/०८/२०१९ अन्वये जिल्हा विकास योजने अंतर्गत निधी उपलब्ध करुन विकास करणे संदर्भात ठरावास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे परंतू गेल्या २ वर्षामध्ये जिल्हा विकास योजने अंतर्गत निधीची उपलब्धता झालेली नसल्याने सदर महासभा ठराव क्र.२०४ दि.२९/०८/२०१९ ठरावात नमूद आरक्षण क्र.४८ चा विकास त्वरीत मनपा निधीतून करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं.२३**:- जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत मेहरुण तलाव लगत असलेल्या शिवाजी उदयानास संरक्षण भिंत बांधणे व सुशोभिकरण करुन विकसित करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.०४ कोटी मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत मा.विरोधी पक्षनेता, श्री.सुनिल सुपडू महाजन यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६४९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहरात प्राचीन मेहरुण तलावा लगत शहरातील प्रशस्त व क्षेत्रफळाने मोठे असे शिवाजी उदयान स्थित असून शहरवासियांसाठी एकमेव पर्यटन, पिकनिक स्पॉट आहे. मात्र सदयस्थितीत उजाड, भकास झालेले आहे तसेच या उदयानास संरक्षण भिंत नसल्यामुळे वृक्षतोडीचे प्रमाण देखिल वाढत आहे. यामुळे शहरातील भव्य असे उदयानाचे अस्तित्व धोक्यात आलेले असून शिवाजी उदयानास संरक्षण भिंत बांधणे व सुशोभिकरण करुन विकसित करणे बाबत नागरीकांकडून मागणी होत असल्याने जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत मेहरुण तलाव लगत असलेल्या शिवाजी उदयानास संरक्षण भिंत बांधणे व सुशोभिकरण करुन विकसित करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.०४ कोटी मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

जिल्हा वार्षीक योजना अंतर्गत या आर्थिक वर्षात निधी मिळण्याची शक्यता कमी असल्याने सन्मा.सदस्यांचा पत्रांचा विचार करता जी कामे जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सन २०२१-२२ असे नमूद केलेली आहेत असे सर्व प्रस्तावीत कामे सन २०२१-२२ ऐवजी सन २०२२-२३ मध्ये सदरील प्रस्ताव प्रशासनाने प्रस्तावित करुन निधी संदर्भात पाठविण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं.२४**:- जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत किंवा वेळोवेळी शासन स्तरावर जो निधी उपलब्ध होईल त्या योजने अंतर्गत प्रभाग क्र.१५ अंतर्गत मेहरुण महादेव मंदीर ते मिल्लत शाळेचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजूस आर.सी.सी.गटार व रोड क्रॉसिंगला स्लॅब कल्व्हेट बांधणे कामी येणारा एकूण रक्कम रु.१,००,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत मा.विरोधी पक्षनेता, श्री.सुनिल सुपडू महाजन यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६५० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत किंवा वेळोवेळी शासन स्तरावर जो निधी उपलब्ध होईल त्या योजने अंतर्गत प्रभाग क्र.१५ अंतर्गत मेहरुण महादेव मंदीर ते मिल्लत शाळेचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजूस आर.सी.सी.गटार व रोड क्रॉसिंगला स्लॅब कल्व्हेट बांधणे कामी येणारा एकूण रक्कम रु.१,००,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

जिल्हा वार्षीक योजना अंतर्गत या आर्थिक वर्षात निधी मिळण्याची शक्यता कमी असल्याने सन्मा.सदस्यांचा पत्रांचा विचार करता जी कामे जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सन २०२१-२२ असे नमूद केलेली आहेत असे सर्व प्रस्तावीत कामे सन २०२१-२२ ऐवजी सन २०२२-२३ मध्ये सदरील प्रस्ताव प्रशासनाने प्रस्तावित करुन निधी संदर्भात पाठविण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं.२५**:- जिल्हा नियोजन मंडळांतर्गत येणाऱ्या वार्षिक योजनेच्या सन २०२१-२२ च्या निधीतुन प्रभाग क्र.०९ मध्ये विविध १ ते ३ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.५५ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या, सौ.प्रतिभा गजानन देशमुख यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६५१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जिल्हा नियोजन मंडळांतर्गत येणाऱ्या वार्षिक योजनेच्या सन २०२१-२२ च्या निधीतुन प्रभाग क्र.०९ मध्ये खालील नमूद विविध १ ते ३ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.५५ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.९ अंतर्गत गट नं.९/१ प्लॉट नं.३१ आनंद पाटील यांचे घरापासुन ते परामार्थ निकेतन पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.३० लक्ष |
| २ | प्रभाग क्र.९ अंतर्गत गट नं.२/२/२ ब प्लॉट नं.१६ देसाई यांचे घरापासुन ते प्लॉट नं.२४ पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१५ लक्ष |
| ३ | प्रभाग क्र.९ अंतर्गत गट नं.२८ परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.१० लक्ष |
| | एकूण रक्कम - | रु.५५ लक्ष |

जिल्हा वार्षीक योजना अंतर्गत या आर्थिक वर्षात निधी मिळण्याची शक्यता कमी असल्याने सन्मा.सदस्यांचा पत्रांचा विचार करता जी कामे जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सन २०२१-२२ असे नमूद केलेली आहेत असे सर्व प्रस्तावीत कामे सन २०२१-२२ ऐवजी सन २०२२-२३ मध्ये सदरील प्रस्ताव प्रशासनाने प्रस्तावित करुन निधी संदर्भात पाठविण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं.२६**:- जिल्हा नियोजन मंडळांतर्गत येणाऱ्या वार्षिक योजनेच्या सन २०२१-२२ च्या निधीतुन प्रभाग क्र.०९ मधील गट नं.२९,३० मुक्ताई नगर ते एसएमआयटी रस्ता नाला बांधकाम व त्यावर १० मीटर स्लॅब कल्व्हेट टाकणे कामी येणारा एकूण रक्कम रु.९,९०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या, सौ.प्रतिभा गजानन देशमुख यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६५२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जिल्हा नियोजन मंडळांतर्गत येणाऱ्या वार्षिक योजनेच्या सन २०२१-२२ च्या निधीतुन प्रभाग क्र.०९ मधील गट नं.२९,३० मुक्ताई नगर ते एसएमआयटी रस्ता नाला बांधकाम व त्यावर १० मीटर स्लॅब कल्व्हेट टाकणे कामी येणारा एकूण रक्कम रु.९,९०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

जिल्हा वार्षीक योजना अंतर्गत या आर्थिक वर्षात निधी मिळण्याची शक्यता कमी असल्याने सन्मा.सदस्यांचा पत्रांचा विचार करता जी कामे जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सन २०२१-२२ असे नमूद केलेली आहेत असे सर्व प्रस्तावीत कामे सन २०२१-२२ ऐवजी सन २०२२-२३ मध्ये सदरील प्रस्ताव प्रशासनाने प्रस्तावित करुन निधी संदर्भात पाठविण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं.२७**:- जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत किंवा वेळोवेळी शासन स्तरावर जो निधी उपलब्ध होईल त्या योजने अंतर्गत प्रभाग क्र.१४ मध्ये स.नं.२६७, २७० व जकात सोसायटी मध्ये रस्ते खडीकरण व

डांबरीकरण करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.२,०४,२१,८३७/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत मा.सभापती,प्र.स.क्र.०३ श्रीमती रेखा चुडामण पाटील यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६५३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत किंवा वेळोवेळी शासन स्तरावर जो निधी उपलब्ध होईल त्या योजने अंतर्गत प्रभाग क्र.१४ मध्ये स.नं.२६७, २७० व जकात सोसायटी मध्ये रस्ते खडीकरण व डांबरीकरण करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.२,०४,२१,८३७/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

जिल्हा वार्षीक योजना अंतर्गत या आर्थिक वर्षात निधी मिळण्याची शक्यता कमी असल्याने सन्मा.सदस्यांचा पत्रांचा विचार करता जी कामे जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सन २०२१-२२ असे नमूद केलेली आहेत असे सर्व प्रस्तावीत कामे सन २०२१-२२ ऐवजी सन २०२२-२३ मध्ये सदरील प्रस्ताव प्रशासनाने प्रस्तावित करुन निधी संदर्भात पाठविण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं.२८**:- शासकीय निधी अंतर्गत प्रभाग क्र.०३ मध्ये विविध ०२ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.१,९०,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या,सौ.रंजना भरत सपकाळे यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६५४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नागरीकांना विविध सोईसुविधा पुरविणे तसेच रहदारी व वाहतूकीच्या सेवा पुरविणे कामी कामे करुन घेणे गरजेचे असून याबाबत सदर परिसरातील नागरीकांकडून सदर कामांना लवकरात लवकर करणेबाबत सतत मागणी होत असल्याने शासकीय निधी अंतर्गत प्रभाग क्र.०३ मध्ये खालील नमूद विविध ०२ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.१,९०,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.३ संपुर्ण खेडी परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.१,५०,००,०००/- |
| २ | प्रभाग क्र.३ जळगांव शिवार गट नं.८८/१/२/३ परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे. | रु. ४०,००,०००/- |
| | एकूण रक्कम - | रु.१,९०,००,०००/- |

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक** :- **लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक** :- **पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं.२९**:- नगरोत्थान महाअभियान योजनेच्या निधीतून प्रभाग क्र.०३ मध्ये श्रीराम कॉलनी ते दशरथ नगर पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.६० लक्ष मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या,सौ.रंजना भरत सपकाळे यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६५५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नगरोत्थान महाअभियान योजनेच्या निधीतून प्रभाग क्र.०३ मध्ये श्रीराम कॉलनी ते दशरथ नगर पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.६० लक्ष मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं.३०**:- प्रभाग क्र.१९ मध्ये विविध १ ते ३ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.२.१५ कोटी मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.विक्रम किसन सोनवणे यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६५६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नागरीकांना विविध सोईसुविधा पुरविणे तसेच रहदारी व वाहतूकीच्या सेवा पुरविणे कामी कामे करुन घेणे गरजेचे असून याबाबत सदर परिसरातील नागरीकांकडून सदर कामांना लवकरात लवकर करणेबाबत सतत मागणी होत असल्याने प्रभाग क्र.१९ मध्ये खालील नमूद विविध १ ते ३ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.२.१५ कोटी मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१९ सुप्रिम कॉलनी अंतर्गत पोलीस कॉलनी व परिसरामध्ये खडीकरण व डांबरीकरण करणे. | रु.०१ कोटी |
| २ | प्रभाग क्र.१९ सुप्रिम कॉलनी अंतर्गत गाडगेबाबा रिक्षा स्टॉप ते प्रेमाबाई जैन शाळेपर्यंत खडीकरण व डांबरीकरण करणे. | रु.०१ कोटी |
| ३ | प्रभाग क्र.१९ सदाशिव नगर व रामनगर, साई प्रसाद कॉलनी,एम.डी.एस.कॉलनी यामध्ये विविध ठिकाणी कल्व्हेट बांधणे. | रु.१५ लक्ष |
| | एकूण रक्कम - | रु.२.१५ कोटी |

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं.३१**:- जिल्हा नियोजन मंडळा अंतर्गत येणाऱ्या वार्षिक योजनेच्या सन २०२१-२२ च्या निधीतून प्रभाग क्र.२ ड मध्ये विविध १ ते १६ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.२,०७,०१,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.किशोर रमेश बाविस्कर यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६५७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जिल्हा नियोजन मंडळा अंतर्गत येणाऱ्या वार्षिक योजनेच्या सन २०२१-२२ च्या निधीतून प्रभाग क्र.२ ड मध्ये खालील नमूद विविध १ ते १६ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.२,०७,०१,०००/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.२ विनोद सोनवणे, दर्गा जवळील संपुर्ण गल्ली कॉक्रीटीकरण करणे. | रु.२०,००,०००/- |
| २ | प्रभाग क्र.२ विनोद पाटील यांच्या घरापासुन ते निवृत्ती बाविस्कर यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.९,९५,०००/- |
| ३ | प्रभाग क्र.२ साईनाथ यांच्या घरापासुन ते गवळी वाडा पर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.९,९५,०००/- |
| ४ | प्रभाग क्र.२ कचोरी वाले चौधरी यांची संपुर्ण गल्ली कॉक्रीटीकरण करणे. | रु.९,९०,०००/- |
| ५ | प्रभाग क्र.२ गंगाराम गुरुजी यांच्या घरापासुन ते सैंदाणे यांचे घरापर्यंत आर.सी.सी.गटार बांधकाम करणे. | रु.९,९५,०००/ |
| ६ | प्रभाग क्र.२ इंगळे यांची संपुर्ण गल्ली कॉक्रीटीकरण करणे. | रु.९,५०,०००/ |
| ७ | प्रभाग क्र.२ राजपुत गल्ली ते महेंद्र सोनवणे पाण्याच्या जार वाली गल्ली संपुर्ण कॉक्रीटीकरण करणे. | रु.९,९५,०००/ |
| ८ | प्रभाग क्र.२ चौघुले प्लॉट ते अनिल जैस्वाल यांच्या घरापर्यंत तसेच गोटु रिक्षा वाले यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.९,९६,०००/- |
| ९ | प्रभाग क्र.२ मोहन सोनवणे यांची संपुर्ण गल्ली कॉक्रीटीकरण करणे. | रु.९,९०,०००/- |
| १० | प्रभाग क्र.२ नाल्याच्या बाजुला गवळी वाडा येथे रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.९,००,०००/- |
| ११ | प्रभाग क्र.२ चौघुले प्लॉट मधील गणेश गाढवे ची गल्ली ते काजल किराणा पर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.९,९६,०००/- |
| १२ | प्रभाग क्र.२ बंटी गवळी व दत्तु चहावाले यांचे संपुर्ण गल्ली कॉक्रीटीकरण करणे. | रु.१५,००,०००/- |
| १३ | प्रभाग क्र.२ मनपा शाळा क्र.२१ मधील खेडाळुंसाठी १ हॉल तयार करणे. | रु. १९,००,०००/- |
| १४ | प्रभाग क्र.२ छन्नु इंगळे ते नाल्यापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.१५,००,०००/- |
| १५ | प्रभाग क्र.२ कांचन नगर मधील रमेश इंगळे यांची संपुर्ण गल्ली कॉक्रीटीकरण करणे. | रु. ९,९९,०००/- |
| १६ | प्रभाग क्र.२ कांचन नगर, चौघुले प्लॉट प्ले सेंटर परिसरात आर.सी.सी.गटार बांधकाम करणे. | रु.३०,००,०००/- |
| | एकूण रक्कम - | रु.२,०७,०१,०००/- |

जिल्हा वार्षीक योजना अंतर्गत या आर्थिक वर्षात निधी मिळण्याची शक्यता कमी असल्याने सन्मा.सदस्यांचा पत्रांचा विचार करता जी कामे जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सन २०२१-२२ असे नमूद केलेली

आहेत असे सर्व प्रस्तावीत कामे सन २०२१-२२ ऐवजी सन २०२२-२३ मध्ये सदरील प्रस्ताव प्रशासनाने प्रस्तावित करुन निधी संदर्भात पाठविण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं.३२**:- जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत प्राप्त सन २०२१-२२ च्या निधीतून प्रभाग क्र.१६ मध्ये विविध १ ते ०८ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.१,२३,८८,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या,सौ.रेश्मा कुंदन काळे यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६५८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत प्राप्त सन २०२१-२२ च्या निधीतून प्रभाग क्र.१६ मध्ये खालील नमूद विविध १ ते ०८ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.१,२३,८८,०००/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१६ मधील ढाके वाडी येथे रविंद्र वाणी यांचे घरापासुन ते प्रदीप श्रीश्रीमाळ यांचे घरापर्यंत रस्ता कॉक्रीटी व आर.सी.सी.गटार तयार करणे. | रु.९९५०००/- |
| २ | प्रभाग क्र.१६ मधील अरिहंत कॉलनी मध्ये रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | रु.२००००००/- |
| ३ | प्रभाग क्र.१६ मधील ईश्वर कॉलनी मध्ये संपुर्ण ठिकाणी आर.सी.सी.गटार तयार करणे. | रु.९९५०००/- |
| ४ | प्रभाग क्र.१६ मधील लक्ष्मीनगर परिसरातील रस्ते कॉक्रीटीकरण करणे. | रु.९९८०००/- |
| ५ | प्रभाग क्र.१६ मधील लक्ष्मीनगर परिसरात आर.सी.सी.गटारी बांधकाम करणे. | रु.७०००००/- |
| ६ | प्रभाग क्र.१६ मध्ये कासमवाडी येथील ६ गल्ली संपुर्ण कॉक्रीटीकरणे करणे. | रु.४००००००/- |
| ७ | प्रभाग क्र.१६ मध्ये सरदार वल्लभभाई पटेल उदयानाच्या आजुबाजुचे रस्ते डांबरीकरणे करणे. | रु.२००००००/- |
| ८ | प्रभाग क्र.१६ मधील संपुर्ण परिसरात ठिकठिकाणी स्लॅब कल्व्हेट तयार करणे. | रु.७०००००/- |
| | एकुण रक्कम - | रु.१,२३,८८,०००/- |

जिल्हा वार्षीक योजना अंतर्गत या आर्थिक वर्षात निधी मिळण्याची शक्यता कमी असल्याने सन्मा.सदस्यांचा पत्रांचा विचार करता जी कामे जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सन २०२१-२२ असे नमूद केलेली आहेत असे सर्व प्रस्तावीत कामे सन २०२१-२२ ऐवजी सन २०२२-२३ मध्ये सदरील प्रस्ताव प्रशासनाने प्रस्तावित करुन निधी संदर्भात पाठविण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं.३३**:- नगरोत्थान निधी, सुवर्ण जयंती निधी, शासनाचा शिल्लक निधी इतर शासकिय व मनपा निधीतून प्रभाग क्र.१६ मध्ये विविध १ ते ४ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.१,८१,४३,७५६/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.भगत रावलमल बालाणी यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६५९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्र.१६ मधील खालील नमूद कामे नागरीकांना विविध सोईसुविधा पुरविणे कामी करुन घेणे गरजेचे असुन याबाबत सदर परिसरातील नागरीकांनाकडून सदर कामासाठी सतत मागणी होत असल्यामुळे नगरोत्थान निधी, सुवर्ण जयंती निधी, शासनाचा शिल्लक निधी इतर शासकिय व मनपा निधीतून प्रभाग क्र.१६ मध्ये खालील नमूद विविध १ ते ४ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.१,८१,४३,७५६/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१६ मध्ये सिंधी कॉलनी कंवर नगर मध्ये कॉक्रीट रस्ते तयार करणे. | रु.१,०५,५८,२९२/- |
| २ | प्रभाग क्र.१६ मधील नवीन जोशी कॉलनीत डांबरी रस्ते तयार करणे. | रु.२१,७९,४३७/- |
| ३ | प्रभाग क्र.१६ मध्ये जुनी जोशी कॉलनीत कॉक्रीट रस्ते तयार करणे. | रु.२४,९२,९९०/- |
| ४ | प्रभाग क्र.१६ सिंधी कॉलनी जवळ टी.एम.नगर मध्ये डांबरी रस्ते तयार करणे. | रु.२९,१३,०३७/- |
| | एकुण रक्कम - | रु.१,८१,४३,७५६/- |

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं.३४**:- नगरोत्थान निधी, सुवर्ण जयंती निधी, शासनाचा शिल्लक निधी इतर शासकीय व मनपा निधीतून प्रभाग क्र.१६ मध्ये विविध १ ते ११ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.३,४६,१३,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.भगत रावलमल बालाणी यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. ३४ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६६० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्र.१६ मधील खालील नमूद कामे नागरीकांना विविध सोईसुविधा पुरविणे कामी करुन घेणे गरजेचे असुन याबाबत सदर परिसरातील नागरीकांनाकडून सदर कामासाठी सतत मागणी होत असल्यामुळे नगरोत्थान निधी, सुवर्ण जयंती निधी, शासनाचा शिल्लक निधी इतर शासकीय व मनपा निधीतून प्रभाग क्र.१६ मध्ये खालील नमूद विविध १ ते ११ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.३,४६,१३,०००/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१६ सर्वोत्तम नगर व मुकूंद नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.५७,००,०००/- |
| २ | प्रभाग क्र.१६ मधील नाथ वाडा, मोचीवाडा रस्ते डांबरीकरण करणे. | रु.२९,७५,०००/- |
| ३ | प्रभाग क्र.१६ मध्ये संचारनगर मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.२५,००,०००/- |

| | | |
|---|---|---|
| ४ | प्रभाग क्र.१६ लक्ष्मीनगर मधील रस्ते कॉक्रीटीकरण करणे. | रु.४३,४०,०००/- |
| ५ | जुनी व नवीन सम्राट कॉलनी मधील रस्ते कॉक्रीटीकरण करणे. | रु.७८,८६,०००/- |
| ६ | संजय गांधी नगर मधील रस्ते कॉक्रीट करणे. | रु.१०,००,०००/- |
| ७ | जाखनीनगर मधील रस्ते कॉक्रीटीकरण करणे. | रु.१३,१२,०००/- |
| ८ | मासुमवाडी मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रु.२७,००,०००/- |
| ९ | सिंधी कॉलनी मधील बाबा नगर मधील रस्ते कॉक्रीटीकरण करणे. | रु.१७,००,०००/- |
| १० | कासमवाडी मधील रस्ते कॉक्रीटीकरण करणे. | रु.३०,००,०००/- |
| ११ | मंजूषा कॉलनी मधील रस्ते कॉक्रीटीकरण करणे. | रु.१५,००,०००/- |
| | एकुण रक्कम - | रु.३,४६,१३,०००/- |

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं.३५**:- जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत शासनाकडुन उपलब्ध होणारा निधी किंवा जिल्हा नियोजन मंडळाकडुन उपलब्ध होणाऱ्या निधीतून प्रभाग क्र.०७ गट नं.५४ मधील आर.सी.सी.गटार बांधकाम करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.८० लक्ष मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत मा.सभापती,प्र.स.क्र.०१ श्री.सचिन भिमराव पाटील यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६६१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत शासनाकडुन उपलब्ध होणारा निधी किंवा जिल्हा नियोजन मंडळाकडुन उपलब्ध होणाऱ्या निधीतून प्रभाग क्र.०७ गट नं.५४ मधील आर.सी.सी.गटार बांधकाम करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.८० लक्ष मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

जिल्हा वार्षीक योजना अंतर्गत या आर्थिक वर्षात निधी मिळण्याची शक्यता कमी असल्याने सन्मा.सदस्यांचा पत्रांचा विचार करता जी कामे जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सन २०२१-२२ असे नमूद केलेली आहेत असे सर्व प्रस्तावीत कामे सन २०२१-२२ ऐवजी सन २०२२-२३ मध्ये सदरील प्रस्ताव प्रशासनाने प्रस्तावित करुन निधी संदर्भात पाठविण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं.३६**:- जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत शासनाकडुन उपलब्ध होणारा निधी किंवा जिल्हा नियोजन मंडळाकडुन उपलब्ध होणाऱ्या निधीतून प्रभाग क्र.०७ गट नं.५३ मधील आर.सी.सी.गटार बांधकाम करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.३० लक्ष मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत मा.सभापती,प्र.स.क्र.०१ श्री.सचिन भिमराव पाटील यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६६२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत शासनाकडुन उपलब्ध होणारा निधी किंवा जिल्हा नियोजन मंडळाकडुन उपलब्ध होणाऱ्या निधीतून प्रभाग क्र.०७ गट नं.५३ मधील आर.सी.सी.गटार बांधकाम करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.३० लक्ष मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

जिल्हा वार्षीक योजना अंतर्गत या आर्थिक वर्षात निधी मिळण्याची शक्यता कमी असल्याने सन्मा.सदस्यांचा पत्रांचा विचार करता जी कामे जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सन २०२१-२२ असे नमूद केलेली आहेत असे सर्व प्रस्तावीत कामे सन २०२१-२२ ऐवजी सन २०२२-२३ मध्ये सदरील प्रस्ताव प्रशासनाने प्रस्तावित करुन निधी संदर्भात पाठविण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं.३७** :- जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत शासनाकडुन उपलब्ध होणारा निधी किंवा जिल्हा नियोजन मंडळाकडुन उपलब्ध होणाऱ्या निधीतून प्रभाग क्र.०७ गट नं.५३ मधील ओपनस्पेस विकसित करुन चेनलिंग फेन्सींग (बगीचा बनविणे) करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.१.१० कोटी मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत मा.सभापती,प्र.स.क्र.०१ श्री.सचिन भिमराव पाटील यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६६३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत शासनाकडुन उपलब्ध होणारा निधी किंवा जिल्हा नियोजन मंडळाकडुन उपलब्ध होणाऱ्या निधीतून प्रभाग क्र.०७ गट नं.५३ मधील ओपनस्पेस विकसित करुन चेनलिंग फेन्सींग (बगीचा बनविणे) करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.१.१० कोटी मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

जिल्हा वार्षीक योजना अंतर्गत या आर्थिक वर्षात निधी मिळण्याची शक्यता कमी असल्याने सन्मा.सदस्यांचा पत्रांचा विचार करता जी कामे जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सन २०२१-२२ असे नमूद केलेली आहेत असे सर्व प्रस्तावीत कामे सन २०२१-२२ ऐवजी सन २०२२-२३ मध्ये सदरील प्रस्ताव प्रशासनाने प्रस्तावित करुन निधी संदर्भात पाठविण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं.३८** :- जिल्हा वार्षीक योजने अंतर्गतच्या विविध निधीतून प्रभाग क्र.१४ मध्ये विविध १ ते ५ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.२.२४ कोटी मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या,सौ.सुरेखा सुदाम सोनवणे यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.
**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६६४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जिल्हा वार्षीक योजने अंतर्गतच्या विविध निधीतून प्रभाग क्र.१४ मध्ये खालील नमूद विविध १ ते ५ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.२.२४ कोटी मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१४ स्मशानभुमी ते गट नं.२५० पर्यंत मध्ये आर.सी.सी.गटार बांधणे. | रु. ४५ लक्ष |
| २ | प्रभाग क्र.१४ अशोक किराणा ते स्वामी समर्थ चौक ते तलाव चौपाटी पर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे. | रु. ५४ लक्ष |
| ३ | प्रभाग क्र.१४ अशोक किराणा ते नागसेन नगरच्या कोपऱ्यापर्यंत आर.सी.सी.गटार बांधणे. | रु. ३५ लक्ष |
| ४ | प्रभाग क्र.१४ स्वामी समर्थ चौक ते मंगलपुरी पर्यंत आर.सी.सी.गटार बांधणे. | रु. ३० लक्ष |
| ५ | प्रभाग क्र.१४ गट नं.२५४/३ या परिसरात रस्ते कॉंक्रीटीकरण करणे. | रु. ६० लक्ष |
| | एकुण रक्कम - | रु.२.२४ कोटी |

जिल्हा वार्षीक योजना अंतर्गत या आर्थिक वर्षात निधी मिळण्याची शक्यता कमी असल्याने सन्मा.सदस्यांचा पत्रांचा विचार करता जी कामे जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सन २०२१-२२ असे नमूद केलेली आहेत असे सर्व प्रस्तावीत कामे सन २०२१-२२ ऐवजी सन २०२२-२३ मध्ये सदरील प्रस्ताव प्रशासनाने प्रस्तावित करुन निधी संदर्भात पाठविण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं.३९** :- जिल्हा वार्षीक योजने अंतर्गतच्या विविध निधीतून प्रभाग क्र.१४ मध्ये विविध १ ते ५ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.१.९० कोटी मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या,सौ.सुरेखा सुदाम सोनवणे यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.
**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.
**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६६५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जिल्हा वार्षीक योजने अंतर्गतच्या विविध निधीतून प्रभाग क्र.१४ मध्ये खालील नमूद विविध १ ते ५ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.१.९० कोटी मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१४ मेहरुण गट नं.२५१/३ अ रामनगर परिसरातील रस्ते कॉंक्रीटीकरण करुन आर.सी.सी.गटार बांधणे. | रु. ४५ लक्ष |
| २ | प्रभाग क्र.१४ मधील मेहरुण स.नं.२५० मधील हनुमान मंदीर परिसरात आर.सी.सी. गटार बांधणे. | रु. ४० लक्ष |

| | | |
|---|---|---|
| ३ | प्रभाग क्र.१४ मधील मेहरुण परिसरातील रामेश्वर कॉलनी, स्वामी समर्थ केंद्रा जवळील मागील व पुढील गल्लीत आर.सी.सी.गटार बांधणे. | रु. ३५ लक्ष |
| ४ | प्रभाग क्र.१४ गट नं.२७४ ब मधील रस्ते डांबरीकरण करणे. | रु. ४० लक्ष |
| ५ | प्रभाग क्र.१४ पाणी पुरवठा कार्यालय ते स्वामी समर्थ चौकापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु. ३० लक्ष |
| | एकुण रक्कम - | रु.१.९० कोटी |

जिल्हा वार्षीक योजना अंतर्गत या आर्थिक वर्षात निधी मिळण्याची शक्यता कमी असल्याने सन्मा.सदस्यांचा पत्रांचा विचार करता जी कामे जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सन २०२१-२२ असे नमूद केलेली आहेत असे सर्व प्रस्तावीत कामे सन २०२१-२२ ऐवजी सन २०२२-२३ मध्ये सदरील प्रस्ताव प्रशासनाने प्रस्तावित करुन निधी संदर्भात पाठविण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं.४०** :- सन २०२१-२२ शासनाच्या नियोजन मंडळातील निधीमधून, दलितेत्तर, नगरोत्थान, वैशिष्ठपुर्ण योजना तसेच महानगरपालिकेच्या फंडातून प्रभाग क्र.०२ मध्ये विविध १ ते ५ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.३,७३,५८,२५७/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.नवनाथ विश्वनाथ दारकुंडे यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६६६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सन २०२१-२२ शासनाच्या नियोजन मंडळातील निधीमधून, दलितेत्तर, नगरोत्थान, वैशिष्ठपुर्ण योजना तसेच महानगरपालिकेच्या फंडातून प्रभाग क्र.०२ मध्ये खालील नमूद विविध १ ते ५ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.३,७३,५८,२५७/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.२ महाविर जिनींग कॉर्नर ते क्रांती चौक रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | रु.६७,५६,३२१/- |
| २ | प्रभाग क्र.२ क्रांती चौक ते दालफळ व ममुराबाद रोडाला जोडणारे आडवे रस्ते डांबरीकरण करणे. | रु.७४,२०,१०९/- |
| ३ | प्रभाग क्र.२ क्रांती चौक ते डि.बी.जैन हॉस्पीटल ते ममुराबाद पुलाचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१,३१,८१,८२७/- |
| ४ | प्रभाग क्र.२ क्रांती चौक ते हुडकोच्या कोपऱ्यापर्यंत रस्ता डांबरी करणे. | रु.६३,००,०००/- |
| ५ | प्रभाग क्र.२ संभाजी चौक ते शाम शिंदे यांचे घरापर्यंत व क्षत्रिय मराठा समाज मंदीरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.३७,००,०००/- |
| | एकुण रक्कम - | रु.३,७३,५८,२५७/- |

जिल्हा वार्षीक योजना अंतर्गत या आर्थिक वर्षात निधी मिळण्याची शक्यता कमी असल्याने सन्मा.सदस्यांचा पत्रांचा विचार करता जी कामे जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सन २०२१-२२ असे नमूद केलेली

आहेत असे सर्व प्रस्तावीत कामे सन २०२१-२२ ऐवजी सन २०२२-२३ मध्ये सदरील प्रस्ताव प्रशासनाने प्रस्तावित करुन निधी संदर्भात पाठविण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं.४१** :- जिल्हा नियोजन मंडळा अंतर्गत निधीतून हरीविठ्ठल नगर भागात साईबाबा मंदीरा पासून पुलापर्यंत आर.सी.सी.गटार व कल्व्हेट बांधणेबाबत सन्मा.सदस्या,सौ.पार्वताबाई दामु भिल यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६६७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, हरिविठ्ठल नगर भागात गटारींची असुविधा असुन गटारींवर कल्व्हेट नसल्याने व सांडपाणी वाहुन जाण्याची व्यवस्था नसल्याने तसेच पाणी तुंबल्याने रस्ते खराब होत असल्याने सदर समस्या दुर करणे कामी जिल्हा नियोजन मंडळा अंतर्गत निधीतून हरीविठ्ठल नगर भागात साईबाबा मंदीरा पासून पुलापर्यंत आर.सी.सी.गटार व कल्व्हेट बांधणेकामी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

जिल्हा वार्षीक योजना अंतर्गत या आर्थिक वर्षात निधी मिळण्याची शक्यता कमी असल्याने सन्मा.सदस्यांचा पत्रांचा विचार करता जी कामे जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सन २०२१-२२ असे नमूद केलेली आहेत असे सर्व प्रस्तावीत कामे सन २०२१-२२ ऐवजी सन २०२२-२३ मध्ये सदरील प्रस्ताव प्रशासनाने प्रस्तावित करुन निधी संदर्भात पाठविण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं.४२** :- महानगरपालिकेकडील उपलब्ध विविध शासकीय निधीपैकी एका निधीतून हरीविठ्ठल नगर, खंडेराव नगर भागातील नाल्याला तातडीने संरक्षण भिंत बांधणेबाबत सन्मा.सदस्या,सौ.पार्वताबाई दामु भिल यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६६८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, पावसाच्या पाण्यामुळे आलेल्या पुरात हरिविठ्ठल नगर, खंडेराव नगर येथील नाल्यात वाहुन जाऊन एका किशोर वयीन मुलीचा बळी गेला. गेल्या सहा-सात महिन्यातील या नाल्यातील ही तिसरी दुर्घटना आहे. भविष्यात अशी दुर्घटना होऊ नये यासाठी या नाल्यावर रेल्वे पुल ते आर.एम.एस.कॉलनी दरम्यान संरक्षण भिंत तातडीने बांधण्याची आवश्यकता असल्याने महानगरपालिकेकडील उपलब्ध विविध शासकीय निधीपैकी एका निधीतून हरीविठ्ठल नगर, खंडेराव नगर भागातील नाल्याला तातडीने संरक्षण भिंत बांधणे कामी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं.४३** :- नियोजन समिती अंतर्गत जळगांव शहरात नव्याने होणाऱ्या रस्त्यावर थर्माप्लास्ट पेंट, झेब्रा क्रासिंग, रिफेक्टर, दिशादर्शक व सुचक फलक बसविणे कामी येणारा एकूण रक्कम रुपये ०२ कोटी मात्र उपलब्ध करुन देणेबाबत मा.विरोधी पक्षनेता, श्री.सुनिल सुपडू महाजन यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६६९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहरातील प्रमुख रस्त्यांसह विविध रस्ते डांबरीकरण, कॉक्रीटीकरणाची कामे विविध निधी अंतर्गत प्रस्तावित असून लवकरच सदर कामांना कार्यारंभ होणार आहे. सदर रस्त्यांची कामे झाल्यावर रस्त्यांवरील वर्दळीचा, नागरीकांकडून वाहनांचा वेग वाढू शकतो. परिणामी सुरक्षित रहदारी व वाहतुकीसाठी रस्त्यांवर थर्माप्लास्ट पेंट, झेब्रा क्रॉसिंग, रिफेक्टर, सुचक फलक बसविणे आवश्यक असल्याने जळगांव शहरात नव्याने होणाऱ्या रस्त्यावर थर्माप्लास्ट पेंट, झेब्रा क्रासिंग, रिफेक्टर, दिशादर्शक व सुचक फलक बसविणे कामी येणारा खर्च एकूण रक्कम रुपये ०२ कोटी मात्र नियोजन समिती अंतर्गत उपलब्ध करुन देणेकामी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

जिल्हा वार्षीक योजना अंतर्गत या आर्थिक वर्षात निधी मिळण्याची शक्यता कमी असल्याने सन्मा.सदस्यांचा पत्रांचा विचार करता जी कामे जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सन २०२१-२२ असे नमूद केलेली आहेत असे सर्व प्रस्तावीत कामे सन २०२१-२२ ऐवजी सन २०२२-२३ मध्ये सदरील प्रस्ताव प्रशासनाने प्रस्तावित करुन निधी संदर्भात पाठविण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं.४४** :- जळगांव शहरातील अजिंठा चौफुली परिसरात ३०० मिटर पर्यंतचे अवजड वाहने उभी करणेस बंदी करणेबाबत सन्मा.सदस्य,श्री. प्रशांत सुरेश नाईक यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६७० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, अजिंठा चौफुलीच्या चारही बाजुने अवजड वाहने उभी राहत असल्याने सदरील ठिकाणी नेहमी छोटे-मोठे अपघात होत असतात व नेहमी वाहतूक ठप्प होत असल्यानेजळगांव शहरातील अजिंठा चौफुली परिसरात ३०० मिटर पर्यंतचे अवजड वाहने (बसेस वगळून) उभी करणेस बंदी करणेस मान्यता प्रदान करण्यात येत असून या ठरावाची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे कामी प्रशासनाने

जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षते खालील असलेली रस्ते सुरक्षा समीतीला अवगत करुन कार्यवाही करणे संदर्भात चर्चा करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं.४५** :- शिवाजी नगर या भागातील क्रिडांगणासाठी आरक्षित असलेली जळगांव शहर स.नं.३४३/१/२/३/४/५ ही जागा विकसीत करणे कामी प्रस्ताव तयार करुन जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालयाकडेस निधी उपलब्धतेसाठी पाठविणेकामी मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.नवनाथ विश्वनाथ दारकुंडे यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६७१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, शहरातील शिवाजी नगर या भागात क्रिडांगणाची आवश्यकता असून या परिसरात आरक्षण क्रमांक ७ व ८ अंतर्गत सर्व्हे नंबर ३४३/१/२/३/४/५ ही जागा क्रिडांगण म्हणुन आरक्षित असल्याने शिवाजी नगर या भागातील क्रिडांगणासाठी आरक्षित असलेली जळगांव शहर स.नं.३४३/१/२/३/४/५ ही जागा विकसीत करणे कामी प्रस्ताव तयार करुन जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालयाकडेस निधी उपलब्धतेसाठी पाठविणेकामी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं.४६**:- शिवाजी नगर स्मशानभुमी येथे स्वखर्चाने बांधकाम करुन शांती मंत्राची कोनशिला लावणेस परवानगी मिळणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.नवनाथ विश्वनाथ दारकुंडे व सन्मा.सदस्य, श्री.किशोर रमेश बाविस्कर यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६७२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, शिवाजी नगर स्मशानभुमी येथे शांतीमंत्राची कोनशिला नसल्यामुळे सन्मा.सदस्य,श्री.नवनाथ विश्वनाथ दारकुंडे व सन्मा.सदस्य, श्री.किशोर रमेश बाविस्कर यांना शिवाजी नगर स्मशानभुमी येथे स्वखर्चाने बांधकाम करुन शांती मंत्राची कोनशिला लावणेस परवानगी देणे कामी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं.४७**:- अमृत योजने अंतर्गत प्रभाग क्र.१४ मधील मेहरुण परीसरातील स.नं.२७१ मधील ओपनस्पेस मध्ये ऑक्सीजन पार्क तयार करणेबाबत सन्मा.सदस्य, श्री.राजेंद्र झिपरु पाटील यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६७३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्र.१४ रामेश्वर कॉलनी परिसरात मोठया संख्येने कामगारवर्ग राहतो, परिसरातील बालगोपालांना खेळण्यासाठी व थोरामोठयांना फेर फटका मारण्यासाठी परिसरात चांगल्या दर्जाचा बगीचा नाही. तसेच या परिसरालगतच औदयोगिक वसाहत असल्याने मोठया प्रमाणात प्रदुषण होत असते प्रदुषणामुळे नागरीकांना विविध आजार होत असतात उदा. दम्याचे आजार, त्वचेचे आजार त्यामुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात येत आहे. मेहरुण सर्वे नं.२७१ मध्ये ओपनस्पे मध्ये अमृत योजने अंतर्गत ऑक्सीजन पार्क तयार केला तर पर्यावरणाचा समतोल साधला जाईल व नागरीकांना ऑक्सिजन पार्क मुळे शुध्द हवा मिळेल व त्यामुळे नागरिकांचे आरोग्य सुधारण्यास मदत होणार असल्याने प्रभाग क्र.१४ मधील मेहरुण परीसरातील स.नं.२७१ मधील ओपनस्पेस मध्ये अमृत योजने अंतर्गत ऑक्सीजन पार्क तयार करणे कामी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं.४८**:- प्रिप्राळा, हुडको भागातील गट क्र.२२२/२ मधील खुल्या जागेवर शादी हॉल बांधकाम करुन मिळणेबाबत तसेच सदर बांधकामासाठी लागणारा निधी नियोजन मंडळातून उपलब्ध करुन मिळणेबाबत श्री.जाकीर रसुल पठाण, शिवसेना, महानगर संघटक जळगांव शहर यांनी मा.महापौर यांना दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**मा.महापौर :-** सभागृहात शांतता ठेवायची आहे , ताई तुम्ही बोला.

**शेख हसीना बी :-** महापौर ताई ४८ नंबर का मेरे वॉर्ड का विषय नही लिया है.

**श्री.कैलास सोनवणे :-** अभी आया नही क्या विषय पुढे आहे का यांचा विषय

**शेख हसीना बी :-** ४८ नंबर का विषय विरोध है.

**श्री.कैलास सोनवणे :-** किती नंबर आहे यांचा विषय

**शेख हसीना बी :-** ४८ वा विषय ख्वॉजा नगर

(सन्मा.सदस्यांनी सभागृहात चर्चा केली)

**श्री.कैलास सोनवणे :-** यांचा जो विषय आहे तो रद्द करा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** पण त्यांच्याकडुन आलेला आहे ना.

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही म्हणता आहे ते त्यांना नाही पाहीजे आहे. तुम्ही काय जबरदस्ती करताहेत.

(सभागृहातील सन्मा.सदस्यांनी केलेली चर्चा स्पष्ट ऐकु येत नाही.)

**श्री.सुनिल महाजन :-** आप्पा (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.जितेंद्र मराठे :-** भाऊ (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.विशाल त्रिपाठी :-** (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.उपमहापौर :-** आप्पा , आप्पा या

**श्री.धिरज सोनवणे :-** (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.) म्हणुन झाले आहे का ते काम रद्द केले तुम्ही

**श्री.सुनिल महाजन :-** नाही नाही नाही

**श्री.धिरज सोनवणे :-** (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.) दयाना मग तुम्ही काम रद्द केले. नाही आमचा विरोध आहे.

**मा.उपमहापौर :-** धिरजभाऊ या विषयाला आमचा विरोध नाहीये. जर संबंधित (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.) ती काळाची गरज आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी : -** नाही आहे तिथे ऑलरेडी दोन तिन हॉल आहे तिथे

**शेख हसीना बी :-** (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.उपमहापौर :-** काय आहे मुलभुत सुविंधांचे काम झाले पाहीजेत १०० टक्के तेवढेच गरजेचे आहे. विकास कामांच्या संदर्भातील विषय आहे आणि विकास कामांच्या संदर्भातला हा जो भाग होता. त्या भागामध्ये (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.) ज्याला कोणाला विरोध असेल परंतू आमचा या विषयाला विरोध नाही.

**श्री.सुरेश सोनवणे : -** त्यांच असं म्हणण आहे की,

(सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.नितीन लढ्ढा : -** त्यांची भुमिका ते मांडताहेत.

**शेख हसीना बी :-** यहा पर पहिली बात इसका कोई संबंध नही है , जो काम की कमी है उसके तरफ खयाल दो ना आप , गटारी नही बन रही है , कुछ ही नही है. हमारे खुद विषय ले नही रहे है जातीवादी कर रहे है तुम सिर्फ

(सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री. कैलास सोनवणे :-** बरोबर आहे. तो विषय

**शेख हसीना बी :-** जो विषय है वो पास नही कर रहे है तुम

**श्री. कैलास सोनवणे :-** हा विषय जो आहे ना तो मी तुमच्या लक्षात आणुन देतो आणि त्या ठिकाणी बहुमत पण आहे आमच

**शेख हसीना बी :-** जो विषय है वो ला नही रहे तुम (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री. कैलास सोनवणे :-** म्हणुन तो विषय नामंजुर आहे.

**शेख हसीना बी :-** (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री. कैलास सोनवणे :-** तुमचं जे चालु आहे केव्हाच सुचक अनुमोदक , सुचक अनुमोदक मी पाहतोय सगळ ते चालु द्या तुम्ही , आम्हाला टाईमाला बोलायच आहे तेव्हा आम्ही बोलु.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ४८ क्रमांकाचा विषय

(सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.उपमहापौर:-** आप्पा विकास कामांच्या संदर्भातील विषय आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ४८ क्रमांकाचाच विषय आहे.

(सभागृहातील उपस्थित सन्मा.सदस्यांनी चर्चा सुरू केल्याने निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री. कैलास सोनवणे :-** तो त्यांचा आपसातला वाद आहे.

**श्री. सुनिल महाजन :-** आप्पा सुचक सुरेश आणि अनुमोदन अश्विनभाऊ घेवु.

**श्री. अश्विन सोनवणे :-** हो चालेल

**शेख हसीना बी :-** हमको पब्लिक को जबाब देना है.

**श्री. कैलास सोनवणे :-** चला पुढचा विषय घ्या. ५०

**मा.महापौर :-** आप्पा हा (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.प्रशांत नाईक :-** गोराणे साहेब

(सभागृहातील उपस्थित सन्मा.सदस्यांनी चर्चा सुरू केल्याने निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री. कैलास सोनवणे :-** नाही नाही , त्यांना अडचण नाहीये , मला अडचण नाहीये मी अनुमोदक आहे त्याला , अहो सुरेशभाऊ खाली बसा मी अनुमोदक आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** आप्पा नाही हो त्यांच्या वॉर्डातील विषय आहे.

**श्री. सुनिल महाजन :-** आप्पा सुचक सुरेश आहे

**श्री.प्रशांत नाईक :-** आप्पा सुरेशभाऊ आहे ना

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्यांच्या वॉर्डातील आहे म्हणुन त्यांना घेतले आहे.

**श्री. कैलास सोनवणे :-** सुचक त्या ताई आहेत अनुमोदक मी आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** नाही हो आप्पा सुरेशभाऊ आहे ना

**श्री.विशाल त्रिपाठी :-** आपल्या सभागृहाचे ज्येष्ठ नगरसेवक सदाशिवराव ढेकळे दादा या सभागृहाचे सगळयात ज्येष्ठ नगरसेवक आहेत आणि त्यांचे जे काही विषय असतील. मी सभागृहाला विनंती करतो की ते आत्ताच काय अहे ते विकास काम आहे त्यांचे काही व्यक्तिगत काम नाही बोलत आहे विकास काम आहे. त्यांचेच बोलतोय आताच विषय घेवुन त्यांचा ठराव करून घ्या.

**श्री. सुनिल महाजन :-** आणि या सभागृहाचे दोन ज्येष्ठ नगरसेवक आहेत कैलास आप्पा आणि नितीनभाऊ यांची त्रिसदस्यीय समिती नेमुन त्यांना आवश्यक असलेली विकास कामं ते या समितीला सुचवतील आणि आपण सर्व मंजुर करू.

**श्री. कैलास सोनवणे :-** नाही नाही (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.) त्याची जी काही पुर्तता करून तुम्ही आणुन द्या निधी

**श्री.विशाल त्रिपाठी :-** समिती कुठे नेमता आहे भाऊ

**श्री.किशोर बाविस्कर :-** सुनिलभाऊ यांचे पण काम घ्या.

**श्री. कैलास सोनवणे :-** मी काम घेईल .तुम्ही निधी आणुन द्या.

(सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.प्रशांत नाईक :-** काहो ज्येष्ठ नगरसेवक दत्तु मामांचे पण आहेत.

**श्री.नितीन लढ्ढा:-** त्यांना (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.) घ्यायला आमची गरज पडणार नाही.

**श्री. सुनिल महाजन :-** जिल्हाप्रमुख आहेत ते आमचे

**श्री.नितीन लढ्ढा:-** हो त्यांच वजन आमच्या बाजुने जास्त आहे तिथे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. ४७ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे. विषय क्रं. ४८ हा सर्वानुमते नामंजुर करण्यात येत आहे.

**श्री. कैलास सोनवणे :-** बहुमताने आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. ४८ हा बहुमताने नामंजुर करण्यात येत आहे.

**श्री. दिलीप पोकळे :-** मला खुलासा करून द्या.

**श्री. कैलास सोनवणे :-** यांच्या मामाचं पत्र हरवल आहे. मामाच पत्र हरवल आहे.

**मा.महापौर :-** काय आप्पा

**श्री. दिलीप पोकळे :-** माझ्या मामाचं पत्र सापडलय. (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.) त्यामुळे मला त्याचा खुलासा हवा आहे. मला खुलासा हवा आहे.

**श्री. सुनिल महाजन :-** (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.) आणि काय खुलासा पाहीजे

**श्री. दिलीप पोकळे :-** मला खुलासा काय पाहीजे आहे की त्यांनी पत्र दिले आहे की गट नं. नाहीये. माझ्याकडे गट नंबर , सिटीएस नं. सगळ आहे . त्यांनी पत्र दिलेले आहे की गट नं. नाहीये प्रशासनाने एवढाच खुलासा करायचा आहे की (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.) की गट नं नाहीये का?

**श्री.प्रशांत नाईक :-** (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.) हायकोर्टात कॅव्हेट दाखल करा.

**श्री. दिलीप पोकळे :-** नाही नाही मी निधी विषयी बोललो नाहीये.मी बोलतोय निविदे प्रक्रीये विषयी

**मा.महापौर :-** या विषयी

**मा.उपमहापौर :-** पोकळे साहेब महापौर ताई बोलताहेत.

**मा.महापौर :-** या विषयी प्रशासनाने खुलासा करावा.

**मा.आयुक्त :-** आमदार आणि खासदार निधी हा स्थानिक विकास कार्यक्रम आहे.याच्यामध्ये महानगरपालिकेच काम आहे की अंमलबजावणी करून यंत्रणा राबवणे मर्यादीत आहे. संबंधित सन्मा.आमदारांनी त्यांच्या अधिकारा नुसार काही काम सुचवली असतील . त्या सुचविलेल्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार हे आदरणिय जिल्हाधिकारी यांना आहे. एखाद्या कामाला दिलेली प्रशासकीय मान्यता जर सन्मा. आमदारांच्या किंवा अन्य कुणाच्या मागणीवरून रद्द करायची किंवा नाही करायची याचाही निर्णय घेण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांचा आहे. त्यामुळे आमदारांनी दिलेल्या पत्राच्या आधारे ते पत्र योग्य आहे किंवा नाही याच्या आधारे त्यांनी दिलेली प्रशासकीय मान्यता रद्द करायची किंवा नाही. याचा सर्वस्वी निर्णय घेण्याचा अधिकार हा जिल्हाधिकाऱ्यांचा आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या निर्णयाची आपण फक्त अंमलबजावणी करायची जबाबदारी महापालिकेवर आहे. आता प्रशासकीय मान्यता दिली गेल्यानंतर ती रद्द करावी की काय याच्यासाठी शासनाने ज्यांना अधिकार दिलेले आहेत जिल्हाधिकाऱ्यांनाच आहे हा निर्णय ते घेवु शकतील आणि त्या निर्णयाबद्दल आपण या ठिकाणी चर्चा करणे योग्य नाही.

**श्री. दिलीप पोकळे :-** नाही माझ काय म्हणण आहे साहेब निविदा प्रक्रीया करून टेंडर उघडुन केले म्हणजे आपण जी सगळी निविदा प्रक्रीया राबवली जी आपण राबवलेली यंत्रणा आहे त्यांनी कोणतं कामकाज केलं त्याच उत्तर द्या. (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.) परंतू पुर्ण प्रक्रीया ३ महिन्यामध्ये चालली आहे ३ महिन्यामध्ये आपण सगळे कागदपत्र तयार केले सर्व टिप्पण्या लिहील्या सर्व ऑनलाईन टेंडर काढले. सर्व टेंडर पुर्ण केलं ते (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.) मला फक्त आपल्या महापालिका प्रशासनाविषयी बोलायचे आहे. मी कुठल्याही विषयी बोलत नाहीये.

**मा.आयुक्त :-** जिल्हाधिकाऱ्यांच्या प्रशासकीय स्तरावर ही कुठलीही प्रक्रीया राबविल्यानंतर वर्कऑर्डर देण्याच्या पुर्वी किंवा वर्कऑर्डर देण्याच्या पुर्वी काम सुरू करण्याचे जर त्याची प्रशासकीय मान्यता रद्द करण्याची कुणी मागणी केलेली असेल. तर ती करण्यात येवु नये किंवा करायची की नाही याचा निर्णय सर्वस्वी जिल्हाधिकाऱ्यांचा आहे. महानगरपालिकेच्या निविदेप्रक्रीयेचा आक्षेपच नाही.

**शेख हसीनाबी शरीफ :-** सदर विषय बहुमताने नामंजुर करण्यात यावा.

**श्री.कैलास सोनवणे :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. ४८ बहुमताने नामंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६७४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, पिंप्राळा हुडको भागात सदयस्थितीत शादी हॉल असल्याने पिंप्राळा, हुडको भागातील गट क्र.२२२/२ मधील खुल्या जागेवर शादी हॉल बांधकाम करुन मिळणेबाबत तसेच सदर बांधकामासाठी लागणारा निधी नियोजन मंडळातून उपलब्ध करुन मिळणेबाबत श्री.जाकीर रसुल पठाण, शिवसेना, महानगर संघटक जळगांव शहर यांनी दिलेला प्रस्ताव नामंजूर करण्यात येत आहे.

**बहुमताने नामंजुर**

**अनुकूल मते :- ३६ प्रतिकुल मते :- ३१**

**सूचक :- शेख हसीनाबी शरीफ**

**अनुमोदक :- सोनवणे कैलास नारायण**

**नगरसचिव विषय क्रं.४९**:- मेहरुण तलाव परीसरातील रामेश्वर कॉलनीकडे जाणाऱ्या हिरवाई प्रकल्पाच्या किनाऱ्यावरील जागा “पक्षी घर” व बटरफ्लाय गार्डन करीता मिळणेबाबत अध्यक्ष व सचिव, मराठी प्रतिष्ठान,जळगांव यांनी मा.महापौर यांना दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६७५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मराठी प्रतिष्ठान व सुबोनियो केमीकल्स यांच्या संयुक्त विदयमाने मेहरुण तलाव परीसरात “पक्षी घर” बनविण्याचा संकल्प करीत आहे. ५५ फुट उंच व दोन हजार पक्षी बसु शकतील असे अत्याधुनिक व आकर्षक “पक्षी घर” जळगांव शहराच्या वैभवात मानाचा तुरा रोवणार आहे. पक्षी घराच्या आजुबाजुला पक्षांना दाणे टाकण्याकरीता खुली जागा व त्याच्याच बाजुला बटरप्लाय गार्डन याचे सुध्दा नियोजन मराठी प्रतिष्ठान करीत आहे. जळगांव शहरातील दानशुर व्यक्तीमत्वाच्या उदयोजकांच्या आर्थिक पाठबळामुळे हे शक्य आहे. लोक सहभागातुन विकास या संकल्पनेवर मराठी प्रतिष्ठान सतत काम करीत आहे.

पक्षी घर व बटरफ्लाय गार्डन या करीता मेहरुण तलाव परीसरातील रामेश्वर कॉलनीकडे जाणाऱ्या हिरवाई प्रकल्पाच्या किनाऱ्यावरील जागा प्रतिष्ठानला उपलब्ध करुन दिल्यास तलाव परीसराचा विकास साध्य करता येणार आहे. त्याच भागात प्रतिष्ठान ने रानमेवा प्रकल्पाच्या माध्यमातुन ५०० फळझाडे लावलेली आहेत.

पक्षांना खायला फळ मिळावी म्हणन ती संकल्पना राबविण्यात आली आहे. त्याचाच विस्तार म्हणून पक्षांना उन-वारा, पाऊस या पासुन संरक्षण मिळावे म्हणून “पक्षी घर” बनविण्याची योजना असून सदर पक्षी घराला सुबोनियो केमीकल्स यांचे अर्थसहाय्य असुन पक्षी घराला “सुबोनियो पक्षी घर” असे नामकरण केले जाणार असल्याने मेहरुण तलाव परीसरातील रामेश्वर कॉलनीकडे जाणाऱ्या हिरवाई प्रकल्पाच्या किनाऱ्यावरील जागा “पक्षी घर” व बटरफ्लाय गार्डन करीता मराठी प्रतिष्ठान व सुबोनियो केमीकल्स,जळगांव यांना देणे कामी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं.५०**:- मोहाडी रस्त्यावरील मनपा हद्दीत असलेल्या व वन विभागाच्या अखत्यारीत असलेल्या लांडोरखोरी उदयानास वंदनिय हिंदुहदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे उदयान असे नाव देणेबाबत शिवसेना महानगर प्रमुख,श्री.शरद शामराव तायडे यांनी मा.महापौर यांना दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. ४८ हा बहुमताने नामंजुर करण्यात आलेला आहे आणि विषय क्रं. ४९ आणि ५० हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**मा.महापौर :-** सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

(सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६७६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मोहाडी रस्त्यावरील मनपा हद्दीत असलेल्या व वन विभागाच्या अखत्यारीत असलेल्या लांडोरखोरी उदयानास " वंदनिय हिंदुहदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे " उदयान असे नामकरण करणे कामी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं ५१:-** जळगांव जिल्हा मोटार ओनर्स & ट्रान्सपोर्ट एजेंट असोसिएशन,पोलन पेठ,जळगांव यांना ट्रक टर्मिनसाठी दिलेली मेहरुण शिवारातील सि.स.नं.३० मधील १.६६ हेक्टर जागा ताब्यात घेणे व नगरपालिकेच्या कार्यकाळातील ठराव क्र.१४४ दि.२४/०८/१९८७ व ठराव क्र.२०६ दि.२५/०८/१९८८ महानगरपालिकेचे आर्थिक हित विचारात घेता सदर ठराव रद्द करुन न्यायालयाची स्थगीती नसल्याने कायदेशिर बाबी तपासून प्रशासनाने सदर जागेचा ताबा घेण्याची व नुकसान भरपाई आकारणी करणेबाबतची कार्यवाही करणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.प्रशांत सुरेश नाईक यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** या संदर्भात झालेले ठराव क्रं. १४४ दि.२४/०८/१९८७ व ठराव क्रं. २०६ दि.२५/०८/१९८८ या दोघ ठरावांना निष्क्रमीत करून प्रशासनाने सदर जागा तात्काळ ताब्यात घेण्याची कार्यवाही करावी. त्यासंदर्भात मा.आयुक्त महोदय याच्यामध्ये खुप दिरंगाई झालेली आहे प्रशासनाकडुन या संदर्भातला साधारणता गेल्या १० वर्षापासुन मी सातत्याने पाठपुरावा करतोय . अत्यंत मोक्याच्या असलेली ही जागा जळगांव शहरात मनपा मालकीची असलेली ही जागा तब्बल साधारणत: ४ एकर जागा आहे. गेल्या साधारणत: १० वर्षापासुन पाठपुरावा करून त्याला जिल्हा न्यायालयाने सुध्दा निकाल हा महानगरपालिकेच्या बाजुने दिलेला होता.परंतू निव्वळ प्रशासनाच्या दिरंगाई मुळे हायकोर्टात कॅव्हेट दाखल करण्याच्या सुचना देवुन सुध्दा उच्च न्यायालयामध्ये कॅव्हेट दाखल न झाल्यामुळे ती प्रक्रीया काही काळ स्टेटस्को म्हणुन राहीली. त्यालासुध्दा कालावधी स्टेटसको ला होता तो सन २०१८ साली परंतू २०१८ पासुन तर अद्याप पावेतो जागा घेण्याच्या संदर्भातले कुठल्याच पध्दतीचे प्रयत्न झालेले दिसुन येत नाही. मध्यंतरी उपायुक्त महोदय प्रशांत पाटील यांच्याशी चर्चा झाल्यानंतर यासंदर्भात सन्मा.सदस्य. प्रशांत नाईक यांनी हा प्रस्ताव दिलेला आहे. हे दोघ ठराव त्यावेळेचे नगरपालिका असतांनाचे ते निरस्त करून तातडीने जागा महानगरपालिकेने ताब्यात घ्यायची कार्यवाही करावी.

**ॲड. शुचिता हाडा:-** सदर जागा तातडीने ताब्यात घ्यावी याबद्दल दुमत नाही आणि महापालिकेची जागा आहे ती निश्चितपणे ताब्यात घेतली पाहीजे . पण या संदर्भात एक काही गोष्टी फक्त स्पष्ट करून घ्यायच्या आहेत. २०१८ मध्ये जो स्टे देण्यात आलेला होता. त्यानंतर पुढे काय घडल आहे. हायकोर्टाने जो स्टे दिलेला होता २०१८ मध्ये या विषयासंदर्भात त्यानंतर काय झाल कारण हा ईथे अशासकीय प्रस्ताव आलेला आहे. त्यामुळे टेक्निकली सगळया बाबी तपासुनच विषय पुढे गेला पाहीजे आणि त्याही पेक्षा महत्वाचा मुद्दा मला ईथे मांडायचा आहे की आपण महापालिकेने केलेल्या ठरावाने दिलेल्या जागा ताब्यात घेतल्या पाहीजे. त्या विषयाबद्दल दुमत नाही पण त्या घेतल्याच पाहीजे पण त्यानंतरच आपल व्हिजन काय असेल . त्यानंतर नियोजन काय आहे महापालिका म्हणुन या संदर्भातील नियोजन महापालिकेने केलेले आहे का ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही ताई काय आहे जागा ताब्यात असोसिएशनने यापुर्वी एक जागेच भुसंपादनाच प्रकरण सुरूही होत. त्याच्यानंतर त्यासंदर्भातील पाठपुरावा केला गेला त्यानंतर मोठी जागा ट्रान्सपोर्ट नगरकरीता आपल्या आरक्षित आपल्या डि पी मध्ये ठेवण्यात आलेली होती. परंतू त्या विषयाला सुध्दा पाठपुरावा करून अद्यापपावेतो त्याचा भुसंपादनाचा प्रस्ताव परिपुर्णपणे मार्गी लागलेला दिसुन येत नाही. भुसंपादनाच्या प्रस्तावाची प्रक्रीया सुरू झाल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या माध्यमातुन ज्यावेळी मोजणीचे आदेश निघाले त्यावेळेला महानगरपालिकेचे कर्मचारी आणि अधिकारी आणि सिटी सर्वेचे ऑफीसर त्या जागेची मोजणी करत असतांना त्या जमीनमालकांनी दादागिरी करून आपल्या कर्मचाऱ्यांना आणि यांना तेथुन हाकलुन लावले . त्या दिवसापासुन तो प्रस्ताव तश्या परिस्थिती मध्ये आहे त्याच परिस्थितीमध्ये प्रलंबित आहे. जेणेकरून तो भुसंपादनाचा प्रस्तावही गतीने सुरू करण्यात

यावा. जेणेकरून हे ट्रान्सपोर्ट नगरही जळगांव शहराच्या बाहेर जाईल . या शहराच्या मध्यवर्ती भागात असलेली ही ४ एकर जागा याच्या संदर्भातील निर्णय महानगरपालिका जे काही भविष्यात धोरण ठरवेल त्या दृष्टीकोनातुन त्याचा उपयोग करता येईल आपल्याला परंतू मुळात १९८३ सालात तत्कालिन प्रशासनाने तब्बल ३ वर्ष करार मुदतीने ती जागा दिलेली होती म्हणजे एखादी जागा ३ वर्षाच्या मुदतीने दिलेली आहे. १९८३ साली तीचा करारनामा संपुष्टात यायला पाहीजे होता. १९८६ सालीच ती जागा महानगरपालिकेने किंवा तत्कालिन नगरपालिकेने ताब्यात घ्यायला पाहीजे होती. परंतू जवळजवळ ३० /३० वर्षाचा कालावधी गेल्यानंतर सुध्दा महानगरपालिका आपल्या जागा योग्य पध्दतीने अंमल करून ताब्यात घेत नाही. कोट्यवधी रूपयांच्या जागा आहेत आणि या पध्दतीने याच विषयाला अनुसरून की जळगांव शहरातील मेहरूण भागातील आपली घरकुलची जागा आहे. अत्यंत मोक्याची जागा आहे. या विषयावर मी १० वेळा चर्चा करून चुकलेलो आहे. आयुक्त साहेब आपण येथे आल्यानंतर सुध्दा कमीत कमी चौथ्यांदा- पाचव्यांदा ही चर्चा होत असेल की सदरहु जागेचा कोट्यवधी रूपयाचा भुसंपादनाचा मोबदला अदा केल्यानंतरही आजही बराचसा भाग जमिन मालकाने स्वत:च्याच ताब्यात ठेवुन स्वत:चा उत्तम व्यवसाय तिथे चालवलेला आहे. म्हणजे आपल्या कोट्यवधी रूपयांचा भुसंपादनाचा मोबदला गेल्या साढे तिन चार वर्षापुर्वी वाढीव मोबदला अडीच कोटी रूपयाचा उच्च न्यायालयाच्या निकषाप्रमाणे आपल्याला द्यावा लागला. परंतू मला हे कळत नाही की महानगरपालिकेने या कोट्यवधी रूपयांच्या जागा जी जागा आपली ताब्यात घेण्याच्या संदर्भातली भुमिका का स्विकारत नाही? इतक्या १० / १० वेळा सभागृहात चर्चा होवुन सुध्दा प्रशासन जबाबदारीतुन का पळ काढतय ? आज तुम्ही त्या जागेची परिस्थिती तुम्ही बघाल तिथे म्हंशींचे गोठे तयार झालेले आहेत. म्हशींना लागणारा चारा तिथे डंम्प केलेला आहे. जमिन मालकाचा स्वत:चा व्यवसाय तिथे सुरू आहे. ती जागा किती आपली आहे किती दुसऱ्याची आहे. याचे मोजमाप सुध्दा महानगरपालिकेकडे नाहीये. साधारणत: ४ महिन्यापुर्वी माहितीच्या अधिकारात दिलेला प्रश्न त्याला सुध्दा उत्तर अजुन मला प्रशासनाकडुन मिळालेल नाहीये. अश्या पध्दतीने कोट्यवधी रूपये किंमतीच्या जळगांव शहर महानगरपालिकेच्या मालकीच्या ज्या ज्या जागा असतील. खुल्या जागा असतील , खाजगी जागा असतील त्या पध्दतीने ही जागा त्या पध्दतीने सम्राट कॉलनीला लागुन असलेली घरकुलची जागा आहे.तयार आहे. (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** नितीन भाऊ जे मांडता आहे ना तुम्ही हे चार वेळा बोललेले आहे मागे तुम्ही सभागृहात .

**श्री.नितीन लढ्ढा :-** (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** बुध्दु समजता आहे का आम्हाला ऐकवता आहे तर

**श्री.प्रशांत नाईक :-** आप्पा प्रशासन ऐकत नाही ना प्रशासनाला तर ऐकु द्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आयुक्त महोदय

**श्री.कैलास सोनवणे :-** सगळे मंजुर आहे ६५ पर्यंत

**श्री.नितीन लढ्ढा :-** आयुक्त महोदय या जागा ताब्यात घेण्यासंदर्भातला प्रशासन काही आश्वस्त कार्यवाही करेल का?

**श्री.कैलास सोनवणे :-** (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.नितीन लढ्ढा :-** अहो आप्पा

**श्री.कैलास सोनवणे :-** हा ना तुम्ही जे ऑग्रुमेंट करता आहे ना त्याच्यामध्ये तुम्हाला निकाल भेटुन गेला ना कशाला हे करता आहे तुम्ही

**ॲड. शुचिता हाडा :-** महापौर ताई या विषयासंदर्भात नितीनभाऊ जे बोलताहेत अगदी वस्तुस्थिती आहे ती महानगरपालिकेच्या कोट्यवधी किमतीच्या जागा अशा रितीन दिलेल्या आहेत आणि प्रशासनाने योग्य पाठपुरावा न केल्यामुळे अजुनही टेक्निकली आपण कार्यवाही करू शकत नाहीये. ती या विषयाची एक अडचण मी तुम्हाला लक्षात आणुन देते. यामध्ये प्रशासनाने त्यावेळेस कॅव्हेटच दाखल केले नाही .त्यामुळे हा विषय तांत्रिक विषयी अडचणीचेच होणार आहे आणि (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

त्यापुढचे व्हिजन काय आहे. याच्याबाबत विचार केला पाहीजे या सभागृहाने मी स्वत: सभापती असतांना (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.) काय झाले त्याचे , फ्युचर व्हिजन काय आहे . पुढच्या व्हिजनचे केव्हा करणार आपण , मग जमिनदारी करायची आहे का आपल्याला मनपाच्या मालमत्ता

गोळा करायच्या आहेत का आपल्याला , पुढच्या व्हिजन बद्दल कोणीतरी विचार करा. संपुर्ण सभागृहाला हे आवाहन आहे . जागा ताब्यात घेणे आवश्यक आहे.त्याच्यापुढचे व्हिजन काय आहे. त्याच्यामध्ये प्रशासनाने वेळेमध्ये कार्यवाही न केल्यामुळे टेक्निकली हा विषय अडचणीचा झालेला आहे. २०१८ चे जजमेंट आहे. No overseas state to be taken against petitionor on petition  in this order स्पेसिफीक म्हंटलेले आहे. कॅव्हेट आपण दाखल नाही केलेल पुढे आपण काय करणार आहात . काय करणार आहेत आपण

**श्री.नितीन लढ्ढा :-** विधी सल्लागाराचे मत घेतले होते का प्रशांत पाटील साहेब

**म.उपायुक्त , श्री.प्रशांत पाटील :-** हो

**श्री.नितीन लढ्ढा :-** काय मत आहे त्यांच

**म.उपायुक्त , श्री.प्रशांत पाटील :-** हो त्याची मी चर्चा केली होती आपले जे मुख्य विधी सल्लागार आहेत त्यांच्याशी चर्चा केली होती त्यांच मत आहे की त्या तारखेपर्यंतच तो स्टे आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तो स्टे आहे  ना ताई त्या तारखेपर्यंतच आहे . त्याच्यानंतर ॲटोमेटीकली व्हॅकेंट झालेला आहे तो स्टे

**ॲड. शुचिता हाडा :-** मला वाटत २०१९ मध्ये झाला होता तो त्यावेळेस मला वाटत उपसंचालक धामणे साहेब जेव्हा होते.तेव्हा (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.) होते ते सुध्दा तपासुन घ्यावे. जेव्हा जागा ताब्यात घ्यायची आहे पण त्याच पुढच व्हिजन सुध्दा असल पाहीजे. नाहीतर मग सरळ त्यांच्याकडुन भाडे वसुल करा. नाहीतरी जागा आपली होती गाळे त्यांनी बांधलेले आहेत. नाहीतर जशा आपले मार्केटचे आहेत तशा त्यांना नोटीसेस द्या . मग भाडे वसुल करा निदान महापालिकेचे उत्पन्न तरी वाढवा. फक्त जागा ताब्यात घेवुन त्याच्या कचराकुंड्या करू नका. ऐवढच माझ म्हणण आहे आणि जे काही कराल ते टेक्निकली पाहुन कराल एवढच माझे म्हणणे आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** लवकरात लवकर काय करायचे ती प्लॅनिंग करा त्या ठिकाणची , महापौर ताई दोन मिनिंट आता हे जेव्हा बोलता आहे ना मी त्यांना फोटो दाखवले त्यांना बिजे मार्केट चे आपले डायरेक्ट चारही साईडने चार दुकाने बांधुन टाकलेले आहे. म्हणजे कोणीही येत आणि आपल्या प्रापर्टीवर दुकाने करून टाकतात आणि त्याच्यामुळे काही नागरीक येवुन गेले तुमच्याकडे मागे मी आलो होतो त्याच्यासोबत त्याठिकाणी स्पेअरपार्टच दुकान टाकलेले आहे. एकाने गॅरेजचे दुकान बांधलेले आहे आणि जे मार्केटवाले दुकानदार आहे त्यांना वापरायला जागा राहात नाही. त्यांना शिवीगाळ होते दुकानदारांना कोण काय करीन मी पाहुन घेईन . ते लोक माझ्या सोबत होते स्वत: त्यांनी तुम्हाला सांगीतले. तुमच्या कडे ते डिपार्टमेंट आहे मी तुम्हाला विनंती केली की , १० ते १५ दिवस फोन केले , ते तोडा याच्यानंतर हे ऊर्दु शाळेच्या बाजुला दुकान पडले आहेत आपले दुसऱ्यांना विकुन टाकलेले आहे परस्पर ते पण तोडा आणि हे दोन मार्केट चे दुकानंपण ताब्यात घ्या हे मी तुम्हाला विनंती करतो साहेब लक्षात राहू द्या तुम्ही

**म.उपायुक्त , श्री.प्रशांत पाटील :-** हो हो

**मा.महापौर :-** सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** ताई ६५ पर्यंत मंजुर आहे मी पहिलेच बोललो आहे. (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.) ज्याला बोलायचे असेल त्यांनी बोला.

**नगरसचिव :-** याला अनुमोदक कोण आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** कोणी पण घ्या ना काय फरक पडतोय.

**श्री.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-**  सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६७७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव नगरपालिका,जळगांव चे तत्कालीन प्रशासक यांनी त्यांचे जा.क्र.३२४४ दि.२९/१२/१९८३ व आदेश क्र.४२६/८४-८५ दि.०५/०९/१९८४ नुसार मेहरुण शिवारातील सि.स.नं.३० मधील १.६६ हेक्टर जागा जनरल सेक्रेटरी,जळगांव जिल्हा मोटार्स ओनर्स & ट्रान्सपोर्ट एजेंट

असोसिएशन,पोलन पेठ,जळगांव यांना ट्रक टर्मिनसाठी ३ वर्षासाठी भाडेपट्टयाने देण्यात आली होती. त्यानुसार सदर जागेचा ताबा असोसीएशनला देण्यात आला होता. त्या नंतर असोसीएशने केलेल्या मागणीनूसार सदर जागा ९९ वर्षाच्या मुदतीसाठी भाडेपट्टा कराराने देणेबाबत ठराव तत्कालीन नगरपालिकेने ठराव क्र.१४४ दि.२४/०८/१९८७ रोजी पारित केला होता व त्यास शासनाची मंजुरी करीता प्रस्ताव पाठविण्याचे नमूद होते.

त्यानंतर नगरपालिकाचे ठरविलेले भाडे जास्त असल्याने नमूद करुन असोसिएशनने वाजवी किंमत आकारुन सदर जागा कायमस्वरुपी मालकी हक्काने मिळावी अशी विनंती नगरपालिकेस अर्जाव्दारे केली. त्यानुसार नगरपालिकेने ठराव क्र.२०६ दि.२५/०८/१९८८ पारित करुन रक्कम रु.११,२५,०००/- एवढया किंमतीस असोसिएशनला मालकी हक्काने देण्यास मंजुरी दिलेली होती व याबाबतीत शासनाची मंजुरी घेण्याचे त्यात नमूद होते. मात्र अदयापपावेतो वरील दोन्ही ठरावांना शासनाची मंजुरी प्राप्त झालेचे दिसून येत नाही. त्यानंतर प्रशासनाने महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार दि.०२/०५/२०१६ रोजी सदर जागेचा ताबा महानगरपालिकेस देण्याबाबतचा आदेश देखील सदर असोसिएशनला बजावलेला आहे.

उक्त नमूद बाबींचा विचार करता जळगांव जिल्हा मोटार ओनर्स & ट्रान्सपोर्ट एजेंट असोसिएशन,पोलन पेठ,जळगांव यांना ट्रक टर्मिनसाठी दिलेली मेहरुण शिवारातील सि.स.नं.३० मधील १.६६ हेक्टर जागा ताब्यात घेणे व नगरपालिकेच्या कार्यकाळातील ठराव क्र.१४४ दि.२४/०८/१९८७ रोजी व ठराव क्र.२०६ दि.२५/०८/१९८८ महानगरपालिकेचे आर्थिक हित विचारात घेता सदर दोन्ही ठराव रद्द करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच न्यायालयाची स्थगीती नसल्याचे व इतर कायदेशिर बाबी तपासून प्रशासनाने सदर जागेचा ताबा तातडीने घेण्याची व नुकसान भरपाई आकारणी करणेबाबतची कार्यवाही करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- नाईक प्रशांत सुरेश**

**नगरसचिव विषय क्रं ५२:-** RCH-II अंतर्गत कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांना कायम सेवेत सामावून घेणेबाबत मा.सभागृहनेता,श्री.ललित विजय कोल्हे यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.महेश चौधरी :-** साहेब , साहेब ५२ नंबरच्या विषयावर मला बोलायचे आहे. विषयाला विरोध नाहीये परंतू RCH अंतर्गत यांची आयुक्त साहेब थोड माझा विषय आहे. RCH अंतर्गत जो प्रोग्राम आहे तो आता सद्या चालु आहे का ? माझा पहिला प्रश्न आहे आणि जर आपल्याला त्यांना RCH च्या प्रोग्राम मध्ये परमनंट करता येईल का? हा विषय आहे तुम्ही मला याच्यावर खुलासा करावा. जर आपल्याला तस करता येत असेल तर आपण ते मंजुर करू.

**श्री.नितीन लढ्ढा :-** जळगांव शहर महानगरपालिके अंर्तगत ४ वैद्यकीय अधिकारी सन २०१० पासुन व १ परिचारीका २००८ पासुन महिला व बाल आरोग्य कार्यक्रमा अंतर्गत कार्यरत आहेत.महासभा ठराव क्रं. ५६ दि. २८/११/२००७ अन्वये सदर RCH-II योजना राबवणे करीता वैद्यकीय अधिकारी व परिचारीका यांची पदे भरण्यास व सदर पदावरील वेतनावरील पुढील सन २००८-०९ मध्ये ५० टक्के सन २००९-१० मध्ये ७५ टक्के व २०१० नंतर वेतनावर होणारा संपुर्ण खर्च करण्यास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. तसेच RCH- II अंतर्गत वैद्यकीय अधिकारी व परिचारीका यांची पदे विहीत पध्दतीनुसार भरण्यात आलेली आहेत. वैद्यकीय अधिकारी व परिचारीका यांची नांवे डॉ.पल्लवी नारखेडे , डॉ.पल्लवी पाटील , डॉ.सुमन जोशी , डॉ.सायली पवार आणि परिचारीका अलका बाविस्कर याच्यामागची पार्श्वभुमि आयुक्त साहेब मी आपल्याशी चर्चा केली की इतर महानगरपालिकांनी म्हणजे इतर महानगरपालिकानांही हे शासन निर्णयच आहे. की अमरावती आहे , सांगली आहे , लातुर आहे मिरज कुपवाड आहे. या सर्व महानगरपालिकांनी अशा पध्दतीने त्यांच्या सेवेमध्ये असलेली जी पदे होती ती त्यांनी नियमीत

आपल्याच सेवेमध्ये समाविष्ठ करून घेतलेली आहेत आणि तशा पध्दतीचा ठराव करून राज्य शासनाला पाठविलेला आहे. राज्य शासनाने त्यास मान्यता दिलेली आहे. तर त्याच पध्दतीने आपणही त्याच पध्दतीने ठराव करून त्यांना आपल्या सेवेमध्ये समाविष्ठ करण्याच्या दृष्टीकोनातुन राज्य शासनाला या बाबतीतला प्रस्ताव पाठविण्यात यावा. तसा एक प्रस्ताव आपल्याकडे सादर करतोय.

**श्री.महेश चौधरी :-** साहेब तस होवु शकते का विचारून घ्याना.

(सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.महेश चौधरी :-** त्यांनी फक्त खुलासा करावा की तसं होत का (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.) हे पहा उलट त्यांना चॉकलेट देवु नका अस माझ म्हणणं आहे. (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.) माझ काय म्हणण आहे त्यांना चॉकलेट देवु नका. जे खरय ते सांगा . आयुक्त साहेबांनी खुलासा करावा.

**मा.महापौर :-** विषय क्रं. ५२ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे. विषय क्रं. ५३ घेण्यात यावा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६७८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी जळगांव RCH-II अंतर्गत कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या पदांसाठी Walk in Interwiew साठीची जाहिरात दि.२३/०१/२०१० च्या लोकमत प्रादेशिक यात प्रकाशीत करण्यात आलेली होती. सदर मुलाखत दि.३०/०१/२०१० रोजी घेण्यात आली. त्या मुलाखतीनुसार निवडसूची जाहिर करण्यात आली. त्या निवड यादीनुसार सर्व महिला अधिकारी RCH-II या पदावर दि.२८/०५/२०१० रोजी रुजू झालेल्या आहेत.

महिला वैदयकीय अधिकारी या पदावर रुजू झाल्यापासून आजपावेतो दिलेल्या नागरी आरोग्य केंद्राअंतर्गत येणारी सर्व कामे उदा.बाहयरुग्ण तपासणी, साथरोग नियंत्रण, पल्स पोलीओ अभियान, सर्व राष्ट्रीय कार्यक्रम, PCP NDT अंतर्गत दवाखाने तपासणी, MR Campain सारखे लसीकरण कार्यक्रम राबविणे, नियमित लसीकरण करुन घेणे, वरिष्ठांनी तोंडी अथवा लेखी आदेशीत केलेली सर्व कामे तसेच सदयाच्या कोरोनाच्या जागतिक महामारीच्या काळातही सर्व कामे जबाबदारीने पार पाडलेली आहेत.

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांचेकडून दि.०३/०८/२०१७ दि.०६/१२/२०१८ दि.१०/१२/२०१८ व दि.१७/१२/२०२१ रोजीच्या पत्रात प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम अंतर्गत (RCH-II) कंत्राटी मानधन तत्वावरील कर्मचाऱ्यांचे पदनिहाय माहिती व सदर कर्मचाऱ्यांना मनपाच्या कायम सेवेत सामावून घेणे बाबत मा.महासभेने ठराव केलेला आहे काय ? याबाबत विचारणा केलेली आहे. त्याअनुषंगाने सदर माहिती ई-मेलव्दारे (ठरावाशिवाय) दि.२४/०३/२०१८, दि.३१/०३/२०१८, दि.३१/०५/२०१८ व दि.२२/०२/२०१९ रोजी नगरविकास विभाग मंत्रालय येथे पाठविण्यात आलेली आहे. वरील तारखांना नगरविकास विभाग मंत्रालय येथून प्राप्त झालेल्या पत्राच्या अनुषंगाने सर्व RCH-II अधिकारी यांना कायम सेवेत सामावून घेण्यासाठीचे विनंती अर्ज दि.२१/०२/२०१९, दि.२०/१०/२०१९, दि.२४/०३/२०२१ व दि.२५/०८/२०२१ रोजी सादर केलेले आहेत.

RCH-II अंतर्गत कर्मचाऱ्यांना कायम सेवेत सामावून घेण्याचे पत्र नगरविकास विभाग, मंत्रालय येथून दि.०४/१०/२०२१ रोजी आयुक्त,नाशिक/जळगांव/मालेगांव/अहमदनगर/धुळे मनपा अधिनस्त RCH-II अंतर्गत कंत्राटी अधिकारी/कर्मचारी यांना मनपाच्या आस्थापनेच्या कायम पदावर सामावून घेणे बाबत आयोजित बैठकीत सर्व मनपाचे कायम सेवेत सामावून घेण्याबाबतचे प्रस्ताव मागविण्यात आलेले होते.

ज्या मनपांनी मंत्रालयात RCH-II कर्मचाऱ्यांना कायम सेवेत सामावून घेण्याबाबतचे प्रस्ताव सादर केले त्या मनपांनी मंत्रालयातून RCH-II अंतर्गत कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना आस्थापनेच्या कायम सेवेत सामावून घेण्याची मंजुरी देण्यात आली आहे. दि.०५/१०/२०२१ रोजीच्या मंत्रालयाच्या बैठकीत चंद्रपुर मनपाने प्रस्ताव सादर केला असता त्यांच्या RCH-II अंतर्गत कर्मचाऱ्यांना कायम सेवेत सामावून घेण्यास मंजूरी देण्यात आली आहे तसेच

यापुर्वी मिरा भाईंदर, धुळे, पुणे, पिंपरी चिंचवड, सांगली-मिरज कुपवाडा, औरंगाबाद, मालेगांव, बृहन्मुंबई, परभणी या मनपांनी RCH-II अंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांना कायम सेवेत सामावून घेण्यासाठीचे प्रस्ताव सादर केले असता सदर कर्मचाऱ्यांना कायम सेवेत सामावुन घेण्यास मंजूरी मिळालेली आहे.

जळगांव शहर महानगरपालिकेत RCH-II अंतर्गत कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांनी मे-२०१० पासून केलेल्या कामाचा व वारंवार केलेल्या विनंती अर्जाचा सहानुभूतीपुर्वक विचार करता त्यांना जळगांव शहर महानगरपालिकेच्या कायम सेवेत सामावून घेणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तरी प्रशासनाने याबाबतची आवश्यक ती प्रक्रिया त्वरीत सुरु करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं ५३:-** जिल्हा अतर्गंत बदली करुन मिळणेबाबत श्री.मनिराम सोमा भोये, लिपीक, महानगरपालिका,जळगांव यांनी मा.महापौर यांना दिलेल्या अर्जावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कैलास सोनवणे :-** सगळे विषय झालेले आहे ना आता कुणाला चर्चा करायची असेल ते करतील

(सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** कुणाला बोलायचे असेल तर बोला. बोला ताई बोला

**ॲड. शुचिता हाडा :-** महापौर ताई विषय क्रं. ५३ वर मला बोलायच आहे.

(सभागृहातील सन्मा.सदस्यांना बसणेसाठीच्या बाकावर बाहेरील अनोळखी व्यक्ती येवुन बसल्यानंतर त्यांना मनपाचे सिक्युरीटी गार्ड व पोलीसांनी त्यांना सभागृहाबाहेर काढले.)

(सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.आयुक्त:-** आता हा विषय क्रं. ५३ जो आहे. आंतरजिल्हा बदलीचा अर्ज आहे मला सभागृहाला एक विनंती करायची आहे की यापुर्वी आपण अशाप्रकारचे बरेचशे असे अशासकीय विषय घेतो व ठराव करतो आणि नंतर त्या ठरावाच्या विषयी अंमलबजावणी साठी प्रशासनाला काही अडचणी येतात. मात्र जो संबंधित लाभार्थी आहे तो त्या ठरावाच्या आधारे काही तरी कायदेशीर अडचणी निर्माण करतो. तर अशा वेळेला सार्वजनिक हिताचे विषय असतात. आपल्या वॉर्ड मधील जे विकास कामांचे जे विषय आहेत.त्याबद्दल आपण अशासकीय प्रस्ताव देण मंजुर करणं हा निश्चितपणे नगरसेवकांचा अधिकार आहे ते आपलं कर्तव्य आहे. परंतू कर्मचाऱ्यांच्या सेवा शर्ती किंवा अशा प्रकारचे जागा देण हे असे विषय की आपल्याला भविष्यामध्ये काही कायदेशीर अडचणी निर्माण होवू शकतात. असे विषय हे प्रशासनाकडून त्याची छाननी करून त्यावर अभिप्राय आल्यानंतर निर्णय घेणं हे सभागृहाच्या हिताच आहे आणि महापालिकेच्याही हिताच आहे. अशाप्रकारे आत्ताच आपण बघितल कि जे ४ , ५ , ६ हे तिन विषय आंतरजिल्हा बदलीचे होते .त्याच्यावर खुप चर्चा करून काही तांत्रिक मुद्दे सदस्यांनी मांडले आणि मग त्यावर आपण कुठेतरी निर्णय घेवु शकलो.अशा प्रकारचा अर्ज हा थेट महासभेसमोर येण आणि त्याच्यावर हो किंवा नाही हा निर्णय घेणं हे योग्य वाटत नाही. त्यामुळे मग कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्ती मध्ये , जागा कुठल्यातरी संस्थेला देण्याच्या संदर्भामध्ये असे विषय थेट येवुन आपण कायदेशीर अडचणी भविष्यामध्ये निर्माण करू शकतो. यापेक्षा अशा प्रकारचे विषय प्रशासनामार्फत आपण महासभेसमोर आणलेले हे महासभेच्या हिताच्या दृष्टीने योग्य राहील. कारण अशा अर्जावर थेट निर्णय घेणे योग्य वाटत नाही.

(सभागृहात मा.महापौर, मा.उपमहापौर,मा.आयुक्त व नगरसचिव यांनी आपआपसात चर्चा केली .)

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. ५३ या विषयी प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी. विषय क्रं. ५३ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे . विषय क्रं. ५४ घ्या.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६७९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, श्री.मनिराम सोमा भोये, लिपीक, महानगरपालिका,जळगांव हे दि.२९/११/२०१२ पासून सरळसेवा पदभरतीच्या अनुषंगाने अज.(S.T) या प्रवर्गातुन लिपीक पदावर कार्यरत असून त्यांचे मुळगांव ता.साक्री जिल्हा धुळे येथिल असल्याने त्यांनी कौटुंबिक परिस्थिती व लहान भाऊ अपंग असलेबाबत तसेच आई वडील वयोवृध्द असल्याने आंतरजिल्हा बदली होणे कामी विनंती अर्ज केलेनूसार श्री.मनिराम सोमा भोये, लिपीक, महानगरपालिका,जळगांव यांची धुळे जिल्हा परिषद येथे जिल्हा अंतर्गत बदली करणे कामी मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सदर बाबतीत प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं ५४:-** दि.२०/०९/२०२१ रोजी संपन्न झालेल्या ऑनलाईन (ॲपव्दारे) स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**मा.उपमहापौर :-** विषय क्रं. ५४ ते ६५

**मा.महापौर :-** नाही ना त्यांना बोलायचे होते ना

**ॲड. शुचिता हाडा :-** मला बोलायचे आहे.

**मा.उपमहापौर :-** विषय क्रं. ५५

(सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय क्रं. ५४ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६८० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, दि.२०/०९/२०२१ रोजी संपन्न झालेल्या ऑनलाईन (ॲपव्दारे) स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं ५५:-** ऑनलाईन बिल्डींग प्लॅन मनेजमेंट सिस्टीम योग्य रितीने कार्यन्वीत ठेवण्यासाठी दि.०१/०४/२०२१ पासुन दि.३१/०३/२०२२ पर्यंतच्या कालावधीसाठी ०१ (एक) कर्मचारी नियुक्ती करणेस मुदत वाढ व १२ महिन्याचे वेतनापोटी येणाऱ्या एकूण रक्कम रु.६,९०,६६०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**ॲड.शुचिता हाडा :-** विषय क्रं. ५५ हा ईथे आपल्यासमोर आलेला आहे.ऑनलाईन बिल्डिंग प्लॅन मॅनेजमेंट सिस्टिम योग्य रितीने कार्यान्वीत ठेवण्यासाठी दि.०१/०४/२०२१ पासुन दि.३१/०३/२०२२ पर्यंतच्या कालावधीसाठी १ मनुष्यबळ करीता येणाऱ्या खर्चाचे बिल महाआयटी यांना अदायगी करणेबाबत मला ईथे करवंदे साहेबांना एक प्रश्न विचारायचा आहे. महापौरताई आपण त्यांना माझ्या प्रश्नाचं उत्तर देण्याची सुचना करावी. आपल्याकडे ऑनलाईन च कामकाज हे केव्हापासुन बंद आहे.

**नगररचनाकार, श्री.करवंदे:-** ऑनलाईनचं कामकाज हे आपले वास्तुविशारद किंवा इंजिनियर आहेत जे ऑनलाईन अर्ज दाखल करतात. ज्यांना जमत नाही किंवा काही तांत्रिक अडचण येते तर आपण दोन्ही विहीत पध्दतीने ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने आपण प्रस्ताव दाखल करून घेतो

**ॲड.शुचिता हाडा :-** साहेब आपण ऑनलाईनसाठी स्वत: ईथे नमुद केलेले आहे . याच्यासाठी नविन युनिफाई डिसीआर मंजुर झालेले असुन , नविन युनिफाई डिसीआर मंजुर झालेला आहे , नविन जर डिसीआर मंजुर झाल्यानंतर त्याच साफ्टवेअर शासनाकडुन आलं का?

**नगररचनाकार, श्री.करवंदे:-** ते महाआयटीला दिलेले आहे ते महाआयटी कडून सॉफ्टवेअर आलेल आहे. त्यांनी दोन माणस नियुक्त केलेले होते. त्यापैकी एक व्यक्तीची भुसावळला ट्रान्सफर झालेली आहे आणि एक व्यक्ती आपल्याकडे काम करतोय.

**ॲड.शुचिता हाडा :-** ते आपल्या डॉकेटमध्ये आलेले आहे. पण जस सन २०२० मध्ये महाराष्ट्रासाठी एकीकृत विकास नियमावली मंजुर केली आणि ती २०२० पासुन अंमलात आली.

**नगररचनाकार, श्री.करवंदे:-** हो

**ॲड.शुचिता हाडा :-** त्याचे सॉफ्टवेअरच तुमच्याकडे आलेले नाही त्यामुळे तुमचे सगळे ऑनलाईनचे कामे बंद आहेत. मग ऑनलाईनचे काम बंद असतांना त्या खर्चाचा कसा काय प्रस्ताव पाठवु शकतो.

**नगररचनाकार, श्री.करवंदे:-** नाही नाही ऑफलाईनची जी काम आहे ती मनपा कडून झाली.

**ॲड.शुचिता हाडा :-** नाही नाही ऑनलाईन साठीचा प्रस्ताव पाठविलेला आहे. ऑनलाईनची कामे आज सुध्दा तुमचे बंद आहेत. ऑनलाईन च्या फाईल तुमच्या फिरताहेत. ऑनलाईनच्या फाईल तुमच्या पेडींग आहेत. कारण त्यासाठीच साफ्टवेअर शासनाकडून तुमच्याकडे आलेल नाहीये.

**नगररचनाकार, श्री.करवंदे:-** नाही ऑनलाईन चे

**ॲड.शुचिता हाडा :-** आयुक्त साहेब मी येथे लक्ष वेधु ईच्छिते यांच्याकडे माझ्या माहितीप्रमाणे डिसेंबर २०२० पासुन ऑनलाईनचे काम बंद आहेत त्याच कारण हे आहे एकीकृत विकास नियमावली मंजुर केली शासनाने त्यासाठी त्यांच सॉफ्टवेअर अजुनही आले नाही आणि त्यामुळे ते कामं बंद आहेत जर ते कामच बंद आहेत . तर अशा परिस्थितीमध्ये त्यासाठीच्या मनुष्यबळाच्या खर्चाचे आपण कशी काय मागणी करू शकतो. येथे असे आहे की ०१/१०/२०२० ते ३१/०३/२०२१ पर्यंतचे ६ महिन्यांचे वेतन येथे आपण ऑलरेडी विकास कामांचे शुल्क व इतर संगणकीय कामकाजा विषयी आपण दिलेले आहे.आता डिसेंबर पासुन ते कामकाज बंद आहे. मग आपण ६ महिन्यांचा खर्च सुध्दा करून टाकला आणि मग आपण मागील पण करतोय आणि पुढच्या वर्षाची मागणी पण करतोय . जर ते कामकाज बंद आहे.

**मा.आयुक्त:-** मी सांगतो आपल्याकडे जी ऑनलाईन बिल्डींग परमिशन सिस्टिम जी आहे. ती १ जुलै २०१८ पासुन राज्यभर सुरू झालेली आहे. आता याच्यामध्ये ADTP यांनी खुलासा केला त्याप्रमाणे काहीवेळेला राज्य शासनाने ऑफलाईन प्रस्ताव समिंट करायची परवानगी दिलेली होती आणि त्याला अनुसरून राज्य शासनाच्या धोरणाप्रमाणे ते सगळ सॉफ्टवेअर सेटअप होवुन महानगरपालिकेला याची संपुर्ण माहिती होईपर्यंत जी शासनाची महाआयटी कंपनी आहे. त्यांच्या मार्फत आपल्याला दोन तंत्रज्ञ उपलब्ध करून दिलेले होते.याच्यासाठी जी पगारासाठी लागणारी जी रक्कम आहे ती दर सहामहिन्यात शासनाकडे ॲडव्हान्स म्हणुन शासनाकडे डिपॉझीट करतो आणि त्याच्यानंतर ते कर्मचारी आपल्याला दिले जातात. आता ०२ डिसेंबर २०२० याच्यापासुन नविन डिसीआर मंजुर झाला आता हा मंजुर झाल्यानंतर त्याच्यामध्ये आपण जुन्या प्रकरणांची सुध्दा त्या जुन्या सॉफ्टवेअर मधुन आपण करत आलेलो आहे. आता त्याच्यामध्ये नागरीकांना असा पर्याय दिलेला होता की जरी डिसेंबर २०२० ला नविन नियम आले. तरी जी प्रकरणे पुर्वी दाखल केलेली आहेत. त्यांच्यासाठी हि मुभा आजही २०२२ पर्यंत चालु आहे. अजुनही त्या जर जुने प्रकरण असेल तर जुन्या प्रकरणांवर जुन्या नियामांप्रमाणे त्या जुन्या प्रकरणे मंजुर करून घेवु शकतात. जर नविन नियमाप्रमाणे करायच आहे त्यांनी नविन नियमाप्रमाणे कराव. आता दोन्ही प्रकारच्या नियमांची अंमलबजावणी काही कालावधीमध्ये सुरू असल्यामुळे आपल्याला DCMA मध्ये आपल्याला तंत्रज्ञांची आवश्यकता होती. त्यामुळे आपण ३१ मार्च २०२१ पासुन कन्टीन्यु ठेवले आहे. आता डिसेंबर २०२० ला नविन झालेल्या नियमाप्रमाणे सॉफ्टवेअर बनविण्याचे काम हे महाआयटी मार्फत चालु आहे. आता आपल्याला याची कल्पना नाहीये की ते कधी पुर्ण होईल आणि कधी कंम्पलिशन होईल .आता साधारणत: ४ महिन्यांपुर्वी या सॉफ्टवेअरच टेस्टिंग झालेले आहे आणि फायनल प्रोजेक्ट काही नगरपालिका आणि महानगरपालिका हद्दीमध्ये चालु आहे. अशावेळेला केवळ ५ ते ६ महिन्यासाठी हि यंत्रणा डिस्टब करायची आणि संपुर्ण प्रकरण ऑफलाईन घ्यायची आणि नविन नियमानुसार नविन

सॉफ्टवेअर घ्यायचे आणि पुन्हा नविन कर्मचारी घ्यायचे हे न करता आहे हेच कर्मचारी कंटीन्यु करत आहोत. आपण काही त्यांना बसुन पगार देत नाही. महानगरपालिकेची रूटीनची जी काम आहेत ती आपण त्यांच्याकडुन करून घेतोय. त्यामुळे महापालिकेच्या हिताच्याही आणि कर्मचाऱ्यांच्याही मदतीसाठी आपल्याला हा महाआयटीचा स्टाफ आहे. तो एक जसा केला असे ADTP यांनी सांगीतले की दोन पैकी एक भुसावळला गेलाय.आता हाही जर दुसरीकडे गेला . तर पुन्हा नविन कर्मचारी आल्यानंतर पुन्हा त्याला आपल्याला नविन ट्रेनिंग देणे अडचणीच होईल. त्यामुळे आपण हा एक कर्मचारी आपण कंटींन्यु करतोय आणि माझ्या माहितीप्रमाणे आता येणाऱ्या महिन्यामध्ये राज्यातील बहुतांश नगरपालिका व महानगरपालिकांमध्ये नविन सॉफ्टवेअरची अंमलबजावणी होणार आहे .त्यामुळे जरी दोन चार महिने जरी त्यांच काम बंद असल . तरी आपण त्यांच्याकडुन नगररचनेच इतर काम करून घेतोय. त्यामुळे आपल्याला ही मान्यता देण योग्य राहील. याच्यामध्ये महापालिकेच कुठेही नुकसान होत नाही. स्टाफ आहे आपल्याकडे तो आपण इतर कामांसाठी वापरतोय आणि आता आपल्याला नविन सॉफ्टवेअरवर पुन्हा काम सुरू करायचे आहे.

**ॲड.शुचिता हाडा :-** नविन येईल . आपण नियुक्ती करत आहे तर तस ईथे नमुद झाल पाहीजे कारण आपण याचे बिल काढणार आहोत.आपण ही खर्चाला मंजुरी देतो आहोत साहेब खर्चाला मंजुरी देतांना आपण यांना ऑनलाईन बिल्डिंग मॅनेजमेंट चे माणस म्हणुन दाखवतो आहे आणि जर काम आपण ऑफलाईनच देत असु तर तस ईथे नमुद झाल पाहीजे कारण शेवटी ही जबाबदारी सभागृहाची सुध्दा येणार आहे. कारण आपण सभागृहाची पण मान्यता घेत आहात.

**मा.आयुक्त:-** आपल्याला ६ महिन्यापर्यंत स्थायी समितीची सभा झाली नाही. हा विषय स्थायी समितीचा आहे स्थायी समितीचा हा विषय महासभेसमोर आलेला आहे. त्यामुळे याच्यामध्ये अनियमीतता काही होणार नाही आणि जे कर्मचारी आपण नेमलेले आहेत. ते कर्मचारी आपली ऑनलाईन सिस्टिम जरी काही काळासाठी बंद असली तरी महानगरपालिकेच्या कामासाठी आपण वापरतो. आपली खात्री आहे की आपल्याला कामाची आवश्यकता आहे. तर त्याच्यासाठी होणारा खर्च हा काही वावगा नाही.

(सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. ५५ हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६८१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, राज्यातील ड वर्ग महानगरपालिकांसाठी बांधकाम परवानगी देणे करीता संगणकीय आज्ञावलीची अंमलबजावणी सुरु करणे बाबतचे क्र.टी.पी.एस.-१८१७/१८२/मु.स./नवि-१३ चे दि.२८/०३/२०१८ रोजीचे पत्र प्राप्त झाले असुन त्या अनुषंगाने संगणकीय आज्ञावलीची प्रक्रिया सुरु करणे बाबत शासनाने आदेशीत केलेले आहे. तसेच शासनाच्या महा.आय.टी.विभागाकडून महा.आय.टी./पी.आर.जे/०१/००३-२०१६ दि.०५/०५/२०१८ च्या पत्रानुसार सर्व संबंधीत महापालिकांनी दि.०१/०८/२०१८ किंवा त्या पुर्वी ऑनलाईन बिल्डींग प्लॅन मॅनेजमेंट सिस्टीम कार्यान्वीत करण्याचे आदेश दिलेले होते.

त्यानुसार ऑनलाईन बिल्डींग प्लॅन मॅनेजमेंट सिस्टीम राबविणेसाठी दि.०३/०४/२०१८ च्या शासन निर्णया नुसार ०२ तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध करुन घेणेसाठी प्रधान सचिव माहिती तंत्रज्ञान विभागाकडे दि.०१/०९/२०१८ रोजी मागणी करण्यात आलेली होती.

त्यानुसार दोन तांत्रिक मन्युषबळ महा आय.टी.ने उपलब्ध करुन दिलेले आहेत. त्याची मुदत दि.३०/०९/२०२० रोजी संपलेली आहे. मात्र दि.१०/१२/२०२० रोजीच्या महा आय.टी.च्या प्राप्त झालेल्या ई मेल नुसार नुकतेच नविन युनीफाईड डी.सी.आर मंजुर झालेले असुन त्या करीता दोन तांत्रिक मनुष्य बळाची गरज होती असे स्पष्टपणे नमुद आहे. त्या अनुषंगाने ०२ (दोन) तांत्रिक मनुष्यबळाची मुदत वाढ देणे आवश्यक आहे. महाआयटीचे दि.२७/१०/२०२० रोजी चे प्राप्त पत्रानुसार दि.०१/१०/२०२० ते दि.३१/०३/२०२१ पर्यंत एकुण ०६ महिन्याचे वेतन पोटी रु.६,१६,०७६/- (अक्षरी रुपये सहा लक्ष सोळा हजार शहात्तर मात्र) पुर्वी अदा केले

आहेत. सदरचा खर्च हा विकास शुल्काच्या, कागदपत्रे व इतर संगणकीय कामकाज खर्च या लेखा शिर्षातुन घेण्यात आलेला आहे.

वर नमुद केल्यानुसार यापुर्वी ऑनलाईन बिल्डींग प्लॅन मॅनेजमेंट सिस्टीम राबविणेसाठी दोन तांत्रिक मन्युष्यबळ महा आय.टी.ने उपलब्ध करुन दिलेले होते मात्र या दोन कर्मचाऱ्यांपैकी एक कर्मचारी यांची महा.आय.टी.कंपनी मार्फत भुसावळ नगरपरिषद येथे नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यामुळे दि.०१/०४/२०२१ ते दि.३१/०३/२०२२ पर्यंत पुढील १२ महिन्या करीता १ (एक) कर्मचारी यांची नियुक्ती करणेस मुदत वाढ व १२ महिन्याचे वेतना पोटी येणारा खर्च रक्कम रु.६,९०,६६०/- मात्र (अक्षरी रुपये सहा लक्ष नव्वद हजार सहाशे साठ मात्र) अदा करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं ५६:-** जळगांव शहर महापालिका मालकीचा मोकाट जनावरे बंदीस्त करणेचा कोंडवाडा ३ वर्ष कालावधीसाठी स्व.सौ.सुगनबाई शिवप्रकाश चांगरे गो-सेवा संस्था हे कोंडवाडयाचे उत्पन्नाचे ३०% स्वामित्व (रॉयल्टी) शुल्क म.न.पा.स देणेस तयार असल्याने निविदा अटी शर्तीनुसार मक्ता देणेस मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६८२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महापालिका मालकीचा मोकाट जनावरे बंदीस्त करणेचा कोंडवाडा ३ वर्ष कालावधीसाठी जनावरांची देखभाल करणेस चालविणे कामी खाजगी, अनुभवी गो-सेवा संस्थेस देणे कामी यापुर्वी ५ ते ६ वेळा कोंडवाडयाची जाहिर सूचना प्रसिध्द केली असता प्रतिसाद न मिळाल्याने पुन्हा

१. दैनिक लोकमत दि.१९/०८/२०२१ वृत्तपत्रात दरपत्रकाची जाहिर सुचना प्रसिध्द केली. दि.२६/०८/२०२१ पर्यंत एकही दरपत्रकाची निविदा प्राप्त झालेली नाही.
२. दैनिक लोकमत दि.२७/०८/२०२१ रोजी दरपत्रकाची फेर जाहिर सुचना प्रसिध्द करुन सुध्दा दि.०६/०९/२०२१ पर्यंत एकही निविदा प्राप्त झालेली नाही.
३. दैनिक लोकमत दि.०९/०९/२०२१ रोजी दरपत्रकाची जाहिर सुचना प्रसिध्द केली असुन दि.१६/०९/२०२१ रोजी मुदतीत एकच निविदा स्व.सौ.सुगनबाई शिवप्रकाश चांगरे गो-सेवा संस्था वसंतवाडी ता.जि.जळगांव यांची प्राप्त झालेली आहे.

वरीलप्रमाणे तिसऱ्या वेळेस एकच निविदा प्राप्त झालेने शासन निर्णय क्र.सी.टी./२०१७/प्र.क्र.८/इमार सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय, मुंबई ३२ दि.२७/०९/२०१८ च्या निर्णयानुसार १ किंवा अधिक निविदा प्राप्त झाल्यास त्या निविदा उघडुन पुढील कार्यवाही करावी असे नमुद आहे. त्यानुसार प्राप्त एकच निविदा उघडणेस अंतिम निर्णय निविदा समीतीने घेवुन निविदा उघडण्यास मान्यता दिल्यानुसार स्व.सौ.सुगनबाई शिवप्रकाश चांगरे गो-सेवा संस्था, वसंतवाडी ता.जि.जळगांव यांनी कोंडवाडयाचे उत्पन्नाचे ३०% स्वामित्व (रॉयल्टी) शुल्क महानगरपालिकेस देणार असल्याने जळगांव शहर महापालिका मालकीचा मोकाट जनावरे बंदीस्त करणेचा कोंडवाडा ३ वर्ष कालावधीसाठी स्व.सौ.सुगनबाई शिवप्रकाश चांगरे गो-सेवा संस्था,वसंतवाडी

ता.जि.जळगांव यांना महानगरपालिकेच्या निविदा अटी शर्तीनुसार मक्ता देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं ५७:-** म.न.पा.तर्फे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत खान्देश कन्या कवियित्री बहिणाबाई चौधरी सार्व.उदयानाच्या पुर्वेस नाविण्यपुर्ण योजना सन- २०१८-१९ अंतर्गत सार्व.शौचालय नव्याने बांधून तयार असून स्वच्छता युनिट प्रमुख प्रभाग क्र.७ व मख्य स्वच्छता निरिक्षक यांनी सादर केलेल्या अहवालानुसार सदर शौचालय पे ॲण्ड युज तत्वावर देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६८३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, म.न.पा.तर्फे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत खान्देश कन्या कवियित्री बहिणाबाई चौधरी सार्व.उदयानाच्या पुर्वेस नाविण्यपुर्ण योजना सन- २०१८-१९ अंतर्गत सार्व.शौचालय नव्याने बांधून तयार असून स्वच्छता युनिट प्रमुख प्रभाग क्र.७ व मुख्य स्वच्छता निरिक्षक यांनी सादर केलेल्या अहवालानुसार सदर शौचालय पे ॲण्ड युज तत्वावर देणेबाबत.

खान्देश कन्या कवियित्री बहिणाबाई चौधरी सार्व.उदयानाच्या पुर्वेस शौचालय बांधलेले असून त्यांचे विवरण खालील प्रमाणे आहे.

| | शौचालय सिट्स संख्या | मुतारी संख्या | स्नानगृह |
|---|---|---|---|
| पुरुष | ०१ | ०३ | ० |
| स्त्री | ०१ | ०२ | ० |
| एकूण- | ०२ | ०५ | ० |

वरील प्रमाणे शौचालय पे ॲण्ड युज तत्वावर खालील निकष व अटी शर्तीस अधीन राहून देता येईल.

१. शौचालयाची देखभाल दुरुस्ती, रंग रंगोटी करुन सुस्थितीत ठेवून पैसे दया व वापरा (पे ॲण्ड युज) या तत्वावर किमान ५ वर्ष कालावधी करिता देता येईल.
२. सदर शौचालय वापरा करिता रु.५/- व मुतारी मोफत वापर करणे कामी सेवा शुल्काचे दर राहतील.
३. सदर शौचालयाची व मुताऱ्यांची रंग रंगोटी व दुरुस्ती देखभाल वेळोवेळी करावी लागेल.
४. शौचालयाची व मुताऱ्यांची साफ सफाई व जंतुनाशकांचा वापर दैनंदिन करावा लागेल.
५. ज्या संस्थेस पे ॲण्ड युज तत्वावर देणेपुर्वी रु.५००/- च्या मुद्रांक पेपरावर करारनामा अटी शर्ती करुन दयावा लागेल.
६. पे ॲण्ड युज वर शौचालय देणे करिता ५ वर्ष कालावधी करिता सुरक्षा ठेव म्हणून रु.१०,०००/- भरणे आवश्यक आहे.

वरील प्रमाणे अटी शर्ती नुसार पे ॲण्ड युज तत्वावर शौचालय व मुताऱ्या दिल्यास म.न.पा.चा त्यावर होणारा खर्च वाचेल व नागरीकांना चांगल्या प्रकारे सुविधा उपलब्ध होईल. तसेच हायवे लगतचा भाग असल्याने बाहेरगांवी जाणारे नागरीक इतरत्र ठिकाणी लघुशंकेस जाणार नाही. तरी खान्देश कन्या

कवियीत्री बहिणाबाई चौधरी सार्व.उदयानाच्या पुर्वेस शौचालय पे ॲण्ड युज तत्वावर देणे करिता स्थायी समिती ठराव क्र.३५६ दि.२०/०९/२०२१ अन्वये वरील १ ते ६ अटी शर्ती नागरीकांना शौचालयाचा वापर करणे कामी रु.५/- व मुतारी मोफतसाठी मान्यता दिलेली आहे. तसेच दैनिक लोकमत दि.१३/१०/२०२१ रोजी दरपत्रकाची जाहिर सूचना प्रसिध्द करुन मुदतीत ६ दरपत्रकाचे सिलबंद पाकिटे प्राप्त झालेनुसार त्याचे दर प्राप्त झाले.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शौचालयाचे उत्पन्नाचे टक्केवारी |
|---|---|---|
| १. | अखील मेहतर वाल्मिक समाज रचनात्मक कार्य संस्था जळगांव. | ५% |
| २. | सुविधा सॅनिटेशन सर्व्हिस जळगांव. | १०% |
| ३. | जनहित कल्याण पर्यावरण संरक्षण संस्था | १३% |
| ४. | शिव सुगंध मेहतर वाल्मिकी समाज बहुउद्देशिय संस्था | १५% |
| ५. | नवल वेल्फेअर फाऊंडेशन नाशिक | २५% |
| ६. | ग्लोबल व्हीजन फाऊंडेशन जळगांव | ३०% |

वरील स्पर्धात्मक तक्ता मध्ये सदर शौचालय पे ॲण्ड युज तत्वावर देणे करिता प्राप्त रॉयल्टी दरानुसार ग्लोबल व्हिजन फाऊंडेशन जळगांव संस्था यांनी सर्वाधिक ३०% रॉयल्टी (स्वामित्व शुल्क) (उत्पन्नाच्या त्रैमासिक) महानगरपालिकेकडे जमा करण्याच्या अटीवर व सदर संस्था दरवर्षी स्वामित्व शुल्काचे ५% वाढ करण्याच्या अटीवर व उपरोक्त अटींनुसार करारनामा करुन ५ वर्षाच्या कालावधी करिता देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सन्मा.सदस्यांनी सभागृहात सदर विषयासंदर्भात चर्चे दरम्यान ज्या सुचना केलेल्या आहेत त्याची प्रशासनाने नोंद घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं ५८:-** सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाचे लेख्यास (जमा व खर्च) मंजूरी देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६८४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिकेचे सन २०२०-२१ या वित्तीय वर्षाचे वार्षिक लेख विवरण पत्रात आरंभिची शिल्लक रु.३३०,२२,९२,१९३/- व भाग अ व क ची एकुण रक्कम रु.४२०,०७,७६,५८३/- मात्र इतकी रक्कम जमा असुन झालेला खर्च रक्कम रु.४४४,०४,५०,५०१/- मात्र इतका आहे. वर्ष अखेर शिल्लक रक्कम रु.३०६,२६,१८,२७५/- इतकी आहे. सदर शिल्लकेत जळगांव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.जळगांव चे शेअर्स ची रक्कम रु.२,८१,७८,१००/- मात्र दर्शविलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९४ (१) चे तरतुदीनुसार सदर जमा व खर्चाचे अवलोकन केले. सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाचे लेख्यास (जमा व खर्च) व पूढील कार्यवाही करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं ५९:-** जळगांव शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.०१ ते ०४ अंतर्गत मे.स्थापत्य कंन्स्लटन्टस् प्रा.लि. अमरावती या कंपनीने सन २०२०-२१ व सन २०२१-२२ मध्ये केलेल्या वार्षीक देखभाल दुरुस्तीच्या कामी आलेल्या एकूण रक्कम रु.२,०६,४७,५७८/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.दिलीप पोकळे :-** विषय क्रं. ५९ मध्ये अमरावतीच्या ठेकेदाराला आपण हे काम दिलेल होत.

**मा.महापौर :-** ५९ वर बोलायचे आहे का आपल्याला .

**श्री.दिलीप पोकळे :-** हो

**मा.महापौर :-** ५९ च्या आधी कुणाला बोलायचे आहे का ?

**मा.उपमहापौर :-** ५५ ते ५८ सर्वानुमते मंजुर आहेत का ?

(सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.महापौर :-** ५५ ते ५८ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** विषय क्रं. ५९ मध्ये मला वाटत अमरावतीच्या ठेकेदाराला आपण हे काम दिलेल आहे. त्याच्यामध्ये महानगरपालिकेने मागच्या महिन्यामध्ये (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.) प्रथमदर्शनी हा झालेला सर्वे या मध्ये दोष आढळुन येत आहे. त्यांच्यामार्फत झालेला सर्वे हा आहे. तर जोपर्यंत त्याचा संपुर्ण निकाल लागत नाही तोपर्यंत त्यांच्या खर्चाची किंवा बिलाची अदायगी त्यांना करण्यात येवु नये.अशी माझी स्पष्ट भुमिका आहे.

**प्रभाग अधिकारी,प्र.स.क्रं.१,श्री.व्हि.ओ.सोनवणी:-** हा मक्ता मे. स्थापत्य कंन्सल्टंटस प्र.लि. अमरावती या कंपनीचा असुन हा सर्वे करण्याकरीता आपल्याला मक्तेदाराकडुन जे कर्मचारी उपलब्ध होतात. तसेच त्यांच्याकडुन आपण महत्वाचे डॉक्युमेंट,डिमांड रजिष्टर, वसुली रजिष्टर हे सुध्दा छापुन घेतो आणि वेळोवेळी जे बदल होतात.उदाहरणार्थ नांव बदल करणे आणि वेगवेगळे जी काम असतात ती आपण त्यांच्याकडुन करून घेतो आणि सर्वेक्षणाचा हा विषय हा वेगळा आहे आणि सर्वेक्षणाचे हे बिल नाही.

**श्री.दिलीप पोकळे :-** दोघ काम वेगवेगळे आहेत का ?

**प्रभाग अधिकारी,प्र.स.क्रं.१,श्री.व्हि.ओ.सोनवणी:-** हो

**श्री.दिलीप पोकळे :-** ठिक आहे.

**नगरसचिव :-** नाही नाही असं नाही ना काहीतरी झाल पाहीजे ना अस नाही. अनुमोदन झाल पाहीजे.

**मा.उपमहापौर :-** माझ अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. ६० घ्यावा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६८५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महानगरपालिका हद्दीतील संपुर्ण मालमत्तांचे (जमिन व इमारती) जी.आय.एस.प्रणालीव्दारे सर्वेक्षण करणे, संपुर्ण मालमत्तांचे संगणीकृत करमुल्य निर्धारण व कर आकारणी

करणे कामी स्थापत्य कन्स्ल्टन्टस् (आय) प्रा.लि. यांना आदेश क्र.ज.म.न.पा./प्र.स.क्र.०१ ते ०४/२२५३ दि.०४/०१/२०१७ अन्वये कार्यादेश देण्यात आलेला आहे. दि.०४/०१/२०१७ च्या करारनाम्यानुसार नमुद अटी व शर्तीच्या अधिन राहून दि.०४/०१/२०१७ पासुन सदर कंपनीने खालील प्रमाणे कामे केलेली आहेत. स्थापत्य कन्स्ल्टन्टस् (आय) प्रा.लि. यांचे दि.०३/०५/२०१८ चे पत्राचे अनुषंगाने तत्कालीन आयुक्त यांनी दि.०१/०४/२०१८ ते दि.३०/०९/२०१८ अखेर ६ महीने मुदतवाढ दिलेली होती. तद्नंतर पुनःश्च स्थापत्य कन्स्ल्टन्टस् (आय) प्रा.लि. यांचे दि.११/०६/२०१९ पत्रानुसार त्यांनी अपेक्षील्याप्रमाणे दि.०१/१०/२०१८ पासुन दि.३१/०३/२०२० पर्यंत मुदतवाढ आयुक्त यांचे मान्यतेने उपायुक्त यांचेकडील पत्र जा.क्र./प्र.स.क्र./०१/६९४ दि.१९/०८/२०१९ अन्वये मुदतवाढ प्रदान केलेली आहे. तसेच स्थापत्य कन्स्ल्टन्टस् (आय) प्रा.लि. यांचे दि.२९/०४/२०२० चे पत्रानुसार ३१ मार्च २०२१ पर्यंत मुदतवाढ आयुक्त यांचे मान्यतेने उपायुक्त यांचे कडील पत्र जा.क्र./प्र.स.क्र.१/१०९१ दि.०३/११/२०२० अन्वये मुदतवाढ प्रदान केलेली आहे. तसेच प्रस्तुत प्रकरणी सन २०१९-२० अखेर पर्यंत वार्षीक देखभाल दुरुस्ती कामी स्थायी समिती ठराव क्र.१५५ दि.०४/०९/२०१९ अन्वये रक्कम रु.२,०८,६२,६३१/- मात्रचे खर्चापैकी यापुर्वी स्थायी समितीचे मान्यतेने रु.१,०७,९४,८१४/- मात्रचे खर्चास प्राप्त मान्यता रक्कम वजा जाता रक्कम रु.१,००,६७,८१८/- चे खर्चास मान्यता प्रदान केलेली आहे. तसेच जादा प्रमाण करिता सन २०१९-२० साठी मिळकती २२९९३Xरु.१९,०८,४१९/- मात्रचे खर्चास स्थायी समिती ठराव क्र.२१९ दि.१०/०१/२०२० अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे. सदर कामासाठी सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकात रु.दोन कोटीची तरतुद केलेली आहे.

सन २०२०-२१ चे वार्षीक देखभाल दुरुस्तीसाठी

| | |
|---|---|
| प्रभाग समिती क्र.०१ | ३२,१००x८३ = २६,६४,३००/- |
| प्रभाग समिती क्र.०२ | २४,०३९x८३ = १९,९५,२३७/- |
| प्रभाग समिती क्र.०३ | २८,४१७x८३ = २३,५८,६११/- |
| प्रभाग समिती क्र.०४ | २४,२१०x८३ = २०,०९,४३०/- |
| एकुण - | १,०८,७६६x८३ = ९०,२७,५७८/- |

उपरोक्त प्रमाणे सन २०२०-२१ साठी वार्षीक देखभाल दुरुस्तीसाठी एकुण खर्च रु.९०,२७,५७८/- मात्र सदर खर्चासाठी सन २०२०-२१ च्या वार्षीक अंदाज पत्रकांत केलेल्या रु.दोन कोटी च्या तरतुदीमधुन खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच सन २०२१-२२ वार्षीक अंदाजपत्रकांत फेरमुल्यांकनाचे कामासाठी रु.एक कोटी पन्नास लक्ष मात्रची तरतुद करण्यात आलेली आहे त्यापैकी वार्षीक देखभाल दुरुस्तीसाठी

प्रभाग समिती क्र.०१ ते ०४ एकुण मिळकती १२००००x८३ = ९९६००००/- व

प्रभाग समिती क्र.०१ ते ०४ एकुण खुले भुखंड २००००x८३ = १६६००००/- असे एकुण रु.१,१६,२०,०००/- मात्र

उपरोक्त प्रमाणे सन २०२१-२२ साठी वार्षीक देखभाल दुरुस्तीसाठी एकुण खर्च रु.१,१६,२०,०००/- मात्र सदर खर्चासाठी सन २०२१-२२ च्या वार्षीक अंदाजपत्रकांत केलेल्या रु.एक कोटी पन्नास लक्ष च्या तरतुदीमधुन खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

देखभाल दुरुस्ती बाबत करारनाम्यात मालमत्ताकराच्या फेरआकारणी अंतिम यादी प्रसिध्द झाल्यानंतर काम सुरु करणे बाबत नमूद आहे. तसेच सन २०१७-१८, सन २०१८-१९ व सन २०१९-२० या वर्षाच्या देखभाल दुरुस्ती खर्चासाठी स्थायी समितीची मान्यता घेण्यात आलेली आहे मात्र सन २०१७ मध्ये महानगरपालिकेचया शिक्षक कर्मचारी यांनी मे.उच्च न्यायालय खंउपिठ औरंगाबाद येथे त्यांचे वेतना बाबत याचिका दाखल केलेली होती त्यावेळी मे.न्यायालयात तत्कालीन आयुक्त यांनी सदरचे फेरमुल्याकनाचे काम

पुर्ण झाल्यानंतर येणाऱ्या रक्कमेतुन शिक्षक कर्मचारी यांची देणी अदा करणेबाबत प्रतिज्ञापत्र सादर केलेले होते. सन २०१७ पर्यंत इकडील प्रभाग समिती क्र.०१ ते ०४ मधील मालमत्ताकर व पाणीपट्टी वसुलीचे सर्व काम हे मॅन्युअली होते. मात्र सदर कामासाठी पुरेसा वेळ मिळावा, लवकरांत लवकर व जास्तीत जास्त वसुली उद्दिष्ट साध्य करुन शिक्षकांचे मोबदला अदा करता यावा या करिता सदर सर्वेक्षणाचे काम सुरु असतांनाच सन २०१७-१८ पासुन पाणीपट्टी व मालमत्ताकर वसुलीचे काम संगणीकृत करणेसाठी संबंधीत कंपनीस तत्कालीन आयुक्त यांचे मान्यतेने तत्कालीन उपायुक्त (महसुल) यांचेकडील पत्र क्र.२४३३ दि.२३/०१/२०१७ व पत्र क्र.७४ दि.२४/०५/२०१७ अन्वये संगणकीकृत कार्यप्रणाली विकसीत करणेकामी देण्यात आलेले होते व त्यानुसार कार्यवाही सुरु करण्यात आली होती. सदर बाबतीत करारनाम्यातील मुद्दा क्र.१२ ए स्टेप २ नुसार सदर कामाचे एका मिळकतींच्या एन्ट्रीसाठी ८३/- रु. मात्रप्रमाणे दर वर्षाच्या ३१ मार्च पर्यंत काम केलेले आहे.

सदर कंपनी स्थापत्य कन्सल्टन्ट,अमरावती यांना कार्यादेश जा.क्र.२२५३, दि.०४/०१/२०१७ अन्वये काम दिलेले आहे. निविदेतील अटी व शर्ती नुसार तसेच करारनाम्यानुसार सदर कंपनीस कामाची मुदत १५ महिने म्हणजे दि.३१/०३/२०१८ पर्यंत होती. तद्नंतर आयुक्त यांच्या मान्यतेनुसार वेळोवेळी सदर कामास खालील प्रमाणे मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर मुदतवाढ देण्याची कारणे खाली दर्शविलेली आहेत.
कारणे-

१. जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत नव्याने तयार होणाऱ्या मिळकतींची संख्या जवळ जवळ ३२००० इतकी म्हणजेच अपेक्षेपेक्षा जास्त झाल्याने मुदतवाढ देण्यात आली.
२. सन २०१८ मध्ये जळगांव शहर महानगरपालिकेची सार्वत्रीक निवडणूक झाली त्यात वसुली विभागाकडील सर्व कर्मचारी यांची निवडणूक कामी नियुक्ती करण्यात आलेली होती त्यामुळे माहे एप्रिल २०१८ ते माहि ऑगष्ट २०१८ पर्यंत सर्व्हेक्षणाच्या कामासाठी मनुष्यबळ पुरविण्यात आलेले नव्हते त्यामुळे सदरच्या कामास मुदतवाढ देण्यात आली.
३. तद्नंतर लोकसभा निवडणूक प्रक्रीयेत देखील थकबाकी नसल्याचा दाखला देणे, तसेच निवडणूक कामी विविध कामे करणेसाठी कर्मचारी वर्ग यांची सेवा अधिग्रहीत करणेत आलेली होती. करीता सदर सर्वेक्षणाच्या कामाची गती संथ होती. तद्नंतर सप्टेंबर महिन्यात विधानसभा निवडणूकीसाठी सुध्दा घरपट्टी विभागातील कर्मचारी यांची सेवा अधिग्रहीत केल्याने काम वेळेत पुर्ण होवू शकले नाही, त्यामुळे मुदतवाढ देण्यात आली.
४. मार्च २०२० पासुन कोविड-१९ च्या फैलामुळे केंद्र शासन व राज्य शासन यांनी वेळोवेळी लॉकडाऊन घोषीत केल्याने सदर कामावर त्याचा परिणाम होवून वेळेत पुर्ण होवू शकले नाही. त्यामुळे मुदतवाढ देण्यात आली.
५. तसेच कोविड-१९ च्या काळात महाराष्ट्र शासनामार्फत राबविण्यात आलेल्या माझे कुटूंब माझी जबाबदारी या मोहिमे अंतर्गत घरपट्टी विभागातील सर्व कर्मचारी यांची नियुक्ती झालेली असल्याने, सर्वेक्षणाच्या कामासाठी मनुष्यबळ पुरविता आले नाही, त्यामुळे सदर कामास मुदतवाढ देण्यात आली.
६. सन १९९१ व सन १९९५ चे फेरमुल्यांकनाचे भाडेमुल्यदर इकडील कार्यालयात उपलब्ध नव्हते परंतु सदर कंपनीस सदरचे भाडेमुल्यदर पुरविल्याशिवाय सदरचे फेरमुल्यांकनाचे काम करणे सदर कंपनीस शक्य नव्हते म्हणून उपायुक्त यांचे निर्देशानुसार प्रभाग समिती क्र.०१ ते ०४ च्या सर्व वसुली लिपीकांकडून जुन्या डाटा रजिष्टरवरुन सन १९९१ व सन १९९५ चे दर एकत्र करुन त्यावरुन सन १९९१ व १९९५ चे भाडेमुल्य दरतक्ता संबंधीत कंपनीस पुरविण्यात आला. सदर

दर एकत्र करुन तक्ता तयार करण्यासाठी कालावधी लागला म्हणुन सदर कामास मुदतवाढ देण्यात आली.

मुदतवाढ-

१. जिल्हाधिकारी तथा आयुक्त यांचे दि.०४/०५/२०१८ चे मान्यतेनुसार सदर कामास दि.३०/०९/२०१८ पर्यंत पहिली मुदतवाढ देण्यात आलेली होती.
२. तद्नंतर आयुक्त यांचे कडील दि.१९/०८/२०१९ च्या मान्यतेने पत्र क्र.६९४ दि.१९/०८/२०१९ अन्वये दि.३१/०३/२०२० पर्यंत दुसरी मुदतवाढ दिलेली होती.
३. तद्नंतर आयुक्त यांचे कडील दि.०२/११/२०२० च्या मान्यतेने पत्र क्र.१०९१ दि.०३/११/२०२० अन्वये दि.३१/०३/२०२१ पर्यंत तिसरी मुदतवाढ दिलेली होती.
४. तद्नंतर आता आयुक्त यांचे कडील दि.२४/०९/२०२१ च्या मान्यतेने पत्र क्र.११३४ दि.३०/०९/२०२१ अन्वये दि.३१/०३/२०२२ पर्यंत चौथी मुदतवाढ दिलेली आहे.

उपरोक्त प्रमाणे सन २०२०-२१ साठी वार्षीक देखभाल दुरुस्तीसाठी एकुण खर्च रु.९०,२७,५७८/- सदर खर्चासाठी सन २०२०-२१ च्या वार्षीक अंदाज पत्रकांत केलेल्या रु.दोन कोटी च्या तरतुदीमधुन खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे तसेच सन २०२१-२२ साठी वार्षीक देखभाल दुरुस्तीसाठी एकुण खर्च रु.१,१६,२०,०००/- सदर खर्चासाठी सन २०२१-२२ च्या वार्षीक अंदाज पत्रकांत केलेल्या रु.एक कोटी पन्नास लक्ष मात्रच्या तरतुदीमधुन खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**
**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं ६०:-** श्री.अमिनोद्दीन शे.अमीर बादलीवाला, रा.१८९, भवानी पेठ, जळगांव यांची मे.जळगांव न्यायालयाच्या निकालानुसार घरपट्टीची रक्कम रु.२,२७,०६७/- निर्लेखित करण्याबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ६० नंबर पण मंजुर परंतू त्याच्या मध्ये सुध्दा दाव्याचा निकाल अर्जदाराच्या बाजुने लागलेला होता. परंतू अजुन पर्यंत त्याच्याबाबतीत अपिल दाखल झालेल नव्हत. म्हणजे विधी शाखेकडुन ज्या पध्दतीने दुर्लक्ष होत की मनपाच्या विधी पॅनलवर असलेले वकील एकतर ते कुठेतरी कमी पडतात किंवा त्यांच्याकडे संदर्भित विषयाची माहिती मनपा प्रशासनाकडुन विचारणा केली जाते. त्यावेळेला तारखांना ती माहिती उपलब्ध करून दिली जात नाही. एखाद्या दाव्याचा निकाल महानगरपालिकेच्या विरूध्द खालच्या कोर्टात झाल्यानंतर विहीत वेळेत उच्च न्यायालयामध्ये त्या संदर्भातील अपिल का दाखल केल जात नाही आणि परिणामी कुठेतरी महानगरपालिकेवर नामुष्कीची वेळ येते. घरकुलच्या भुसंपादनाच्या संदर्भात साडेसात कोटी रूपयाचा मोबदला दिला गेला. ती मोबदल्याची रक्कम रिकाऊंट करण्याच्या संदर्भात आज ती रक्कम जमिनमालकाने इतरत्र वापर करून घेतली आहे. ५ कोटीचा अतिरीक्त मोबदला मागणीची संदर्भातील जी भुमिका होती. आपण व्यक्तिगत लक्ष न घातल्यामुळे हायकोर्टाने स्टेटस्को दिला आहे ते मा.सुप्रिम कोर्टापर्यंत कैलास आप्पांनी नेले सुप्रिम कोर्टापर्यंत त्यांना यश मिळाल नाही. परंतू कालांतराने पुन्हा त्याच्यामध्ये प्रयत्न केला आपण आणि प्रयत्नांती तो विषय थांबवला गेला . मग अश्या पध्दतीने आपल्या महानगरपालिकेच्या विधी शाखेच्या संदर्भातील जी कार्यपध्दती जी आहे ती अत्यंत ढिसाळ आहे आणि पॅनलवरच्या वकीलांना सुध्दा या गोष्टींचे गांभीर्य नसते. परिणामी बऱ्याचशा दाव्यांमध्ये महानगरपालिकेला अपयश प्राप्त होत. फक्त अपयश प्राप्त होवुन उपयोग नाहीये. परंतू कोट्यावधी रूपयांच्या भुसंपादनाचे मोबदले आपल्याला द्यावे लागतात. एकीकडे आपण १०-१० , २०-२५ लाखांच्या विकासकामांसाठी या सभागृहात भांडतो.

प्रशासनाशी दोन दोन हात करतो आणि कोट्यवधी रूपयाच्या भुसंपादनाचे मोबदले अशा पध्दतीने आपल्या कुठेतरी तांत्रिक चुकांमुळे किंवा प्रशासनाच्या काही ठिकाणच्या हलगर्जीपणा मुळे ही अशी अत्यंत गभीर अशी बाब आहे साहेब म्हणुन आपल्याला विधी शाखा ही अद्ययावत करणे हे खुप गरजेचे आहे. या संदर्भात आपण कुठेतरी सक्त निर्देश विधी शाखेला देण्यात यावे आणि आपल्या पॅनलवर असणाऱ्या वकीलांच्या संदर्भात जे जे काही कोर्टामध्ये प्रलंबित मॅटर्स असतील. त्याच्या संदर्भातील दर महिन्याला आढावा आपण स्वत: घेण्यात यावा. जेणेकरून कुठल्या दाव्यांच काय स्टेटस आहे हे दावा आपल्या अगेन्स्ट मध्ये गेल्यानंतर आपल्याला कळत ही खुप गंभीर स्वरूपाची बाब आहे. तर या संदर्भात आपण कसोशीने थोड लक्ष घालाव.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** हा जो विषय आलेला आहे . असे बरेच विषय बऱ्याच वर्षापासुनचे पेडींग आहेत. तसच खुला भुखंड आणि घरपट्टी , कारण खुला भुखंड रजिष्टरला आज पण आकारणी आहे आणि तिथे घर झालेले आहेत. तेही आपल्याला निर्लेखित करावे लागतील. त्यात माझ मत अस आहे की मार्च पर्यंत तिन महिन्यात हा सर्वे करून एकच विषय निर्लेखितचा या सभागृहापुढे आणावा . म्हणजे पुन्हा पुन्हा तो विषय भविष्यात येणार नाही आणि आपल सर्व रेग्युलराईज होवुन जाईल.

**मा.आयुक्त :-** आपण आता एक काम करतोय. आपला खुला भुखंड विभाग हा पुर्वी वेगळा होता.आता तो आपण त्या त्या प्रभाग समितीला अटॅच केला आहे आणि ते कर्मचारी सर्व प्रभाग समितीमध्ये वर्ग केलेले आहेत. आता आपल्याकडे जवळपास ३५ हजार मिळकती खुला भुखंडाच्या रजिष्टर मध्ये नोंद आहेत. त्यापैकी आपण जो सर्वे केला . या स्थापत्य कंन्सलटन्सी मार्फत तर त्यामध्ये मला वाटत काहीतरी १६ ते १७ हजार या फक्त खुला भुखंड म्हणुन आलेल्या आहेत. याचा अर्थ ५० टक्के खुल्या भुखंडावरती आता बांधकाम झालेली आहेत. आता या दोन्हीची अशी स्थिती आहे की हा दोन्ही कडे येतो . तो आपल्या घरपट्टीच्या आकारणी मध्ये येतो आणि खुला भुखंडाच्या आकारणी मध्ये येतो. तर याची मागच्या १५ दिवसांपुर्वी आम्ही बैठक घेवुन हे जे सगळे हे जे काम दिले आहे त्यांच्याकडुनच आपण हे काम करून घेतोय. त्याच्यामध्ये जिपीएस प्रणालीचा वापर करून ते स्पॉट लोकेट करायचे . गरज लागली तर टिपी ची मदत घ्यायची. आपले घरपट्टीचे लोक , स्थापत्य कंन्सलटंसी चे लोक आणि टीपी चे त्या भागातील असीस्टंट यांच्या मार्फत तो प्लॉट लोकेट करायचा आणि मग त्याच्यावरती जर डबल आकारणी होत असेल. तर आपण ते दुरूस्त करणार आहोत. या वर्षाच्या अखेरपर्यंत या अशाप्रकारच्या आपण ज्याला फाजील डिमांड म्हणतो . अशाप्रकारच्या कमी करून जवळपास २००५ पासुन अशाप्रकारच्या खुला भुखंड जे आहे की ज्यांना आपण बिल दिलेली नाही. ती बिले सुध्दा या वर्षी देण्याचा आमचा प्रयत्न आहे आणि ते होवुन जाईन. आता याच्यामध्ये ज्या काही खुला भुखंडाचे राहीलेली बिल असतील हे आपण त्याला दिल्यानंतर त्याच्यासाठी जर आपल्याला पुन्हा अभय योजना आणायची असेल तर ती सुध्दा आणु. कारण गेल्या १५ वर्षापासुन खुला भुखंड या कडे नागरीकांचेही दुर्लक्ष झाले आहे आणि आपलेही दुर्लक्ष झाले आहे. परंतू हा विषय मार्च पर्यंत बिलाच्या संदर्भात होईल. दुसरं जे की खुला भुखंडाची जी आकारणी आहे.त्या आकारणीच्या धोरणाविषयी न्यायालयामध्ये एक पीआरए दाखल आहे. त्याच्यासंदर्भात याच्यामध्ये जे तांत्रिक ॲडीशनल मुद्दे आहेत आणि महानगरपालिकेच्या विधी सल्लागारांशी चर्चा करून त्याच्यामधील कायदेशीर वाद संपवुन आपल्याला घरपट्टीची आकारणी योग्य पध्दतीने करता येईल. याच्यापुर्वी याच्या संदर्भातील काही विसंगत निर्णय आहेत. ते विसंगत निर्णय रद्द करून हे सुसंगत करण्याचा प्रस्ताव हा शक्यतो येणाऱ्या महासभेपुढे ठेवावयाचा प्रयत्न करतोय. तो जर झाला तर नागरीकांचे याच्याबद्दलचे आक्षेप मिटतील आणि आपल्याला खुला भुखंडा मधुन सुध्दा मोठ्या प्रमाणामध्ये उत्पन्न चालु होईल.आता खुला भुखंडाच्या बाबतीमध्ये फक्त हस्तांतरण करायच असेल किंवा बांधकाम करायच असेल. तरच लोक टॅक्स भरतात. ज्याला खुल्या भुखंडाच काहीच करायच नाही. तो माणुस टॅक्सही भरत नाही आणि आपलेही कर्मचारी तिथे जात नाही. हा जो डेडलॉक झालेला आहे हा डेडलॉक याच वर्षामध्ये सोडवायचा आमचा प्रयत्न आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नाही डिमांडला जे प्रकरण पेडींग असतील तो प्रस्ताव पाठवा.

**मा.आयुक्त :-** आपण याच आर्थिक वर्षामध्ये ते पुर्ण करू.

**ॲड. शुचिता हाडा :-** आयुक्त साहेब एक सुचना मांडायची होती. आमदार चंदुभाई पटेल यांच्या निधीतुन ती उभारणी करण्यात आलेली आहे. तर डॉकेट जर बघितले त्यानुसार आपण ईथे दरपत्रक मागविले, सुचना प्रसिध्द केली. दैनिक लोकमत मध्ये दरपत्रकाची जाहीर सुचना प्रसिध्द करून मुदतीत दरपत्रके ६ सिलबंद पाकीटे प्राप्त

झालेनुसार ते दरपत्रक प्राप्त झाले आणि त्यानुसार ते जास्तीत जास्त रॉयल्टी आपल्याला देणार आहेत. तर आपण ते काम करणार आहे. याच्यात मी सुचना मांडते की, स्वच्छता गृहाचे जे आधी मुद्दे मांडले की संस्था निवडीचा निकष या विषयात तरी लावला होता का? कारण आता ईथे ते दिसत नाहीये. ईथे फक्त रॉयल्टी जो जास्त देतो आहे त्याला आपण काम देतोय. हे रितसर आहे टेक्निकली ते बरोबर आहे. त्याला काही माझा आक्षेप नाही. पण माझे जे मुद्दे स्वच्छता गृहाबद्दल जे आधी होते फक्त तेच मुद्दे ईथे आहेत की संस्था निवडीची निकष आपण तपासले होते का? शेवटी होत काय की काम दिले जाते कुणाला तरी आणि जर ती संस्था ते काम व्यवस्थित करत नाही आणि आपल्याला त्याचा उपभोग घेता येत नाही.आपल्याला जर त्याचा उपयोग होणार नाही. हे तपासलेल आहे का प्रशासनाने आणि मला वाटत ते तपासलेल नाही.

**श्री.पवन पाटील , आरोग्याधिकारी :-** आपण जे शौचालय पे ॲन्ड युज नुसार द्यायच ठरवल होत. तेव्हा त्या अटि शर्ती आपण डॉकेटमध्ये नमुद केलेल्या आहेत. त्या अटी शर्तींची पुर्तता केल्यावर त्याच्या आधारे आपण ते देणार आहे. लोकमत मध्ये जी आपण जाहीरात प्रसिध्द केली होती. आणि जे आपल्याला प्राप्त झाले त्याच्यात मिनिमम १० टक्के रॉयल्टी ठरवुन त्याच्यावर जास्तीत जास्त देणाऱ्या संस्थेला आपण हे काम देणार आहोत.

**ॲड. शुचिता हाडा :-** बरोबर आहे पाटील साहेब तुमच म्हणण बरोबर आहे. माझा प्रश्नच तुमच्या लक्षात नाही आलेला. या अटी शर्तीमध्ये मला संस्था निवडीचे निकष हे तुम्ही काय लावले हे विचारले . संस्था निवडी निकष काय आहेत. आपण जेव्हा एखादी जागा महापालिकेची देतो. त्यावेळेला आपण त्याचे गोष्टी आपण तपासतो आणि त्या आपण तपासायला हव्या होत्या. संस्थेची विश्वासार्हता काय आहे.

**मा.आयुक्त :-** निकष म्हणजे आपण एक याच्यामध्ये ज्या तांत्रिक बाबीचे निरीक्षण करतो. त्याच्यानंतर आपण तो लिफाफा उघडतो. त्यानंतर त्याच्यामध्ये या अटी शर्ती काय आहे त्या पाहील्या जातात.

**ॲड. शुचिता हाडा :-** अटी शर्ती आपण टाकत आहोत. व त्या महापालिका हिताच्या असाव्यात.सगळयांचे कागदपत्र आपण जमा केलेले आहेत.या गोष्टी तपासलेल्या आहेत का ?

**श्री.पवन पाटील , आरोग्याधिकारी :-** आपण तांत्रिक लिफाफ्या मध्ये ज्या अटी शर्ती होत्या त्या म्हणजे एक संस्था नोंदणी प्रमाणपत्र नंतर त्यांचे पॅनकार्ड , संस्थेचे जर त्यांनी काम केलेले असेल तर त्या अनुभवाचा दाखला अशा जनरल अटी शर्ती आपण ठेवलेल्या आहेत.

**ॲड. शुचिता हाडा :-** त्यांचे काही रिटर्न्स काही घेतले आहेत का , त्यांची आर्थिक पत आणि व्यवहार हे तपासले होते का?

**श्री.पवन पाटील , आरोग्याधिकारी :-** नाही.

**ॲड. शुचिता हाडा :-** मग हे तपासायला होते का नाही ? हे ईथे होत काय आहे की आपण काम अशाच पध्दतीने करून टाकतोय. ईथे दुकानदारी लागते आहे.

**मा.आयुक्त :-** ताई सुचना तुमची बरोबर आहे. परंतू आपण ज्या शौचालयचे काम आपण त्यांच्याकडून करून घेणार आहे. त्यामध्ये त्यांना फार मोठी गुंतवणूक करण्याची गरज नाही.त्यामुळे त्यांची आर्थिक क्षमता तपासण्याचे कारणच नाही. हे बिओटीचे आहे.

**ॲड. शुचिता हाडा :-** आर्थिक क्षमता हा एकच मुद्दा झाला.मी काय म्हणते आहे संस्थेचा आपण

**मा.आयुक्त :-** ताई अनुभवाचे कागदपत्र जी आहेत ते दिलेले आहेत.

**श्री.पवन पाटील , आरोग्याधिकारी :-** हो.

**मा.आयुक्त :-** आणि याच्यामध्ये ईन्व्हेस्टमेंट करायची गरज नाही. त्यामुळे त्याची आर्थिक क्षमता तपासण्याची काही गरज नाही.

(मा.महापौर व नगरसचिव यांची चर्चा सुरू होती.)

**मा.महापौर :-** विषय क्रं. ६० हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे. विषय क्रं. ६१ घेण्यात यावा.

**श्री.कैलास सोनवणे :-** विषय क्रं. ६१ ते ६५ मंजुर आहेत . ज्यांना कोणाला चर्चा करायची असेल तर चर्चा करा ज्यांना करायची असेल त्यांना परवानगी द्या आणि संपवा विषय.

**मा.उपमहापौर :-** सर्व विषयांना माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. ६१ ते ६५ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ॲड. शुचिता हाडा :-** महापौरताई मला बोलायच आहे थोडस

**मा.उपमहापौर :-** कोणत्या विषयावर बोलायच आहे आप्पांच्या की कोणत्या विषयावर बोलायच आहे.

**ॲड. शुचिता हाडा :-** महापौरताई आपण बिलाबाबत आहे त्या विषयाच आहे. मला फक्त विचारायच आहे की जी अधिसुचना २०१९ ची निघाली होती. त्यामध्ये एक मुद्दा होता. स्थावर मालमत्ता आता दिल्या जात आहे. गाळे भाड्याने देण्यासंदर्भात खालील प्रमाणे कार्यवाही करावी. महानगरपालिका / नगरपरिषदा/ नगरपंचायत यांच्या स्थावर मालमत्ता भाडेकराराने किंवा लिलाव पध्दतीने भाडे पट्टयाने देण्यासंदर्भात नविन निर्देश देण्यात येतील. सदर सुधारीत निर्देश होईपर्यंत कोणत्याही स्थानिक नागरी संस्थेने आपल्या स्थावर मालमत्ता भाडेपट्टयाने देण्याची कार्यवाही करू नये. सदर बाबीची खातरजमा झाल्याची जबाबदारी संबंधित आयुक्त / मुख्याधिकारी यांची असेल. हा आपल्याकडे जिआर आलेलाच असेल. यानुसार आपल्याकडे खरोखर कायद्यानुसार होत आहे का ? कारण या संदर्भात ८४२ नंबरचा ठराव होता आणि याला महासभेत विरोध केलेला होताच. आता त्याची वसुली झालेली आहे आपल्याकडे पुर्णपणे याच्यामध्ये एक नोंदवु ईच्छिते की याचा आपण आदेशाचा अवमान करीत आहोत ही कार्यवाही करून त्यामुळे याचा एकदा विचार करावा प्रशासनाने हवतर सर्वपक्षीय गटनेत्यांना प्रशासनाने बैठक घेवुन चर्चेसाठी बोलवाव आणि त्यानंतर याविषयाचा निर्णय फायनल करावा.तो पर्यंत हा विषय तहकुब करावा.

(मा.आयुक्त यांनी सदर जि.आर ची प्रत मागवली.)

**मा.आयुक्त :-** महापालिकेच्या ज्या मालमत्ता आहे . त्या आपल्याला कलम ७९ खाली ज्यावेळेला आपल्याला आवश्यक वाटेल त्यावेळेला आपण त्या लिलावाच्या पध्दतीने भाड्याने देण्याची आपल्या कायद्यामध्ये तरतूद आहे. त्याप्रमाणे आपले जे २०१९ चे जे नियम झालेले आहेत . हे प्रामुख्याने नुतनीकरणाचे नियम आहेत. परंतू त्या नुतनीकरणा मध्ये सुध्दा ज्या मिळकती नुतनीकरणाला पात्र नसतील त्या मिळकती आपण जाहीर लिलाव करणार आहेत. त्याबद्दलचा विषय हा आपण मागच्या महासभेमध्ये मंजुर केलेला आहे. आता हा आजचा जो विषय आहे. हा फक्त आपण त्या महासभेमध्ये ठराव असा केलेला होता की अशाप्रकारे लिलावाने देण्याच्या ज्या मिळकती असतील. त्याच्या अटी शर्ती स्थायी समितीकडुन मंजुर करून घेण्यात याव्यात. आता स्थायी समितीकडे न जाता हा विषय महासभेकडे आलेला आहे. तर आज आपण फक्त अटी शर्ती हे करतोय. महानगरपालिकेच्या ठरावाप्रमाणे जे मनपाच्या ताब्यात असलेले गाळे आहेत ते आपल्याला या लिलावाद्वारे द्यायचे आहेत. याच्या संदर्भामध्ये हा जो आपण म्हणताहेत. हा तारीख नसलेला जो काही याच्यामध्ये हा जिआर दिसतोय.

**ॲड. शुचिता हाडा :-** याच्यावर तारीख आलेली नाही पण हा २०/०९/२०१९ तारखेचा आहे.

**मा.आयुक्त :-** मॅडम याच्यावर सही ही दिसत नाही कुणाची

**ॲड.शुचिता हाडा :-** मी तुम्हाला व्हॉटसअप वर त्याची सांक्षाकीत प्रत पाठवते. साक्षांकीत प्रत सुध्दा आहे माझ्याजवळ त्याच्यावर तारीख आहे २०/०९/२०१९ आणि त्याच्यावर अवर सचिव सहस्त्रबुध्दे यांची सही सुध्दा आहे.

**मा.आयुक्त :-** चालेल तर आता या जिआर च्या आधारे आता हा जिआर शासनाने प्रसिध्द केला असेल याची आपण खात्री करूया आणि जर केला असेल .

**ॲड.शुचिता हाडा :-** केला आहे माझ्याजवळ कॉपीसुध्दा आहे आणि महापालिकेला सुध्दा पाठविलेला आहे. तरी मी आपल्याला त्याची कॉपी पण देते.

**मा.आयुक्त :-** हो , आपण या जिआर च्या आधारे आपल्याला याच्यामध्ये शासनाचे काही बंधने येता का ? याची आपण खात्री करू . ठराव आपण केलेला आहे आणि कुठेही शासनाच्या आदेशाचा भंग होणार नाही . याची खात्री करूनच लिलावाची प्रक्रीया केली जाईल.

**ॲड.शुचिता हाडा :-** निश्चितच , आता याच्या ज्या अटी शर्ती केलेल्या आहेत. त्या अटी शर्तीबद्दल सुध्दा माझी एक सुचना आहे. की आता ज्या गाळेधारकाने ५० टक्के पैसे भरलेले आहेत. त्यांना बोलीमध्ये प्राधान्य द्यावं. सर्वोच्च बोली जी काही ठरेल. त्यामध्ये त्या गाळेधारकाला प्राधान्य द्याव. जेणेकरून जे गाळेधारक आहे. तो त्या गाळ्यापासुन विस्थापित होण्यापासुन आपण त्यांना वाचवु शकतो आहे. तर ती एक अट या अटी शर्तीमध्ये नमुद करायला हवी . ती नमुद केलेली नाहीये . ती नमुद करावी आणि हे नैसर्गिक न्यायतत्वाला धरून आहे . म्हणुन याच्यामध्ये मला वाटत काही विरोध असण्याच कारण नाही.

**मा.आयुक्त :-** आता जे आपले डॉकेट आहे ते ठरावच आहे जे आपण मान्य करतोय

**श्री.नितीन लढ्ढा :-** धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल.

**ॲड.शुचिता हाडा :-** नाही आता या ज्या अटी शर्तींचा जो मसुदा आहे तो मी वाचला आहे . यात हे कुठेच नमुद केलेले आढळुन येत नाही. सर्वोच्च बोली जी काही निघेल त्यामध्ये एक्झिटिंग त्या गाळेधारकाला प्राधान्य द्याव. हे नैसर्गिक न्यायतत्वाला धरूनच मी येथे मांडलेले आहे. तर मला वाटत की सर्वानुमते त्याच्यात ईन्क्लुड कराव या मसुद्यामध्ये आणि मी आता जो जिआर दिलेला आहे. त्याचा उहापोह होवुन नंतर आपला निर्णय होईलच.

**मा.आयुक्त :-** निश्चितच आहे त्याच्यामध्ये दोन प्रकारच्या आपल्या मिळकती वेगळया आहेत. १ ज्या म्हणजे गाळेधारकांच्या ताब्यामध्ये आहेत आणि आपण आता ८१ क ची कारवाई करून आपण त्यांना नुतनीकरणाची संधी देणार आहोत. जे नुतनीकरणाला अपात्र ठरतील. ते गाळे आपण लिलाव करणार आहोत. त्याच गाळेधारकांना फक्त हायस्ट बोली करण्याची संधी देणार आहोत. आता हा जो विषय / मुद्दा येथे आलेला आहे. तो म्हणजे महानगरपालिकेने गाळे ताब्यात यापुर्वीच घेतलेले आहेत. आता तिथे कोणताही विद्यमान गाळेधारक नाही. त्यांना संधी देण्याचा प्रश्नच येणार नाही. त्यामुळे ती अट यामध्ये येणार नाही. त्यावेळेला आपण हा निर्णय घेतलेला आहे.

**ॲड.शुचिता हाडा :-** याच्यासाठीच म्हणते आहे जे त्यांच्या ताब्यात आहे त्यांना संधी देण्याबाबत विषय आहे हा.

**मा.आयुक्त :-** जे बाकी आहेत आपण त्यांना ८१ ब ची नोटीस देवु

**ॲड.शुचिता हाडा :-** माझी जी मागणी आहे ते मी दोन वेगवेगळे विषय मांडलेले आहेत. हे ईन्क्लुड करण्याबद्दलची मागणी आहे आणि याचा अभ्यास होवुन त्या अनुषंगाने निर्णय घ्यावा.

**मा.आयुक्त :-** जो विद्यमान गाळेधारक आहे त्याला फर्स्ट प्रायोरिटीने संधी देण्याचे धोरणात्मक निर्णय हा महासभेने यापुर्वी घेतलेला आहे.

**ॲड.शुचिता हाडा :-** तो येथे नमुद करून घ्यावा साहेब तो नमुद नाहीये याच्यात नमुद नाहीये . त्या अटी शर्तींच्या मध्ये नमुद नाहीये. म्हणुन यात नमुद करून घ्यावं एवढच म्हणण आहे. ही सुचना आहे नगरसचिव साहेब तेवढ रेकॉर्ड वर घ्या.

**नगरसचिव :-** तहकुब चा विषय म्हणाले आपण

**ॲड.शुचिता हाडा :-** दोन वेगवेगळे विषय आहेत जे मी मांडले.

**मा.आयुक्त :-** ज्यावेळेस जो गाळेधारक असेल त्यावेळेस

**श्री.नितीन लढ्ढा :-** जे गाळे ज्या पोझिशन मध्ये त्यांना देण्यात यावे त्याच्याबद्दलचा धोरणात्मक निर्णय आहे.

**नगरसचिव :-** आपण प्रस्ताव तहकुब करण्याची सुचना मांडली होती.

**ॲड.शुचिता हाडा :-** तहकुबची सुचना मांडली पण आता सर्वानुमते ते होत असेल तर त्यात माझी ही सुचना ईनक्लुड करा की सर्वोच्च बोली धारकाला प्रथम प्राधान्य द्यावे.

**मा.आयुक्त :-** नाही याच्यामधील संभ्रम काढण्यासाठी दोन वेगळे विषय आहेत. जर आपण ठरावामध्ये घेतल तर त्या सगळया अटी शर्ती मध्ये येईल. आता समजा ज्यांनी ४ वर्षापुर्वी गाळे सोडले. त्यांना आपण हक्क प्राप्त करून देण्यासारख होईल आणि त्याच्यामध्ये कायदेशीर गुंतागुंती होईल. त्यापेक्षा आपण मागच्या ठरावात जो निर्णय घेतलेला आहे. तो निर्णय स्वतंत्र आहे हा जो आहे जे आपल्या ताब्यामध्ये असलेले गाळे याचा आता कुणाशीही संबंध नाही. विद्यमान गाळेधारकांचा विषय नाही. त्यांच्यासाठी अटी शर्ती आहेत. आपल्या सुचनेप्रमाणे विद्यमान गाळेधारकांच्या बाबतीमध्ये आपण हे करणार आहोत. आज जर आत्ता आपण हे ॲड केल हे तर कन्फ्युझन निर्माण होईल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठराव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझ अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. ६१ ते ६५ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहेत.

**ॲड.शुचिता हाडा :-** विषय क्रं. ६५ बद्दल फक्त एक माहिती घ्यायची आहे मला

(सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** ताई अहो ताई तुम्ही जेवण करून आल्या आहेत घरून

**ॲड.शुचिता हाडा :-** मी सकाळी १० वाजताच जेवते आप्पा , जेवण करायला जायच आहे का आप्पांना

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही मी कशाला जावु ताई

**ॲड.शुचिता हाडा :-** ताई आप्पांना जेवायला पाठवा आप्पा फार घाई करतात आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** ताई

**ॲड.शुचिता हाडा :-** आप्पा तुम्ही खुप वर्षांपासुन बोलतात आहे. आम्ही नविन आहेत आम्हाला बोलू द्या आता , आता या ज्या संविदा झालेल्या आहेत. त्या संविदांबद्दल मला फक्त प्रशासनाकडुन थोडीशी माहिती हवी आहे. संविदाच्या नोंदी आयुक्तांच्या अधिकारामध्ये संविदा होतात. यात सगळ्या संविदा आहेत पाणी पुरवठा , बांधकाम , आरोग्य तर या वेगवेगळया विभागातील ज्या संविदा होतात आयुक्तांच्या एका आर्थिक वर्षात किती रकमेपर्यंत त्यांना संविदा करण्याचा अधिकार आहे आणि त्याच्या नोंदी कुठे ठेवल्या जातात. सभागृहाला ही माहिती अवगत करून द्यावी.

**मा.आयुक्त :-** माझ्या माहितीप्रमाणे याचे अधिकार आयुक्तांना दिलेले आहेत. याच्यात एकत्रित कामाला म्हणजे एका आर्थिक वर्षाला कुठलीही सिलींग म्हणजे उच्चतम मर्यादा दिलेली नाही. २५ लाखांच्या सगळया कामांच्या बाबतीमध्ये स्थायी समितीची मान्यता घेण्यात येते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६८६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग समिती क्र.२ अंतर्गत वसुली प्रभाग क्र.०२/०८ मालमत्ता क्र.१३४८ वर श्री.अमिनोद्दीन शे.अमीर बादलीवाला रा.१८९ भवानी पेठ जळगांव यांनी जळगांव येथील न्यायालयात स्पेशल सिव्हील सुट क्र.३७१/०५ अन्वये दावा दाखल केला होता. दि.११/०१/२००७ रोजी दाव्याचा निकाल अर्जदार यांचे बाजुने लागल्याने म.न.पा.तर्फे दि.०४/१०/२००५ रोजी मागील कराची रक्कम मागणी केलेली नोटीस ही मे.न्यायालयाने रद्द केलेली आहे. सदर निकाला विरुध्द म.न.पा.तर्फे कोणतेही अपिल दाखल केलेले नसल्यामुळे मे.कोर्टाच्या आदेशाचे पालन करणे गरजेचे आहे. त्यामुळे मिळकतधारकाने मे.कोर्ट जळगांव न्यायालयात अवमान याचिका दाखल केलेली असुन ती सदयस्थितीत न्याय प्रविष्ट आहे. तरी सन २००४ ते सन २०२१-२२ पावेतो थकबाकीची रक्कम सन २०२१-२२ अखेर रक्कम रु.१२,४०,५२५/- मात्र थकीत रक्कम असुन मे.न्यायालयाच्या निकाला नुसार रु.२,२७,०६७/- मात्र निर्लेखित करुन उर्वरीत रक्कम रु.१०,१३,४५८/- मात्र शास्तीसह वसुलपात्र रक्कम असल्याने अर्जदार यांनी मे.कोर्टाच्या दि.११/०१/२००७ दाव्याच्या निकाला नुसार रु.२,२७,०६७/- मात्र (मालमत्ता कराची रक्कम) निर्लेखित करणे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ अन्वये मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं ६१ :-** जळगांव शहर महानगरपालिकेच्या ताब्यात असणाऱ्या व भविष्यात ताब्यात येणारे गाळे, हॉल व रहिवासी गाळे यांचा लिलावाने विनीयोग करणेकामीच्या लिलावाच्या अटी व शर्ती तसेच भाडे करारनाम्याच्या अटी व शर्तीचा मसुदा निश्चित करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६८७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिकेच्या ताब्यात असणाऱ्या व भविष्यात ताब्यात येणारे गाळे, हॉल व रहिवासी गाळे लिलावाने विनीयोग करणेबाबत महासभा ठराव क्र.५४५ दि.१२/०८/२०२१ अन्वये धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे. सदर ठरावांच्या अनुषंगाने कार्यवाही करणे आवश्यक आहे.

तद्पुर्वी महासभा ठराव क्र.५४५ दि.१२/०८/२०२१ नुसार निर्देशित केल्याप्रमाणे गाळे लिलावाच्या इतर अटी व शर्ती, लिलावात गाळा घेणाऱ्या गाळेधारकांना भाडे करारनामा हे स्थायी समितीच्या मान्यतेने निश्चित करुन घेणे योग्य असल्याने सदरच्या लिलावाच्या अटी व शर्ती, लिलावात गाळा घेणाऱ्या गाळेधारकांचा भाडे करारनामा मसुदा सोबत संलग्न केलेला आहे तसेच आवश्यकतेप्रमाणे आयुक्त यांना इतर अटी व शर्ती निश्चित करता येतील.

उपरोक्त नुसार जळगांव शहर महानगरपलिकेच्या ताब्यात असणाऱ्या व भविष्यात ताब्यात येणारे गाळे, हॉल व रहिवासी गाळे संदर्भातील लिलावाच्या अटी व शर्ती तसेच भाडेकरारनाम्याच्या सोबतच्या मसुदयास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सन्मा.सदस्यांनी सभागृहात सदर विषयासंदर्भात चर्चे दरम्यान ज्या सुचना केलेल्या आहेत त्याची प्रशासनाने नोंद घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं ६२ :-** दैनिक बाजार वसुली शुल्क सुधारीत करुन निवीदा प्रसिध्द करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६८८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, दैनिक बाजार वसुली शुल्क वसुली कामी स्थायी समिती ठराव क्र.३४६ दि.०९/०७/२०२१ अन्वये रु.१,८६,३४,०००/- मात्र देकार रक्कम निश्चित करणेस मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार सदर देकार रकमेअन्वये दैनिक बाजार शुल्क वसुली करणे कामी जाहिर ई-निविदा सूचना क्र.८५ दि.२३/०७/२०२१ अन्वये प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निविदेस कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे तिसरी फेर ई-निविदा सूचना प्रसिध्द करण्यातआली असता सदर निविदा सूचनेस देखील कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. मागील मक्त्याचा कालावधीत दि.१०/०७/२०२१ रोजी संपलेला असल्याने सदर मक्तेदार किरण शंकर भालोदकर यांना स्थायी समिती ठराव क्र.३४६ दि.०९/०७/२०२१ अन्वये निविदा प्रक्रिया पूर्ण होईपावेतो मुदतवाढ देण्यात आली होती. निविदा प्रक्रिया पूर्ण होण्या अगोदर मक्तेदार यांचे दि.०७/०९/२०२१ चे पत्रानूसार सदयस्थितीत हॉकर्सची संख्या पहाता मला साप्ताहीक रक्कम भरता येणे शक्य नाही. तरी दि.१३/०९/२०२१ पासून दैनिक बाजार शुल्क वसुली म.न.पा.प्रशासना मार्फत करावी असे सूचीत केले आहे. त्याअनुषंगाने आयुक्त यांचे मान्यतेने दि.१३/०९/२०२१ पासून म.न.पा.कर्मचारी यांचेकडून वसुली करण्यात येत आहे. त्यातील मागील वसुली खालील तक्त्याप्रमाणे

| अ.क्र. | वसुली कालावधी | एकूण वसुली रक्कम (रु.) | सरासरी दैनंदिन वसुली (रु.) |
|---|---|---|---|
| १ | दि.१३/०९/२०२१ ते दि.१४/११/२०२१ | २२६२४८० | ३५९१२ |

वरील तक्त्यानुसार मनपा कर्मचाऱ्यांकडून होत असलेल्या वसुलीच्या अनुषंगाने सरासरी रुपये १,३१,०७,८८०/- मात्र वार्षिक दैनिक बाजार शुल्क वसुली होवू शकते परंतु मनपा कर्मचारी वसुली कालावधीत पावसाच्या व्यत्ययामुळे व कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर देखील हॉकर्स संख्येवर परिणाम झालेला आहे. भविष्यात कोविड प्रादुर्भाव ओसरल्यावर हॉकर्सच्या उपस्थितीत वाढ होण्याची शक्यता विचारात घेता तसेच वसुलीसाठी म.न.पा.ने नेमलेल्या कर्मचारी यांनी मर्यादित संख्या व हंगामी व्यवसायीक लक्षात घेता अंदाजीत २५ टक्केवाढ अपेक्षीत धरुन जवळपास रु.१,६४,००,०००/- मात्र देकार रक्कम निश्चित करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

निविदा काळात कोविड-१९ चा प्रादुर्भाव वाढल्यास व त्यामुळे हॉकर्सच्या उपस्थितीवर निर्बंध आल्यास हॉकर्सच्या उपस्थितीचा सर्व्हेकरुन भरणा रकमेत सुट देण्याचे आयुक्त यांना अधिकार राहतील मात्र नियमीत अतिक्रमण कार्यवाहीमुळे मक्तेदारास कोणतीही सुट देता येणार नाही याप्रकारची अट निविदेत/ करारनाम्यात समाविष्ट करण्यात यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं ६३ :-** नागरी दलितेत्तर वस्त्यात सुधारणा योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.१९ मधील मेहरुण अंतर्गत स.नं.२१ मधील रस्ते खडीकरणासह डांबरीकरण करणे कामी मक्तेदार वैष्णवी बिल्डकॉन जळगांव यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकारणे व सदर कामी येणारा एकूण खर्च रक्कम रु.२९,०७,८८६/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६८९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नागरी दलितेत्तर वस्त्यात सुधारणा योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.१९ मधील मेहरुण अंतर्गत स.नं.२१ मधील रस्ते खडीकरणासह डांबरीकरण करणे कामास जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडील पत्र क्र.नप/नियोजन/आर.आर./६९७/२०२१ दि.१२/०५/२०२१ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त मनपा यांचे दि.२३/०५/२०२१ च्या मान्यतेने अन्वये उक्त कामाची ई निविदा सुचना क्र.७९/०८ सन २०२१-२२ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई-निविदा सुचना मनपा पत्र क्र.सा.बा./२४१ दि.१०/०६/२०२१ चे पत्रान्वये दै.सामना या वर्तमान पत्रात दि.११/०६/२०२१ रोजी प्रसिध्द केल्यानुसार संगणकाव्दारे निविदा भरणेकरीता दि.१०/०६/२०२१ ते दि.२४/०६/२०२१ पर्यंत मुदत देण्यात आली होती. मुदतीत संगणकाव्दारे https://mahatenders.in वर दिलेल्या मुदतीत ०२ ई निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ अन्वये प्रथम मागणीवेळी दोनच निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे सूचित आहे. त्यानुसार सदर कामाचे आलेल्या ई-निविदांचे संगणकावर कागदपत्रांचे फोल्डर क्र.०१ उघडले असता ०२ मक्तेदारांचे उक्त कामाचे प्राप्त झालेले ई-निविदा

कागदपत्रांचे संबंधीत युनिट अभियंता व सार्व.बांधकाम विभागाचे उपलेखापाल यांनी छाननी केली असता खाली नमुद मक्तेदार यांनी सर्व आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने निविदा समितीने दिलेला निर्णया नुसार त्यांचे ई निविदा फोल्डर नं.२ दि.१२/१०/२०२१ रोजी ओपन करुन उक्त मक्तेदार यांनी दिलेल्या ई-निविदा दरांचा तुलानात्मक तक्त्याची संगणकावर प्रिंन्ट प्रत काढुन घेण्यात आली असुन उक्त तुलनात्मक तक्त्यांची प्रत मुळ प्रकरणास जोडलेली असुन त्या नुसार ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | निविदा रक्कम रु.२४४६४९७/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | एल.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन प्रा.लि.जळगांव | निविदा रक्कमेवर ७.७७% जास्तीचे दराने | २६३६५९०/- |
| २ | वैष्णवी बिल्डकॉन जळगांव | निविदा रक्कमेइतकेचेच दराने | २४४६४९७/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार वैष्णवी बिल्डकॉन जळगांव यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमी आलेले आहे. त्यानुसार सदर कामी रक्कम रु.२४४६४९७/- मात्र इतका खर्च निविदा रक्कमेप्रमाणे आहे. पंरतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी. कामगार विमा, टेस्टींग चार्जेस, व रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | निविदा प्रमाणे अपेक्षीत खर्च रक्कम | २४४६४९७/- |
| ०२ | जि.एस.टी.१२% | २९३५८०/- |
| ०३ | कामगार विमा ०.५०% | १२२३२/- |
| ०४ | टेस्टींग चार्जेस | ५०५०/- |
| ०५ | रॉयल्टी | १५०५२७/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु. :- | २९०७८८६/- |

प्रभाग क्र.१९ मधील मेहरुण अंतर्गत स.नं.२१ मधील रस्ते खडीकरणासह डांबरीकरण करणे कामी वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरास व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.२९०७८८६/- मात्र नागरीदलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गतच्या निधीतुन खर्च करणेस तसेच मक्तेदार वैष्णवी बिल्डकॉन जळगांव यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर स्विकारण्यास व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार संविदा करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं ६४ :-** अमृत अभियाना अंतर्गत प्रस्तावित मलनिस्सारण योजनेच्या इलेक्ट्रीकल व मॅकेनिकल कामाची ई-निविदा सुचना क्र.९३ (३rd Call) मध्ये प्राप्त दरास व अतिरिक्त खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६९० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, अमृत अभियाना अंतर्गत प्रस्तावित कामाची ई निविदा सुचना क्र.९३ (३rd Call) अन्वये मलनिस्सारण योजनेच्या इलेक्ट्रीकल व मॅकेनिकल कामाची रु.१,८६,६७,९२७/- मात्र किंमतीची ई निविदा प्रसिध्द करणेत आली होती. त्यानुसार निविदेत तिसऱ्या वेळेस एकच निविदाधारकाने सहभाग घेतला आहे. याबाबतची प्राप्त तांत्रिक कागदपत्रे तपासणीकामी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडे पाठविणेत आली होती. मजिप्रा विभागाने कागदपत्रांची तपासणी केली असून मे.एल.सी.इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि., अहमदाबाद यांची प्राप्त निविदा तांत्रिक तपासणीत पात्र ठरत असल्याने आर्थिक लिफाफा उघडण्याची शिफारस केली होती. त्यानुसार वित्तीय लिफाफा क्र.२ उघडण्यांत आला असुन त्यात प्राप्त दर खालील प्रमाणे-

१. मे.एल.सी.इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.अहमदाबाद- निविदा रक्कमेवर ३६.५४%

तद्नंतर दर जास्त वाटत असल्याने मक्तेदारास शहर अभियंता यांचे दि.२९/१०/२०२१ रोजी पत्र देऊन वाटाघाटीकरणे कामी दि.०१/११/२०२१ रोजी हजर रहाणे बाबत कळविण्यांत आले. मक्तेदार वाटाघाटीसाठी प्रत्यक्षात उपस्थित राहीलेले नाही. मात्र त्यांनी प्रतिनिधी मार्फत वाटाघाटीचे पत्र मनपास सादर केले आहे. त्यानुसार मक्तेदार यांनी पत्राव्दारे १.९८% दर कमी करुन अंदाजित रक्कमेवर ३४.५६% जास्तने काम करणेस लेखी सहमती दर्शविली आहे.

त्यानुसार प्राप्त दरांचे विश्लेषण करणेकामी मजीप्रा.कडे प्रस्ताव पाठविण्यांत आला होता. अधिक्षक अभियंता, मजीप्रा,जळगांव यांचे कडील पत्र क्र./लेखा/अमृत/मल/२८४/२०२१ दि.११/११/२०२१ अन्वये निविदेच्या तृतीय मागणीचे मुल्यांकन प्रस्ताव सदर योजनेतील निविदा मंजुरीसाठी शिफारशीसह पाठविला होता. त्यानुसार मे.एल.सी.इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि.अहमदाबाद यांचे निविदा रक्कमेवर ३४.५६% जास्तीचे दर हे प्रचलित दरसुची २०२१-२२ मधील येणाऱ्या खर्चाशी तुलना केली असता ४.१९% कमी खर्च येत असल्याने निविदा स्विकृतीची शिफारस केलेली आहे. त्यानुसार निविदा दरानुसार ३४.५६% जास्तसह असा एकूण येणारा खर्च रु.२,५१,१९,५६२/- मात्र येणार आहे. सदर कामी प्रशासकीय मान्यतेपेक्षा रु.६४,५१,६३५/- खर्च जास्त होणार आहे. एकूण प्रकल्पाची प्रशासकीय मान्यता रक्कम रु.१९५.६८ कोटी असून सदयस्थितीत उर्वरीत कामे प्रगतीत सुरु आहेत. या निविदेकामी येणारा वाढीव खर्च एकूण प्रशासकीय मान्यतेच्या रक्कमेपैकी होणाऱ्या बचतीतून करता येईल. तसेच सदर कामी बचतीची रक्कम वाढीव खर्चाच्या रक्कमेपेक्षा कमी असल्यास उर्वरीत खर्च महानगरपालिका निधीतून करण्यांस मान्यता मिळणे कामी सादर करण्यात आलेला आहे.

सदर कामी निविदा रक्कम रु.१,८६,६७,९२७/- वर ३४.५६% जास्तीचे (वाटाघाटीनंतर) प्राप्त झालेले दर हे प्रचलित दरसुची सन २०२१-२२ च्या तुलनेत ४.१९% कमीचे असल्याने त्यानुसार येणारा खर्च रु.२,५१,१९,५६२/- ला (वाढीव खर्च प्रशासकीय मान्यतेच्या रक्कमेपैकी होणाऱ्या बचतीतून / मनपा निधीतून उभारण्यासह) मान्यता प्रदान करण्यास येत आहे तसेच मे.एल.सी.इन्फ्रा.प्रोजेक्ट प्रा.लि.अहमदाबाद यांचे दर महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ नुसार स्विकृत करुन संविदा करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं ६५ :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६९१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेतली.

१.प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./७७ दि.०१/०९/२०२१ अन्वये नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.१२ मधील अनुराग स्टेट बँक कॉलनी येथील पवन हिल ते नंदनवन कॉलनी ओपनस्पेस पर्यंतचा रस्ता कॉंक्रीटीकरण करणे कामी मक्तेदार श्री.सुरजराजे विजय नारखेडे यांचे निविदा रक्कमेपेक्षा ९.६९% कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.२२,३९,८३१/- मात्र खर्चाची संविदा.

२.प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./७८ दि.०१/०९/२०२१ अन्वये नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.१५ मध्ये मेहरुण अंतर्गत त्रिवेणी माता मंदिराजवळ पुल बांधणे कामी मक्तेदार हार्दिक प्रकाश पटेल यांचे निविदा रक्कमेपेक्षा ८.८८% कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.१४,२९,००४/- मात्र खर्चाची संविदा.

३.प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./७९ दि.०१/०९/२०२१ अन्वये नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.०८ अंतर्गत शिवराज अपार्टमेंन्ट गुजराल पेट्रोलपंपा मागील भाग व परीसरात गटार बांधणे कामी मक्तेदार श्री.स्वप्नील नरेंद्र चौधरी यांचे निविदा रक्कमेपेक्षा ९% कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.९,०५,९१२/- मात्र खर्चाची संविदा.

४.प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./८० दि.०१/०९/२०२१ अन्वये नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.०६ अंतर्गत तुकाराम वाडी वहीवाटीत येथे पेव्हिंग ब्लॉक बसविणे कामी मक्तेदार श्री.सुरजराजे विजय नारखेडे यांचे निविदा रक्कमेपेक्षा १०% कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.८,९८,६७३/- मात्र खर्चाची संविदा.

५.प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./८२ दि.०१/०९/२०२१ अन्वये नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.१४ मध्ये अंतर्गत रामेश्वर कॉलनीतुन तलाव चौपाटीकडे जाणाऱ्या रस्त्यावरील नाल्यावर पुल बांधणे कामी मक्तेदार श्री.संदेश ज्ञानदेव टेकाडे यांचे निविदा रक्कमेपेक्षा १४.५०% कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.२१,४५,४०१/- मात्र खर्चाची संविदा.

६.प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./८३ दि.०१/०९/२०२१ अन्वये नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.१५ मध्ये मेहरुण अंतर्गत मिल्लत हायस्कुल जवळील नाल्यावर पुल बांधणे कामी मक्तेदार श्री.श्री.एन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचे निविदा रक्कमेइतकेचेच कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.१५,६५,२२३/- मात्र खर्चाची संविदा.

७.प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./८४ दि.०१/०९/२०२१ अन्वये नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.१५ मध्ये मेहरुण अंतर्गत लक्ष्मी नगर येथील नाल्यास संरक्षण भिंत बांधणे कामी मक्तेदार श्री.हार्दिक प्रकाश पटेल यांचे निविदा रक्कमेपेक्षा ८.८८% कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.१८,१५,४३६/- मात्र खर्चाची संविदा.

८.प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./८६ दि.०२/०९/२०२१ अन्वये नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.०८ निमखेडी गट नं.११५/१, ११५/२ मध्ये आर.सी.सी.गटार बांधणे कामी मक्तेदार श्री.विलास प्रभाकर पाटील यांचे निविदा रक्कमेपेक्षा ७% कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.१९,७१,६५६/- मात्र खर्चाची संविदा.

९.प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./८७ दि.०२/०९/२०२१ अन्वये नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.०८ निमखेडी १०२ जीवराम नगर मध्ये आर.सी.सी.गटार बांधणे कामी मक्तेदार श्री.विलास प्रभाकर पाटील यांचे निविदा रक्कमेपेक्षा ७% कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.५,०३,६३३/- मात्र खर्चाची संविदा.

१०.प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./८८ दि.०२/०९/२०२१ अन्वये नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.०८ निमखेडी रोड विश्राम नगर पुर्वेकडील साईडला रेल्वे गेट लाईन जवळ आर.सी.सी.गटार बांधणे कामी

मक्तेदार श्री.एस.कुमार कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रक्कमेपेक्षा ०.१०% कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.२१,१६,७६७/- मात्र खर्चाची संविदा.

११.प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./९३ दि.१६/०९/२०२१ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हददीतील जळगांव शहरातील महानगर पालिका मालकीचा पिंप्राळा गट नं.३४४ व गट नं.२७ चे ओपन स्पेसला चेनलिंक फेन्सिंग करुन विकसित करणे कामी मक्तेदार श्री.महेश शालीग्राम पाटील यांचे निविदा रक्कमेपेक्षा ०.३१% कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.११,४४,०३९/- मात्र खर्चाची संविदा.

१२. प्रशासकीय आदेश क्र./विदयुत/०९ दि.२०/०७/२०२१ अन्वये विदयुत विभाग क्र.३ अंतर्गत प्रभाग क्रं.१५ मध्ये ठिकठिकाणी ९ मीटर उंचीचे २१ नग व १२.५ मीटर उंचीचे २ नग असे एकुण २३ नग हायमास्ट पोल उभारुन त्यावर एलईडी पथदिवे बसवून प्रखर प्रकाश व्यवस्था करणे कामी मक्तेदार सत्यम इलेक्ट्रीकल्स अॅण्ड इंजिनिअरींग,भुसावळ यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.१५,७४,८११/- मात्र खर्चाची संविदा.

१३. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./१०१ दि.२०/१०/२०२१ अन्वये नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.१२ अजिंठा हॉसिंग सोसायटी मधील ओपन स्पेस समोरील उताराचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे कामी मक्तेदार श्री.रिकु उमाकांत चौधरी यांचे निविदा रक्कमेपेक्षा ९.९९% कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.६,५६,३८४/- मात्र खर्चाची संविदा.

१४. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./१०२ दि.२१/१०/२०२१ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्रं.०१ अंतर्गत राधाकृष्ण नगर स.नं.३००/१+३००/२ मध्ये आर.सी.सी.गटार व स्लॅब कल्व्हर्ट बांधणे कामी मक्तेदार श्री.निर्मल विकास यशवंते यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.१०,००,०००/- मात्र खर्चाची संविदा.

१५. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./१०३ दि.२१/१०/२०२१ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्रं.०४ अंतर्गत जोशी पेठ मधील श्रीराम प्रोव्हिजन जवळ रस्ता पेव्हिंग ब्लॉक बसवुन तयार करणे कामी मक्तेदार श्री.बालाजी इन्फ्रास्ट्रक्चर यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.९,९९,९९९/- मात्र खर्चाची संविदा.

१६. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./१०४ दि.२१/१०/२०२१ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्रं.०४ अंतर्गत रिधुरवाडयातले रस्ते पेव्हिंग ब्लॉक बसवून तयार करणे कामी मक्तेदार श्री.निलेश रमेश पाटील यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.१०,००,०००/- मात्र खर्चाची संविदा.

१७. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./१०५ दि.२१/१०/२०२१ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्रं.०४ अंतर्गत ओकनगर परीसरात रस्ते पेव्हिंग ब्लॉक बसवून तयार करणे कामी मक्तेदार श्री.बालाजी इन्फ्रास्ट्रक्चर यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.१०,००,०००/- मात्र खर्चाची संविदा.

१८. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./१०६ दि.२१/१०/२०२१ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्रं.०२ मध्ये शिवाजी नगर हमालवाडा व हुडको परीसरात ठिकठिकाणी आर.सी.सी.गटार व स्लॅब कल्व्हर्ट बांधणे कामी मक्तेदार श्री.मनोज सुनिल पाटील यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.१०,००,०००/- मात्र खर्चाची संविदा.

१९. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./१०७ दि.२१/१०/२०२१ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्रं.१० पिंप्राळा हुडको मधील बौध्द वसाहत येथे कॉक्रीट पाथवे तयार करणे कामी मक्तेदार श्री.प्रणव

कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.१०,००,०००/- मात्र खर्चाची संविदा.

२०. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./१०८ दि.२१/१०/२०२१ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्रं.११ अंतर्गत हरिविठ्ठल नगर मधिल मराठी शाळे समोरील विश्वकर्मा मंदिर रस्त्याच्या बाजुस आर.सी.सी.गटार बांधणे कामी मक्तेदार श्री.वरुण शिरिष पाटील यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.९,९९,२०४/- मात्र खर्चाची संविदा.

२१. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./१०९ दि.२१/१०/२०२१ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्रं.११ हरिविठ्ठल नगर मधिल श्री हनुमान मंदिर व गणपती मंदीर समोरील रस्त्याच्या बाजुस आर.सी.सी.गटार व रोड क्रॉसिंग ठिकाणी स्लॅब कल्व्हर्ट टाकणे कामी मक्तेदार श्री.वरुण शिरिष पाटील यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.९,९९,२०४/- मात्र खर्चाची संविदा.

२२. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./११० दि.२१/१०/२०२१ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्रं.०४ मध्ये चौबे शाळेच्या खुल्या जागेवर पेव्हर ब्लॉक बसविणे कामी मक्तेदार श्री.निलेश रमेश पाटील यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.९,९९,९९९/- मात्र खर्चाची संविदा.

२३. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./१११ दि.२१/१०/२०२१ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्रं.०३ वाल्मीक नगर बगीच्या ओपन जीम तयार करणे कामी मक्तेदार श्री.डी.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.९,५२,५७१/- मात्र खर्चाची संविदा.

२४. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./११२ दि.२१/१०/२०२१ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्रं.११ गट नं.१६२/१ब पिंप्राळा शिवार मधील ओपन स्पेसला चेनलिंग फेन्सिंग करणे कामी मक्तेदार श्री.महेश शालीग्राम पाटील यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.७,८९,९५४/- मात्र खर्चाची संविदा.

२५. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./११३ दि.२१/१०/२०२१ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्रं.१३ नेहरु नगर मधिल मेहरुण स.नं.४१५ ओपनस्पेस मध्ये जॉगींग ट्रॅक तयार करणे कामी मक्तेदार श्री.रामेश्वर बंन्सीलाल धामणे यांचे निविदा रक्कमेपेक्षा ०.०४% सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.६,९९,७२२/- मात्र खर्चाची संविदा.

२६. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./११४ दि.२१/१०/२०२१ अन्वये नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.०७ अंतर्गत गंधर्व कॉलनी येथील खुल्या जागेमध्ये पाथवे तयार करणे कामी मक्तेदार श्री.डी.एच.पाटील कंन्ट्रक्शन यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.९,९९,९४१/- मात्र खर्चाची संविदा.

२७. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./११५ दि.२१/१०/२०२१ अन्वये नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.०७ अंतर्गत गजानन कॉलनी येथील खुल्या जागेमध्ये पाथवे तयार करणे कामी मक्तेदार ज्योती लक्ष्मण कोळी यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.९,९९,८८४/- मात्र खर्चाची संविदा.

२८. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./११६ दि.२१/१०/२०२१ अन्वये नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.०७ अंतर्गत भगिरथ कॉलनी व श्रीकृष्ण कॉलनी येथील खुल्या जागेस चेनलिंक फेन्सींग करणे कामी मक्तेदार निलेश सुरेश पाटील यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.९,९९,९९९/- मात्र खर्चाची संविदा.

२९. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./११७ दि.२१/१०/२०२१ अन्वये नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.०७ अंतर्गत पिंप्राळा गट नं.५६ मारुती पार्क येथील खुल्या जागेस चेनलिंक फेन्सींग करणे कामी मक्तेदार

श्री.प्रविण काशिनाथ राणे यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.९,९९,९९९/- मात्र खर्चाची संविदा.

३०. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./११८ दि.२१/१०/२०२१ अन्वये नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.०९ पिंप्राळा गट नं.३४८ जिल्हाबँक कॉलनी ओपनस्पेसला चेनलिंक फेन्सींग करणे कामी मक्तेदार श्री.डि.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.९,९८,८६०/- मात्र खर्चाची संविदा.

३१. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./११९ दि.२१/१०/२०२१ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्रं.०१ मधिल स.नं.३४४/१ जळगांव शिवार श्री.नंदु पुरोहीत ते मुरली महाजन यांचे घरापर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामी मक्तेदार श्री.बालाजी इन्फ्रास्ट्रक्चर यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.९,९४,६३४/- मात्र खर्चाची संविदा.

३२. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./१२० दि.२१/१०/२०२१ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्रं.०२ मधिल स.नं.३३७/४ मधील श्री.सुकदेव भंडगर ते श्री.सतिष कंडारे यांचे घरापर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामी मक्तेदार श्री.निलेश रमेश पाटील यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.९,९४,६३४/- मात्र खर्चाची संविदा.

३३. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./१२१ दि.२१/१०/२०२१ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्रं.१६ सिंधी कॉलनी नेत्रज्योती दवाखान्याजवळ रस्ता डांबरीकरण करणे कामी मक्तेदार श्री.निर्मला विलास यशवंते यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.९,९६,९२४/- मात्र खर्चाची संविदा.

३४. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./१२२ दि.२१/१०/२०२१ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्रं.०४ मधिल दालफड परीसरातील रस्ते पेव्हिंग ब्लॉक बसवून तयार करणे कामी मक्तेदार श्री.बालाजी इन्फ्रास्ट्रक्चर यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.१०,००,०००/- मात्र खर्चाची संविदा.

३५. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./१२३ दि.२१/१०/२०२१ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्रं.१२ रामदास कॉलनी मधील अॅड निकम यांच्या घरापासुन नाल्यापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे कामी मक्तेदार ज्योती लक्ष्मण कोळी यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.६,७२,३३१/- मात्र खर्चाची संविदा.

३६. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./१२४ दि.२१/१०/२०२१ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्रं.१३ मोहन नगर मेहरुण स.नं.४४९ मधील प्लॉट नं.९६ ते ११५ पर्यंत रोड डांबरीकरण करणे कामी मक्तेदार श्री.अजिंक्य सुनिल पाटील यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.९,९९,५९८/- मात्र खर्चाची संविदा.

३७. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./१२५ दि.२१/१०/२०२१ अन्वये नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.०८ मध्ये गट नं.११२/१+२+३ निमखेडी शिवार येथे आर.सी.सी.गटार बांधणे कामी मक्तेदार नचिकेत सुभाष सोनवणे यांचे निविदा रक्कमेपेक्षा ११% सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.२१,५८,३३९/- मात्र खर्चाची संविदा.

३८. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./१२६ दि.२१/१०/२०२१ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.१४ मधील मेहरुण सिटी सर्वे नं.२७० मधील ओपन स्पेसला चेनलिंक फेन्सिंग करणे व जॉगिंक ट्रॅक तयार करणे कामी मक्तेदार स्वप्नील आसाराम सोनवणे यांचे निविदा रक्कमेपेक्षा ११.१३% सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.१३,१४,५१६/- मात्र खर्चाची संविदा.(मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

३९. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./१२७ दि.२१/१०/२०२१ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.०७ मधील महानगरपालिका मालकीचे कवियत्री बहिणाबाई उदयान विकसित करणे कामी मक्तेदार डी.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रक्कमेपेक्षा १०.११% सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.११,१८,०५०/- मात्र खर्चाची संविदा.(मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

४०. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./१२८ दि.२१/१०/२०२१ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.०६ मधील महानगरपालिकेचे गणेशवाडी उदयान (मेहरुण टि.पी.एस २ एफ पी ५५८) विकसीत करणे कामी मक्तेदार प्रणव कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रक्कमेपेक्षा ०६% सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.८,८७,०७२/- मात्र खर्चाची संविदा.(मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

४१. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./१२९ दि.२१/१०/२०२१ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील जळगांव शहरातील गुरुदत्त कॉलनी मधील गुरुदत्त मंदिर शिवमंदिर शिवमंदिर जवळील महानगरपालिका मालकीचा ओपन स्पेस विकसीत करणे कामी मक्तेदार प्रणव कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रक्कमेपेक्षा ६% सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.५,४८,७१५/- मात्र खर्चाची संविदा.(मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

४२. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./१३० दि.२१/१०/२०२१ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील जळगांव शहरातील टेलिफोन नगर पश्चिम महानगरपालिका मालकीचा गट नं.४७९/अ/२/१ मेहरुण मधिल ओपन स्पेसला चेनलिंक फिन्सींग करणे कामी मक्तेदार अजिंक्य सुनिल पाटील यांचे निविदा रक्कमेपेक्षा २.२५% सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.८,२४,३३०/- मात्र खर्चाची संविदा.(मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

४३. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./१३१ दि.२१/१०/२०२१ अन्वये नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्र.०८ निमखेडी गावठाण भागात आर.सी.सी. गटार बांधणे कामी मक्तेदार एस कुमार कंन्स्ट्रक्शन यांचे वाटाघाटीअंती निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.१९,९७,९२०/- मात्र खर्चाची संविदा.

४४. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./१३२ दि.२१/१०/२०२१ अन्वये नाविण्यपुर्ण योजना सन २०२०-२१ अंतर्गत प्रभाग क्र.०७ डेमला कॉलनी व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर उदयान जवळील मुख्य नाल्यास संरक्षण भिंत बांधणे कामी मक्तेदार श्री.डी.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रक्कमेपेक्षा ५.५६% सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.१२,२६,९६७/- मात्र खर्चाची संविदा.

४५. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./१३३ दि.२८/१०/२०२१ अन्वये जळगांव शहरातील डांबरी रस्ते पॉटहोल मशिनच्या सहाय्याने दुरुस्ती करण्याकरिता इमल्शन डांबर पॅक डब्यात शासकीय दराने हिंदुस्थान कोलॅस प्रा.लि.मुंबई यांचे कडुन खरेदी करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.१४,९९,११५/- मात्र खर्चाची संविदा.

४६. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./१३८ दि.०१/११/२०२१ अन्वये नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्र.१५ मधील संत गुलाब कॉलनी मागील रस्ता खडीकरणासह डांबरीकरण करणे कामी मक्तेदार सुशिलकुमार गणपत डोंगरे यांचे निविदा रक्कमेपेक्षा ०.४०% सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.७,८७,८१८/- मात्र खर्चाची संविदा.

४७. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./१३९ दि.१६/११/२०२१ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.१५ अंतर्गत इकबाल कॉलनीतील महानगरपालिकेच्या खुल्या भुखंडास पेव्हर ब्लॉक बसविणे कामी मक्तेदार निलेश रमेश पाटील यांचे निविदा रक्कमेपेक्षा ५.५८% सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.९,३३,९७५/- मात्र खर्चाची संविदा.(मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

४८. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./१४० दि.१६/११/२०२१ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.०७ अंतर्गत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर उदयान येथे कॉक्रीट फ्लोरींग व सुशोभिकरण करणे कामी मक्तेदार डी.एच.पाटील कंन्स्टक्शन यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.९,८९,३५४/- मात्र खर्चाची संविदा.(मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

४९. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./१४२ दि.१८/११/२०२१ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.०३ येथील गट क्र.६२/१/२ महानगरपालिका मालकीचा ओपन स्पेसला चेनलिंक फेन्सिंग विकसित करणे कामी मक्तेदार वैभव किशोर भोळे यांचे निविदा रक्कमेपेक्षा ९% सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.६,४८,९००/- मात्र खर्चाची संविदा.(मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

५०. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./१४३ दि.१८/११/२०२१ अन्वये नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्र.०६ अंतर्गत जळगांव स.नं.२७४/अ/६/४ प्लॉट नं.०६ सर्व्हे नं.२७४/अ/६/१ प्लॉट नं.०५ दत्त कॉलनी येथील रस्ते डांबरीकरण करणे कामी मक्तेदार वैष्णवी बिल्डकॉन जळगांव यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.९,९९,८९९/- मात्र खर्चाची संविदा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**मा.महापौर , मा.उपमहापौर , मा.आयुक्त , सन्मा.सदस्य .श्री. नितीन लढ्ढा यांनी स्टेज वर चर्चा केली . त्यावेळी सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.**

**नगरसचिव , जादा विषय क्रं १ :-** महिला व बालकांच्या कल्याणाकरीता राबविण्याच्या योजनेबाबत धोरण निश्चित करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कैलास सोनवणे :-** मंजुर आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मंजुर आहे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे. पुढील विषय घेण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६९२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागांतर्गत महिलांना विविध क्षेत्रात सक्षम करण्याच्या दृष्टीने विविध योजनांचा आराखडा तयार करुन महासभेसमोर सादर करुन महासभेची मान्यता घेवुन महापालिकेचे धोरण निश्चित करणे बाबत मा.महापौर तसेच मा.सभापती महिला व बालकल्याण समिती यांनी दि.०८/०९/२०२१ रोजी मा.महापौर यांचे दालनात उपायुक्त यांचे उपस्थितीत दिलेल्या सूचनेनूसार महिला व बालकल्याण विभागांतर्गत खालील विविध योजनांचा आराखडा तयार करण्यात आलेला आहे -

१. कवियत्री बहिणाबाई चौधरी जळगांव भूषण पुरस्कार
२. ८ मार्च जागतिक महिला दिन साजरा करणे.
३. क्रिडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विदयार्थ्यांचा सत्कार समारंभ
४. कोविड १९ महामारी अंतर्गत ज्या मुलामुलींचे आई,वडील किंवा दोन्ही मयत झाले असतील अशा निराधार मुलांना शिक्षणासाठी अर्थसहाय्य योजना.
५. जळगांव शहर महानगरपालिका अंतर्गत स्त्री संसाध कैंद्र स्थापन करणे.
६. जीवन ज्योति व जीवन सुरक्षा योजना
७. मनपा शालेय स्तरावर मुलींना क्रिडा साहित्य उपलब्ध करुन देणे.
८. स्वयंम सिध्द प्रशिक्षण योजना

९. जळगांव शहरातील एक अथवा दोन मुलींवर कुटूंब नियोजन करणाऱ्या कुटूंबाचा सत्कार करणे.

१०.जळगांव शहरातील पिवळे व केशरी रेशनकार्डधारक कुटूंबातील इयत्ता १० वी व १२ वी मधील ७५ टक्के गुण संपादन करणाऱ्या विदयार्थ्यांचा सत्कार व अर्थसहाय्य करणे.

११.जळगांव शहरात रहिवास करणाऱ्या कुटूंबात मुलीचा जन्म झाल्यास मुलीच्या नावे सुकन्या योजनेचे खाते उघडून देणे.

१२.महिला व बालकांच्या विकासाकरीता शहरात विविध पायाभूत सुविधांची निर्मिती करणे.

१३.महिला बचत गट महोत्सव.

१४.पाळणाघर चालविणाऱ्या अशासकीय संस्थांना अर्थसहाय्य करणे.

१५.हस्तकला/गृहउदयोग/व्यावसायीक प्रशिक्षण व अर्थसहाय्य करणे.

महिला व बालकांच्या कल्याणाकरीता राबविण्याच्या योजनेबाबत योजना निहाय आराखडयास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- जादा विषय क्रं.२:-** विशेष रस्ता अनुदाना अंतर्गत प्रभाग क्र.१० मधील हुडको दर्गा ते स्वस्तधान्य दुकानापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे कामाचे रक्कम रु.६८,६५,४५२/- मात्रचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब.

**मा.महापौर :-** बोला आप्पा

**श्री.कैलास सोनवणे :-** वॉर्ड क्रं. १० ख्वॉंजा नगरी मधील बिल्डींग नं. १ ते २६ येथील रस्ता डांबरीकरण करणे. ४९ लक्ष वॉर्ड क्रं. १० गट नं. १८६ , १८७/१/२ डांबरीकरण करणे , ५०,९०,२८२/- असे ९९,९०,२८२/- रूपयांचे हे काम जो उरलेला निधी आहे हा जो शिल्लक निधी आहे तो आणि बाकीचे मनपा फंडातील टाकुन हे काम करायचे तुमच्याच वॉर्डाचे .

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे. यातील ह्या कामातून उरलेल्या शिल्लक निधीतुन

**श्री.कैलास सोनवणे :-** जे ईस्टिमेट आलेले आहे ना त्याच्यापेक्षाही जास्त शिल्लक आहे. त्यात मनपाचे टाकुन . बाकीचे दोन्ही विषय मंजुर

**मा.उपमहापौर :-** बिल्डिंग नं.१

**श्री.कैलास सोनवणे :-** बाकीचे दोन्ही विषय मंजुर (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६९३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका विविध रस्त्याचे कामे करण्याकरिता विशेष रस्ता अनुदान सन २०१६-१७ या आर्थीक वर्षात रक्कम रु.३.७५ कोटी महाराष्ट्र शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१६/प्र.क्र.१४८/नवि-१६ मंत्रालय मुंबई दि.२३ मे २०१६ अन्वये महापालिकेस वितरीत करण्यात आलेला आहे. त्यानुसार जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत सेट टेरीसा ते सिध्दार्थ नगर पर्यंत मेहरुण तलाव सभोवतालचा ९ मीटर रुंद रस्त्याचे डांबरीकरण करणे कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम रु.३४२४९०५६/- मात्रला अध्यक्ष जिल्हास्तरीय समिती तथा विभागीय आयुक्त, नाशिक यांचे कडील पत्र

क्र.न.प.प्र/जमनपा/विरअनु/कार्या/२/१/१६२/२०१८ दि.१४/०३/२०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार वर नमुद काम पूर्ण होवून त्याकरीता रक्कम रु.३०६३२९६२/- मात्रचा खर्च झालेला आहे. सदर वितरीत केलेल्या अनुदानातुन खर्च होवुन (३७५००००० - ३०६३२९६२) असे रक्कम रु.६८६७०३८/- मात्रचा निधी शिल्लक आहे. सदरचा निधी खर्च करण्याकरीता महाराष्ट्र शासन निर्णय क्र.संकीर्ण११९८/प्र.क्र.३०/नवि ०४ मंत्रालय, मुंबई दिनांक २१ मे २०२१ अन्वये दि.२८ फेब्रुवारी २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने शिल्लक असलेल्या निधी अंतर्गत प्रभाग क्र.१० मधील हुडको दर्गा ते स्वस्त धान्य दुकानापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे कामाचे रक्कम रु.६८६५४५२/- मात्रचे अंदाजपत्रकास तसेच प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडेस मान्यतेसाठी पाठविणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनूसार उपरोक्त निधीतून काम झालेनंतर शिल्लक निधीतून तसेच मनपा निधीतून १) प्रभाग क्र.१० ख्वॉजानगरी मधील बिल्डींग नं. १ ते २६ येथिल रस्ता डांबरीकरण करणे कामी येणारा खर्च रक्कम रु.४९,००,०००/- मात्र, २) प्रभाग क्र.१० गट नं.१८६, १८७, १/२ येथील रस्ते कॉंक्रीटीकरण करणे कामी येणारा खर्च रक्कम रु.५०,९०,२६२/- मात्र एकूण रक्कम रु.९९,९०,२६२/- मात्रचे खर्चास तसेच सदरचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचेकडेस मान्यतेसाठी पाठविणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- जादा विषय क्रं.३ :-** म.न.पा.शाळा क्रमांक १८ ही पात्र शैक्षणिक संस्थेस लिलाव प्रक्रियेव्दारा भाडे कराराने देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.सचिन पाटील :-** हा जो ईथे विषय आलेला आहे. तेथे आता सुधारणा केली गेलेली आहे. तर जाहीरात स्वरूपात पेपरलाही दिले गेलेले आहे. आत्ताच सभागृहाचे ज्येष्ठ नेते नितीनभाऊंनी सांगीतलेले आहे की, प्रशासनाने काहीतरी धोरण अंवलंबन कराव गरीब जनते करीता एखादी शाळा महापालिका प्रशासनाने सुरू करून ती डेव्हलप करावी. जेणेकरून जनतेला काहीतरी आधार मिळेल इंग्लिश मिडीयम शाळा निश्चित करण्याकरीता याच्या पुढचं मि सांगेन की याच शाळेपासुन सुरूवात करावी आणि या शाळेचा उपक्रम या शाळेला नविन उपक्रम म्हणुन मा.हिंदुह्यदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच नांव देवुन हा उपक्रम सुरू करावा अशी मी सभागृहाला माझी विनंती करत आहे.

(सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** नांव आहे तिथे ऑलरेडी , गफ्फार भाईच्या आईचे नांव आहे.

(सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** हा विषय मीच आणलेला आहे. परंतू (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.सचिन पाटील :-** (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** नियमांच्या बाहेर काहीच नाही , त्यांच्या लोकांचे फोन आले होते की ते नामंजुर करा . (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.सचिन पाटील :-** (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.) काय केलेले आहे काय नाही ते माहिती आहे सगळयांना म्हणजे त्यांनी काम सांगीतले त्याचा पाठपुरावा केला .

**श्री.सचिन पाटील :-** हा विषय नामंजुर करण्यात यावा. याच्या पासुन सुरूवात करायची ही शाळा ऊर्दु माध्यमाची सुरू करावी . आणि आप्पांनी हा विषय नामंजुर केला आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** शाळा सुरू करा.

(सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही नाही नामंजुर

**श्री.सचिन पाटील :-** (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** भाड्याने देण्यात काही अडचण आहे का आपल्याला

**श्री.सचिन पाटील :-** नामंजुर बोलले ना आप्पा तुम्ही आत्ता , काहो आप्पा तुम्ही नामंजुर बोलले ना आत्ता

**श्री.कैलास सोनवणे :-** हो शब्द पकडी घे भो माझा नामंजुर तर नामंजुर

(सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.नितीन लढ्ढा :-** आप्पा शाळेच स्टेटस काय आहे आता खाली आहे का

**श्री.कैलास सोनवणे :-** खाली आहे ती (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.सचिन पाटील :-** (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.सुनिल महाजन :-** महापालिकेकडुन होवु द्या .

**श्री.कैलास सोनवणे :-** काय महापालिकेकडुन

**श्री.सुनिल महाजन :-** आपल्या महापालिकेकडुन होवु द्या

(सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही नाही ती किती वर्षापासुन खाली पडलेली आहे ती

**श्री.कैलास सोनवणे :-** (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.) चार महिने फिरले आहे ते शाह लोक

**श्री.सचिन पाटील :-** शाळा तर होत्या (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे खाली पडलेली आहे तिथे शाळा सुरू होवू शकत नाही. मुस्लिम भागामध्ये ती शाळा आहे.

**श्री.सचिन पाटील :-** अहो नितीनभाऊ

**मा.उपमहापौर :-** उलट जास्त पटसंख्या राहील भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो ना

**श्री.सचिन पाटील :-** मी सांगीतल्याप्रमाणे मानसिकता ठेवुन प्रशासनाने जर ठरवलं तर ते का होणार नाही.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अहो पण त्या शाळेच्या आजुबाजुला पुर्ण अतिक्रमणमध्ये दुकानं बांधले गेलेले आहेत.

**श्री.सचिन पाटील :-** तुम्ही सांगीतल्याप्रमाणे प्रशासनाने सुरूवात केली तर

**श्री.कैलास सोनवणे :-** तुम्ही कुठला विषय कुठे जोडता आहेत. आसोदा रोड (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.) नाही आम्ही सांगतोय की आमच्या वॉर्डात आहे आम्हाला माहिती आहे . काही पण सांगता की अतिक्रमण आहे आणि हे आहे.

**श्री.सचिन पाटील :-** मी सांगीतल्याप्रमाणे प्रशासनाने सुरूवात करावी. भाऊ , नितीनभाऊ अनुमोदन आहे का आता आप्पांनी मांडला तो विषय

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब या जळगांव शहरातील नागरीक आपल्याला निवडुन देतात चांगले काम करण्यासाठी

**श्री.नितीन लढ्ढा :-** बरोबर आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** आणि काही ते लोक आपल्याकडे निवडुन आल्यानंतर येतात की त्यांची जी शाळा आहे ती आम्हाला अपुर्ण पडते आहे तर त्याच्या बाजुला जी शाळा आहे ती आम्हाला पाहीजे आहे. ती शाळा भाड्याने द्यायची किंवा विकत द्यायची तर ते नियमात बसत असेल तर ते द्यायला पाहीजे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बरोबर आहे ,चांगले आहे , चांगले आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** आणि जर द्यायची असेल जर काही त्याच्यामध्ये अयोग्य वाटत असेल तर द्यायला पाहीजे. असं माझे मत आहे.

**श्री.सचिन पाटील :-** मी आप्पासाहेब

(सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.सचिन पाटील :-** अहो आप्पासाहेब

**श्री.कैलास सोनवणे :-** थांबरे मी बोलतोय ना

**श्री.सचिन पाटील :-** हो ठिक आहे. तुम्ही बोला

**श्री.कैलास सोनवणे :-** अश्या पध्दतीचे कामकाज करण्यासाठी आपण येथे आलोय . आपण लोकांना चांगल्या सेवा देण्यासाठी मग प्रत्येकामध्ये काही काळगोर वाटत असेल तर सोडा ना विषय नामंजुर तर नामंजुर

**श्री.सचिन पाटील :-** ठिक आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.) एक आपली इमारत खाली पडलेली आहे आणि याबाबतीत तर अश्या बाबतीत कुठेतरी सकारात्मक दृष्टीकोनातुन विचार करायला हवा. याच्यात जे आपण भाड्याने देण्याचे धोरण अंवलंब केला असता तर त्याच्यातुन महानगरपालिकेला उत्पन्न मिळेल शिक्षणाच कार्य चालु राहील. आज शिक्षणाचं कार्यही बंद आहे आणि महानगरपालिकेला उत्पन्नही मिळत नाहीये. तर या दोघी गोष्टींचा कुठेतरी एक योग्य पध्दतीने कुठेतरी निर्णय घ्यायला पाहीजे. प्रस्ताव कुणी आणला कोणती संस्था चालवतेय . त्यापेक्षा जी जागा आहे. ज्या कारणासाठी आरक्षित आहे. तेच पर्पज तिथे चालणार आहे शिक्षणाचं म्हणजेच शैक्षणिक उद्धीष्ट पुर्ण होतेय आहे . दुसरं महानगरपालिकेला उत्पन्न प्राप्त होत आहे.तर याबाबतीत सगळयाचा सभागृहाने योग्य तो विचार करायला हवा याच्यामध्ये असे गैर काही नाहीये की आपण कोणाच्या घश्यात ती जागा टाकतोय आणि याच्या संदर्भातही रितसर जाहीर निविदा प्रक्रीया राबवुन द्यायची आहे. अस नाहीये की या संस्थेने मागीतली आणि आपण त्या संस्थेला देतोय अशातली परिस्थिती नाहीये. विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करूनच ती शाळा देण्याच्या संदर्भातील भुमिका आहे. मला वाटत तो प्रस्ताव तशा पध्दतीने मला तुमचा नेमका उद्देश्य काय आहे तो कळला नाही.

**श्री.सचिन पाटील :-** भाऊ तुम्ही जो आता विषय मांडला त्याच्या पहिले मी या विषयाबाबत प्रशासनाने काहीतरी भुमिका घ्यावी. शाळेची सुरूवात करण्याकरीता तर या १८ नंबर पासुन सुरूवात करावी असं माझ म्हणण आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही नाही ऐका ना

**श्री.सचिन पाटील :-** आणि ज्या दुसऱ्या संस्थेला आपण किंवा लिलावाने द्यायची म्हणतोय , बाजुच्या संस्थेला आप्पांनी सांगीतले त्या पध्दतीने त्याप्रमाणे त्या बद्दल दुमत नाहीये . पण त्यांना विद्यार्थी मिळु शकत आहे तर प्रशासनाने सुरूवात केली तर त्यात काय वेगळे आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** नाही प्रशासनाचा विषय नाहीये.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही नाही काय आहे (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.) त्यांना विचारायचे कारण काय आहे

**श्री.सचिन पाटील :-** (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.) कारण ती प्रायव्हेट आहे. तर ते गर्व्हमेंटच असेल मनपाच असेल तिथे फी नसेल **.**

**श्री.कैलास सोनवणे :-** (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.) विचार करायला पाहीजे .

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो ना नाही विचार करायला पाहीजे .

**श्री.कैलास सोनवणे :-** आम्ही तुमच्या मताशी सहमत आहे बिलकुल मीच

**श्री.सचिन पाटील :-** नितीनभाऊ हे बघा कुठेतरी चांगल्या गोष्टीला सुरूवात व्हावी मी फक्त सांगतोय माझ काही व्यक्तिगत काही हे नाहीये.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो ना जी संस्थेने मागणी केलेली आहे. तीला डायरेक्टली देण्याचा आपल्याला काही अधिकार नाहीये. त्याच्यापेक्षा मागणी केलेल्या संस्थेपेक्षा चांगल्या संस्थेला देता येईल्.

**श्री.कैलास सोनवणे :-** ठिक आहे ना लिलाव पध्दतीने द्या .जळगांव च्या सगळया संस्थांना बोलवणार आहे . त्यांनांच द्यायची आहे असं काही नाहीये. जो येईल घ्यायला त्यालाच (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.सचिन पाटील :-** अहो आप्पासाहेब माझ म्हणण असं आहे की मनपा प्रशासनाने पुढाकार घेवुन सुरू करावी.

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही होत आहे ना आपल्याकडुन म्हणुन तर

**श्री.सचिन पाटील :-** होईल ना का नाही (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.) दोन दोन उपायुक्त आहे येथे

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो एक उदाहरण सांगतो भोईटे शाळेचे , भोईटे शाळेची पटसंख्या बघा आणि त्यांच्या शिक्षणावर होणारा खर्च बघा

**श्री.कैलास सोनवणे :-** हो जास्त आहे. फार जास्त आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे एका विद्यार्थ्यावर लाखो रूपये खर्च होतो अशी परिस्थिती आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** तशीच आहे परिस्थती

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणुन खाजगीकरण्याकडे लोकांचा व्यवहार काय आहे. (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.उपमहापौर :-** भाऊ आपल्या मनपाच्या काही शाळा ज्या आहेत ज्या बंद पडलेल्या आहेत ना भाऊ त्या ठिकाणी सगळे अवैध धंदे चालतात. त्याच्यामुळे अशा पध्दतीने जर शाळा आपण कोणत्या संस्थेला देणार आहोत. आणि ती चालु होणार आहे ती.

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही नाही ही जी शाळा आहे ना , नितीनभाऊ मुस्लिम विद्यार्थ्यांची ऊर्दु शाळा आहे आणि महापालिकेच्या ऊर्दुंच टिचर आणि ऊर्दुंच विद्यार्थी शिक्षण घेताहेत. म्हणजे हिंदु शिक्षण तर तिथे आहेच नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मला काय वाटतय महापौरताई याच्यामध्ये भाड्याने द्यावी.

**श्री.कैलास सोनवणे :-** एक मिनिंट नितीनभाऊ त्यांची तारीफच करायला पाहीजे. त्यांच्याकडे पर्याय नाही बिचाऱ्यांकडे पैसे नसतात. ते प्रायव्हेट मध्ये जावु नाही शकत. हिंदु विद्यार्थी प्रायव्हेट मध्ये जावु शकतात. आता त्या ठिकाणी त्यांची शाळा बाजुलाच आहे.त्यांना जागा अपुर्ण पडते आहे म्हणुन ते ८ ते १० वर्षापासुन मागे लागलेले आहे या जागेसाठी

**श्री.सचिन पाटील :-** आप्पासाहेब मग आपण त्याच्याकरीताच आपण होवुन डेव्हलपमेंट करणार त्या जनतेकरीता त्या गरीब जनतेकरीता

**श्री.नितीन लढ्ढा :-** सर सर (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.सचिन पाटील :-** (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.) काम आहे आपलं ते

**श्री.कैलास सोनवणे :-** ते लाय डिटेक्टर असत ना तसं वाईन डिटेक्टर ठेवा साहेब यांच्यासाठी

**श्री.सचिन पाटील :-** का बरं

**श्री.नितीन लढ्ढा :-** सर , सचिनभाई मला असं वाटत हा उपक्रम राबवायला हरकत नाहीये.

**श्री.सचिन पाटील :-** हो

**श्री.नितीन लढ्ढा :-** अजुन जाहीरात द्यायची आहे त्यांनर जागा द्यायची आहे. जागा दिल्यानंतर कोणत्या संस्था येतात आणि अंतिम निर्णय हा पुन्हा आपल्या समोरच येणार आहे.

**श्री.सचिन पाटील :-** ठिक आहे चालेल भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** आणि मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** भाऊ याच पध्दतीने शाहु नगरची एक शाळा आहे. १२ नंबर ती पण अशाच पध्दतीने बंद पडलेली आहे ती पडकी शाळा त्याच्या अनुभव पण सेम पोजीशन आहे. काही वर्ग चालु आहे (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.) या ठरावाला माझं अनुमोदन आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** मला बोलायच होत थोड , याच विषयाला धरून बोलायचे आहे. आपल्या महानगरपालिकेच्या कायद्यामध्ये विक्री करणं किंवा भाड्याने देणं याची एक स्पष्ट तरतूद आहे. आणि जर महानगरपालिकेने निर्णय घेतला तर आपण जागा विक्रीही करू शकतोय. तर त्यासाठी आपल्याला कुठल्याही परवानगीची आवश्यकता नाहीये. अस असतांना माझी सभागृहाला विनंती आहे आणि सुचना आहे. (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.) तर पुढील काळामध्ये आपण हे धोरण निश्चित कराव . महानगरपालिकेचे देण आपण लागतोय आपले कर्ज असतील. आपले पैसे असतील जे काही आपण ज्यांचे देणे लागतोय त्याची रक्कम आपण निश्चित करावी आणि त्या करीता आपण महानगरपालिकेची एखादी मालमत्ता विकावी आणि ती विक्री करून आणि

आपले सगळे देणे करून आपण कर्ज बाजारी आहोत त्यामुळे आपली परिस्थिती खराब आहे. या कर्जातुन आपण बाहेर येणार आहेत. अशी सभागृहाला माझी सुचना आहे.

**ॲड.शुचिता हाडा :-** महापौरताई या विषयासंदर्भात फक्त थोडस बोलायचं आहे. आता येथे बराच उहापोह झाला मनपाच्या शाळा या विषयावर यापुर्वीही शाळेचा विषय आला होता आजच्याच पटलावर त्यावेळी मनपाच्या शाळेंची आजची परिस्थिती सुधारली पाहीजे आणि गरीब वर्गाच्या मुलांसाठी हा एक चांगला मार्ग आहे शिक्षणाचा आता ती ऊर्दु संस्था मागतेय ईथपर्यंत आपण आलो. ती त्या संस्थेलाच द्यावी असा ठराव आपण केलाच नाही नाहीतर आपण लिलावाने करणार आहोत. ईथपर्यंत आलो. पण हा एकप्रकारे आपण असा पायंडा पाडतोय का की या मनपाच्या शाळा बंद पडत जाणार आणि मग कोणत्यातरी खाजगी संस्था त्या जागा ॲक्वायर करत जाणार. शेवटी ईन्फ्रास्ट्रक्चर आपल आहे. ईन्फ्रास्ट्रक्चर आपण तयार केलेल आहे काही वर्ष , काही पिढ्या ते खुप चांगल्या पध्दतीने चाललय . नितीनभाऊंना ज्ञात असेल की जळगांव शहरातील अनेक मान्यवर की ज्यांनी मनपाच्या शाळेमध्ये त्यांनी शिक्षण घेतलेल आहे. मग असा जो मनपाचा नावलौकीक होता . गौरव होत्या मनपाच्या शाळा त्या शाळा बंद पडतात. तर त्याचा अभ्यास येथे व्हावा. त्याच्याबद्दलच आत्मचिंतन आपण कराव, प्रशासनाने आणि लोकप्रतिनिंधींनी सुध्दा की आपण हे काम कराव की नाही ते आपण लिलावाने विक्री करायची का ती लिलावाने भाड्याने द्यायची का , एकेरी काहीच निर्णय घ्यायचा नाही नितीनभाऊ हे लिलावाने द्यायला काहीच अडचण नाहीये नितीनभाऊ मनपाचे उत्पन्न सुरू होणार आहे. १०० टक्के मी आपल्या मताशी सहमत आहे की याच्यात कोणतीही टेक्निकली अडचण नाही आणि लिलाव प्रक्रीया होणार म्हणजे ती निरपेक्ष होणार आहे असे अभिप्रेत आहे. पण अस होतय का की हे सगळ हे ईथपर्यंत आणि हे प्रकरण कस आलं , काही टिप्पण्या लिहिल्या गेल्या की या शाळेची आपल्याला गरज नाही. ईथे पटसंख्या कमी आहे. विद्यार्थी संख्या खालावत गेली . तर अस तर होत नाहीये ना की ह्या अशा टिप्पण्या जाणुन बुजुन तयार केल्या जाता आहेत आणि मनपाच्या शाळा बंद पडतात . आप्पा माझा या शाळेबद्दलचा विरोध नाही (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही ताई बोला तुम्ही तुम्ही

**ॲड.शुचिता हाडा :-** मला माहिती सुध्दा नाहीये की याच एक्झ्याटली लोकेशन कुठे आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही ताई बोला तुम्ही बरोबर बोलता आहेत.

**ॲड.शुचिता हाडा :-** माझा मुद्दा हा आहे की अस काही होत आहे का ? म्हणजे स्लो पॉईझनिंग जो प्रकार म्हणतो आपण तर असा तर हा काही प्रकार नाही ना याच्या बद्दलचा थोडा अभ्यास झाला पाहीजे आणि अगदीच जर मत मतांतर होत असेल तर आजच्या महासभेपुढचा हा विषय तहकुब करावा. तहकुब करा आणि सर्व पक्षीय ज्येष्ठ नेत्यांनी याच्यावर चर्चा करा आणि पुढच्या महासभेमध्ये निर्णय घ्या . घाईने कोणत्याही निर्णयावर पोहचू नका.

**श्री.कैलास सोनवणे :-** जावु द्या ना तहकुब करा ना तो विषय (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.नितीन लढ्ढा :-** डॉकेटमध्ये दिले आहे (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**ॲड.शुचिता हाडा :-** हो डॉकेटमध्ये सगळ दिलेल आहे नितीनभाऊ, नितीनभाऊ डॉकेट मध्ये सगळ क्लियर आहे. टेक्निकली अडचणीच डॉकेट नाही. माझा मुद्दा हा आहे की डॉकेट तयार झाल का हळु हळु आता असा पायंडा म्हणजे नितीनभाऊ आपण जे म्हणतात नाही म्हातारी मेल्याचे दुख: नाही पण काळ सोसावतो . तस होवु नये एवढच माझ म्हणण आहे. बाकी निर्णय संगळयानी घ्यावा.

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही विषय काय आहे ताई आता जर का त्यांना बंद पाडायची असेल तर त्यांना प्लॅनिंग करायची असेल तर बंद करायची असेल तर ३० वर्षापासुन सुरूवात करावी लागेल . ३० वर्षापासुन सुरूवात केली तर तेव्हा ती प्लॅनिंग सक्सेस होईल . आता मी तस बोलत नाहीये.

**ॲड.शुचिता हाडा :-** आप्पा (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** मी समजलो तुमची शंका ताई (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**ॲड.शुचिता हाडा :-** आप्पा अशा स्लो पॉईझनिंग सारखा तर विषय नाहीयेना

(सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** मी समजलो तुमची शंका ताई तुमच्या शंकेला .

**ॲड.शुचिता हाडा :-** आणि समाजाच्या ते लक्षात येत नाही .

**श्री.कैलास सोनवणे :-** मी तुमच्या शंकेच निरसण करतोय. काय आहे माहिती आहे का की ते घेतीलच नाहीये. त्यांची किंमत काढण्याची पध्दतपण सांगतो ताई मी तुम्हाला , मागे पण , मागे पण मी

**ॲड.शुचिता हाडा :-** या नुसार तर ते टेक्निकली परवाडणारच नाहीये

**श्री.कैलास सोनवणे :-** ताई या स्ट्रक्चरवर जो खर्च झालेला आहे ना मनपाचा तो पण त्यांच्याकडुन घेतला जाईल. त्याची किंमतपण घेतली जाईल . टाऊन प्लॅनिंगचे पण नियम असतात की याला कसे द्यायचे आहे. त्यानुसार ते सगळ आधारीत होईल आणि आता त्याची जर किंमत वाढली तर तो घेईल की नाही घेईल हे मी नाही सांगु शकत.

**ॲड.शुचिता हाडा :-** म्हणुन मी सांगतेय आणि माझे हे मत आहे आणि सभागृहाला एक दिशा दाखवते आहे की , आपण आपली जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्था म्हणुन आपली एक जबाबदारी आहे की, लोअर आर्थिक वर्गाला फ्री शिक्षण देण्याची आता ही संस्था समजा या संस्थेला दिली आणि ही जागा मिळाली त्यांनी घेतली . तेही देणार आहेत का फ्री ऑफ कॉस्ट मुस्लिम मुलींना शिक्षण नाही देणार आहे का शिक्षण . ते संस्था त्यांच्याकडुन पैसा वसुल करणार आहे. मग आपणच का ही जबाबदारी घेत नाही. निम्न आर्थिक स्तराला फ्री शिक्षण देण स्थानिक स्वराज्य संस्था म्हणुन आपली जबाबदारी आहे. ईन्फ्रास्ट्रक्चर आपले आहे. आपल ईन्फ्रास्ट्रक्चर आपण वापरायला हवं. एवढच माझ म्हणण आहे. ईतका जर याच्यामुळे डिस्पुट होत असेल तर हा विषय तहकुब करण्यात यावा. रद्द करण्यापेक्षा तहकुब करावा . पुढच्या महासभेमध्ये निर्णय घेवु.

**श्री.कैलास सोनवणे:-** तहकुब तहकुब

**श्री.दिलीप पोकळे :-** प्राथमिक या विषयाचे (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.) आणि जर उत्पन्नाच जर साधन निर्माण होत असेल तर हा विषय आपल्याला हा विषय मंजुर करण्यास काही हरकत नाही

(सभागृहातील निर्माण झालेल्या गोंधळामुळेव आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही पुढच्या याच्याकरीता सगळी माहिती घ्या आणि मग पुढच्या महासभेत विषय मंजुर करू.

(सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.उपमहापौर:-** या विषयावर महापौरांना बोलायच आहे. एक मिनिटं फक्त महापौर बोलताहेत.

**मा.महापौर :-** जी शाळा आहे आणि जी शैक्षणिक संस्था आहे त्या संस्थेला भाड्याने घ्यायचे आहे आणि जर आपण मनपाने तरी ठरवल की डेव्हलपमेंट करायच आहे . तरी असे की तेथे मुस्लिम वस्ती असल्यामुळे ही ऊर्दु शाळा आहे आणि आपल्या ज्या ऊर्दु शाळा आहेत त्या चांगल्या स्तरावर सुरू आहेत.तरी त्यामुळे आपण येथे मराठी मिडीयम चे इंग्लिश मिडीयम जरी काढायच ठरवले तरी ते या ठिकाणी सक्सेस होणार नाही. परंतू

(सभागृहातील निर्माण झालेल्या गोंधळामुळे व आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.महापौर :-** नाही सेमि इंग्लिश आणि इंग्लिश जस

**श्री.सचिन पाटील:-** नाही ऊर्दु जी आहे ना तिथे ऊर्दुची इंग्लिश सुरू करा.

(सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.महापौर :-** नाही आपण हा स्पॉट जर पाहीला तर हा मुस्लिम वस्तीतील आहे त्यामुळे आपण ईथे ऊर्दु शाळा सुरू करावी.

**श्री.सचिन पाटील:-** ताई मग आपण त्या ठिकाणी

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही ताई आजचा हा विषय तहकुब सचिन सर जे सांगताहेत. विषय रद्द आहे का

(सभागृहातील निर्माण झालेल्या प्रचंड गोंधळ व आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई ऊर्दु शाळा जी आहे ना आपली ती ऊर्दु शाळेला (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.महापौर :-** पण शिक्षण मंडळाला माझ एक सांगण आहे. की खरच महापालिकेची एक इंग्लिश मिडीयम किंवा सेमि मिडीयमची शाळा आपण डेव्हलपमेंट करणे हे गरजेचे आहे. त्याच्या साठी ही शाळा जरी आपल्याला स्पॉट म्हणुन योग्य नसणार तरी जळगांव शहरातील अशी एखादी शाळा शोधावी आणि त्याठिकाणी या अनुषंगाने त्याठिकाणी आपण कार्यवाही करावी. ही शाळा या संस्थेला देण्यास माझ्या मते काही हरकत नाही. कुणाचे काही ऑब्जेक्शन असेल तर आपण सांगु शकता.

**श्री.सचिन पाटील:-** महापौर ताई आप्पांनी तहकुब करायचे सांगतीले ना.

**श्री.कैलास सोनवणे :-** काय लावल आहे यार केव्हांच (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.) तो विषय मी आणलेला आहे. म्हणजे किती वेळ लावणार आहे.

**मा.उपमहापौर :-** सचिनसर

(सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.अनंत जोशी :-** सचिनभाऊ मला एक गोष्ट सांगा (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.सचिन पाटील:-** काय हा विषय तहकुब

**श्री.कैलास सोनवणे :-** मी आत्ता पण तेच बोललो त्यांना दोन तिन घंटे बोला

**श्री.सचिन पाटील:-** केव्हाही बोला आप्पा

**श्री.अनंत जोशी :-** भाऊ ,भाऊ ४५ नंबर आहे ना पोलीस लाईनची

(सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.अनंत जोशी :-** ४५ नंबर सबजेलच्या मागे , (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.) मला वाटत प्रदिपभाऊ महापौर होते की नितीनभाऊ महापौर असतांना तिचा लिलाव केला होता.

**श्री.सचिन पाटील:-** नाही ती शाळा चालु आहे म्हणुन माझ्या (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.अनंत जोशी :-** मी साक्षीदार आहे ना भाऊ

**श्री.सचिन पाटील:-** नाही साक्षीदार चा विषय नाही भाऊ मी काय म्हणतोय

(सभागृहातील निर्माण झालेल्या गोंधळामुळे व आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.विशाल त्रिपाठी :-** जाऊ द्या भाऊ

**श्री.अनंत जोशी :-** (सभागृहातील निर्माण झालेल्या गोंधळामुळे आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.) अस का करायच.

**श्री.सचिन पाटील:-** मी काय म्हणतोय बंटीभाऊ

**श्री.सुनिल महाजन :-** (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.अनंत जोशी :-** एकतर एवढ बोलाव लागतय आम्हाला

**श्री.सचिन पाटील:-** हो एकतर हो म्हणा एकतर नाही म्हणा एवढच म्हणतोय मी तुम्ही बोलायचे असेल तर काही तरी बोला.

(सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर साहेब , ताई माझ्या मते तुम्ही मुख्याधिपिका आहेत बरोबर आहे ना.

**मा.महापौर :-** हो

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो बरोबर आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** आणि महापौर व मुख्याधिपिकेच्या मिटींगमध्ये एखादा शिक्षक अशाप्रकारे गोंधळ घालत असेल तर त्यांची मेडीकल चाचणी व्हायला पाहीजे.

**श्री.सचिन पाटील :-** आप्पा , आप्पा तस नाही

**श्री.कैलास सोनवणे :-** यांची मेडीकल व्हायला पाहीजे.

**मा.उपमहापौर :-** आप्पा सकाळी चालु होता हा विषय सगळयांना लागू आहे हा विषय

**श्री.कैलास सोनवणे :-** हो ना सगळयांना लागु आहे. लक्षण त्यांचे आहे.

**श्री.नितीन लढ्ढा:-** निर्णय घ्या.
**मा.उपमहापौर :-** एकच निर्णय घ्या सर्वांनी मिळुन काहीतरी
**श्री.कैलास सोनवणे :-** पुढच्या मिटींग मध्ये बोलु

(सभागृहातील निर्माण झालेल्या गोंधळा मुळे व आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.सचिन पाटील :-** आप्पा आप्पा ऐकून तर घ्या विषय

(सभागृहातील निर्माण झालेल्या गोंधळा मुळे व आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** पुढच्या मिटींगमध्ये बोलु .चला घ्या पुढचा विषय , मी काय म्हणतोय महापौर साहेब हा विषय तहकुब करा. पुढचे विषय मंजुर करू. कोणाला बोलायचे असेल तर बोला.हा विषय पुढच्या मिटींग मध्ये घेऊ काय आहे त्याच्यात

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे हा विषय तहकुब करून पुढच्या मिटींगमध्ये घेवु.
**मा.महापौर :-** विषय क्रं. ३ हा सर्वानुमते तहकुब करण्यात येत आहे.
**श्री.कैलास सोनवणे :-** विषय क्रं. ०२ ते १० मंजुर आहेत ताई सगळे ईस्टिमेट आहेत ते
**ॲड. शुचिता हाडा :-** सदर विषय तहकुब करण्यात यावा.
**श्री.कैलास सोनवणे :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६९४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, म.न.पा.शाळा क्रमांक १८ ही पात्र शैक्षणिक संस्थेस लिलाव प्रक्रियेव्दारे भाडे कराराने देणेबाबत प्रशासनाकडुन आलेला प्रस्ताव तहकूब करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह**
**अनुमोदक :- सोनवणे कैलास नारायण**

**नगरसचिव ,जादा विषय क्रं.४ :-** शहरातील विविध प्रभागात जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत किंवा शासनाच्या वेळोवेळी प्राप्त निधीमधून संपुर्ण शहरासाठी १२.५० मिटर उंचीचे हायमस्ट व ९ मीटर उंचीचे मिनी हायमस्ट लॅम्प लावणे कामी येणाऱ्या अंदाजित खर्च रक्कम रु.१.५५ कोटी मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत मा.महापौर,सौ.जयश्री सुनिल महाजन यांचेकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.
**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६९५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहराची आजची स्थिती पाहता विविध प्रभागात जेथे नविन कॉलनी झालेली आहे. तसेच जुन्याही काही भागात लाईट व्यवस्था तुटपुंज्या स्वरुपात असल्याने शहरातील विविध प्रभागात जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत किंवा शासनाच्या वेळोवेळी प्राप्त निधीमधून संपुर्ण शहरासाठी १२.५० मिटर उंचीचे हायमस्ट व ९ मीटर उंचीचे मिनी हायमस्ट लॅम्प लावणे कामी येणाऱ्या अंदाजित खर्च रक्कम रु.१.५५ कोटी मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

जिल्हा वार्षीक योजना अंतर्गत या आर्थिक वर्षात निधी मिळण्याची शक्यता कमी असल्याने सन्मा.सदस्यांचा पत्रांचा विचार करता जी कामे जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सन २०२१-२२ असे नमूद केलेली आहेत असे सर्व प्रस्तावीत कामे सन २०२१-२२ ऐवजी सन २०२२-२३ मध्ये सदरील प्रस्ताव प्रशासनाने प्रस्तावित करुन निधी संदर्भात पाठविण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव ,जादा विषय क्रं.५ :-** प्रभाग क्र.१ मधील विविध १ ते ३ विकास कामांना दलितेत्तर निधी, नगरोत्थान किंवा इतर उपलब्ध निधी अंतर्गत करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.२.९० कोटी मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.दिलीप बबनराव पोकळे यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६९६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्र.१ मधील खालील नमूद विविध १ ते ३ विकास कामांना दलितेत्तर निधी, नगरोत्थान किंवा इतर उपलब्ध निधी अंतर्गत करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.२.९० कोटी मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | त्रिभुवन कॉलनी मधील रस्ते डांबरी करण करणे व कॉक्रीट गटारी करणे. | रु.९० लक्ष |
| २ | के.सी.पार्क मधील रस्ते डांबरीकरण करणे व कॉक्रीट गटारी करणे | रु.०१ कोटी |
| ३ | सिटी कॉलनी मधील रस्ते डांबरीकरण करणे कॉक्रीट गटारी करणे. | रु.०१ कोटी |
| | एकुण रक्कम - | रु.०२.९० कोटी |

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव ,जादा विषय क्रं.६ :-** प्र.क्र.१९ मध्ये मेहरुण अंतर्गत विविध १ ते २ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.२ कोटी मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.विक्रम किसन सोनवणे यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६९७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्र.क्र.१९ मध्ये मेहरुण अंतर्गत खालील नमूद विविध १ ते २ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.२ कोटी मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **कामाचे नांव** | **अंदाजित रक्कम** |
|---|---|---|
| १ | प्र.क्र.१९ मध्ये मेहरुण अंतर्गत सुप्रिम कॉलनी मध्ये औरंगाबाद हायवे ते ईदगाह रोड खडिकरण व डांबरीकरण करणे. | रु.०१ कोटी |
| २ | प्र.क्र.१९ मध्ये मेहरुण अंतर्गत सुप्रिम कॉलनी मध्ये गाडगेबाबा रिक्षा स्टॉप ते प्रेमाबाई शाळा पर्यंत खडिकरण व डांबरीकरण करणे. | रु.०१ कोटी |
| | एकुण रक्कम - | रु.०२ कोटी |

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव ,जादा विषय क्रं.७ :-** प्र.क्र.५ व ६ मध्ये जिल्हा वार्षीक योजने अंतर्गत विविध १ ते ३ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु. ७५,२०,७६०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या,सौ.राखी शामकांत सोनवणे यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६९८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्र.क्र.५ व ६ मधील नागरीकांना विविध सोईसुविधा पुरविणे तसेच रहदारी व वाहतूकीच्या सेवा पुरविणे कामी नागरीकांकडून सतत मागणी होत असल्याने प्र.क्र.५ व ६ मध्ये जिल्हा वार्षीक योजने अंतर्गत विविध १ ते ३ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु. ७५,२०,७६०/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्र.क्र.५ व ६ अंतर्गत शाहूनगर येथिल श्री.मनोज भोई ते श्री.धर्मा कदम यांचे घरापर्यंत आर.सी.सी.गटार व रोड क्रॉसिंगला स्लॅब कल्व्हेट बांधणे. | रु.१५,६९,१४६/- |
| २ | प्र.क्र.५ व ६ अंतर्गत शाहूनगर येथिल श्री.मनोज भोई ते श्री.धर्मा कदम यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. | रु.९,७९,३६१/- |
| ३ | प्र.क्र.५ अंतर्गत नवीपेठ मधील महानगरपालिका जवळील व.वा.मार्केट मागील फायर ऑफीस ते खाऊ गल्लीपर्यंतचा रस्ता काँक्रीटीकरण करणे. | रु.४९,७२,२५३/- |
| | एकुण रक्कम - | ७५,२०,७६०/- |

जिल्हा वार्षीक योजना अंतर्गत या आर्थिक वर्षात निधी मिळण्याची शक्यता कमी असल्याने सन्मा.सदस्यांचा पत्रांचा विचार करता जी कामे जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सन २०२१-२२ असे नमूद केलेली आहेत असे सर्व प्रस्तावीत कामे सन २०२१-२२ ऐवजी सन २०२२-२३ मध्ये सदरील प्रस्ताव प्रशासनाने प्रस्तावित करुन निधी संदर्भात पाठविण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव ,जादा विषय क्रं.८ :-** दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्र.क्र.१३ मधील चैत्रबन कॉलनी मेहरुण स.नं.४४७/१/१ लेआऊट ओपनस्पेस लगत पुर्व व उत्तर बाजुस रोड साईडला संरक्षण भिंत बांधणे कामी येणारा एकूण रक्कम रु.१५,३६,५००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या,सौ.ज्योती बाळासाहेब चव्हाण यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ६९९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका प्रभाग क्र.१३ मधील चैत्रबन कॉलनी भागातील मेहरुण स.नं.४४७/१/१ लेआऊट ओपनस्पेस लगत पुर्व व उत्तर बाजुस रोड असुन सदरचे रस्ते ओपनस्पेस पेक्षा १० ते १२ फुट उंच आहे. सदरचे रस्त्यावरुन जाणारे नागरीक हे या खुल्या जागेतील खोल भागात पडुन अपघात संभवतो. सदरचा भाग हा पुर्ण विकसीत झालेला आहे. त्या ठिकाणी रोड साईड संरक्षक भिंत बांधणे आवश्यक आहे. सदरचा प्रभाग क्र.१३ हा अनुसुचित जाती अंतर्गत आरक्षीत असल्याने सदरचे काम दलीत वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रस्तावित करणेत आले असुन नागरीकांना विविध सोईसुविधा पुरविणेकामी व याबाबत परिसरातील नागरीकांकडून सतत मागणी होत असल्याने दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्र.क्र.१३ मधील चैत्रबन कॉलनी मेहरुण स.नं.४४७/१/१ लेआऊट ओपनस्पेस लगत पुर्व व उत्तर बाजुस रोड साईडला संरक्षण भिंत बांधणे कामी येणारा एकूण रक्कम रु.१५,३६,५००/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव ,जादा विषय क्रं.९ :-** प्र.क्र.१३ मधील संपुर्ण परिसरात ठिकठिकाणी आर.सी.सी.गटारी बांधणेचे काम महानगरपालिका निधीमधुन करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.०२ कोटी मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या,सौ.ज्योती बाळासाहेब चव्हाण यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ७०० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभागातील नागरीकांची सोईसुविधा पुरविणे कामी सतत मागणी होत असल्याने प्र.क्र.१३ मधील संपुर्ण परिसरात ठिकठिकाणी आर.सी.सी.गटारी बांधणेचे काम महानगरपालिका निधीमधुन तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनूसार सदर कामे वेळोवेळी उपलब्ध होणाऱ्या शासकीय निधी व म.न.पा.निधीमधुन करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.०२ कोटी मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव ,जादा विषय क्रं.१० :-** प्र.क्र.१६ मधील संपुर्ण परिसरात ठिकठिकाणी आर. सी. सी. गटारी तसेच स्लॅब कल्व्हेट बांधकाम करणेचे कामे महानगरपालिका निधीमधुन करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.०१ कोटी मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या,सौ.रेश्मा कुंदन काळे यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**मा.उपमहापौर :-** याच्यामध्ये बांधकाम विभागाच्या विषयांमध्ये एक पत्र आलेले आहे महापौरांना गट नं. ३०३ , ३०४ मंदिराला चेन्जींग फेन्सींग करणेसंदर्भात तो पण एक विषय या ठिकाणी मंजुर करावा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौर ताई मंजुर करण्यात यावा . मंजुर आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** ११ नंबर जो गटारींचा विषय आहे

**सौ.ज्योती चव्हाण :-** महापौरताई , आयुक्त साहेब मला एक विचारायचे आहे. आता तुम्ही याच्यामध्ये म्हणताहेत की वेळोवेळी प्राप्त निधी किंवा इतर शासकीय निधी मिळेल त्यातुन करू आणि महापौरताई मला एक सांगायच आहे की माझ्या वॉर्डमध्ये समता नगरमध्ये गेल्या दहा महिन्यापासुन एक काम केलेले आहे रस्त्याचे त्या कामाचे कार्यादेश दिले गेले आहे.पण ते काम अजुनही सुरू झालेले नाही . दहा महिने झाले त्याला कार्यादेश देवुन १० टक्के (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.) दिलेले आहे आणि मला वाटत १० टक्के सिमेंट कॉंक्रीटचा रस्ता आहे तो आपण तिथे उदघाटनाला पण आल्या होत्या . अजुनही ते काम सुरू झालेले नाही.वेळोवेळी मी फॉलोअप घेते पण मला त्याचे उत्तर मिळत नाही आणि हे काम सुरू का होत नाहीये. १० महिने झाले त्या गोष्टीला

**मा.महापौर :-** त्या ठिकाणी बहुतेक मी त्याची चौकशी केली होती. तर त्या ठिकाणी नळ कनेक्शन बाकी होते.

**सौ.ज्योती चव्हाण :-** बर पण आता दहा महिने झाले ना ताई

**मा.महापौर :-** अमृत योजनेचा विषय आहे ताई

**श्री.व्हि.ओ.सोनवणी, शहर अभियंता :-** अमृतचे काम बाकी आहे ताई अजुन म्हणुन ते काम बाकी आहे आणि पुढच्या महिन्यात सुरू करण्याचा प्रयत्न करू.

**मा.महापौर :-** आपण सुचना करा ठेकेरादास की लवकरात लवकर काम सुरू करावे.

**श्री.व्हि.ओ.सोनवणी, शहर अभियंता :-** हो

**मा.महापौर :-** कार्यादेश देवुन सुध्दा करत नसेल तर ब्लॅकलिस्ट मध्ये टाकावे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** ताई त्याला ब्लॅकलिस्टेड करा आणि नविन निविदा करा त्याच्या नाहीतर त्याच्या दुसरा जो असेल त्याने निविदा भरली असेल तर त्याला निविदा देण्यात यावी. तो जर कामच करत नाहीये. त्याची मानसिकता नाहीये की काय आहे. कळतच नाही १० महिने झाले ना एकतर रस्त्यांवर प्रचंड खड्डे आहेत जळगांव मध्ये

**मा.महापौर :-** याची सगळी शहानिशा करा आणि जर काम करत नसेल तर त्याला नोटीस द्या.

**सौ.ज्योती चव्हाण :-** महापौरताई जस आपण प्रभाग १२ मध्ये आपण काम रद्द केल तस यांचेपण काम रद्द करा. आणि नविन द्या . कारण आता आपण किती दिवस वाट बघायची कारण आता १० महिने झाले कार्यादेश दिलेले आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई

**मा.उपमहापौर :-** विषय क्रं. ४ ते ९

**श्री.कैलास सोनवणे :-** १० पर्यंत मंजुर ११ वा घ्या.

**मा.महापौर :-** विषय क्रं. ४ ते १० सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई

**मा.महापौर :-** बोला ताई

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई आता आपण हे सगळे विषय मंजुर करतोय . विरोध आमचा कोणत्याच विकास कामांना नाहीये. आयुक्त साहेबांना तिन चार वेळा भेटलो की मनपा फंड देता येईल की नाही तर ते म्हणाले की देता येणार नाही. ते खुप गरजेचे काम आहे. समता नगरमधुन नाला येतो आहे आणि तो नाला गटार मध्ये कन्व्हर्ट झाला आहे म्हणजे तो नाला छोटी गटार बनली आहे. ते पाणी दोन गल्ल्या फिरवुन पाणी जातय आणि काही घरामध्ये ते पाणी जात आहे. ती गटार जी आहे ते मला वाटत काहीतरी ६ ते ७ लाखापर्यंतचे एक काम आहे आणि दुसर परी शाळेचे , परी शाळेच्या तिथल एक अपार्टमेंट आहे. त्या परी शाळेचे पुर्ण पाणी खालच्या घरांमध्ये जात आहे. तर हे दोन काम माझे याच्यात समाविष्ट करण्यात यावे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.) म्हणजे हे किरकोळ का होतील . म्हणजे ओरड कमी होईल.

**श्री.कैलास सोनवणे :-** (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.) घ्या पुढील ११ वा विषय घ्या. जे आहेत ना त्यांना पाच पाच द्या आणि बाकीच्यांना पंचवीस पंचवीस द्या. त्यांना विस चा फरक मिळाला आहे त्यांना पाच द्या.

**मा.महापौर :-** विषय क्रं. ११ घेण्यात यावा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.
**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ७०१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभागातील नागरीकांची सोईसुविधा पुरविणे कामी सतत मागणी होत असल्याने प्र.क्र.१६ मधील संपुर्ण परिसरात ठिकठिकाणी आर. सी. सी. गटारी तसेच स्लॅब कल्व्हेट बांधकाम करणेचे कामे महानगरपालिका निधीमधुन करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.०१ कोटी मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव ,जादा विषय क्रं.११ :-** प्र.क्र.१५ मधील विविध ०२ ठिकाणी आर.सी.सी.गटार बांधणे व स्लॅब टाकणेचे काम मनपा फंडातुन करणे कामी मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.प्रशांत सुरेश नाईक यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.
**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.
**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ७०२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्र.१५ मध्ये १) रिलायन्स पेट्रोल पंप ते मलीक नगरच्या नाल्यापर्यंत रोड साईडला आर.सी.सी.गटार बांधणे व स्लॅब टाकणे. २) डिमार्ट ते फुकटपुरा सार्व.शौचालयापर्यंत आर.सी.सी.गटार बांधणे व स्लॅब टाकणे. सदर ठिकाणावरील अतिक्रमण काढण्यात आलेले असून त्याठिकाणी रस्त्याच्या मधोमध जुनी गटार असुन नविन आर.सी.सी.गटार रोड साईड गटार बांधुन स्लॅब टाकणे गरजेचे आहे कारण त्याठिकाणी नविन डांबरीकरण कामास जुनी गटारीमुळे अडथळा निर्माण होणार असल्याने उपरोक्त दोन्ही कामे महानगरपालिका फंडातून करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव ,जादा विषय क्रं.१२ :-** दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत किंवा जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत किंवा वेळोवेळी शासन स्तरावर जो निधी उपलब्ध होईल त्या योजने अंतर्गत प्र.क्र.०४ मध्ये विविध १ ते ३६ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.४००.१६ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.चेतन गणेश सनकत यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.
**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.
**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ७०३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत किंवा जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत किंवा वेळोवेळी शासन स्तरावर जो निधी उपलब्ध होईल त्या योजने अंतर्गत प्र.क्र.०४ मध्ये खालील नमूद विविध १ ते ३६ कामे करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.४००.१६ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.४ अंतर्गत श्री.राजेश गुप्ता यांचे घरापासुन ते श्री.तौसिफ शेख ते श्री.गोविंद मोरे यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. | रु.१२.४ लक्ष |
| २ | प्रभाग क्र.४ अंतर्गत श्री.गोविंद मोरे यांचे घरापासुन ते श्री.शंभु स्टेशनरी यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. | रु.१९.७० लक्ष |
| ३ | प्रभाग क्र.४ अंतर्गत श्री.शरीफ गवळी यांचे घरापासुन ते श्री.मधु महाजन यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. | रु.६.८५ लक्ष |
| ४ | प्रभाग क्र.४ अंतर्गत श्री.प्रदिप गुप्ता यांचे घरापासुन ते श्री.मधु महाजन यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. | रु.१०.४२ लक्ष |
| ५ | प्रभाग क्र.४ अंतर्गत श्री.मेहमुद पटेल यांचे घरापासुन ते श्री.श्रीराम यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. | रु.१०.१६ लक्ष |
| ६ | प्रभाग क्र.४ अंतर्गत श्री.अय्याज शेख यांचे घरापासुन ते श्री.डॉ.अजिज शेख यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. | रु.६.२५ लक्ष |
| ७ | प्रभाग क्र.४ अंतर्गत श्री.रफिक शेख यांचे घरापासुन ते श्री.प्रदिप मंडोरे यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. | रु.११.३७ लक्ष |
| ८ | प्रभाग क्र.४ अंतर्गत श्री.आरीफ शेख यांचे घरापासुन ते काटया फाईल मस्जिद पर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. | रु.८.९९ लक्ष |
| ९ | प्रभाग क्र.४ अंतर्गत श्री.कोतकर बिल्डींग पासुन ते श्री.करीम सालार यांचे नविन घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. | रु.७.१६ लक्ष |
| १० | प्रभाग क्र.४ अंतर्गत श्री.शरीफ शेख यांचे घरापासुन ते जय स्लोर्ट (साकीरे) पर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. | रु.७.९२ लक्ष |
| ११ | प्रभाग क्र.४ अंतर्गत श्री.राम आण्णा गवळी यांचे घरापासुन ते श्री.भुसारी वकील यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.९.९९ लक्ष |
| १२ | प्रभाग क्र.४ अंतर्गत श्री.भुसारी वकील यांचे घरापासुन ते खांबेटी व्यायामशाळे पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.३० लक्ष |
| १३ | प्रभाग क्र.४ अंतर्गत श्री.शफी पेंटर यांचे घरापासुन ते श्री.करीम सालार यांचे जुने घरा पर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. | रु.७.५६ लक्ष |
| १४ | प्रभाग क्र.४ अंतर्गत श्री.बशिर पटेल यांचे घरापासुन ते श्री.जमिल पेंटर यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१५.६० लक्ष |
| १५ | प्रभाग क्र.४ अंतर्गत श्री.नासिर दादा (ईब्राहीम) यांचे घरापासुन ते श्री.संजय गवळी यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१२ लक्ष |
| १६ | प्रभाग क्र.४ अंतर्गत नॅशनल जिम ते आहुजा किराणा पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१९ लक्ष |
| १७ | प्रभाग क्र.४ अंतर्गत डिलक्स ट्रान्सपोर्ट ते श्री.डॉ.पी.एन.पाटील यांचे दवाखान्या पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१५ लक्ष |
| १८ | प्रभाग क्र.४ अंतर्गत मिर्झा चौक पासुन ते नईम दादा यांचे घरापर्यंतचा रस्ता व स्व.हाजी गफ्फार मलिक यांचे घरा समोरिल रस्ता काँक्रीटीकरण करणे. | रु.७.८३ लक्ष |
| १९ | प्रभाग क्र.४ अंतर्गत फैज मेडीकल ते पिंजारी चौक ते विजय किराणा यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे. | रु.८.५० लक्ष |

| | | |
|---|---|---|
| २० | प्रभाग क्र.४ अंतर्गत एल्गार चौक ते कोईलाकी चौक पर्यंतचा रस्ता व श्री.हैदर भाई टि.व्ही वाले यांचे घरा समोरील रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | रु.७.८३ लक्ष |
| २१ | प्रभाग क्र.४ अंतर्गत श्री.सदु मिस्तरी यांची गल्ली व श्री.बाबु शेठ यांचे घरा समोरील रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | रु.६.०२ लक्ष |
| २२ | प्रभाग क्र.४ अंतर्गत गुरुनानक नगर मधील श्री.गंगाराम शिंदे यांचे घरा जवळील परीसरातील १० रस्ते कॉंक्रीटीकरण करणे. | रु.९.९९ लक्ष |
| २३ | प्रभाग क्र.४ अंतर्गत श्री.रमेश धवलपुरे यांचे घरापासुन ते श्री.कैलास जाधव, गोरु कसोटे श्यामलाल घेंगट यांचे घरा समोरील ते समाज मंगल कार्यालय बोरींग पर्यंतचा रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | रु.५.१५ लक्ष |
| २४ | प्रभाग क्र.४ अंतर्गत माणिक जावळे, अजय जावळे ते मनोज निधाने ते मंगा गोडाले ते राजु तांबोळी, ते सुरेश कलोसे, ते जयचंद भगत यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | रु.८.५० लक्ष |
| २५ | प्रभाग क्र.४ अंतर्गत श्री.आण्णा शिंदे ते मनोज जावळे, सुरेश जावळे ते सुभाश बेंडवाल यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | रु.८.१० लक्ष |
| २६ | प्रभाग क्र.४ अंतर्गत श्री.सुभाष बेंडवाल ते श्री.मधु गोयर श्री.जितेंद्र सुर्यवंशी ते विशाल सोनवाल विनोद बारसे ते मनोज जावळे यांचे घरा जवळील रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | रु.९.९९ लक्ष |
| २७ | प्रभाग क्र.४ अंतर्गत श्री.किशोर मोरे ते श्री.संजय सपकाळे शनिपेठ पोलीस स्टेशन गेट ते श्री.नरेश ढंढोरे यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | रु.९.९० लक्ष |
| २८ | प्रभाग क्र.४ अंतर्गत श्री.धिरज ढंढोरे ते मंगल कार्यालया जवळील बोअरींग तसेच सुभाष गाढे ते कैलास सोनवाल यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | रु.९.९९ लक्ष |
| २९ | प्रभाग क्र.४ अंतर्गत श्री.राजेश कसोटे यांचे घरा समोरील रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | रु.५.५० लक्ष |
| ३० | प्रभाग क्र.४ अंतर्गत म.न.पा.बालवाडी ते कन्हैया कुंज पर्यंतचा रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | रु.१३.०० लक्ष |
| ३१ | प्रभाग क्र.४ अंतर्गत विलास मेघे ते राजा सारवान, आकाश हंसकर, ते रामु राणवे यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | रु.९.९९ लक्ष |
| ३२ | प्रभाग क्र.४ अंतर्गत जयचंद भगत यांचे घरापासुन ते शनिपेठ पोलीस स्टेशन पर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | रु.१२.०० लक्ष |
| ३३ | प्रभाग क्र.४ अंतर्गत श्री.राजा सारवान यांचे घरापासुन ते रामदेव बाबा मंदीरा मागे पर्यंत (बापु अटवाल यांची गल्ली) रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | रु.८.०० लक्ष |
| ३४ | प्रभाग क्र.४ अंतर्गत श्री.सुभाष हंसकर यांचे घरा जवळील मंदीरापासुन ते श्री.चांगरे घराजवळील शौचालया पर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | रु.१३.०० लक्ष |
| ३५ | प्रभाग क्र.४ अंतर्गत नॅशनल जिम पासुन ते शनिपेठ पोलीस स्टेशन गेट पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | रु.१६.५० लक्ष |
| ३६ | प्रभाग क्र.४ अंतर्गत ममुराबाद रोड गुरुनानक नगर येथील लेंडी नाल्याला बाकी राहीलेल्या ठिकाणी सुरक्षा भिंत बांधणे. | रु.२०.०० लक्ष |
| | एकुण रक्कम - | रु.४००.१६ लक्ष |

जिल्हा वार्षीक योजना अंतर्गत या आर्थिक वर्षात निधी मिळण्याची शक्यता कमी असल्याने सन्मा.सदस्यांचा पत्रांचा विचार करता जी कामे जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सन २०२१-२२ असे नमूद केलेली आहेत असे सर्व प्रस्तावीत कामे सन २०२१-२२ ऐवजी सन २०२२-२३ मध्ये सदरील प्रस्ताव प्रशासनाने प्रस्तावित करुन निधी संदर्भात पाठविण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव ,जादा विषय क्रं.१३ :-** प्रभाग क्र.१३ मधील दगडी चाळ येथील ३३ kv ची विदयुत वाहिनी स्थलांतरीत करणेचे काम मनपा फंडातुन करणे कामी सन्मा.सदस्य,श्री.जितेंद्र भगवान मराठे यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** सदर विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सदर विषय सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ७०४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्र.१३ मधील दगडी चाळ येथील रहिवाशींच्या निवासस्थानाच्या गच्चीवरुन अती उच्च दाबाची ३३ kv ची विदयुत वाहिनी गेलेली असल्याने तेथील रहिवाश्यांच्या जिवितास धोका असुन भविष्यात जिवित व वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्या अनुषंगाने सदरची लाईन महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीच्या धोरणानुसार १.३% योजने अंतर्गत अंदाजपत्रक मागवून सदरची लाईन स्थलांतरीत करणेचे काम हाती घ्यावे. जेणे करुन तेथील नागरिकांच्या जिवितास धोका निर्माण होणार नाही. यास्तव प्रभाग क्र.१३ मधील दगडी चाळ येथील ३३ kv ची विदयुत वाहिनी स्थलांतरीत करणेचे काम मनपा फंडातुन करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव ,जादा विषय क्रं.१४ :-** जळगांव शहरातील संभाजीनगर चौक येथे नागरीकांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था ( प्याऊ ) स्वखर्चाने करण्यास परवानगी मिळणेबाबत तसेच “प्याऊ” ला कै.चारीत्र्यकुमार बेद (जैन) यांच्या स्मृतीपित्यर्थ असे नांव देणेस व जागा बांधकाम करणेस परवानगी मिळणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.जितेंद्र भगवान मराठे यांनी दिलेल्या पत्रावर विचार करुन निर्णय घेणे.

**मा.उपमहापौर :-** विषय क्रं. ११ , १२ , १३ आणि १४ ला माझे अनुमोदन आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** विषय क्रं. १४ पण मंजुर आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** विषय क्रं. १४ पण मंजुर

**मा.महापौर :-** विषय क्रं. ११ , १२ , १३ आणि १४ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई (सभागृहातील निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट आवाज ऐकु येत नाही.)

**मा.उपमहापौर :-** प्रशांतभाऊंचे म्हणणे थोडक्यात सांगु द्या सगळयांना

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ७०५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहरातील संभाजीनगर चौक येथील परिक्षीत चारीत्र्यकुमार जैन व तेथील नागरीकांनी नागरीकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था “प्याऊ” स्व खर्चाने करुन दयावयाची आहे. सदरचा “प्याऊ” ची दैनंदिन देखभाल व दुरुस्तीचा खर्च करण्यास तेथील नागरीक तयार असल्याने जळगांव शहरातील संभाजीनगर चौक येथील नागरीकांना नागरीकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था (प्याऊ) स्वखर्चाने करण्यास परवानगी देणेस तसेच “प्याऊ” ला कै.चारीत्र्यकुमार बेद (जैन) यांच्या स्मृतीपित्यर्थ असे नांव देणेस व जागा बांधकाम करणे कामी परवानगी देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव, जादा विषय क्रं .१५:-** नागरी दलितेत्तर वस्त्यात सुधारणा योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.१५ मेहरुण गावठाण अंतर्गत महादेव मंदिर ते श्यामा फायर कॉम्प्लेक्स पर्यंतचा तसेच महादेव मंदिर ते शिरसोली नाका पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे येणारा एकूण रक्कम रु.१,६९,०९,९८१/- मात्र चे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

(सभागहात सन्मा.सदस्यांनी सदर विषय मंजुर असल्याबाबत सांगीतले.)

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर , मंजुर आहे.

**मा.उपमहापौर :-** १५ , १६ , १७ अनुमोदन आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही १६ नंबर नाहीये , १६ नंबरच्या विषयाचे हे टेंडर रद्द करण्यात यावे.

(मा.महापौर , मा.उपमहापौर , मा.आयुक्त , नगरसचिव यांच्यात चर्चा सुरू झाली.)

**श्री.कैलास सोनवणे :-** अहो गोराणेसाहेब , आयुक्त साहेब

(मा.महापौर , मा.उपमहापौर , मा.आयुक्त , नगरसचिव हे चर्चा करीत असतांना त्यांच्यात काय चर्चा झाली ही सभागृहातील सन्मा.सदस्यांच्या आपआपसातील चर्चेमुळे सभागृहातील चर्चा व आवाज स्पष्ट ऐकु आला नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** ५ करोड रूपयांचा निव्वळ निधी आहे , पुर्णचा पुर्ण निधी आहे. तर माझ असं म्हणणे आहे की त्याच्यामध्ये २ करोड रूपयाचा आणखी त्याच्यामध्ये मनपा फंड टाका आणि प्रतिभा कापसे सांगतील ते १ कोटींचे काम आणि रंजना सपकाळे सांगतील त्यांचा एक प्रस्ताव आहे ते १ कोटींचे काम सुध्दा दलितवस्तीमध्ये घेवुन नव्याने निविदा अर्जंट काढा .

**श्री.दिलीप पोकळे :-** या ज्या निविदा आहे ना आप्पा

**श्री.कैलास सोनवणे :-** ते काम कॅन्सल नाही . ते काम कॅन्सल नाही .

**मा.उपमहापौर :-** नाही भाऊ हा विषय तसाच आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** आप्पा नविन टेंडर काढायचे आहे म्हणजे मनपा फंडातून काम करावयाचे.

**श्री.कैलास सोनवणे :-** मी सांगीतले ना.

**श्री.चेतन सनकत :-** आप्पा माझ्या वॉर्डातले पण घ्याना.

**श्री.दिलीप पोकळे :-** आप्पा तो निर्णय सभागृह घेईल.

**मा.उपमहापौर :-** नितीनभाऊ हा विषय मंजुरी साठी नाही फक्त माहितीस्तव आला आहे.याच्यावर निर्णय घ्यायचा सभागृहाचा संबंधच येत नाहीये.

**श्री.कैलास सोनवणे :-** सबके डालेंगे तो उपमहापौर के काम भी

**मा.उपमहापौर :-** आप्पा हा विषय कार्यादेश देण्यासंदर्भातील विषय आहे. हा विषय एक कोटी नाही दोन कोटी नाही पाच कोटी चे अनुदानाचे काम आहेत तर ते आता जे या वॉर्डात हे काम टाकलेले आहे . हे वॉर्ड वगळुन जे इतर

वॉर्ड असतील ते वॉर्डात टाका . दलितवस्तीचा निधी आहे आप्पा तो हा कामांचा विषय नाहीये कार्यादेशाच्या संदर्भातील आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आप्पा हे कस आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** झाल का सगळयांच बोलुन , हे काम रद्द करण्यात यावे. प्रतिभा कापसे यांच्या वॉर्डातील एक करोडच मनपा फंडाच काम आणि रंजनाताई सपकाळे यांचे एक कोटींचे असे दोन्ही दोन कोटींचे काम टाकावे आणि नव्याने निविदा काढण्यात यावी.

**मा.उपमहापौर :-** आप्पासाहेब याच्यामध्ये पहिले मनपामध्ये पैसे

**श्री.कैलास सोनवणे :-** हा मी येथे ठराव मांडतोय आता याच्यावर काही ऑग्रुमेंट करायचे नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आप्पा निविदा झालेली आहे. अश्या नव्याने निविदा करता येणार नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** करता येईल महासभेचा ठराव आहे हे टेंडर रद्द करावे. संपला विषय

**मा.उपमहापौर :-** निविदा झाली आहे. प्रशासनाने उत्तर द्याव की करता येईल की नाही .आप्पासाहेब करता येणार नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** राहु द्या , राहु द्या हा विषय येथे आलाय ना महासभेत , महासभेत आलाय ना

**श्री.नितीन लढ्ढा :-** आप्पासाहेब महासभेत आलाय परंतू स्टँडींगचा विषय आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** रद्द करायचा आहे आम्हाला सभेत आलाय ना विषय संपला विषय , अधिकार आहे ना आम्हाला ठराव करायचा.

**श्री. सुनिल महाजन :-** निविदा झाली आहे आप्पा त्याची

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो आप्पा

**श्री.कैलास सोनवणे :-** निविदा हो का काही हो ठराव करायचा अधिकार आहे.परत होणार नाही का निविदा सुनिलभाऊ

**श्री.सुनिल महाजन :-** आप्पा वेळ जातो ना

**श्री.कैलास सोनवणे :-** काही वेळ जाणार नाही , भाऊ मक्तेदार रेडी आहे . तुमच्या याच्या पहिले काम करून देईन तो

**मा.उपमहापौर :-** आप्पासाहेब हे पैसे १९-२० चे आहेत.

**श्री.कैलास सोनवणे :-** माहिती आहे.

**मा.उपमहापौर :-** हे पैसे आपल्याला डिसेंबर ३१ नंतर हे पैसे वापरता येणार नाही

**श्री.कैलास सोनवणे :-** उपमहापौर साहेब , सन्मा.उपमहापौर साहेब तुमच ऑग्रुमेंट आम्ही ऐकलेले आहे आम्ही असा ठराव करू.

**मा.उपमहापौर :-** बर याचे मतदान घेवुन टाका मग

**श्री.कैलास सोनवणे :-** मतदान घ्या , तुमची प्रचलित पध्दत आहे ती  तुमची कशी पध्दत आहे ते सांगा पहिले. पध्दत सांगा , सांगा पहिले

**मा.उपमहापौर :-** हे पहा आप्पा निविदा रद्द करता येतील का त्याच उत्तर प्रशासनाने द्याव.

**नगरसचिव :**- विषय क्रं. १५ जो आहे. विषय क्रं. १५ . .

**श्री.सुनिल महाजन :-** एक मिनिटं आयुक्त साहेब याच्यावर जी निविदा प्रक्रीया कंम्प्लीट झालेली आहे. आता काय करता येईल तुम्ही तुमची भुमिका स्पष्ट करा बर

**मा.उपमहापौर :-** कार्यादेश देण्यासंदर्भात माहितीस्तव आलेले आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही हो ५ करोड च टेंडर आहे सुनिलभाऊ

**श्री.सुनिल महाजन :-** आप्पा मान्य आहे ना.

**श्री.कैलास सोनवणे :-** माहीती आहे मला . धमक्या दिलेल्या आहे याच्यामध्ये सगळ्या

**नगरसचिव :**- सन्मा. सभागृह विषय क्रं. १५ जो आहे.

**श्री.सचिन पाटील :**- १६

**नगरसचिव :**- नाही १५ बद्दल ही दुरूस्ती आहे. सन्मा.सभागृह विषय क्रं. १५ जो आहे त्याच्यामध्ये विषय पत्रिकेमध्ये रक्कम रू.१,६९,०९,९८१/- मात्र खर्चाला मान्यता मिळणे असे म्हंटलेले आहे परंतू प्रत्यक्षात याच्यामधे त्यात जे दर आलेले आहेत  याच्यात दराला आणि संविदा करायला मान्यता मिळावी असा विषय आहे हा

(सभागृहात सन्मा.सदस्यांची चर्चा सुरू असतांना निर्माण झालेल्या आवाजामुळे चर्चा व आवाज स्पष्ट ऐकू आला नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** बिलोचे टेंडर आहे हे बिलो मध्ये येईल , महापालिकेचा फायदा आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** मंजुर करून टाकले आहे ते

**श्री.कैलास सोनवणे :-** महापालिकेचा फायदा आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ते पण मंजुर करून टाकले आहे आप्पा

**श्री.कैलास सोनवणे :-** ते नाही करत आम्ही ते तुम्हाला करावेच लागतील.कारण ते बिलोमध्ये आहे महापालिकेचे नुकसान आहे. ( व्हिडीओ चित्रिकरणामध्ये सदर आवाज आलेला नसल्याने सन्मा.सदस्यांची त्यामध्ये सांगीतलेली नांव ऐकु आले नाही.)आणि प्रतिभा कापसे यांच्या वॉर्डात १ करोड आणि सपकाळे ताईंच्या वॉर्डात १ करोड असे ३ करोडचा मनपा फंड आणि ५ करोड हे असे ८ करोडचे नविन टेंडर काढण्यात यावे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आप्पा काहो आप्पा

(सभागृहात सन्मा.सदस्यांची आपआपसात चर्चा सुरू असतांना निर्माण झालेल्या गोंधळामुळे सभागृहातील चर्चा व आवाज स्पष्ट ऐकु आला नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** अरे थांबा ना यार हे का काय विरासत आहे. नाहीतर टेंडर भरणारे कोणी येणार नाही.

**श्रीमती.सरिता नेरकर :-** आप्पा आमचे पण ५० लाख वाढवुन घ्या. (सभागृहात निर्माण झालेल्या आवाजामुळे सन्मा.सदस्या काय बोलल्या हे पुर्णपणे स्पष्ट ऐकु आले नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** ताई घुसवले नाही आपण त्याच्यामध्ये घुसवले नाही.

(सभागृहात सन्मा.सदस्यांमध्ये व व्यासपिठावर मा.महापौर, म.उपमहापौर , मा.आयुक्त व नगरसचिव हे आपसात चर्चा करीत होते.)

**श्रीमती.सरिता नेरकर :-** आप्पा सगळ्यांना सारखे द्याना.

**श्री.कैलास सोनवणे :-** ताई , साहेब याच्यात आता हे ५ करोड परत सांगतो त्या सपकाळे ताईंच्या वॉर्डामध्ये १ करोड , रेडी आहे आपले सगळे ईस्टिमेट , प्रतिभाताई कापसेंच्या वॉर्डात १ करोड एक नंबर वार्डात १ करोड आणि ५० लाख ४ नंबरच्या वॉर्डात चेतनच्या वॉर्डात साढेआठ करोडचे नविन  टेंडर लगेच ईमिजेट काढा . विलंब व्हायला नाही पाहीजे आणि लगेच सभा काढा महापौर साहेब लगेच या विषयासाठी अर्जंट झाल.

(सभागृहात सन्मा.सदस्यांची आपआपसात चर्चा सुरू असतांना निर्माण झालेल्या आवाजामुळे सभागृहातील चर्चा व आवाज स्पष्ट ऐकू येत नव्हता.)

**श्री.सदाशिव  ढेकळे :-** झाल ना.

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही पुढच्या याच्यात करू. चला झाल आता याच्यात कुठलेच वॉर्डाचे वाढवायचे नाहीये.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आप्पा

(सभागृहात सन्मा.सदस्यांची चर्चा सुरू असतांना निर्माण झालेल्या गोंधळामुळे सभागृहातील चर्चा व आवाज स्पष्ट ऐकु आला नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-**  अरे नवनाथ ला वाढवुन दिले तरी वाढवायला लावतो आहे.

**श्री.चेतन सनकत :-** आप्पा ५० लाखच काबर १ करोड पाहीजे होते.

**श्री.किशोर बाविस्कर :-** आप्पा (सभागृहात सन्मा.सदस्यांची आपआपसात चर्चा सुरू असतांना निर्माण झालेल्या गोंधळामुळे सभागृहातील चर्चा व आवाज स्पष्ट ऐकू आला नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** अरे ४ नंबर मध्ये दिले आहे . हे तिघांचे टेंडर काढा.

**श्री.सुनिल महाजन :-** आप्पा ते नगरसेवकांचे २५, २५ लाखांचे टेंडर काढा ना त्याच्यामध्ये

**श्री.कैलास सोनवणे :-** कोणते २५ लाख

**श्री.धिरज सोनवणे :-** २५ / २५ लाख देताहेत ना ते मनपा फंडाचे

**श्री.कैलास सोनवणे :-** महापालिकेकडे आहे का ते पहा पहिले.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आप्पा

(सभागृहात सन्मा.सदस्यांची आपआपसात चर्चा सुरू असतांना निर्माण झालेल्या गोंधळामुळे सभागृहातील चर्चा व आवाज स्पष्ट ऐकू आला नाही.)

(सन्मा सदस्य.श्री.प्रशांत नाईक हे व्यासपिठावर आले व मा.पिठासीन अधिकारी व मा.उपमहापौर व मा.आयुक्त सो यांचेशी त्यांनी चर्चा केली )

**श्री.कैलास सोनवणे :-** साहेब हे ५ कोटींचे आणि ते ५ कोटींचे असे दहाचे करा.

**मा.उपमहापौर :-** आप्पा मनपा फंडातुन आहे. मला वॉर्ड नं. सांगा

**श्री.कैलास सोनवणे :-** त्या चारही वॉर्डांचे  एक , एक करोड असे मनपा फंडातुन टाकुन याच्यामध्ये मुंकुंदा आणि चेतनचा एक वॉर्ड त्याच्यात आमचाही आला , किशोरभाऊ आणि आमचा एक वॉर्ड , पोकळे साहेबांचा वॉर्ड आणि नेरकर ताई , एक प्रतिभाताई कापसे आणि रंजना सपकाळे ताईंच्या वॉर्डात १ करोड असे ९ कोटींचे एकत्रित टेंडर काढायच क्लब करून

**श्री.नितीन लढ्ढा :-** आप्पा दलितवस्तीचे आहे ते.

**श्री.सुनिल महाजन :-** प्रशासनाला विचारा होवु शकत का.

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही नाही मला हे

**मा.उपमहापौर :-** प्रशासनाने आप्पा आता हा जो विषय आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** मला हे करतांना काही खुशी होत नाहीये कुलभुषणभाऊ ऐकुन घ्या.

**मा.उपमहापौर :-** नाही ना आप्पा

**श्री.कैलास सोनवणे :-** मनामध्ये एक स्थान असतं त्या भाजपा कार्यालयात तुम्ही तिथे लाथा मारून आलेले आहे.

**मा.उपमहापौर :-** आप्पा नाही नाही तो वेगळा विषय आहे. तो विषय सभागृहात नकोय

**श्री.कैलास सोनवणे :-** तर त्यामुळे हे आम्हाला आता कराव लागेल.

**मा.उपमहापौर :-** आप्पा नाही नाही राजकारणाचा विषय आहे. राजकारणाचा विषय हा या सभागृहाच्या बाहेर आणि सभा विकास कामांच्या संदर्भात विषय आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** विकास कामांचेच टाकले आहे ४ कोटी ते वाढविले आहे . चौफेर केले आहे.

**मा.उपमहापौर :-** आप्पा तुम्ही तुमचे मांडा

**श्री.कैलास सोनवणे :-** चौफेर केलेले आहे. चला मंजुर आहे का हा विषय

**मा.उपमहापौर :-** (सभागृहात सन्मा.सदस्यांची आपआपसात चर्चा सुरू असतांना निर्माण झालेल्या आवाजामुळे सभागृहातील चर्चा व आवाज स्पष्ट ऐकू येत नव्हता.) तुम्ही तुमचे मत मांडा ना आप्पा

**श्री.कैलास सोनवणे :-** हो चला मंजुर आहे हा विषय , पुढचा विषय पण मंजुर आहे आता सभा संपली असेल बहुतेक , ठिक आहे.

(सभागृहात सन्मा.सदस्यांची चर्चा सुरू असतांना निर्माण झालेल्या आवाजामुळे सभागृहातील चर्चा व आवाज स्पष्ट ऐकू येत नव्हता.)

(सभागृहात सर्व सन्मा.सदस्य आपआपसात चर्चा करायला लागले)

**नगरसचिव :-** सभागृहाला विनंती आहे की विषय वाचल्यानंतर त्याला सुचक अनुमोदक तर पाहीजेत ना १५ नंबरचा विषय वाचला त्याला सुचक कोण अनुमोदक कोण (सभागृहात सन्मा.सदस्यांची चर्चा सुरू असतांना निर्माण झालेल्या आवाजामुळे चर्चा व आवाज स्पष्ट ऐकू येत नव्हता.)

**श्री.कैलास सोनवणे :-** तुम्हाला पटेल ते घ्याना साहेब

**नगरसचिव :-** नाही नाही तस नसत

**श्री.कैलास सोनवणे :-** प्रशांत घ्या. सांगा भाऊ नांव सांगा

**श्री.सुनिल महाजन :-** नितीन भाऊंचे अनुमोदन आहे या विषयाला

**मा.महापौर :-** सुचक अनुमोदक घ्या . भाऊ

**मा.उपमहापौर :-** घ्या ना.

**मा.महापौर :-** १५ ला घ्या आधी

**श्री.कैलास सोनवणे :-** १६ नंबरला मुंकुदा आणि चेतन

**मा.महापौर :-** विषय क्रं. १५ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे. १६ नंबर घ्या.

(सभागृहात सर्व सन्मा.सदस्य चर्चा करायला लागले)

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ७०६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नागरी दलितेत्तर वस्त्यात सुधारणा योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.१५ मेहरुण गावठाण अंतर्गत महादेव मंदिर ते श्यामा फायर कॉम्प्लेक्स पर्यंतचा तसेच महादेव मंदिर ते शिरसोली नाका पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे कामास जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडील पत्र क्र.नप/नियोजन/आर.आर./६९७/२०२१ दि.१२/०५/२०२१ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त मनपा यांचे दि.२३/०५/२०२१ च्या मान्यते अन्वये उक्त कामाची ई-निविदा सुचना क्र.७९/११ सन २०२१-२२ http://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई-निविदा सुचना मनपा पत्र क्र.सा.बा./२४१ दि.१०/०६/२०२१ चे पत्रान्वये दै.सामना या वर्तमान पत्रात दि.११/०६/२०२१ रोजी प्रसिध्द केल्यानुसार दिलेल्या मुदतीत ०२ ई-निविदा सदर संकेस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ अन्वये प्रथम मागणीवेळी दोनच निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित आहे. त्यानुसार सदर कामाचे आलेल्या ई-निविदा कागदपत्रांची छाननी केली असता मक्तेदार यांनी सर्व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असून मक्तेदार यांनी दिलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | निविदा रक्कम रु.१४१८९४०४/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | शेलीनो बिल्डकॉन प्रा.लि. | निविदा रक्कमेवर ९% जास्तीचे दराने | १५४६६४५०/- |
| २ | सुशिलकुमार गणपत डोंगरे | निविदा रक्कमेइतकेचेच दराने | १४१८९४०४/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार सुशिलकुमार गणपत डोंगरे,जळगांव यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेइतकेचेच दर सर्वात कमी आलेले आहे. त्यानुसार सदर कामी रक्कम रु. १४१८९४०४/- मात्र इतका खर्च निविदा रक्कमेप्रमाणे आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेलया दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, टेस्टींग चार्जेस, व रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | निविदा प्रमाणे अपेक्षीत खर्च रक्कम | १४१८९४०४/- |
| ०२ | जि.एस.टी.१२% | १७०२७२८/- |
| ०३ | कामगार विमा ०.५०% | ७०९४७/- |
| ०४ | टेस्टींग चार्जेस | १०१००/- |
| ०५ | रॉयल्टी | ९३६८०२/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.:- | १६९०९९८१/- |

वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु१६९०९९८१/- मात्र आहे सदर रक्कमेपैकी रक्कम रु.१६९०९९८१/- मात्र नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गतच्या निधीतुन खर्च करावयाचा आहे. त्यानुसार नागरी दलितेत्तर वस्त्यात सुधारणा योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.१५ मेहरुण गावठाण अंतर्गत महादेव मंदिर ते श्यामा फायर कॉम्प्लेक्स पर्यंतचा तसेच महादेव मंदिर ते शिरसोली नाका पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे कामी मक्तेदार सुशिलकुमार गणपत डोंगरे जळगांव यांचे निविदा रक्कमेइतकेचेच कमीचे दर स्विकृत करणेस तसेच सदर दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- महाजन सुनिल सुपडू**

**श्री.कैलास सोनवणे :-** १६ नंबर सर्वानुमते येईल तो कारण तो मनपा निधी आहे. (सभागृहात सर्व सन्मा.सदस्य चर्चा करायला लागले परंतु चर्चेमुळे यामधील संभाषण ऐकु आले नाही.)

**श्री.नितीन लढ्ढा :-** आप्पा १६ नंबर

**श्री.कैलास सोनवणे :-** १६ नंबर सर्वानुमते आहे हो ना झाली ना चर्चा आता ऐवढी हो ना.

**मा.उपमहापौर :-** नाही माझी भुमिका तटस्थ आहे याच्यामध्ये

**नगरसचिव , विषय क्रं. १६ :-** नागरी दलितवस्ती सुधारणा योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.१० अंतर्गत डांबरी रोड, काँक्रींट रोड, पेवहींग ब्लॉक बसविणे, पुल व संरक्षण भिंत बांधणे तसेच आर.सी.सी गटार बांधणे कामी येणारा एकूण खर्च रक्कम रू.४,९९,८०,१२१/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करून निर्णय घेणे.

**मा.उपमहापौर :-** सदरील विषयामध्ये निधी जो प्राप्त झालेला आहे.हा सामाजिक न्याय विभागाकडुन प्राप्त झालेला आहे.सदरील विषयामध्ये कोणत्या सदस्याने काय भुमिका घेतली किंवा काय कोणत्या सदस्याने काय मत मांडल , परंतू सदरील विषयामध्ये माझं मत तटस्थ नोंदवांव आणि सदरील विषयाच्या विकास कामांमध्ये भविष्यामध्ये DSR रेट वाढल्यास या निधीचा विनियोग योग्य रितीने न झाल्यास सदरील निधीच्या बाबतीत या विषयाच्या विकासकामांना होणाऱ्या संदर्भात नुकसान हे त्या त्या सदस्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी.

**श्री.कैलास सोनवणे :-** आणि जो फायदा होईल तो त्या त्या सदस्यांना पाठवुन द्यायचा.

**मा.उपमहापौर :-** ओके आप्पा

**श्री.कैलास सोनवणे :-** बिलोमध्ये गेले तर , बिलोमध्ये गेल तर पाठवुन द्यायचे .

**श्री.सुनिल महाजन :-** आप्पा बहुमताने करा.

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही पाठवुन द्यायचा.

**श्री.सुनिल महाजन :-** आप्पा , कुलभुषणभाऊ बहुमताने करा.

**श्री.कैलास सोनवणे :-** म्हणजे उपमहापौरांचे असे म्हणणे आहे की शहराच्या विकास कामांना तटस्थ राहणार आहे.

**मा.उपमहापौर :-:-** बिलकुल बिलकुल

**श्री.कैलास सोनवणे :-** तुमचे असे म्हणणे आहे का तुम्ही पण तटस्थ राहणार आहे का ?

**मा.उपमहापौर :-:-** नाही तुम्ही विरोध करताहेत.

**मा.उपमहापौर :-** आप्पा तुम्ही विरोध करताहेत विकास कामांना मी करत नाहीये पण तुम्ही विरोध करताहेत. ठिक आहे माझा तर विरोध नाहीये.

**श्री.कैलास सोनवणे :-** विरोध नाही करत आहे. मी ४ कोटींचे एक्स्ट्रा काम टाकले त्याच्यामध्ये तुमची पाहाण्याची भुमिका वेगळी आहे मी काय करू त्याला.

**मा.उपमहापौर :-** आप्पासाहेब ठिक आहे ना, तुम्ही तुमचे मत मांडताहेत संबंधित विषयात नुकसान झाल्यास

**श्री.कैलास सोनवणे :-** विरोध नाही करत आहे. मी ४ कोटींचे काम टाकले मी विरोध केला का पोकळे ?

**मा.उपमहापौर :-** आप्पासाहेब संबंधित विषयामध्ये नुकसान झाल्यास

**श्री.कैलास सोनवणे :-** विरोध केला का मी या विषयाला

**मा.उपमहापौर :-** याच्यामध्ये सर्वानुमते किवा बहुमताने

**श्री.कैलास सोनवणे :-** चला ठिक आहे संपवा विषय

**मा.उपमहापौर :-** याच्यामध्ये भविष्यामध्ये लेखापरिक्षणात काही आक्षेप नोंदविल्यास सदरील विषयाची त्या सदस्यांवर ती जबाबदारी राहील ती निश्चित करण्यात यावी.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो हो

**श्री.सुनिल महाजन :-** अहो आप्पा बहुमताने करा ना.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो ठिक आहे ना काय आहे तुमचा विषय चालता आहे का

**श्री.चेतन सनकत :-** आप्पा बहुमताने करून घ्या.

**मा.उपमहापौर :-** काय ?

**श्री.चेतन सनकत :-** बहुमताने मंजुर करा.

**श्री.कैलास सोनवणे :-** तुमचे मत मांडा .

**मा.उपमहापौर :-** हो ठिक आहे ना घ्या.

**श्री.कैलास सोनवणे :-** तुमचे मत द्या याच्यात . तुमचं मत कोणाकडुन आहे याच्यात
**श्रीमती.सरिता नेरकर :-** महापौरांकडे आहे आमचे मत
**श्री.कैलास सोनवणे :-** काय
**श्रीमती.सरिता नेरकर :-** महापौर
**श्री.चेतन सनकत :-** महापौरांकडे आहे आमचं मत
**श्री.कैलास सोनवणे :-** ठिक आहे.
**सौ.ज्योती चव्हाण :-** आमचं मत नोंदवुन घ्या.
**श्री.कैलास सोनवणे :-** ताई ताई थांबा दोन मिनिंट मी तुम्हाला विचारत नाहीये.
**सौ.ज्योती चव्हाण :-** आमचं मत नोंदवुन घ्या.
**श्री.कैलास सोनवणे :-** ताई , ताई
**सौ.ज्योती चव्हाण :-** आमचं मत उपमहापौरांकडुन आहे.
**श्री.कैलास सोनवणे :-** ताई ठिक आहे , या ठिकाणी नेरकर ताई , चेतन आणि पोकळे साहेब यांना विचारायचे आहे. तुमच्या वॉर्डात निधी आलेला आहे. तुम्हाला विरोध करायचा आहे का याला ?
**श्री.दिलीप पोकळे :-** आप्पा याच्यात एक विनंती अशी आहे की , बहुमताने करा
**श्री.सुनिल महाजन :-** आप्पा बहुमताने मंजुर करा.
**श्री.कैलास सोनवणे :-** ठिक आहे ना बहुमताने मंजुर करा.
**मा.उपमहापौर :-** ठिक आहे या विषयासंदर्भात मतदान घेण्यात यावे.
**श्री.सुनिल महाजन :-** नाही नाही बहुमताने मंजुर करा.
**श्री.दिलीप पोकळे :-** तस नसत आप्पासाहेब हे बेकायदेशीर आहे. तुम्ही असे एक , दोन तिन असे विचारता आहे जर मतदान करायचे असेल तर तसे प्रत्येकाला विचारा सभागृहाला.
**श्री.कैलास सोनवणे :-** तुमच्या वॉर्डामध्ये काम टाकले म्हणुन विचारलेले आहे.
**श्री.सुनिल महाजन :-** नाही बहुमताने करा.
**श्री.दिलीप पोकळे :-** नाही मान्य आहे आम्हाला पण विचारायला पाहीजे ना.
**श्री.सुनिल महाजन :-** सोडा तो विषय ठिक आहे बहुमताने करा. तो विषय बहुमताने त्यांच्या सोईनुसार करून घ्या.
(मा.महापौर , मा.उपमहापौर , मा.आयुक्त , सन्मा.सदस्य . श्री.नितीन लढ्ढा व विरोधी पक्षनेते श्री. सुनिल महाजन हे व्यासपिठावर चर्चा करीत होते. तसेच संपुर्ण सभागृहात सन्मा सदस्य आपआपसात चर्चा करीत होते . त्यामुळे निर्माण झालेल्या प्रचंड आवाजामुळे चर्चा व आवाज स्पष्ट ऐकू आला नाही.)
**श्री.सुनिल महाजन :-** बहुमताने मंजुर करा.
(मा.महापौर , मा.उपमहापौर , मा.आयुक्त , सन्मा.सदस्य . श्री.नितीन लढ्ढा व विरोधी पक्षनेते श्री. सुनिल महाजन हे व्यासपिठावर चर्चा करीत होते. तसेच संपुर्ण सभागृहात सन्मा सदस्य आपआपसात चर्चा करीत होते . त्यामुळे निर्माण झालेल्या प्रचंड आवाजामुळे चर्चा व आवाज स्पष्ट ऐकू आला नाही.)
**श्री.कैलास सोनवणे :-** काहो नितीनभाऊ मतदान घ्यायचे आहे का ,
**श्री.नितीन लढ्ढा :-** हो
(यावेळी नगरसचिव कार्यालयातील गणक मतदान प्रक्रीये करीता लागणारे गणनापत्रक घेवुन व्यासपिठावर आले व नगरसचिव यांचेशी चर्चा करू लागले.)
**श्री.कैलास सोनवणे :-** घ्या लवकर मतदान घ्या ना, घ्याना मतदान घ्या, गोराणे साहेब पध्दत काय आहे तुमची मतदान घेण्याची,
**नगरसचिव :-** हो
**श्री.कैलास सोनवणे :-** काहो गोराणेसाहेब प्रत्येक टाईमाला ठराव कसा करता तुम्ही , ठरावाचे मतदान कसे टाकता तुम्ही प्रत्येक वेळेस.
**श्री.सुनिल महाजन :-** आप्पा बहुमताने सांगीतले आहे ना
(सभागृहात निर्माण झालेल्या प्रचंड आवाजामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकू येत नव्हती.)

**श्री.कैलास सोनवणे :-** झाल ना सांगीतले ना त्यांना

**श्री.सुनिल महाजन :-** आप्पा क्लॉज पाहता आहेत ते

**श्री.कैलास सोनवणे :-** क्लॉज नाही पाहता आहेत ते , (सभागृहात सदस्यांची आपआपसात चर्चा सुरु होती. त्या चर्चेच्या आवाजामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकू आली नाही.) बिजेपीचे आहे, ११ मतदान शिवसेनेचे आहे, ३ मतदान एमआयएम चे आहे आणि १६ मतदान उर्वरीतांचे आहे असे ३० व्हर्सेस ३६ आहे.

(सभागृहात सदस्यांची आपआपसात चर्चा सुरु होती. त्या चर्चेच्या आवाजामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकू आली नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** हो , अजुन दोन चार ईकडे येण्याची शक्यता आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ३६ आहे ते घेवुन टाका ना आप्पा

**श्री.कैलास सोनवणे :-** सांगीतले ना मी त्यांना

(सभागृहात सदस्यांची आपआपसात चर्चा सुरु होती. त्या चर्चेच्या आवाजामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकू आली नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** काय लावले आहे.

**नगरसचिव :-** पिठासीन अधिकारी यांनी थांबायला सांगीतले आहे , आप्पा पिठासीन अधिकारी यांनी थांबायला सांगीतले आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** काय आहे ताई , काय आहे हे

**श्री.जितेंद्र मराठे :-** करा ना वो साहेब लवकर

**श्री.विशाल त्रिपाठी :-** काय आहे हे ?

**श्री.जितेंद्र मराठे :-** एवढा वेळ काय लावता आहे. मतदान झाले ना ही कसली पध्दत आहे.सुचक आणि अनुमोदक घ्या आणि करा.

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही ना सांगीतले मी मुंकुद आणि चेतन

**श्री.मुकुंदा सोनवणे :-** सुरेशभाऊचे घ्या.

**श्री.कैलास सोनवणे :-** मुंकुद आणि सुरेशभाऊ दिलेले आहे आम्ही

**मा.उपमहापौर :-** नाही ह्या विषयावर मतदान घेवु ना आपण

(सभागृहात निर्माण झालेल्या आवाजामुळे सन्मा.सदस्यांमध्ये सुरू असलेल्या चर्चेमुळे स्पष्ट चर्चा व आवाज ऐकू आला नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही गोराणे साहेब तुमची नेहमीची पध्दत काय आहे ती सांगा पहिले मला

**मा.उपमहापौर :-** आप्पासाहेब

**नगरसचिव :-** एक मिनिंट , नाही नाही आप्पा तसे नाहीये आता जे प्रेझेंट आहेत , त्याचे वोटींग घ्यावे लागेल.

**श्री.कैलास सोनवणे :-** का बरं ? अस कोणत्या नियमानुसार करता आहे तुम्ही

**मा.महापौर :-** नाही त्यानुसार घ्यावे लागेल.

**नगरसचिव :-** नाही नाही प्रेझेंट चे वोटींग घ्यावे लागेल ना

**श्री.कैलास सोनवणे :-** चला घ्या.

**नगरसचिव :-** चला घ्या ताई

**श्री.कैलास सोनवणे :-** चला घ्या पटापट घ्या.

(सभागृहात निर्माण झालेल्या गोंधळाच्या आवाजामुळे सन्मा.सदस्यांमध्ये सुरू असलेल्या चर्चेमुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकू आली नाही.)

**मा.महापौर :-** यावर मतदान घेण्यात यावे , या विषयावर मतदान घेण्यात यावे.

**नगरसचिव :-** ठरावाच्या बाजुने , विषय क्रं. १६ मा.महापौर यांचे निर्देशानुसार सन्मा.सदस्य. श्री.कैलास सोनवणे यांनी मांडलेल्या प्रस्तावाच्या बाजुने मतदान घेण्यात येत आहे तरी या प्रस्तावाच्या बाजुने ज्यांचे मतदान आहे त्यांनी हात वर करायचे आहे.

(सभागृहात सदर प्रस्तावाच्या बाजुने असलेल्या सन्मा.सदस्यांनी हात वर केले. यावेळी नगरसचिव कार्यालयातील गणक श्री.प्रकाश सोनवणे यांनी गणनापत्रक मतदान नोंदविण्यासाठी तयार केले. त्याच वेळी सभागृहातील सन्मा.सदस्यांमध्ये सुरू असलेल्या चर्चेमुळे व आवाजामुळे चर्चा व आवाज स्पष्ट ऐकू आला नाही.)

**नगरसचिव :-** आप्पासाहेब प्रशासनाचा जो प्रस्ताव आहे ,प्रशासकीय प्रस्ताव आहे. तुमची सुचना काय आहे ती मांडा ना सभागृहामध्ये कारण

**श्री.कैलास सोनवणे :-** १० वेळा मांडु का ?

**नगरसचिव :-** नाही नाही आता वोटींग घेतांना प्रशासनाच्या प्रस्तावावर सुचना मांडावी लागते. प्रशासनाचा प्रस्ताव जो आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** मांडलेली आहे , हे रद्द करून साडेनऊ कोटींचे टेंडर करावे.

**नगरसचिव :-** हा

**श्री.कैलास सोनवणे :-** हे टेंडर रद्द करून साडे नऊ कोटींचे टेंडर काढावे. ज्या ज्या नगरसेवकाचे मी नांव सांगीतलेले आहे , पैसे सांगीतलेले आहे. त्याप्रमाणे ह्या लोकांनी त्यासाठी मतदान केले. आता या विरोधात करायचे असेल कोणाला त्यांनी करायचे आहे मतदान

**नगरसचिव :-** प्रशासनाचा प्रस्ताव आहे .

**श्री.कैलास सोनवणे :-** याच्या विरोधात करायचे आहे मतदान.

**नगरसचिव विषय क्रं.१६ :-** नागरी दलितवस्ती सुधारणा योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.१० अंतर्गत डांबरी रोड, कॉक्रींट रोड,पेव्हींग ब्लॉक बसविणे , पुल व संरक्षण भिंत बांधणे तसेच आर.सी.सी. गटार बांधणे कामी येणारा एकूण खर्च रक्कम रू.४,९९,८०,१२१/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडून आलेल्या प्रस्तावावर विचार करून निर्णय घेणे. आता याच्यावर .. .

**श्री.कैलास सोनवणे :-** हा प्रस्ताव आम्ही रद्द करतोय. या बाबत आम्ही याचा विरोध करतोय आम्ही सुधारीत प्रस्ताव मांडला आहे येथे त्याच्या बाजुने आम्ही मतदान करतोय.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** केले.

**श्री.कैलास सोनवणे :-** केले आहे. केलेय मतदान आम्ही

(सभागृहात सदस्यांची आपआपसात चर्चा सुरु होती. त्या चर्चेच्या आवाजामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकू आली नाही.)

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मोजुन घ्या.

**नगरसचिव :-** आदरणिय कैलास आप्पा सोनवणे यांनी जी सुचना मांडलेली आहे. त्याला कोणत्या सदस्यांच समर्थन आहे किंवा त्यांच्या ठरावाला पाठींबा आहे त्यांनी हात वर करायचे आहेत.

(सभागृहात सन्मा.सदस्य श्री.कैलास आप्पा सोनवणे यांनी मांडलेल्या सुचनेच्या बाजुने असलेल्या सदस्यांनी हात वर केले . तदनंतर नगरसचिव कार्यालयातील गणक श्री.प्रकाश सोनवणे यांनी सन्मा.सदस्यांची ओळख करून देणेसाठी श्री. अर्जुन चौधरी शिपाई कर्मचारी यांचे मदतीने ओळख करून मतदानाच्या गणनापत्रकावर ज्या सदस्यांचे हात वर होते त्यांचे नावासमोर पेनाने गणनापत्रकात खुणा केल्या.)

(सभागृहात सदस्यांची आपआपसात चर्चा सुरु होती. त्या चर्चेच्या आवाजामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकू आली नाही.)

**नगरसचिव :-** हात वर करायचे आहेत. कृपा करून वोटींग आहे. सहकार्य करावे ही विनंती. एकच हात वर करा आणि उंच हात वर करा.

**श्री.प्रशांत नाईक :-** याची दखल निवडणुक आयोग घेईल बर का ? गोराणेसाहेब याची दखल निवडणुक आयोग घेईल.

**नगरसचिव :-** आदरणिय कैलास आप्पा सोनवणे यांनी मांडलेल्या प्रस्तावाच्या बाजुने आहे. पुढील सदस्यांनी हात वर केलेला आहे. सुरेशभाऊ सोनवणे त्यानंतर धिरजभाऊ , अश्विनभाऊ , दत्तुभाऊ कोळी , जितेंद्रभाऊ मराठे त्यानंतर विजयभाऊ पाटील , मागे हात वर करा जर कोणाला मतदान करायचे असेल , हसीनाबी शरीफ , ढेकळेदादा , अमितभाऊ काळे , विश्वनाथ खडके ,

(सभागृहात सदस्यांची आपआपसात चर्चा सुरु होती. त्या चर्चेच्या आवाजामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकू आली नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** मयुर कापसे , लावा तुम्ही टाईम लावा.

(सभागृहात सदस्यांची आपआपसात चर्चा सुरु होती. त्या चर्चेच्या आवाजामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकू आली नाही.)

**नगरसचिव :-** मयुर कापसे

**श्री. प्रशांत नाईक :-** निवडणुक प्रक्रीया होईपावेतो हात वरती करा.

(सभागृहात सदस्यांची आपआपसात चर्चा सुरु होती. त्या चर्चेच्या आवाजामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकू आली नाही.)

**नगरसचिव :-** डॉ.चंद्रशेखर पाटील, चेतना चौधरी, तायडे सुरेखा नितीन . बंद करा ते गेट आता

**श्री.कैलास सोनवणे :-** वानखेडेताई पण आहेत . हात वर करा ताई

(सभागृहात सदस्यांची आपआपसात चर्चा सुरु होती. त्या चर्चेच्या आवाजामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकू आली नाही.)

**नगरसचिव :-** भारतीताई सोनवणे

**श्री.कैलास सोनवणे :-** त्या वानखेडेताई राहील्या आहे साहेब घेतले का .

**नगरसचिव :-** हो घेतले घेतले , बेंडाळे उज्वला,सिमा भोळे ,

**सौ.भारती सोनवणे :-** सह्या घेवुन टाका ना सगळयांच्या

(सभागृहात सदस्यांची आपआपसात चर्चा सुरु होती. त्या चर्चेच्या आवाजामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकू आली नाही.)

**श्री.प्रशांत नाईक :-** गोराणेसाहेब सह्या घेवुन टाका नाहीतर सगळयांच्या

**श्री.कैलास सोनवणे :-** काही गरज नाहीये सह्यांची

(सभागृहात सदस्यांची आपआपसात चर्चा सुरु होती. त्या चर्चेच्या आवाजामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकू आली नाही.)

**श्री.अश्विन सोनवणे :-** प्रशांत तु शांत बस बाबा.

(सभागृहात सदस्यांची आपआपसात चर्चा सुरु होती. त्या चर्चेच्या आवाजामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकू आली नाही.)

**नगरसचिव :-** याठिकाणी सन्मा.सदस्य. कैलास आप्पा सोनवणे यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे. त्यांच्या बाजुने ज्या सन्मा.सदस्यांनी मतदान केले आहे त्यांचे नांव मी वाचुन दाखवतो.

**श्री.कैलास सोनवणे :-** झाले आहे आता काही गरज नाहीये वाचायची.

(सभागृहात सदस्यांची आपआपसात चर्चा सुरु होती. त्या चर्चेच्या आवाजामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकू आली नाही.)

**नगरसचिव :-** नाही नाही आप्पासाहेब , मध्ये मध्ये कृपा करून मध्ये बोलु नका .

(सभागृहात सदस्यांची आपआपसात चर्चा सुरु होती. त्या चर्चेच्या आवाजामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकू आली नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** वाचा वाचा

**नगरसचिव :-** सोनवणे भारती कैलास ,

(सभागृहात सदस्यांची आपआपसात चर्चा सुरु होती. त्या चर्चेच्या आवाजामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकू आली नाही.)

**नगरसचिव :-** कृपया बोलु नका . सोनवणे भारती कैलास , चौधरी चेतना किशोर , सोनवणे मुकुंदा भागवत,काळे अमित पांडुरंग , ॲड . हाडा शुचिता अतुलसिंह, सोनवणे धिरज मुरलीधर , भोळे सिमा सुरेश, काळे दिपमाला मनोज , सोनवणे अश्विन शांताराम, पाटील चंद्रशेखर शिवाजी, कापसे मयुर चंद्रकांत , पाटील विजय पुंडलिक, बेंडाळे उज्वला मोहन, राणे गायत्री इंद्रजित, तायडे सुरेखा नितीन , मराठे जितेंद्र भगवान,सोनवणे अजंनाबाई प्रभाकर,ढेकळे सदाशिव गणपत, सोनवणे रंजना विजय , खडके विश्वनाथ सुरेश, खान रूखसाना बी गबलु, कोळी दत्तात्रय देवराम, सपकाळे रंजना भरत, सोनवणे सुरेश माणिक, बारी शोभा दिनकर, शेख हसीनाबी शरीफ

(सभागृहात सदस्यांची आपआपसात चर्चा सुरु होती. त्या चर्चेच्या आवाजामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकू आली नाही.)

(मा.उपमहापौर सो हे नगरसचिव यांचेशी चर्चा करीत होते . परंतू सभागृहातील सन्मा.सदस्यांच्या सुरू असलेल्या चर्चेमुळे चर्चा व आवाज स्पष्ट ऐकू आला नाही)

(यावेळी नगरसचिव यांनी गणनापत्रक तपासले , नगरसचिव विभागातील शिपाई श्री.अर्जुन चौधरी यांनी नगरसचिव यांना सांगीतले की आपण पुकारलेल्या नावांमध्ये सोनार रंजना विजय ऐवजी आपण सोनवणे रंजना विजय असे पुकारलेले आहे. )

**नगरसचिव :-** हो सोनार रंजना विजय आहेत. टोटल २६ वोटींग आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** २७ आहेत का ?

(सभागृहात सदस्यांची आपआपसात चर्चा सुरु होती. त्या चर्चेच्या आवाजामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकू आली नाही.)

**श्री.अश्विन सोनवणे :-** २७ आहेत आम्ही मोजले आहेत.

**श्री.कैलास सोनवणे :-** २७ आहेत

**नगरसचिव :-** आता ही जी यादी वाचली त्याच्या व्यतिरीक्त कुणाचे नांव बाकी आहे का ? आता मी जे नांव वाचले त्याच्यापैकी ,

(सभागृहात सदस्यांची आपआपसात चर्चा सुरु होती. त्या चर्चेच्या आवाजामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकू आली नाही. यावेळी नगरसचिव यांनी पुनश्च गणनापत्रकाची बेरीज केली)

**नगरसचिव :-** २६ आहेत कैलास आप्पा यांचा जो प्रस्ताव मांडला आहे त्याच्याबाजुने २६ मत पडलेले आहेत.

(व्यासपिठावर मा.महापौर,मा.उपमहापौर , मा.आयुक्त व नगरसचिव यांनी चर्चा केली तसेच मा.आयुक्त यांनी नगरसचिव यांना सुचना केली परंतू सदर सुचना सभागृहात निर्माण झालेल्या आवाजामुळे स्पष्ट ऐकु येत नाही.)

**नगरसचिव :-** आता कैलास आप्पा यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे त्याच्या विरोधात ज्यांना मतदान करायचे आहे त्यांनी वर हात करायचे आहेत.

(सभागृहात सदस्यांची आपआपसात चर्चा सुरु होती. त्या चर्चेच्या आवाजामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकू आली नाही.)

**नगरसचिव :-** कृपया शांतता ठेवा , विनंती आहे सन्मा. सभागृहाला

(सभागृहात सन्मा.सदस्य श्री.कैलास सोनवणे यांनी मांडलेल्या सुचनेच्या विरूध्द असलेल्या सदस्यांनी हात वर केले . तदनंतर नगरसचिव कार्यालयातील गणक श्री. प्रकाश सोनवणे यांनी सन्मा.सदस्यांची ओळख करून देणेसाठी श्री. अर्जुन चौधरी शिपाई कर्मचारी यांचे मदतीने ओळख करून मतदानाच्या गणनापत्रकावर ज्या सदस्यांचे हात वर होते त्यांचे नावासमोर पेनाने गणनापत्रकात खुणा केल्या.)

(सभागृहात सदस्यांची आपआपसात चर्चा सुरु होती. त्या चर्चेच्या आवाजामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकू आली नाही.)

**श्री.अश्विन सोनवणे :-** हो ना टाईमपास होतोय.

(सभागृहात सदस्यांची आपआपसात चर्चा सुरु होती. त्या चर्चेच्या आवाजामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकू आली नाही.)

**नगरसचिव :-** कृपया दोन मिनिंट भाऊ सहकार्य करा.

(सदर मतदान सुरू असतांना सभागृहात सन्मा.सदस्य श्री.विष्णु भंगाळे हे उपस्थित झाले.)

(सभागृहात सदस्यांची आपआपसात चर्चा सुरु होती. त्या चर्चेच्या आवाजामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकू आली नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** झाले का आमचे पण येताहेत. चला लवकर करा.

**सौ.भारती सोनवणे :-** झाल का मतदान ?

(सभागृहात सदस्यांची आपआपसात चर्चा सुरु होती. त्या चर्चेच्या आवाजामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकू आली नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** मतदानाची पध्दत असते ही

(सभागृहात सदस्यांची आपआपसात चर्चा सुरु होती. त्या चर्चेच्या आवाजामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकू आली नाही.)

**नगरसचिव :-** हात वर करा , कृपया हात वर करा , बाजुला होवुन जा तुम्ही पत्रकार बंधुंनो बाजुला व्हा प्लीज वोटींग चालु आहे म्हणुन

**श्री.प्रशांत नाईक :-** नाव घ्याना हो साहेब

**श्री.विशाल त्रिपाठी :-** करा लवकर लवकर गोराणे साहेब इतके हळु हळु नका करू.

(सभागृहात सदस्यांची आपआपसात चर्चा सुरु होती. त्या चर्चेच्या आवाजामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकू आली नाही.)

**श्री.प्रशांत नाईक :-** निवडणुक प्रक्रीया सुरू आहे.

**नगरसचिव :-** या नंतर मी कैलास आप्पांनी जो प्रस्ताव मांडलेला होता , सर्व सन्मा सदस्यांना विनंती आहे की खाली हात करायचे आहेत. त्यांच्या ठरावाच्या विरूध्द ज्यांनी वोटींग केलेली आहे त्यांचे नांव वाचुन दाखवतो.

**नगरसचिव :-** भंगाळे विष्णु रामदास ,

(सभागृहात प्रचंड गोंधळ निर्माण झाला. सभागृहात सदस्यांची चर्चा सुरु होती. सभागृहातील आवाजामुळे व निर्माण झालेल्या गोंधळामुळे आवाज व चर्चा स्पष्ट ऐकू आली नाही.)

**नगरसचिव :-** (नगरसचिव यांनी नांव उच्चारलेले आहे परंतू सभागृहातील गोंधळामुळे नांव स्पष्ट ऐकू आले नाही)

(सभागृहात सदस्यांची आपआपसात चर्चा सुरु होती. त्या चर्चेमुळे व आवाजामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकू आली नाही.)

**नगरसचिव :-** लढ्ढा नितीन बालमुकुंद , जोशी अनंत हरिश्चंद्र

(काही सन्मा.सदस्यांनी सभागृहात घोषणाबाजी करण्यास सुरूवात केली.)

(यावेळी सभागृहात प्रचंड गोंधळ निर्माण झाला. त्यामुळे संपुर्ण सभागृहात कोणतीही चर्चा स्पष्ट ऐकू आली नाही.)

**मा.उपमहापौर :-** सर्वांनी शांतता ठेवायची आहे. मतदानाची नावे पुकारली जात आहेत. मतदान प्रक्रीया चालु आहे.

**नगरसचिव :-** महाजन सुनिल सुपडू , महाजन जयश्री सुनिल , हॅलो वोटींग झालेले आहे. वोटींग , वोटींग

(सभागृहात प्रचंड गोंधळ निर्माण झाला. सभागृहात सदस्यांची चर्चा सुरु होती. त्या आवाजामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकू आली नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** वोटींग झालेले आहे ना

(काही सन्मा.सदस्य व्यासपिठावर व व्यासपिठावरुन खाली येवुन थांबले व व्यासपिठावर सभागृहात प्रचंड गोंधळ निर्माण झाला. सन्मा.सदस्या .सौ.काळे रेश्मा कुंदन यांनी सभागृहात प्रवेश केला व येवुन सभागृहात उभे राहीले. )

**श्री.प्रशांत नाईक :-** गोराणे साहेब , गोराणे साहेब

**श्री.धिरज सोनवणे :-** वोटींग झालेले आहे ना , मतदान झालेले आहे.

(सभागृहात व्यासपिठावर चर्चा करायला आले व व्यासपिठावर श्री.कैलास सोनवणे , ॲड . शुचिता हाडा , श्री.विष्णु भंगाळे ,श्री. धिरज सोनवणे , श्री. जितेंद्र मराठे , श्री.सुरेश सोनवणे , श्री. प्रशांत नाईक व सौ.काळे रेश्मा , यांनी चर्चा केली तसेच व सभागृहात प्रचंड गोंधळ निर्माण झाला . तसेच सभागृहात काही सदस्य उभे राहीले. सदर निर्माण झालेल्या गोंधळामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकु आली नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** वोटींग झालेले आहे ना

**श्री.सुरेश सोनवणे :-** मतदान संपले आहे.

**ॲड . शुचिता हाडा :-** भाऊ हे काय चालु आहे.

**मा.उपमहापौर :-** ताई मतदान प्रक्रीया चालु आहे. जे सदस्य आहेत.

**श्री.प्रशांत नाईक :-** प्रक्रीया चालु आहे ज्या सदस्या आहेत.

(सभागृहात प्रचंड गोंधळ निर्माण झाला . सदर निर्माण झालेल्या गोंधळामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकु आली नाही.)

**श्री.धिरज सोनवणे :-** वोटींग झालेले आहे ना

**श्री.कैलास सोनवणे :-** मतदान झालेले आहे आता ,वोटींग झालेले आहे ना चला

(सभागृहात पुन्हा गोंधळ निर्माण झाला . सदर निर्माण झालेल्या गोंधळामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकु आली नाही.)

**मा.आयुक्त :-** गोराणे (सभागृहातील गोंधळामुळे आवाज व चर्चा स्पष्ट ऐकु आली नाही) घेवु नका पब्लिश करून टाका.

(मा.महापौर, मा.उपमहापौर,मा.आयुक्त व नगरसचिव यांनी आपआपसात एकत्रित चर्चा केली.)

(सभागृहात प्रचंड गोंधळ निर्माण झाला . सदर निर्माण झालेल्या गोंधळामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकु आली नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** डिक्लिअर करा.

**नगरसचिव :-** भंगाळे विष्णु रामदास , लढ्ढा नितीन बालमुकुंद ,

(नगरसचिव यांनी नगरसचिव कार्यालयातील गणक श्री. प्रकाश सोनवणे व श्री. अर्जुन चौधरी शिपाई यांना स्टेजवर बोलविले व त्यांनी नावांची खात्री केली.)

**मा.महापौर :-** बसुन घ्या सगळयांनी

**नगरसचिव :-** जोशी अनंत हरिश्चंद्र , महाजन सुनिल सुपडू , महाजन जयश्री सुनिल, नाईक प्रशांत सुरेश.

(सभागृहात प्रचंड गोंधळ निर्माण झाला. सदर निर्माण झालेल्या गोंधळामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकु आली नाही.)

**मा.महापौर :-** सगळयांनी शांतता ठेवायची आहे.

**नगरसचिव :-** पटेल ईब्राहीम मुसा , सोनवणे विक्रम किसन

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौर ताई

**मा.महापौर :-** प्रशांतभाऊ तुम्ही शांत बसा , बाकीचेपण बसतील.

(सभागृहात प्रचंड गोंधळ निर्माण झाला . सदर निर्माण झालेल्या गोंधळामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकु आली नाही.)

**नगरसचिव :-** नेरकर सरिता अनंत,पोकळे दिलीप बबनराव, दारकुंडे नवनाथ विश्वनाथ,बाविस्कर किशोर रमेश , सनकत चेतन गणेश , सचिन भिमराव पाटील,पाटील कुलभुषण विरभान, भिल पार्वताबाई दामु,कोल्हे सिंधु विजय,

(मा.उपमहापौर व नगरसचिव व नगरसचिव कार्यालयाकडील गणक श्री.प्रकाश सोनवणे व श्री.अर्जुन चौधरी शिपाई यांच्यात चर्चा झाली.)

**सौ.ज्योती चव्हाण :-** माझे नांव नाही आले.

(सभागृहात सदस्यांची आपआपसात चर्चा सुरु होती. त्या चर्चेमुळे व आवाजामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकू आली नाही.)

**नगरसचिव :-** कोल्हे ललीत विजय, चव्हाण ज्योती बाळासाहेब , पाटील रेखा चुडामण, सोनवणे सुरेखा सुदाम , आहुजा मनोज नारायणदास.

**मा.उपमहापौर :-** काळे रेश्मा यांचे नांव घ्याना.

**श्री.कैलास सोनवणे :-** मतदान प्रक्रीयेमध्ये भाग घेवु नका उपमहापौर , त्यांना करू द्या.

(मा.महापौर व मा.उपमहापौर यांची आपसात चर्चा सुरू होती.)

**नगरसचिव :-** बागवान रियाज अहमद अब्दुल करीम, देशमुख सुन्नाबी राजु,शेख सईदा युसुफ

**मा.उपमहापौर :-** रेश्मा काळे बाकी आहे रेश्मा काळे

**मा.उपमहापौर :-** साहेब रेश्मा काळे

(मा.उपमहापौर हे मा.आयुक्त यांचेशी बोलत असतांना सभागृहात सन्मा.सदस्यांची चर्चा सुरू होती. सदर चर्चेमुळे निर्माण झालेल्या आवाजामुळे चर्चा व आवाज स्पष्ट ऐकायला आला नाही . नगरसचिव यांनी मतदान गणनापत्रकाची तपासणी करीत होते.)

**श्री.कैलास सोनवणे :-** (सभागृहात निर्माण झालेल्या गोंधळामुळे चर्चा व आवाज स्पष्ट ऐकायला आला नाही.) खंडीत कसे काय करताहेत तुम्ही

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मतदानाची घोषणा करा सरळ सरळ

**श्री.ललीत कोल्हे :-** करतील ना , करतील ना आप्पा ते

(सभागृहात सदस्यांची आपआपसात चर्चा सुरु होती. त्या चर्चेमुळे व आवाजामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकू आली नाही व नगरसचिव मतदान केलेल्या सदस्यांची बेरीज करीत होते. व सर्व गणना झाल्यानंतर नगरसचिव यांनी मा.महापौर,मा.उपमहापौर यांचेशी चर्चा केली तसेच व्यासपिठावर मा.महापौर, मा.उपमहापौर , नगरसचिव यांनी चर्चा केली.)

**नगरसचिव :-** २६ मत बाजुने आहेत आणि २५ मत विरूध्द आहेत.

**मा.उपमहापौर :-** रेश्मा काळे यांच घेतल का ?

**श्री.कैलास सोनवणे :-** निर्णय द्या . निर्णय लवकर

(व्यासपिठावर मा.महापौर, मा.उपमहापौर, नगरसचिव यांनी चर्चा केली. गणनापत्रक मा.महापौर तथा पिठासीन अधिकारी यांचेकडेस घोषणा करणेसाठी सुपुर्द केले. त्यानंतर मा.महापौर तथा पिठासीन अधिकारी यांनी गणनापत्रकातील मतदानाची तपासणी केली व त्यांनी बेरीज केली)

(सभागृहातील गोंधळामुळे चर्चा व आवाज स्पष्ट ऐकु आला नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** डिक्लिअर करा , नगरसचिव डिक्लिअर करा.

(नगरसचिव यांनी मा.महापौर यांचेकडेस ठरावाच्या विरोधात झालेल्या मतदानाचे गणनापत्रक मा.महापौर तथा पिठासीन अधिकारी यांचेकडेस सुपूर्द केले व मा.महापौर तथा पिठासीन अधिकारी व मा.उपमहापौर यांनी सदर गणनापत्रक तपासले व बेरीज केली.)

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई मतदान बरोबर झाले आहे ना.

(सभागृहात सदस्यांची आपआपसात चर्चा सुरु होती. त्या चर्चेमुळे व आवाजामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकू आली नाही.)

**मा.उपमहापौर :-** शांतता ठेवा.

(मा.महापौर व मा.उपमहापौर यांनी खात्री करणेकामी गणनापत्रक नगरसचिव यांचेकडेस दिले.(सभागृहातील गोंधळामुळे आवाज स्पष्ट येत नसल्यामुळे ऐकु येत नाही. मा.उपमहापौर हे नगरसचिव यांचेशी चर्चा करीत होते. व यावेळी नगरसचिव यांनी गणनापत्रक तपासले.)

**श्री.कैलास सोनवणे :-** हे मतदान झाले आहे डिक्लिअर करा . बोगस मतदान बाद करा.

(सभागृहात सदस्यांची आपआपसात चर्चा सुरु होती. त्या चर्चेमुळे व आवाजामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकू आली नाही.)

**मा.उपमहापौर :-** व्हिडीओ शुटींग, व्हिडीओ शुटिंग करा. व्हिडीओ शुटींग वरून करा ना तुम्ही (सभागृहातील गोंधळामुळे आवाज व चर्चा स्पष्ट येत नसल्यामुळे ऐकु आली नाही.)

(मतदानाचे गणनापत्रक नगरसचिव कार्यालयातील गणक श्री.प्रकाश सोनवणे यांचे हातात होते. यावेळी नगरसचिव यांनी खात्री करणेसाठी गणक व शिपाई कर्मचारी यांचेशी चर्चा केली. तसेच यावेळी सन्मा.सदस्य.श्री.कैलास सोनवणे व्यासपिठावर आले.)

**श्री.कैलास सोनवणे :-** आता याच्यामध्ये एकही मतदान होणार नाही तुम्ही डिक्लिअर करा , २६/२४ काय आहे ते डिक्लिअर करा.

**मा.उपमहापौर :-** आप्पा २६/२६ आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** काही २६/२६ नाहीये . डिक्लिअर करा. २४ आहे काही २६/२६ नाहीये

**मा.उपमहापौर :-** आप्पा २६/२६ आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** कशाला २६/२६ आहे. डिक्लिअर करा. तुम्ही ईतक्या येड्या घालु नका गोराणे साहेब हा तुम्ही येड्या घालता आहेत. डिक्लिअर करा तुम्ही

**नगरसचिव :-** नाही आप्पा

(नगरसचिव हे गणक श्री.प्रकाश सोनवणे व श्री.अर्जुन चौधरी शिपाई कर्मचारी यांचेशी चर्चा करीत होते व सभागृहात व्यासपिठावर मा.महापौर, मा.उपमहापौर व आयुक्त साहेब हे आपसांत चर्चा करीत होते)

**श्री.कैलास सोनवणे :-** डिक्लिअर करा. आता याच्यामध्ये एकपण मतदान होणार नाही .प्रक्रीया पुर्ण झाली आहे. तुम्ही डिक्लिअर करा.

**मा.उपमहापौर :-** आप्पा थांबा ना

**श्री.कैलास सोनवणे :-** प्रक्रीया पुर्ण झाली आहे. तुम्ही डिक्लिअर करा.

**मा.उपमहापौर :-** तुम्ही बसा महापौर डिक्लिअर करतील.

**श्री.कैलास सोनवणे :-** काऊंटिंग चालु झाली आहे. आम्ही काहीच ऐकणार नाही. तुम्ही जर चुकीचं केल नगरसचिव तर विचार करजा.

**मा.उपमहापौर :-** बिलकुल बिलकुल

**श्री.कैलास सोनवणे:-**जे आहे ते हे मतदान झाले आहे तुमची काऊंटींग चालु आहे.काऊंटींग नंतर मतदान होत का ?

**मा.उपमहापौर :-** मतदान कुठे करता आहे पण.

**श्री.कैलास सोनवणे :-** काही गरज नाही.

**मा.उपमहापौर :-** मतदान करतच नाहीये आप्पा

**श्री.कैलास सोनवणे :-** डिक्लिअर करा तुम्ही हे सगळ रेकॉर्डींग झालेले आहे. तुम्ही जे काय करता आहे ते.

**मा.उपमहापौर :-** हो हो आप्पा

**श्री.कैलास सोनवणे :-** डिक्लिअर करा.

**मा.उपमहापौर :-** १०० टक्के

(सभागृहात सदस्यांची आपआपसात चर्चा सुरु होती. त्या चर्चेच्या आवाजामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकू आली नाही.)

(नगरसचिव यांनी खात्री करणेसाठी गणक व शिपाई कर्मचारी यांचेशी चर्चा केली.)

(सभागृहात व्यासपिठावर मा.महापौर, मा.उपमहापौर व आयुक्त साहेब व नगरसचिव हे आपसांत चर्चा करीत होते. परंतू सभागृहातील सन्मा.सदस्य आपआपसात चर्चा करीत होते त्या चर्चेमुळे निर्माण झालेल्या आवाजामुळे आवाज व चर्चा स्पष्ट ऐकु आली नाही )

**श्री.कैलास सोनवणे :-** नगरसचिव डिक्लिअर करा.

(यावेळी सभागृहात प्रचंड गोंधळ निर्माण झाला.)

(सन्मा.सदस्य श्री.कैलास सोनवणे व्यासपिठावर चर्चा करण्यासाठी आले व चर्चा केली. परंतू सभागृहातील प्रचंड गोंधळामुळे स्पष्ट आवाज ऐकू आला नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** मग डिक्लिअर करा ना मग. समर्थक आणि विरोधक

(सन्मा.सदस्या. चौधरी मंगला संजय या चर्चा करणेसाठी व्यासपिठावर आल्या.)

**श्री.कैलास सोनवणे :-** चला ताई बसा आता तुम्ही ,

(सभागृहात व्यासपिठावर मा.महापौर, मा.उपमहापौर व आयुक्त साहेब सन्मा.सदस्य.श्री.कैलास सोनवणे व नगरसचिव यांनी आपसात चर्चा केली व नगरसचिव यांनी गणक यांचेशी चर्चा केली.)

(सभागृहात प्रचंड गोंधळ निर्माण झाला. गोंधळामुळे स्पष्ट आवाज व चर्चा ऐकू आली नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** हे सगळ रेकॉर्डींग झालेले आहे आपले , तुम्ही जे नांव घेतलेले आहेत ते रेकॉर्डींग झालेले आहे.

(सभागृहात व्यासपिठावर मा.महापौर, मा.उपमहापौर व आयुक्त साहेब व नगरसचिव यांनी आपसात चर्चा केली)

**श्री.कैलास सोनवणे :-** रेकॉर्डींग झालेली आहे सगळी

(सभागृहात व्यासपिठावर मा.महापौर, मा.उपमहापौर व आयुक्त साहेब हे आपआपसात चर्चा करीत असतांना सभागृहात स्टेजवर विरोधीपक्ष नेते श्री. सुनिल महाजन त्यांचे सोबत सन्मा.सदस्य.श्री. कैलास सोनवणे मा.महापौर, मा.उपमहापौर व मा.आयुक्त साहेब यांचेशी चर्चा करणेसाठी आले व त्यांनी आपसात चर्चा केली.नगरसचिव यांनी गणक श्री.प्रकाश सोनवणे व श्री.अर्जुन चौधरी शिपाई कर्मचारी यांचेसोबत गणकपत्राबाबत चर्चा केली.)

(सभागृहातील गोंधळामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकु आली नाही.)

**श्री.सुनिल महाजन :-** आप्पा पहिल्यापासुन मध्ये होते ना

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही नाही नाही

**मा.उपमहापौर :-** मनोज आहुजा होते आप्पा

(सन्मा.सदस्य.श्री. अश्विन सोनवणे हे व्यासपिठावर आले.)

**श्री.कैलास सोनवणे :-** रेकॉर्डीग झालेली आहे सगळी , नाही होता. (सभागृहातील गोंधळामुळे स्पष्ट आवाज ऐकु आली नाही.)

(सभागृहात सदस्यांची आपआपसात चर्चा सुरु होती. त्या चर्चेच्या आवाजामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकू आली नाही.)

**श्री.अश्विन सोनवणे :-** आप्पा यांना बोलुन काही फायदा नाही.

(सन्मा.सभागृह नेते श्री. ललीत कोल्हे ,सन्मा.सदस्य.श्री. विष्णु भंगाळे व श्री.दिलीप पोकळे , श्री.जोशी अनंत हे स्टेजवर आले.सभागृहात प्रचंड गोंधळ निर्माण झाला व काही सदस्यांनी घोषणाबाजी करणेस सुरूवात केली.मा.आयुक्त सो यांनी सन्मा.सदस्यांची समजुत घालत आपआपल्या जागेवर बसणेबाबत विनंती केली.)

**श्री.कैलास सोनवणे :-** आयुक्त साहेब डिक्लिअर करा.

**श्री.विष्णु भंगाळे :-** एक मिनिट मला एक सांगा एक विषयाच मतदान आहे. हे काही निवडणुकीच मतदान नाहीये.

(सभागृहातील गोंधळामुळे स्पष्ट आवाज व चर्चा ऐकु आली नाही.)

**श्री.कैलास सोनवणे :-** विष्णुभाऊ चला आता

**श्री.विष्णु भंगाळे :-** सदस्य सभागृहात हजर झाले.

**श्री.कैलास सोनवणे :-** बोलवायचे आहे सगळयांना , सगळयांना बोलवायचे का सांगा.

(सभागृहात प्रचंड गोंधळ निर्माण झाला व व्यासपिठावर असलेले सर्व सन्मा.सदस्यांनी मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.आयुक्त व नगरसचिव यांचेशी चर्चा सुरू केली.) (सभागृहात व्यासपिठावर सन्मा.सदस्य.श्री. कैलास सोनवणे, श्री.विष्णु भंगाळे, विरोधी पक्ष नेते. सुनिल महाजन, सभागृह नेते, श्री.ललीत कोल्हे, श्री. अश्विन सोनवणे ,श्री.धिरज सोनवणे, श्री.अनंत जोशी ,श्री. मयुर कापसे , श्री.जितेंद्र मराठे इ.सदस्य उपस्थित होते.)

**श्री.सुनिल महाजन:-** आप्पा हे सगळ रेकॉर्डीग झालेले आहे ना.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो ना मग

(सभागृहातील निर्माण झालेल्या प्रचंड गोंधळामुळे सभागृहात व्यासपिठावर सुरू असलेल्या चर्चेचा आवाज स्पष्ट ऐकू आला नाही.)

**मा.उपमहापौर :-** अहो साहेब (बोलण्याचा स्पष्ट आवाज आला नाही.)

(मा..उपमहापौर व नगरसचिव आपसात चर्चा करीत होते.)

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई महापौरताई निवडणुक प्रक्रीयेमध्ये जे विघ्न घालताहेत त्यांचे निलंबन करा. महापौरताई .

**मा.उपमहापौर :-** अहो मतदान प्रक्रीया चालु होती तेव्हा

(सभागृहात व्यासपिठावर सन्मा.सदस्य श्री. अनंत जोशी यांनी नगरसचिव यांचेशी चर्चा केली.)

**ॲड. शुचिता हाडा :-** प्रशांत भाऊ , प्रशांतदादा सगळयात जास्त गोंधळ तुमचा आहे तुम्ही आधी बसा.

**श्री.प्रशांत नाईक :-** ताई कामकाजात व्यत्यय येतो ना त्यांना

**ॲड. शुचिता हाडा :-** कशासाठी मतदान प्रक्रीया संपलेली आहे.शांततेत बसा. शांत बसा आता

**श्री.प्रशांत नाईक :-** ताई मनोज आहुजांचे बाकी होते, राखीताई सोनवणे यांचे बाकी होते.

**श्री.दिलीप पोकळे :-** महापौर महोदया, मला एक विषय मांडायचा आहे. महापौर महोदया, माझा या मतदान प्रक्रीयेला आक्षेप आहे. सदरचे जे मतदान झाल ते सभेच्या कामाकाजाप्रमाणे या सभेच्या चार सदस्यांनी जर मागणी केली तरच मतदान घेता येत.येथे कोणत्या कोणत्या सदस्यांनी मागणी केली. दाखवा बर

**श्री.जितेंद्र मराठे :-** अहो उपमहापौरांनीच सांगीतले (सभागृहात निर्माण झालेल्या प्रचंड गोंधळामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकू आली नाही.)

**श्री.दिलीप पोकळे :-** नाही सभागृहातील चार लोकांनी मतदानाची मागणी करायला पाहीजे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** अहो उपमहापौरांनीच सांगीतले (सभागृहात निर्माण झालेल्या प्रचंड गोंधळामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकू आली नाही.)

**श्री.दिलीप पोकळे :-** मला सांगाव नगरसचिवांनी किंवा आयुक्तांनी सांगाव की कोणकोणत्या चार सदस्यांनी मतदानाची मागणी केली.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आता (सभागृहात निर्माण झालेल्या प्रचंड गोंधळामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकू आली नाही.) पोकळे साहेब

**श्री.दिलीप पोकळे :-** माझा या मतदान प्रक्रीयेलाच आक्षेप आहे पुर्णपणे, ही निवडणुक प्रक्रीया राबविलेली आहे (सभागृहात निर्माण झालेल्या प्रचंड गोंधळामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकू आली नाही.) बेकायदेशीर झालेली आहे. पहिले चार सदस्यांनी आक्षेप घ्यायचा आहे. चार सदस्यांनी मतदान प्रक्रीया घ्या असे मांडायचे आहे.सभेच्या कामकाजात स्पष्ट नमुद आहे.

**ॲड. शुचिता हाडा :-** दिलीपभाऊ मतदान प्रक्रीयेला आक्षेप घेत आहात ना मग मतदान प्रक्रीयेत भाग का घेतला तुम्ही,

(सभागृहात निर्माण झालेल्या प्रचंड गोंधळामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकू आली नाही.)

**ॲड. शुचिता हाडा :-** भाग का घेतला

(यावेळी सभागृहात प्रचंड गोंधळ निर्माण झाला)

**श्री.दिलीप पोकळे :-** ही मतदान प्रक्रीया . . (गोधंळामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकू आली नाही.)

**ॲड . शुचिता हाडा :-** (गोधंळामुळे स्पष्ट आवाज ऐकू आला नाही. यावेळी सभागृहात प्रचंड गोंधळ निर्माण झालेला होता.)

**श्री.दिलीप पोकळे :-** चार सदस्यांनी मागणी केल्यानंतरच मतदान घेता येत.

**ॲड . शुचिता हाडा :-** मतदान प्रक्रीयेला आक्षेप घेत आहात ना मग आधी आक्षेप का नाही घेतला.उशिरा सुचल का तुम्हाला

**श्री.दिलीप पोकळे :-** या संपुर्ण मतदान प्रक्रीयेला माझा आक्षेप आहे.

**ॲड . शुचिता हाडा :-** मतदान प्रक्रीयेला आक्षेप घ्यायचा होता तर मतदान प्रक्रीयेत भाग घेण्यापुर्वी घ्यायचा होता. आता मतदान पुन्हा होणार नाही.

**श्री.दिलीप पोकळे :-** हे मतदान पुर्ण बेकायदेशीर झालेले आहे. चार सदस्यांनी मागणी केलेली नाही. हे पुन्हा घेण्यात यावं जर चार सदस्यांनी मागणी केलेली असेल तर त्यांनी नांव सागांवी.

(सभागृहात प्रचंड गोंधळ निर्माण झाला, त्यामुळे सभागृहातील गोंधळामुळे चर्चा व आवाज स्पष्ट ऐकू आला नाही.)

**मा.महापौर :-** सगळयांनी बसुन घ्यायचे आहे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** अध्यक्ष महोदय,

(सभागृहातील गोंधळामुळे सभागृहातील चर्चा व आवाज स्पष्ट ऐकू आला नाही.)

**ॲड . शुचिता हाडा :-** विष्णुभाऊ

**श्री.विष्णु भंगाळे :-** अध्यक्ष महोदय, मी फक्त आपणांस सभागृहात विचारू ईच्छितो मला काही माहिती नाही कारण मी अज्ञान आहे.

(सभागृहातील गोंधळामुळे सभागृहातील आवाज व चर्चा स्पष्ट ऐकू आली नाही.)

**श्री.विष्णु भंगाळे :-** आता जे मतदान झालेले आहे व सभेमध्ये मतदान घ्यायचे असेल तर त्याच्या साठी चार सदस्यांचे अनुमोदन लागते का? याच निरसण करून द्या.

**मा.महापौर :-** (यावेळी गणकांनी तयार केलेले मतदान गणनापत्रक मा.महापौर तथा पिठासीन अधिकारी यांचेकडेस होते.) सगळयांनी शांततेने निर्णय ऐका. प्रस्तावाकडुन आलेले जे मतदान आहे ते मतदान २६ आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** २७ पाहीजे ताई

**मा.महापौर :-** त्याच्यानंतर कैलास आप्पा यांच्या विरूध्द यांनी मांडलेल्या ठरावाच्या विरूध्द आलेले मतदान हे सुध्दा २६ आहे . . .

(मा.पिठासीन अधिकारी यांनी उपरोक्त निर्णय घोषित करतेवेळी सभागृहात सन्मा.सदस्य हे उभे राहीले व त्यावेळेस सभागृहात प्रचंड गोंधळ निर्माण झाला. तसेच बरेच सदस्य सभागृहातील टेबल वाजवित असतांना त्या गोंधळात

सभागृहामध्ये मा.पिठासीन अधिकारी यांनी घोषित केलेला निर्णय स्पष्ट व पुर्ण ऐकु आला नाही. तसेच महासभेचे व्हिडीओ कॅमेराद्वारे करण्यात आलेल्या चित्रिकरणाच्या डि.व्हि.डी मध्ये सुध्दा मा.महापौर तथा पिठासीन अधिकारी यांची वरील निर्णयाची घोषणा पुर्ण ऐकू येत नसल्यामुळे त्यांनी दिलेला निर्णय स्पष्ट ऐकू येत नाही.)

(मा.महापौर तथा पिठासीन अधिकारी हे बोलत असतांना आवाज स्पष्ट ऐकु येत नसल्यामुळे मा.महापौर तथा पिठासीन अधिकारी हे सभागृहात सुरू असलेल्या प्रचंड गोंधळामुळे काय बोलले याचा आवाज सभागृहात ऐकू आला नाही व त्यात स्पष्टता आली नाही. त्यानंतर संपुर्ण सभागृहातील गोंधळातच मा.महापौर तथा पिठासीन अधिकारी व मा.उपमहापौर उभे राहीले. नगरसचिव हे मा.महापौर तथा पिठासीन अधिकारी मा.उपमहापौर यांना विषय क्रं . १६ च्या निर्णयाबाबत तसेच पुढील दोन विषयांबाबत सांगण्याचा प्रयत्न करीत असतांनाच अचानक राष्ट्रगीत सुरू झाल्याने मा.आयुक्त व नगरसचिव तसेच सभागृहातील उपस्थित सर्व सन्मा.सदस्य, अधिकारी / कर्मचारी तात्काळ राष्ट्रगीत साठी उभे राहीले. )

(राष्ट्रगीत झालेनंतर सभागृहात प्रचंड गोंधळ निर्माण झाला व व्यासपिठावरील मतदानाच्या गणनापत्रकाची प्रत टेबलावरुन सन्मा.सदस्यांनी ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला, त्या गोंधळात टेबलावरुन सन्मा.सदस्यांनी गणनापत्रकाची प्रत ओढुन त्याचा कोरा भाग त्या गोंधळात फाडला, परंतु फाडण्यात आलेला कोरा भाग हा जश्याचा तसा मिळाला व त्याप्रमाणे गणनापत्रक टेक्सो टेपने जोडण्यात आलेला आहे.)

(राष्ट्रगीत झाल्यानंतर तात्काळ व्यासपिठावर सन्मा.सदस्य.श्री. कैलास सोनवणे, श्री.जितेंद्र मराठे, श्री.मुकुंदा सोनवणे, विरोधी पक्ष नेते श्री. सुनिल महाजन सन्मा.सदस्या.सौ.बेंडाळे उज्वला, सौ.काळे दिपमाला, सन्मा.सभागृह नेता. श्री.ललीत कोल्हे, श्री.विश्वनाथ खडके, श्री.धिरज सोनवणे, अॅड. शुचिता हाडा, श्री.विक्रम सोनवणे व इतर सन्मा.सदस्य आले.)

(सदर वेळी सभागृहात निर्माण झालेल्या प्रचंड गोंधळामुळे सभागृहात स्पष्ट आवाज ऐकु येत नव्हता. यावेळी सभागृहात पोलिस कर्मचारी उपस्थित होते. यानंतर सुध्दा सभागृहात खुप गोंधळ सुरुच होता. सदर गोंधळातच मा.महापौर तथा पिठासीन अधिकारी व मा.उपमहापौर सभागृहातुन त्यांचे सतराव्या मजल्यावरील कार्यालयात निघुन गेले. त्यानंतर बरेच सन्मा.सदस्य सभागृहातील व्यासपिठाजवळ एकत्र आलेले होते व सभागृहात तसेच व्यासपिठाजवळ बराच वेळ खुपच गोंधळ सुरु होता.)

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ७०७ पारित करण्यात आला.**

असा ठराव पारित करण्यात येतो की, नागरी दलितवस्ती सुधारणा योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.१० अंतर्गत डांबरी रोड, कॉक्रींट रोड, पेव्हींग ब्लॉक बसविणे, पुल व संरक्षण भिंत बांधणे तसेच आर.सी.सी.गटार बांधणे कामी येणारा एकूण खर्च रक्कम रु.४,९९,८०,१२१/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे या प्रस्तावाचे वाचन केले.

सदर विषयांवर सन्मा.सदस्य श्री.कैलास नारायण सोनवणे यांनी पूढील प्रमाणे सूचना मांडली, उपरोक्त प्रस्तावातील ५ करोड रुपयांचे निधीमध्ये २ करोड रुपयांचा मनपा फंड टाकावा व त्यामध्ये सन्मा.सदस्या, प्रतिभा चंद्रकांत कापसे हे सांगतील ते १ कोटींच काम आणि सन्मा.सदस्या,सौ.रंजना भरत सपकाळे त्यांचा एक प्रस्ताव आहे ते १ कोटींचे काम टाकुन नव्याने निविदा काढावी.

सदर प्रस्तावाबाबत सभागृहात सन्मा.सदस्यांनी बरीच चर्चा केली व त्यानंतर पिठासीन अधिकारी यांनी सदर विषयावर मतदान घेणेबाबत निर्देश दिलेत त्यानूसार सन्मा.सदस्य, श्री.कैलास नारायण सोनवणे यांनी मांडलेल्या प्रस्तावाचे बाजूने हात वर करुन मतदान घेण्यात आले. सन्मा.सदस्य श्री.कैलास नारायण सोनवणे यांनी मांडलेल्या प्रस्तावाचे बाजूने २६ सन्मा.सदस्यांनी हात वर करुन आपले मत नोंदविले व गणना पत्रकावर गणकांनी (त्यांचे नांवासमोर बरोबरची अशी टिक मार्क करुन) नोंद घेतली.

तद्नंतर सन्मा.सदस्य श्री.कैलास नारायण सोनवणे यांनी मांडलेल्या सूचनेच्या विरोधात ज्या सन्मा.सदस्यांना मतदान करावयाचे असेल त्या सदस्यांना हात वर करणेबाबत विनंती केली. तद्नंतर २५ सन्मा.सदस्यांनी हात वर करुन आपले मत नोंदविले व गणना पत्रकावर गणकांनी (त्यांचे नांवासमोर बरोबरची अशी टिक मार्क करुन) नोंद घेतली. उपरोक्त मतांची गणनापत्रकातील मतांची नोंदणी केल्यानंतर व मतगणनेची बेरीज करीत असतांना

सन्मा.सदस्या,सौ.रेश्मा कुंदन काळे यांनी मनपा सभागृहात प्रवेश केल्याने त्यांची गणना गणनापत्रकात करण्यात आलेली नाही. त्यानंतर गणनापत्रक पिठासीन अधिकारी यांचेकडेस घोषणा करणे कामी सुपुर्द करण्यात आले व त्यांनी मतगणना पत्रकाची तपासणी केली.

पिठासीन अधिकारी यांनी सन्मा.सदस्या,सौ.रेश्मा कुंदन काळे हे मतदानापासून वंचित राहू नये म्हणून त्यांचे एक मताची मतगणना विषयपत्रिकेवरील प्रशासनाच्या प्रस्तावाचे बाजूने नोंदवुन सभागृहातील सदस्यांना शांततेने निर्णय ऐकण्यास सांगीतले व सन्मा.सदस्य श्री.कैलास नारायण सोनवणे यांनी मांडलेल्या ठरावाचे बाजूने जे मतदान झालेले आहे ते मतदान २६ असल्याचे जाहीर केले त्याच्यानंतर श्री.कैलास नारायण सोनवणे यांनी मांडलेल्या ठरावाचे विरुध्द झालेले मतदान हे सुध्दा २६ आहे असे जाहीर केले मात्र यावेळी सभागृहात प्रचंड गोंधळ निर्माण झाल्याने व सन्मा.सदस्यांनी सभागृहातील वाजविलेल्या टेबलांच्या आवाजामुळे पिठासीन अधिकारी हे पूढे काय बोलल्या याचा स्पष्ट आवाज सभागृहात ऐकु आला नाही तसेच सदर महासभेचे व्हिडीओव्दारे करण्यात आलेल्या चित्रीकरणाच्या डिव्हीडी मध्ये सुध्दा पिठासीन अधिकारी यांची वरील घोषणा पूर्ण ऐकू येत नसल्यामुळे दिलेला निर्णय स्पष्ट होत नाही.

त्यामुळे पिठासिन अधिकारी यांनी सभागृहात घोषीत केलेल्या निर्णयानूसार सन्मा.सदस्य श्री.कैलास नारायण सोनवणे यांनी मांडलेल्या प्रस्तावाच्या व प्रशासनाचे प्रस्तावाचे बाजूने २६ - २६ याप्रमाणे समसमान मत पडल्याने सदरच्या विषयाबाबत कोणताही निर्णय झालेला नसल्याने सभा कामकाजातील विषयांवर निर्णय घेतांना पारदर्शकता राहावी व कोणतीही अनियमितता राहू नये तसेच मतदानापासून कोणीही वंचित राहू नये तसेच सन्मा.सदस्यांमध्ये संभ्रम निर्माण होवू नये म्हणून सदरचा विषय (प्रशासनाचा प्रस्ताव) निर्णयासाठी पूढील महासभेत ठेवण्यात यावा.

अनुकूल मते :- २६ प्रतिकुल मते :- २६ अनिर्णीत

**सही/-**
**(जयश्री सुनिल महाजन)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**